# लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे आशय विश्लेषण : २००७ – २०१४

**तात्त्विक व सामाजिक विद्याशाखेअंतर्गत**

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विद्यानिष्णात (एम. फील.) पदवीसाठी सादर**


**अभ्यासक**

**कु. आरती बाळू येलंगे**

**मार्गदर्शक**

**डॉ. बी. एम. पानगे**

**सहाय्यक ग्रंथपाल, जयकर ग्रंथालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे**

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग**

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**


**ऑगस्ट २०१६**

# अभ्यासकाचे प्रमाणपत्र

मी कु. आरती बाळू येलंगे घोषित करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथून एम. फील. अभ्यासक्रमासाठी ‘‘लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे आशय विश्लेषण : २००७-२०१४ ’’ हा संशोधन शोधनिबंध विषय डॉ. बी. एम. पानगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली पूर्ण केलेला असून सदर शोधनिबंध मी स्वतः तयार केलेला आहे. यातील संशोधन माझे स्वतःचे असून यापूर्वी प्रस्तुत विषयावर संशोधन झालेले नाही याची मी खात्री करून घेतलेली आहे.

स्थळ :

दिनांक : संशोधकाची सही

# मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, कु. आरती बाळू येलंगे यांनी एम. फिल. अभ्यासक्रमांतर्गत "लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे आशयविश्लेषण : २००७-२०१४ " हा संशोधण प्रकल्प विषय माझ्या मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली पूर्ण केला आहे. या विषयावर मी यापूर्वी कोणत्याही विद्यापीठासाठी कुठल्याही विद्यार्थ्याला पर्यवेक्षण व मार्गदर्शन केलेले नाही.

मार्गदर्शक सही

डॉ. बी. एम. पानगे

सहायक ग्रंथपाल,

जयकर ग्रंथालय

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ह्या विद्यापीठाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विद्या निष्णात एम. फील. हा अभ्यासक्रम सुरु करून उच्च शिक्षणाची दारे विद्यार्थ्यांसाठी खुली केली त्यांमुळे उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाल्याबद्दल मी सर्वप्रथम विद्यापीठाची अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधन प्रकल्प सादर करण्यासठी मी जरी परिश्रम  घेतले तरी ते सार्थकी लावण्याचे संपूर्ण श्रेय माझे मार्गदर्शक डॉ. बी. एम. पानगे, सहाय्यक ग्रंथपाल, जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनाच जाते. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळेच माझ्या परिश्रमाला योग्य दिशा व प्रेरणा मिळाली. याकरिता मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालयातील ग्रंथपाल डॉ. धनिष्ठा खंदारे, सौ. यामिनी पंडित, कु. सुजाता हरगुडे यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले तसेच वेळोवेळी ग्रंथालयातील इतर सहकारी, सेवक वर्ग यांचे सहकार्य मिळाले. तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागामधील डॉ. मोहन कांबळे सर या सर्वांच्या सहकार्याने मी सदर विषयाचे संशोधन पूर्ण करू शकले त्यामुळे मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

प्रकल्प पूर्णत्वासाठी माझ्या माहेरच्या कुटुंबीयांनी, तसेच सौ. नंदिनी, कु. सुप्रिया व श्री. मंदार यांनी केलेल्या सहकार्यामुळेच संशोधन प्रकल्पाचे लेखन पूर्णत्वास गेले. याबद्दल त्यांची अत्यंत ऋणी आहे.

कु. आरती बाळू येलंगे

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | **अभ्यासकाचे प्रमाणपत्र** | i. |
| २. | **मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र** | ii. |
| ३. | **ऋणनिर्देश** | iii. |
| ४. | **अनुक्रमणिका** | iv. |
| ५. | **सारणी अनुक्रमणिका** | vii. |
| ६. | **आलेख अनुक्रमणिका** | viii. |
| | **प्रकरण १ संशोधनाची प्राथमिक माहिती** | |
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | संशोधन विषय | ३ |
| १.३ | संशोधन निवडीचा हेतू | ४ |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्टे | ४ |
| १.५ | संशोधनाची गृहीतके | ५ |
| १.६ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | ७ |
| १.७ | संशोधनासाठी नमुना निवड | ७ |
| १.८ | संशोधनासाठी पद्धती | ८ |
| १.९ | माहिती संकलन तंत्रे | ९ |
| १.१० | संशोधनाची व्यावसायिक गरज | ९ |
| | सारांश | १२ |
| | संदर्भ | १३ |
| | **प्रकरण २ पुर्वसाहीत्याचा अभ्यास** | |
| २.१ | प्रस्तावना | १३ |
| २.२ | शोधप्रबंध | १३ |
| २.३ | शोधप्रबंधिका | १३ |
| २.४ | ग्रंथालय आणि महितीशास्त्रातील भारतीय  नियतकालिके | १४ |
| २.५ | "लायब्ररी हेराल्ड" नियतकालिका संबंधीत लेख | १६ |
| २.६ | इतर नियतकालिकांचे बिब्लिओग्राफीक विश्लेषण | १८ |

| | | |
|---|---|---|
| २.७ | इतर विषयांसंबंधीत नियतकालिकांचे आशय विश्लेषण | २० |
| २.८ | इतर विषयांचे आशय विश्लेषण | २० |
| २.९ | ग्रंथ (पुस्तके) | २८ |
| २.१० | पॉवर पॉइन्ट सादरीकरण | २८ |
| | सारांश | २९ |
| | संदर्भ | ३० |
| | **प्रकरण ३ आशय विश्लेषण** | |
| ३.१ | आशय विश्लेषण | ३३ |
| ३.१.१ | आशय विश्लेषणाच्या व्याख्या | ३६ |
| ३.२ | आशय विश्लेषणाची उद्दिष्टे | ३७ |
| ३.३ | आशय विश्लेषणतंत्राचे महत्त्व | ३८ |
| ३.४ | आशय विश्लेषणाची गरज | ३९ |
| ३.५ | आशय विश्लेषणाच्या पायऱ्या | ४० |
| ३.६ | आशय विश्लेषणाचा इतिहास | ४१ |
| ३.७ | आशय विश्लेषण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या आज्ञावली | ४२ |
| | सारांश | ४२ |
| | संदर्भ | ४३ |
| | **प्रकरण ४ लायब्ररी हेराल्ड या ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नियतकालिकाचे आशय विश्लेषण** | |
| ४.१ | लायब्ररी हेराल्ड विषयी | ४८ |
| ४.२ | लायब्ररी हेराल्ड नियतकालिकातील आशय विश्लेषण | ४९ |
| ४.२.१ | शोधनिबंधांची संख्यात्मक निर्मिती | ५० |
| ४.२.१.१ | २००७ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ५१ |
| ४.२.१.२ | २००८ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ७० |
| ४.२.१.३ | २००९ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ८२ |
| ४.२.१.४ | २०१० या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ९२ |

| | | |
|---|---|---|
| ४.२.१.५ | २०११ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १११ |
| ४.२.१.६ | २०१२ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १२७ |
| ४.२.१.७ | २०१३ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १४० |
| ४.२.१.८ | २०१४ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १५७ |
| ४.२.२ | विशेष अंक आणि सर्वसाधारण अंक | १७५ |
| ४.२.३ | शोधनिबंधांची लांबी | १७५ |
| ४.२.४ | लेखांचे विश्लेषण | १७७ |
| ४.२.५ | लेखक योगदान विश्लेषण | १७८ |
| ४.२.६ | अग्रेसर लेखक | १८० |
| ४.२.७ | मुख्य विषय पैलू | १८१ |
| ४.२.७.१ | ग्रंथालयाच्या प्रकारानुसार लेखांचे विश्लेषण | १८२ |
| ४.२.७.२ | ग्रंथालयातील सेवा, वाचनसाहित्य आणि संबंधित ग्रंथपालन व्यवसाय | १८३ |
| ४.२.७.३ | ग्रंथालयाच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक | १८४ |
| ४.२.७.४ | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान विषयाचे विश्लेषण | १८५ |
| ४.२.७.५ | ग्रंथसूचीय परीक्षण, उल्लेख निर्देश याविषयीची माहिती | १८६ |
| ४.२.८ | देशांप्रमाणे विश्लेषण | १८८ |
| | सारांश | १८८ |
| | संदर्भ | १८९ |
| | **प्रकरण ५ निष्कर्ष व शिफारशी** | |
| ५.१ | प्रास्ताविक | १९२ |
| ५.२ | निष्कर्ष | १९२ |
| ५.३ | शिफारशी | १९४ |
| ५.४ | पुढील संशोधनाची दिशा | १९५ |
| | संदर्भ सूची | १९७ |

# सारणी अनुक्रमणिका


| क्र. | सारणीचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | शोधनिबंधांची संख्यात्मक निर्मिती | ५० |
| १.१ | २००७ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ५१ |
| १.२ | २००८ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ७० |
| १.३ | २००९ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ८२ |
| १.४ | २०१० या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ९२ |
| १.५ | २०११ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १११ |
| १.६ | २०१२ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १२७ |
| १.७ | २०१३ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १४० |
| १.८ | २०१४ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १५७ |
| २. | विशेष अंक आणि सर्वसाधारण अंक | १७५ |
| ३. | शोधनिबंधांची लांबी | १७५ |
| ४. | लेखांचे विश्लेषण | १७७ |
| ५. | लेखक योगदान विश्लेषण | १७८ |
| ६. | लेखक योगदान विश्लेषण | |
| ७. | अग्रेसर लेखक | १८० |
| ८. | मुख्य विषय पैलू | १८१ |
| ८.१ | ग्रंथालयाच्या प्रकारानुसार लेखांचे विश्लेषण | १८२ |
| ८.२ | ग्रंथालयातील सेवा, वाचनसाहित्य आणि संबंधित ग्रंथपालन व्यवसाय | १८३ |
| ८.३ | ग्रंथालयाच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक | १८४ |
| ८.४ | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान विषयाचे विश्लेषण | १८५ |
| ८.५ | ग्रंथसूचीय परीक्षण, उल्लेख निर्देश याविषयीची माहिती | १८६ |
| ९. | देशांप्रमाणे विश्लेषण | १८८ |

# आलेख अनुक्रमणिका


| क्र. | आलेख नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | शोधनिबंधांची संख्यात्मक निर्मिती | ५० |
| २. | २००७ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ५१ |
| ३. | २००८ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ७० |
| ४. | २००९ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ८२ |
| ५. | २०१० या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ९२ |
| ६. | २०११ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १११ |
| ७. | २०१२ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १२७ |
| ८. | २०१३ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १४० |
| ९. | २०१४ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १५७ |
| १०. | लेखांचे विश्लेषण | १७७ |
| ११. | लेखक योगदान विश्लेषण | १७८ |
| १२. | ग्रंथालयाच्या प्रकारानुसार लेखांचे विश्लेषण | १८२ |
| १३. | ग्रंथालयातील सेवा, वाचनसाहित्य आणि संबंधित ग्रंथपालन व्यवसाय | १८३ |
| १४. | ग्रंथालयाच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक | १८४ |
| १५. | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान विषयाचे विश्लेषण | १८५ |
| १६. | ग्रंथसूचीय परीक्षण, उल्लेख निर्देश याविषयीची माहिती | १८६ |
| १७. | देशांप्रमाणे विश्लेषण | १८८ |

# प्रकरण १ संशोधनाची प्राथमिक माहिती


| क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | संशोधन विषय | ३ |
| १.३ | संशोधन निवडीचा हेतू | ४ |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्टे | ४ |
| १.५ | संशोधनाची गृहीतके | ५ |
| १.६ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | ६ |
| १.७ | संशोधनासाठी नमुना निवड | ७ |
| १.८ | संशोधनासाठी पद्धती | ८ |
| १.९ | माहिती संकलन तंत्रे | ९ |
| १.१० | संशोधनाची व्यावसायिक गरज | ९ |
| | सारांश | १२ |
| | संदर्भ | १३ |

## १.१ प्रास्ताविक

सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवाला सतत नवीन तंत्रज्ञानाची, नवीन संकल्पनांची माहिती करून घ्यावी लागते. अद्ययावत माहितीद्वारे मानवाला आपली प्रगती साधता येते.

मानव इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे. मानवाला लेखन कला अवगत झाल्यावर त्याने आपले विचार, ज्ञान, अनुभव एकत्रित करून संग्रहित केले. अशा प्रकारे ज्ञान संग्रहित करण्यासाठी मानव लिखित, मुद्रित स्वरूपातील साधने वापरतो. यामध्ये प्रामुख्याने ग्रंथ आणि नियतकालिकांचा वापर मानव करतो. अशा प्रकारच्या पारंपारिक साधनांमध्ये तर वाढ होतच आहे. परंतु माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आधुनिक साधनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. आधुनिक साधनांमध्ये प्रामुख्याने ई-स्रोत म्हणजेच ऑनलाईन नियतकालिके, ग्रंथ, डेटाबेसेस, शोधनिबंध यांचा समावेश होतो.

ग्रंथपालन क्षेत्रात वाचनसाहित्याच्या दोन पैलूंबाबत संशोधन केले जाते. वाचन साहित्याचे बाह्य स्वरूप आणि वाचनसाहित्यातील आशय. वाचन साहित्य तयार करण्यासाठी वापरलेले साहित्य, ग्रंथांची बांधणी, आकार, वेष्टन या बाह्य वैशिष्ट्यांबाबत ग्रंथपालनामध्ये संशोधन झाले आहे.

वाचनसाहित्यातील आशय, त्याची अद्ययावतता, आशयाचा विषय, लेखक इ. बाबतही ग्रंथालय संशोधक संशोधन करत आहेत. याशिवाय वाचनसाहित्यातील आशयाच्या परिणामाबाबतही ग्रंथालय क्षेत्रातील संशोधक संशोधन करत आहेत. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील संशोधनामध्ये मात्र बहुअंशीकरून नियतकालिकातील आणि वर्तमानपत्रातील आशयाचेच **विश्लेषण**केले जाते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील संशोधनाच्या दृष्टीकोनातून आशय **विश्लेषण** म्हणजे वाचनसाहित्यातील आशयाचे **विश्लेषण** होय. ग्रंथालयातील मर्यादित जागेचा विचार करता वाचनसाहित्याची (ग्रंथ,

नियतकालिके) साठवणूक व त्यांचा वापर करणे अवघड होऊन बसले आहे. तसेच मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या ई-साहित्याचा (डेटाबेस, ई-नियतकालिके, ई-ग्रंथ) संग्रह करणे किंवा त्यातून उपयुक्त माहिती शोधणे फार अडचणीचे झाले आहे. यावर पर्याय म्हणून त्या साहित्याचे आशय **विश्लेषण** करून थोडक्यात माहिती उपलब्ध करणे गरजेचे आहे. त्यामुळे उपयोजकांना योग्य माहिती कमी वेळात मिळेल आणि कर्मचाऱ्यांचा वेळ वाचेल. ग्रंथालयात ग्रंथपाल व ग्रंथालयातील कर्मचारी यांना ग्रंथालयीन कामकाजात नाविन्य आणण्यासाठी अद्ययावत माहितीचा म्हणजे नियतकालीकाचा वापर करावा लागतो. यासाठी नियतकालिकातील ज्ञानाचा योग्य अर्थ लावणे गरजेचे आहे. थोडक्यात त्यांचे आशय **विश्लेषण** केले पाहिजे. विश्लेषण करून सारांश रूपाने नियतकालिकातील माहितीचा आशय मांडता येतो. याचा वापर संबंधीत विषयातील शिक्षक, संशोधक यांना तसेच विद्यार्थी व इतर उपयोजकांना होऊ शकतो.

## १.२ संशोधनाचा विषय

आशयाचा परिणाम लक्षात घेऊन वाचनसाहित्याची उपयोगिता किंवा त्या वाचनसाहित्याचा कल ठरवता येतो. अशाप्रकारे 'लायब्ररी हेराल्ड' या नियतकालिकाचा कल कोणत्या विषयात आहे, कोणत्या संशोधकांना त्याचा जास्त उपयोग होऊ शकतो याचा अभ्यास, तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयाच्या साधारण १३० पेक्षा जास्त नियतकालिकांपैकी 'लायब्ररी हेराल्ड' या पिअर रिव्ह्युड नियतकालिकामध्ये प्रकाशित होणाऱ्या लेखांचे आशय **विश्लेषण**श्लेषण सदर संशोधनात करण्यात येणार आहे. सदर संशोधनाचा विषय "लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे आशय **विश्लेषण**(२००७-२०१४)" असा आहे.

## १.३ संशोधन विषयाच्या निवडीचा हेतू

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयावर साधारण १३० पेक्षा जास्त नियतकालिके प्रकाशित होतात. यांपैकी पिअर रिव्ह्यूड, दिल्ली लायब्ररी असोसिएशनकडून १९५८ पासून प्रकाशित होणारे "लायब्ररी हेराल्ड" या नियतकालिकामधील लेखांचे आशय विश्लेषण केल्यास

१. संशोधकांना नियतकालिकाच्या उपयुक्तते संबधित माहिती मिळेल.

२. लायब्ररी हेराल्ड मधील लेखांचा कल कोणत्या विषयाकडे आहे या विषयी माहिती मिळेल.

३. लेखाची मांडणी, लेखांमधील आशय या विषयी माहिती मिळेल.

४. संशोधकांना आवश्यक विषयातील आशयाची थोडक्यात माहिती मिळेल.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे

संशोधन दरम्यान करावयाच्या कार्यांची सुस्पष्ट यादी म्हणजेच उद्दिष्टे. उद्दिष्टांच्या मदतीने संशोधन समस्येचे कृतीशिलतेत (कार्यांमध्ये) रुपांतर होते. म्हणूनच उद्दिष्टांना 'क्रियादर्शके' असेही म्हणतात. उद्दिष्टांच्या मदतीनेच पुर्वानुमानाची मांडणी करता येते व त्याची चाचणीही घेता येते.

सदर संशोधनात 'लायब्ररी हेराल्ड' या ग्रंथालयशास्त्र विषयासंबंधित नियतकालिकाच्या आशयाचे विश्लेषणकरून संशोधनाची आवश्यकता दर्शवण्यासाठी खालील उद्दिष्टे मांडता येतील.

१. "लायब्ररी हेराल्ड" या नियतकालिकामधील लेखांचा कल ओळखणे.

२. लेखांचे विषयानुसार आशय विश्लेषण करणे.

३. प्रकाशन वर्षानुसार लेखांच्या वितरणाचे परीक्षण करणे.

४. लेखांच्या आशयाचा अभ्यास करणे.

५. माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव तपासणे.

## १.५ संशोधनाची गृहीतके

ज्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी संशोधन कार्य सुरु केले आहे त्या प्रश्नाचे संभाव्य उत्तर म्हणजे संशोधनाची उपकल्पना किंवा गृहीतक होय. संशोधकाचा हा एक अंदाज असतो. संशोधक स्वतःला असलेल्या ज्ञानाच्या आधारे संशोधन विषयासंबंधी कोणते तरी सामान्य अनुमान निश्चित करतो. यासाठी संशोधकाला विषयाचे पूर्वज्ञान असणे आवश्यक आहे. त्याच्या आधारावर काही संभाव्य अनुमान काढले जाते. या अनुमानामुळे संशोधन कार्याचे लक्ष्य निश्चित व आवश्यक तथ्यावरच केंद्रित केले जाते. त्यामुळे संशोधनाची दिशा निश्चित होते. या संभाव्य अनुमानाला गृहीतक असे म्हणतात.

व्यक्ती परिस्थिती सापेक्ष कार्य करताना अनेक विचार, कल्पना करत असते, थोडक्यात काही अनुमान करत असते अशा या गृहीतकृत्यांच्या व्याख्या खालील प्रमाणे –

**संशोधनाच्या व्याख्या**

वेगवेगळ्या तज्ञांनी गृहीतकासंदर्भात ज्या व्याख्या केल्या आहेत त्यावरून त्याचे सर्व साधारण स्वरूप स्पष्ट होते.

१. वेबस्टर शब्दकोश : गृहीतकृत्य किंवा गृहीतक म्हणजे गृहीत धरलेले विधान, तत्त्व किंवा अट होय.[४]

२. प्रा. पॉलिन यंग : गृहीतके म्हणजे ज्याच्या आधारे संशोधन कार्य करता येते असा कार्य संदर्भातील विचार होय. [४]

३. गुड आणि हॅट : गृहीतकृत्य अथवा गृहीतके म्हणजे असे अनुमान की जे तथ्य निरीक्षणावर आधारलेले असून ज्यामुळे भावी संशोधन कार्यास गती मिळते. [४]

सर्वसामान्य अनुभव, निरीक्षण, ज्ञान व तर्काच्या आधारे संशोधन समस्येसंबंधी केलेले आणि सिद्ध न झालेले विधानात्मक उत्तर म्हणजे परिकल्पना किंवा त्याची सत्यासत्यता संशोधन प्रक्रीयेनंतर ठरवली जाते ती गृहीतके होय.

वरील विविध व्याख्यांवरून गृहीतकाची पुढील वैशिष्टे सांगता येतील. गृहीतकामुळे संशोधन कार्यास दिशा मिळते. गृहीतकामुळे संशोधनातील प्रारंभीच्या अडचणीचे निराकरण होते. चलांमधील परस्पर संबंध स्पष्ट होतो. ही प्रथम पायरी असते त्यायोगे संशोधन सुरु राहते.

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाला विषयाची व्यापकता विचारात घेता अनेक गृहीतके समोर आली. परंतु संशोधकाचे प्राथमिक कार्य लक्षात घेता, संशोधकाने खालील गृहीतके मांडली आहेत.

१. लायब्ररी हेराल्ड नियतकालिकामधील लेख प्रामुख्याने माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित आहेत.

२. लायब्ररी हेराल्ड नियतकालिकामध्ये विविध व्यक्तीविषयक लेखांचा भर जास्त आहे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात १३० पेक्षा जास्त नियतकालिके प्रकाशित होत आहेत. तसेच याच विषयात संशोधन करणाऱ्या संशोधकांची संख्या देखील जास्त आहे. अशावेळी एकूणच मोठ्या माहितीसाठ्यातून योग्य माहिती मिळविण्यासाठी त्या माहितीचे आशय विश्लेषण करून त्याचा सारांश मांडला तर संशोधनास ते उपयुक्त ठरेल. संशोधनाला योग्य दिशा मिळेल.

प्रस्तुत संशोधनाचा संबंध ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाशी संबंधित प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमधील ‘‘लायब्ररी हेराल्ड’’ या नियतकालिकाशी आहे. सदर संशोधनात यामधील लेखांचे आशय विश्लेषण करण्यात आले आहे.

‘‘लायब्ररी हेराल्ड’’ हे नियतकालिक १९५८ सालापासून ग्रंथालयशास्त्र विषयांवरील अनेक उपयुक्त घटकांवरील लेख प्रकाशित करत आहे. सदर संशोधनात २००७ ते २०१४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या खंडांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## १.७ नमुना निवड

संशोधनासाठी ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमाशी संबंधित विषय निर्धारित केला आहे. ग्रंथालयातील मुद्रित स्वरूपातील ग्रंथ, नियतकालिके किंवा ई-साहित्य स्वरूपातील नियतकालिके, ग्रंथ यांचे आशय विश्लेषण केले जाऊ शकते.

संशोधनासाठी ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाशी संबंधित प्रकाशित होणाऱ्या ‘‘लायब्ररी हेराल्ड’’ या नियतकालिकाचे २००७ ते २०१४ या कालावधीमध्ये प्रकाशित झालेल्या ८ खंडामधील प्रत्येक वर्षात ४ याप्रमाणे ३२ अंकातील  लेखांचा अभ्यास केला आहे.

## १.८ संशोधन पद्धती

वेबस्टर शब्दकोशानुसार...

‘‘सत्याचा शोध घेण्यासाठी किंवा सत्याचा योग्य तो अर्थ लावण्यासाठी म्हणजेच अर्थनिर्वाचनासाठी किंवा नवीन माहिती विचारात घेऊन, प्रस्थापित तत्वे आणि सिद्धांतांमध्ये बदल करण्यासाठी; सुधारणा करण्यासाठी किंवा प्रचलित तत्वांचे व सिद्धांतांचे उपयोजन करण्यासाठी केलेली पद्धतशीर चौकशी किंवा प्रयोग म्हणजे संशोधन होय.’’ [३]

In English

"Research is a studious enquiry or examination especially; investigation or experimentation aimed at the discovery and interpretation of facts, revision of accepted theories or laws in the light of new facts or practical applications of such new or revised theories or laws. [3]

संशोधन म्हणजे सत्याचा शोध घेणे, अर्थनिर्वाचन करणे, प्रस्थापित तत्वांमध्ये सुधारणा करणे आणि प्रचलित तत्वांचे उपयोजन करणे होय. म्हणजेच प्रत्यक्ष प्रश्न काय याचा विचार करून त्याचे उत्तर कसे शोधता येईल, शोधलेल्या उत्तराचे उपयोजन कसे करता येईल हे पाहणे.

असा सत्याचा शोध घेण्यासाठी संशोधनाचा एक ढोबळ आराखडा तयार करावा लागतो. त्यात प्रामुख्याने कोणत्या पद्धतीने संशोधन करणार याचा विचार करावा लागतो. त्यावरून वर्णनात्मक, ऐतिहासिक, प्रायोगिक अशा तीन पद्धतींनी संशोधन केले जाते.

सदर संशोधनात आशय विश्लेषणया मुख्य पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तर वर्णनात्मक पद्धतीचा वापर देखील केला आहे. सदर नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषणवर्णनात्मक पद्धतीने केले आहे.

## १.९ माहिती संकलन तंत्रे

संशोधनासाठी माहिती संकलित करताना निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत अशी तंत्रे वा साधने वापरतात. या तंत्रांद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषणकरून संशोधनाचे निष्कर्ष मांडले जातात.

सदर संशोधनासाठी प्रामुख्याने निरीक्षण हे तंत्र वापरले आहे. 'लायब्ररी हेराल्ड' या नियतकालिकाच्या खंडांचे अवलोकन करून आशय विश्लेषणकरण्यात आले आहे.

## १.१० संशोधनाची व्यावसायिक गरज

एखाद्या वस्तूचे, भावनांचे, सवयींचे, प्रक्रियेचे, वैचारिक प्रवाहाचे, लिखित साधनांचे, चित्रांचे अशा कोणत्याही व्यक्त व अव्यक्त साधनांचे आशय विश्लेषणकरता येते. यामुळे एखादे कार्य करताना अथवा निर्णय घेताना, संशोधन करताना, त्याच्या उपयुक्तेसंबंधी विचार करता येतो आणि कार्य अधिक परिणामकारक घडू शकते.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात आशयविश्लेषणाचा उपयोग उपयोजकांना अधिक प्रभावी सेवा देण्यासाठी करता येतो. प्रचलित जागरुकता सेवा (CAS), निवडक माहितीचे प्रसारण (SDI) अशा सेवा उपयोजकांना देता येतात. सारांश स्वरूपातील आशयाची माहिती मिळवून कोणते साधन किती उपयुक्त आहे हे ठरवता येते. या सर्वांचा वापर प्रामुख्याने ग्रंथपालन व्यवसायात मोठ्या प्रमाणावर होतो. ग्रंथालयात येणाऱ्या विविध उपयोजकांना विविध प्रकारच्या वाचनसाहित्याची आवश्यकता असते. मुद्रणकलेच्या शोधामुळे, तसेच आधुनिक तंत्रज्ञाना मध्ये होणाऱ्या विकासामुळे वाचनसाहित्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. अशा माहितीच्या प्रचंड साठ्यातून योग्य माहिती उपयोजकाला देता यावी म्हणून माहितीचे आशय विश्लेषणकेल्यास थोडक्या माहितीतून माहिती शोधणे अधिक सोयीचे ठरते.

सदर संशोधन विषय हा ग्रंथालय आणि माहितीशास्त्राशी निगडीत आहे. या विद्याशाखेमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर संशोधन होत आहे. संशोधन करताना अद्ययावत माहितीसाठी नियतकालिकाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. सदर संशोधनात "लायब्ररी हेराल्ड" पिअर रिव्ह्यूड नियतकालिकाच्या आशय विश्लेषणाचा अभ्यास ग्रंथपालन व्यवसायाच्या दृष्टीने म्हणजेच उपयोजकाला सेवा देण्याच्या दृष्टीने करण्यात आला आहे.

'लायब्ररी हेराल्ड' या पिअर रिव्ह्युड नियतकालिकामध्ये परिणामकारक ग्रंथपालनाच्या दृष्टीने, ग्रंथालयीन सेवांच्या दृष्टीने, ग्रंथालयातील वाढत्या तंत्रज्ञानाच्या दृष्टीने योग्य मार्गदशन मिळते.

## सारांश

सदर प्रकरणात संशोधनाची प्रस्तावना, संशोधनाचा आराखडा याविषयी माहिती सादर केली आहे. संशोधनाचा विषय, संशोधनाचा हेतू, संशोधनाची गृहीतके, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन पद्धती, माहिती संकलन तंत्र, संशोधनाची व्यावसायिक गरज या विषयीचे स्पष्टीकरण सदर प्रकरणात केले आहे.

# संदर्भ

1. Ahuja, R. (2011). *Research Methods*. Jaipur: Rawat Publications.
2. Patil, Namita P., & Lihitkar, Shalini R. (2013). Content Analysis of Library Herald 2008-2011.
3. Riahnia, N. (2009). A 2003 - 2007 Citation Analysis of Library Herald. *Library Herald*, *47*(1).
4. Singh, K. P., & Bedi. (2014). Library Herald : A Bibliometric Study (2013-2012). *Library Herald*, *52*(1), 19–27p.
5. Tigga, U. P., Lihitkar, Shalini R., & Rajyalakshmi, D. (2005). Content Analysis of DESIDOC Bulletin of Information Technology (1997-2002). *DESIDOC Bulletin of Information Technology*, *25*(4), 5–11p.
6. White, M. D., & Marsh, E. E. (2006). Content Analysis: A Flexible Methodology. *Library Trends*, *55*(1), 23–45p.
7. आगलावे प्रदीप. (n.d.). संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे. पुणे.
8. कुंभार राजेंद्र. (२०१३). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन (प्रथमावृती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.
9. चव्हाणनिवृत्ती ज. (2013). ग्रंथालयशास्त्राच्या ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकातून प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आशय विश्लेषणाचा अभ्यास (शोधाप्रबंधिका). टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

# प्रकरण २ पूर्वसाहित्याचा अभ्यास


| क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | १३ |
| २.२ | शोधप्रबंध | १३ |
| २.३ | शोधप्रबंधिका | १३ |
| २.४ | ग्रंथालय आणि महितीशास्त्रातील भारतीय  नियतकालिके | १४ |
| २.५ | "लायब्ररी हेराल्ड" नियतकालिका संबंधीत लेख | १६ |
| २.६ | इतर नियतकालिकांचे बिब्लिओग्राफीक विश्लेषण | १८ |
| २.७ | इतर विषयांसंबंधीत नियतकालिकांचे आशय विश्लेषण | २० |
| २.८ | इतर विषयांचे आशय विश्लेषण | २० |
| २.९ | ग्रंथ (पुस्तके) | २७ |
| २.१० | पॉवर पॉइन्ट सादरीकरण | २८ |
| | सारांश | २९ |
| | संदर्भ | ३० |

## २.१ प्रस्तावना

संशोधनाविषयी समग्र माहिती मिळविण्यासाठी संबंधित साहित्याचा पूर्वाभ्यास हा संशोधन कार्यातील एक महत्त्वाचा भाग आहे, पूर्वाभ्यासामुळे किंवा आपण ज्या विषयावर संशोधन करीत आहोत त्या विषयात यापूर्वी कोणते आणि कितपत संशोधन झाले आहे हे पाहिल्यामुळे आपल्या संशोधनाला दिशा मिळते.

सदर प्रकल्पाचा अभ्यास करताना अभ्यासकाने या संशोधनाचा पूर्वाभ्यास शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये आढळलेला संदर्भ पुढीलप्रमाणे:

## २.२ शोधप्रबंध

- Lalitha Bai. (2013) या Karunya University येथून प्रकाशित झालेल्या शोधप्रबंधात EBSCO या डेटाबेसचे बिब्लिओमेट्रिक विश्लेषणकेले आहे. शास्त्रज्ञ व लेखकांद्वारे निर्माण केले जाणारे ज्ञान तसेच नियतकालिके व संस्थांद्वारे ज्ञान मिळणे हे माहिती मिळवण्याचे उत्तम मार्ग आहेत. साहित्य म्हणजेच माहितीच्या वाढीचा नमुना अभ्यासण्यासाठी संशोधन अहवाल, साहित्य वापराचा काळ, संशोधकांच्या माहितीच्या गरजा यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. अशा माहितीचा उपयोग मोठ्या नियमांचा ठराव करताना किंवा कोणताही निर्णय घेताना होतो.

  सदर शोधप्रबंधात अर्थशास्त्राच्या नऊ नियतकालिकांचा अभ्यास केला गेला आहे. या नियतकालिकांचे संशोधनातील योगदान, नियतकालिकातील विविध पैलूंचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले की या नऊ नियतकालिकांमध्ये सारखेपणा नाही.

## २.३ शोधप्रबंधिका

- चव्हाण निवृत्ती ज. (2013). “ग्रंथालयशास्त्राच्या ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकातून प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आशयविश्लेषणाचा अभ्यास” हा शोधप्रबंध विद्या निष्णात या पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे सादर करण्यात आला

आहे.

वरील शोधप्रबंधिके मध्ये ‘ज्ञानगंगोत्री’ या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्रकाशित होणाऱ्या त्रैमासिकात प्रकाशित होणाऱ्या साहित्याच्या आशय विश्लेषणाचा अभ्यास केला आहे. ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकात २०११ ते २०१३ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखांचे आशय विश्लेषणकेले आहे.

सदर संशोधनात असे दिसून आले की हे त्रैमासिक फक्त महाराष्ट्र राज्यापुरतेच मर्यादित आहे. यामध्ये सेट – नेट विषयी, मान्यवरांची चरित्रे, ग्रंथपालन इतिहास, विशेष ग्रंथालये अशा विषयांवर लेखन झालेले नाही. तसेच सदर त्रैमासिकात लिहिणारे लेखक हे महाराष्ट्रातील आहेत. प्रसिद्ध झालेल्या अंकांच्या पानांची संख्या कमी आहे.

## २.४ ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील भारतीय नियतकालिके

- Pradhan, P., & Chandrakar, R. (2011). SSCI Database वापरून, भारतीय ग्रंथालय माहिती शास्त्र साहित्याचा जगाशी तुलना करता किती विकास झाला आहे याचा या लेखात अभ्यास केला आहे. त्याबरोबर सकस (Productive) लेखन करणाऱ्या भारतीय लेखकांची सूची करणे, लेखकांचा लेख लिहिण्याचा कल पडताळणे, उल्लेख वितरण पद्धत (Citation distribution patterns) शोधणे ही उद्दिष्टे आहेत. २००० – २००९ या काळात आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये जागतिक ग्रंथालय माहिती शास्त्र साहित्याच्या तुलनेत भारताचे योगदान अतिशय कमी (१.०७ % फक्त) आहे. भारतात Bibliometrics, Webometrics, Infometrics या विषयांचे जास्त (२६.७५ %) लेखन झाले आहे. एक किंवा दोन लेखकांनी मिळून लिहिण्याकडे (७५.८८ % लेख) जास्त कल आहे.
- Mahesh, G., & Wadhwa, N. K. (2012). या लेखात भारतीय

नियतकालिकांमधील लेखकांनी वेब ऑफ सायन्स चे वैशिष्ट्य असलेल्या "उल्लेख संदर्भांचा शोध" घेण्यासाठी वापरलेल्या वेगवेगळया पद्धतींचा अभ्यास केला आहे. निर्देशित न केलेल्या नियतकालिकांसाठी या वेब ऑफ सायन्स चा वापर होत नाही. नियतकालिकांचे रॅन्किंग ठरवण्यासाठी वेब ऑफ सायन्सचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. भारतीय नियतकालिकांचे याद्वारे रॅन्किंग ठरविले जाते.

- Thavamani, K. (2013). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील डिरेक्टरी ऑफ ओपन ॲक्सेस जर्नल्समध्ये (DOAJ) समाविष्ट असलेल्या नियतकालिकांचा बिब्लिओमॅट्रिक अभ्यास सदर लेखामध्ये केला आहे. या अभ्यासात १५१ ग्रंथालय माहिती शास्त्र नियतकालिकांचे परीक्षण करण्यात आले आहे. यामध्ये विषयाचे वितरण, विषयाचे पैलू, लेखांचे निर्मिती देश, प्रकाशनाची भाषा, भाषेचा नमुना, प्रकाशन वर्ष, प्रकाशनाची वर्गणी, प्रकाशित साहित्यासाठी परवाने (Licenses) व प्रकाशन संस्था या नऊ विषयांचा अभ्यास सदर लेखात केला आहे. या अभ्यासामध्ये असे दिसून आले की बरेचसे लेख हे इंग्रजी भाषेत व युनायटेड स्टेटस् मध्ये प्रकाशित झाले आहेत. गेल्या दोन वर्षात इतर भाषांमधील लेख प्रकाशित झाले.

  सर्वात जास्त लेख इंग्रजीमधील व अमेरिकेतील आहेत. २००४ – २००६ या काळात ४० प्रकाशने सुरु झाली व २०११ मध्ये १३ नवीन प्रकाशने सुरु झाली. इंग्रजीशिवाय इतर भाषांमध्ये २३ प्रकाशने सुरु झाली. Directory of Open Access Journals मध्ये रशियन नियतकालिकांचा उल्लेख नाही.

- सेन (२०१४). भारतामध्ये ग्रंथालय माहिती शास्त्राची सुमारे १३० नियतकालिके प्रकाशित होतात. यातील प्रमुख ७ नियतकालिके निवडण्यासाठी जी पद्धत वापरली गेली त्यात नियतकालिकांचे २०१३ मधील उल्लेख (Number of citations in 2013), ८० % लेख सारांशासहित असणे इत्यादी निकष लावण्यात आले. प्रमुख ७

नियतकालिके पुढीलप्रमाणे आहेत. Annals of Library & Information Studies, SRELS Journal of Information Management, DESIDOC Journal of Library & Information Technology, Information Studies, CollNET Journal of Scientometrics & Information management, IASLIC Bulletin व Library Herald. अध्यापक व विद्यार्थ्यांना ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वरील नियतकालिकांचे वर्गणीदार होता येईल. तसेच UGC च्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे Ph.D च्या विद्यार्थ्यांना वरीलपैकी एका नियतकालिकात प्रबंध प्रकाशित करता येईल.

## २.५ "लायब्ररी हेराल्ड" नियतकालिका संबंधीत लेख

- Tigga, U. P., Lihitkar, Shalini R., & Rajyalakshmi, D. (2005). जानेवारी १९९७ ते जुलै २००२ या कालावधीत प्रकाशित झालेल्या "डेसीडॉक बुलेटीन ऑफ इन्फरमेशन टेक्नोलॉजी" च्या ३३ प्रकाशित खंडांचे आशय विश्लेषणसदर लेखामध्ये केले आहे. "डेसीडॉक बुलेटीन ऑफ इन्फरमेशन टेक्नोलॉजी" या पिअर रिव्ह्यूड नियतकालिकाचा अभ्यास केल्यावर असे निदर्शनास आले की या लेखांमध्ये माहिती तंत्रज्ञान, ग्रंथालय व्यवस्थापन आणि माहितीचे विपणन याविषयीची माहिती दिली आहे. "डेसीडॉक बुलेटीन ऑफ इन्फरमेशन टेक्नोलॉजी" हे नियतकालिक ग्रंथालय व्यावसायिक, माहिती व्यवस्थापक, शास्त्रज्ञ, माहिती विशेष तज्ञ, संगणकाशी संबंधित काम करणाऱ्या व्यक्ती, संशोधक यांना उपयुक्त आहे.

  सामान्य आणि विशेष अंकांची तुलना करता विशेष अंक जास्त प्रमाणात प्रकाशित केले जातात. नियतकालिकाचे संपादक वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रातून आलेले आहेत. विशेष करून दिल्लीमधील संपादक जास्त आहेत. ग्रंथालय

शास्त्रातील वेगवेगळ्या विषयांवर लेख प्रसिद्ध केले जातात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमांची माहिती सदर नियतकालिकामध्ये दिली आहे.

- White, M. D., & Marsh, E. E. (n.d.). (2006) ग्रंथालयशास्त्रातील संशोधनाची उद्दिष्टे आणि ध्येय साध्य करण्यासाठी आशय विश्लेषणही एक लवचिक संशोधन पद्धती आहे. संशोधकांना आशय विश्लेषणाचा वापर कसा करता येईल, त्याचा उपयोग त्यांच्या अभ्यासात कसा करता येईल या विषयी सदर लेखात विवेचन केले आहे.
- Thanuskodi, S. (2011). सदर लेखात लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकाबद्दल ग्रंथसूचीय अभ्यास केला आहे. ग्रंथालय शास्त्राविषयी माहिती प्रकाशित करणाऱ्या नियतकालिकातील ‘लायब्ररी हेराल्ड’ या नियतकालिकाचे बिब्लिओग्राफिक परीक्षण सदर लेखामध्ये केले आहे.
- Patil, Namita P., & Lihitkar, Shalini R. (2013). ग्रंथालय माहिती शास्त्राच्या क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या, दिल्ली लायब्ररी असोसिएशनच्या लायब्ररी हेराल्ड या प्रकाशनाच्या (Vol. 46 – 49) ४ अंकांचे या लेखात आशय विश्लेषणकेले आहे. लायब्ररी हेराल्ड हे Peer - reviewed नियतकालिक आहे. वरील लेखामध्ये ‘लायब्ररी हेराल्ड’ या Peer Reviewed त्रैमासिकाच्या २००८ – २०११ मधील १६ अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे आशय विश्लेषणकरण्यात आले आहे. लेखकांची लेख लिहिण्याची शैली, राज्याप्रमाणे आणि शिक्षणसंस्थेनुसार लेखांचे वितरण, लेखांचे महत्व, ग्रंथ परीक्षण, बातम्या, कार्यक्रम यांविषयीची माहिती सदर लेखात दिली आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नव्याने निर्माण होणारी माहिती प्रसारित करणे हे आपले प्राथमिक उद्दिष्ट सदर त्रैमासिक योग्य रितीने साध्य करीत आहे. प्रत्येक

खंडामधील लेखांच्या वितरणावरून असे लक्षात येते की प्रत्येक खंडाप्रमाणे व नवीन तंत्रज्ञानाप्रमाणे बदल केले आहेत. तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील संशोधन कार्यात सदर नियतकालिक महत्वाची भूमिका बजावत आहे. ग्रंथालय माहिती शास्त्र क्षेत्रातील ज्ञानाच्या प्रसारण (dissemination) व वाटणी (sharing) साठी त्यांनी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

- Singh, K. P., & Bedi. (2014). सदर लेखानुसार लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकात २००३ ते २०१२ या कालावधीत एकूण २३४ लेख प्रकाशित झाले. या लेखात ग्रंथसूचीय परीक्षण करण्यासाठी लेखकांचे योगदान, स्त्री पुरुष योगदान, भौगोलिक वितरण, मुख्य लेखक आणि त्यांचे सहलेखक, लेखांची लांबी या विषयांचा अभ्यास केला आहे. या परीक्षणानंतर तेहरानच्या नुसरत रीहीनिया (Nosrat Riahinia) यांचे लेख लिहिण्यातील योगदान जास्त म्हणजे १६ आहे असे निदर्शनास आले. तसेच २००३ व २००५ मध्ये अनुक्रमे ३० व १४ इतके लेख प्रसिध्द झाले. म्हणजेच भारतीय लेखकांचे लेख लिहिण्यातील योगदान जास्त आहे.

## २.६ इतर नियतकालिकांचे बिब्लिओग्राफीक विश्लेषण

- Das, T. K. (2013). “लायब्ररी ट्रेंडस” या नियतकालिकातील २००७ – २०१२ या वर्षात प्रकाशित झालेल्या लेखांचा बिब्लिओमेट्रिक अभ्यास सदर लेखामध्ये केलेला आहे. हे एकमेव नियतकालिक असे आहे ज्यामध्ये गुणवत्ता, उत्पादन क्षमता, परिपक्वता आहे. संशोधकांना त्यांच्या माहितीच्या गरजा भागविण्यासाठी कोणत्या माध्यमातून, कशा प्रकारे माहिती मिळवता येईल याविषयी संशोधन प्रशिक्षण दिले जाते. १९ खंडांमधील एकूण २०६ लेखांपैकी सर्वात जास्त ५१ लेख २००७ -२००८ या वर्षात प्रकाशित झाले.

- Pandita, R. (2014). डेसीडॉक जर्नल ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फरमेशन टेक्नोलॉजी

हे नियतकालिक डीफेन्स सायन्स डॉक्युमेंटेशन सेंटर, नवी दिल्ली येथून गेली तीन दशके प्रकाशित होणारे द्वैमासिक आहे. या द्वैमासिकाचा बिब्लीओमेट्रिक अभ्यास सदर लेखात करण्यात आला आहे.  राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वाचकांना या नियतकालिकाचा लाभ घेता येतो. २००३ – २०१२ या कालावधीत माहिती तंत्रज्ञान विषयावरील अनेक लेख प्रकाशित झाले. या लेखामध्ये सदर नियतकालिकाचे ग्रंथसूचीय परीक्षण, लेखकांची लेखनशैली, भौगोलिक वितरण, उल्लेख निर्देश यांचा अभ्यास केला गेला आहे.

गेल्या दशकात कोणत्याही ठराविक क्षेत्रातीलच नव्हे तर २२ देशांतील संशोधकांनी सदर नियतकालिकात संशोधन अहवालाचे लेखन केले आहे. प्रकाशनाच्या व्याप्तीवर त्याचा वापर आणि उपलब्धता अवलंबून असतात. या नियतकालिकामध्ये एकत्रित लेखन म्हणजेच दोन किंवा तीन लेखकांचे लेख जास्त दिसून येतात.

- Verma, A., Sonkar, S. K., & Gupta, V. (2015). “ लायब्ररी फिलॉसॉफी ॲन्ड प्रक्टिसेस” या ई - नियतकालिकाच्या २००५ – २०१४ या कालावधीतील लेखांचा अभ्यास सदर लेखात केला आहे. या अभ्यासात लेखकांची लेखनशैली व नियतकालिकाची वाढ याबाबत विवेचन केले आहे. त्याचबरोबर इतर विषयांचा अभ्यास देखील सदर संशोधनात केला आहे, जसे लेखक ग्रंथसूचीय पैलू म्हणून, तज्ञांनी लिहिलेल्या लेखांतील भौगोलिक उत्पादनक्षमता, विषयांप्रमाणे वितरण या सर्व गोष्टींचा अभ्यास केला आहे. ११७७ लेखांचा अभ्यास सदर संशोधनात करण्यात आला आहे. प्रत्येक वर्षी सरासरी ११७ लेख प्रकाशित केले जातात. सदर संशोधनाचा उपयोग ग्रंथालये, संशोधक, वाचक, तज्ञ यांना त्यांच्या अभ्यासासाठी उपयुक्त नियतकालिक कोणते हे ठरवण्यासाठी होईल.

## २.७ इतर विषयांसंबंधीत नियतकालिकांचे आशय विश्लेषण

- Archibald, M. M. & etc. (n.d.). (2015) गेल्या काही वर्षात 'मिश्र संशोधन पद्धती' ही पद्धती मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होत आहे. या पद्धतीमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक डेटा हे आव्हान असते. सदर लेखामध्ये ५ विषयांची निवड करून २००३ ते २०१४ या कालावधीतील लेखांचा अभ्यास केला आहे. मिश्र संशोधन पद्धतीचा पुरस्कार करणारे तात्विक मुद्दे, प्रक्रियात्मक सूचना, व्यावहारिक प्रश्न आणि सर्वोत्तम पद्धती, भविष्यातील संशोधनाची दिशा हे पाच पैलू अभ्यासासाठी ठरविले आहेत. सदर अभ्यासात गुणात्मक माहितीला जास्त प्राधान्य (८६%) दिले आहे. मिश्र संशोधन पद्धती गुणात्मक संशोधन, अभ्यास आराखडा, अभ्यास हेतू यावर परिणाम करू शकते.

## २.८ इतर विषयांचे आशय विश्लेषण

- Dimitroff, Alexandra (1995). 'आरोग्यशास्त्र ग्रंथालयाचे ग्रंथपाल ज्या शैक्षणिक सेवा पुरवतात त्यांच्याविषयीचे १९८७ – १९९४ मधील प्रकाशित झालेले साहित्य' हा आशय विश्लेषणाचा विषय आहे. यामध्ये प्रकाशन, नियतकालिक, लेखांचे प्रकार, लेखांचे विषय व शैक्षणिक सेवेचे उपयोजक हे मुद्दे विचारात घेतले गेले. १२३ लेखांपैकी ८२.१% सविस्तर (descriptive), १४.६% कायदे विषयक व ३.३% रिव्ह्यू होते. ग्रंथालय उपयोजकांचा प्राथमिक गट (८५.१%) होता. १९७५ – १९८६ च्या पाहणीमधील संख्येत वाढ झालेली दिसली. १२.८% लेख ग्रंथपालांविषयी होते. शैक्षणिक ग्रंथालयांनी शिक्षण साहित्याच्या योगदानात भर (८३.२%) घातलेली आहे तर रुग्णालय ग्रंथालयांचे योगदान कमी (५%) आहे. या पृथक्करणात कळते की आरोग्यशास्त्र ग्रंथालयांच्या शैक्षणिक कार्यक्रमाबाबत संशोधन करण्याची मोठी गरज आहे. या संशोधनासाठी तंत्र व पद्धती उपलब्ध आहेत, पण वेळ व भांडवलाचा प्रश्न

आहे. ग्रंथालय अध्यापक व ग्रंथपाल यांच्यात सहकार्याची गरज आहे, तसेच ग्रंथालय व्यावसायिक त्यांच्या कल्पना सुचवू शकतात. जसजसे शिक्षणपद्धतीचे स्वरूप बदलत आहे तसतसे आरोग्यशास्त्र ग्रंथालयांना वाढता वाव आहे. तंत्रज्ञानात प्रचंड बदल झाल्यामुळे माहितीची पुनर्प्राप्ती, माहिती व्यवस्थापन व कोणत्याही विषयाच्या अध्यापनाची तंत्रे यातही बदल झाला आहे व ग्रंथपाल उपयोजकांना बदललेल्या तंत्रज्ञानाचा वापर शिकवू शकतात. या विश्लेषणात bibliographic सूचना फारशा आढळत नाहीत.

- Evans, M. P. (2013). सदर लेखामध्ये जर्नल ऑफ काउंसिलिंग ॲन्ड डेव्हलपमेंट (JCD) आणि काउंसिलर एज्युकेशन ॲन्ड सुपरव्हिजन (CES) या दोन नियतकालिकांचे आशय विश्लेषणकेले आहे. ही दोन नियतकालिके व्यावसायिक समुपदेशनात महत्वाची भूमिका बजावतात. या समुपदेशन साहित्यात पुरुषांच्या अडचणींबाबत समुपदेशनावर जास्त भर दिला गेला आहे असे सदर लेखाच्या अभ्यासावरून दिसून येते. समुपदेशक व समुपदेशन शिक्षण कार्यक्रम हे पुरुषांची कामावर भरती आणि कामाचा मिळणारा मोबदला यांच्याशी संबंधित आहे.

  पुरुषांना घसघशीत वेतन देऊन, तसेच जलद पदोन्नतीद्वारे त्यांची मानसिक गरज भागविण्याचा किंवा त्यांना बहुमान देण्याचा प्रयत्न केला तरी व्यावसायिकदृष्ट्या समुपदेशन त्यांना योग्य दिशा दाखवते. कुटुंबपद्धती व नातेसंबंधांमध्ये पुरुष महत्वाची भूमिका बजावतात. सदर लेखाद्वारे समुपदेशकाचे शिक्षण यासंबंधित विषयावर ही विचार केला आहे.

- Seth, C. L. & etc. (2013). सदर लेखामध्ये, निर्माण होणाऱ्या प्रचंड माहितीची (Big data) हाताळणी संगणकीय व पारंपारिक किंवा मानवनिर्मित पद्धतीने

एकत्रितरित्या (hybrid) करून त्या माहितीचे आशय विश्लेषणकरता येईल याविषयी माहिती सांगितली आहे.

लेखकांची लेखन पद्धतीने विश्लेषणकरणे फारच आव्हानात्मक आहे. संगणकीय पद्धतीद्वारे या अडचणी दूर होऊ शकतात पण काही बाबतीत येथेही मर्यादा येतात. म्हणूनच या दोन्ही पद्धतींचा एकत्रितरित्या (hybrid) वापर करून आशय विश्लेषणकेले जाऊ शकते. ‘ट्विटरमध्ये याचा प्रत्यक्ष वापर आढळून येतो. पारंपारिक व संगणकीय यांच्या एकत्रिकरणातून पारंपारिक आशय विश्लेषणाचा आवाका वाढून त्यामध्ये सांख्यिकीय अचूकता देखील आणता येईल. शिवाय मोठ्या स्वरूपातील माहितीचा विस्तार कमी केला जाऊ शकतो.

- King, T. T. & etc. (2014). असीस्टेड प्रोडक्टीव्हीटी टेक्नोलॉजी या विषयाबद्दल उत्तर अमेरिकेत प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रातील लेखांतील आशय विश्लेषणसदर लेखात केले आहे. यामध्ये २००५ – २०११ या कालावधीतील प्रकाशित वर्तमानपत्रातील लेखांचा अभ्यास केला आहे. वर्तमानपत्रातील लेखांच्या आशयाचे विश्लेषणसदर लेखात केले आहे.

वंध्यत्व आणि त्यावरील उपाययोजना हा माध्यमांसाठी मोठा विषय आहे. Assisted Reproductive Technology (ART) संबंधी लोकप्रिय माध्यमात काय मतप्रवाह आहेत हे जाणण्यासाठी North American वर्तमानपत्रातील लेखांचे आशय विश्लेषणकेले गेले. क्युबेक, कॅनडा येथे ART ला मिळणाऱ्या सार्वजनिक निधीचाही विचार केला गेला. यासाठी २००५ ते २०११ मधील मुद्रित व on – line वृत्तपत्र लेखांचा (७१९) आढावा घेण्यात आला. जोखीम (६३%), नैतिकमूल्ये (६१%) हे यातील सर्वसाधारण चिंतेचे विषय होते. क्युबेक आधारित लेखांमध्ये ART संबंधी राजकीय व आर्थिक बाबतीत चर्चा करणारे लेख होते. ART बद्दल वस्तुस्थिती

दर्शविण्याऐवजी वर्तमानपत्रे अतिशयोक्त व वादग्रस्त चित्र उभे करताना दिसतात. वर्तमानपत्रे माहितीचा महत्वाचा स्त्रोत असतो व त्यातील बातम्यांचा समाजावर, रुग्णांवर परिणाम होत असतो. ही जबाबदारीची जाणीव वर्तमानपत्रांनी ठेवली पाहिजे.

जवळजवळ ५०% लेखांमध्ये हे मान्य केले होते की जोखीम, नैतिकमूल्ये याचबरोबर मातृत्व, मूल जन्माला घालण्याचे वय, आईचे करिअर हेही विषय वर्तमानपत्रात चर्चिले जातात व त्यांची भीती पसरवली जाते. त्याचबरोबर वयस्कर, ख्यातनाम व्यक्तींच्या यशस्वी गर्भारपणाच्या बातम्या देवून खोट्या आशा पसरवल्या जातात की गर्भारपणासाठी वयाची मर्यादा नसते.

निम्म्याहून कमी लेखांमध्ये प्रत्यक्ष उपाययोजनांच्या शक्यतांचा विचार केला होता. रुग्णाचा स्वानुभव हा आजार व इलाजाचे खरे व अचूक चित्र उभे करतो. तसेच वैज्ञानिक व वैद्यकीय तज्ञांचे विचार निम्म्याहून कमी लेखात आढळले. नाट्यपूर्ण मथळे, वादग्रस्त विधाने व मसालेदार बातम्यांनी वर्तमानपत्रांचा खप वाढतो. पण ते संख्याशास्त्रीय पुरावे किंवा शास्त्रीय लेख देत नाहीत. हा अभ्यास काही वर्तमानपत्रांपुरता मर्यादित होता. विश्लेषणातील सर्व वर्तमानपत्र अहवाल on – line उपलब्ध होते.

- Barrio Minton, C. A. & etc. (2014). अमेरिकन कौन्सलिंग असोसिएशन व तिच्या शाखा यांनी जानेवारी २००१ ते डिसेंबर २०१० मध्ये प्रकाशित केलेल्या नियतकालिकांमधील अध्ययन व अध्यापन विषयक २३० peer - reviewed लेखांचे या प्रलेखात आशय विश्लेषणकेले आहे. यामध्ये एकाग्रतेची परीक्षा (examination of focus), शैक्षणिक पाया व कार्यपद्धती यांचा समावेश आहे. समुपदेशन शिक्षणामध्ये अध्ययन व अध्यापनाच्या विद्वत्तापूर्ण गुंतवणुकीची चर्चा केली आहे. लेखकांनी जास्त करून पदवीधर किंवा पदव्युत्तर विद्यार्थ्यांवर Ph.D. विद्यार्थ्यांपेक्षा

जास्त लक्ष केंद्रित केले आहे; तसेच सामाजिक व सांस्कृतिक विविधतेबाबतच्या अध्यापनाच्या अहवालांना प्राधान्य दिले आहे. व्यवसायाभिमुखता, व्यावसायिक नैतिकता, करिअरचा विकास, संशोधन, पर्यवेक्षण व व्यक्तिगत विकास या गोष्टी समुपदेशन व्यवसायाचा पाया आहेत याकडेही लक्ष दिले पाहिजे.

- Giesler, M. A., & Beadlescomb, T. (2015). विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणामध्ये व्यावसायिक ज्ञान, श्रध्दा, कौशल्य देण्याऱ्या दृष्टीने पाठ्यपुस्तके महत्त्वाची भूमिका बजावतात.

  सदर लेखामध्ये ‘Introduction to Social Work’ या पाठ्यपुस्तकातील पुरुषांच्या वर्णनाचे आशय विश्लेषणकरण्यात आले आहे. त्याद्वारे सामाजिक कार्य याविषयाच्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यामध्ये पुरुष व्यावसायिक कोणती भूमिका पार पाडतात याविषयी माहिती मिळते.

  या अभ्यासातून असे निदर्शनास आले की सदर ग्रंथात (Introduction to Social Work) स्त्रिया व पुरुष संबंधित समान लिखित माहिती आढळते. विद्यार्थ्यांना समाजकार्य विषयात प्रकाशित होणाऱ्या विशाल माहितीच्या कुंपणापर्यंत नेणारा एक मार्ग म्हणजे Introduction to Social Work हे पाठ्यपुस्तक आहे. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकात वर्णिलेल्या समाजकार्यकर्त्यांना फक्त तज्ञ, माहितीचे प्रसारक म्हणून नाही तर व्यावसायिक मूल्य आणि नियम जपणारे असे मानले पाहिजे.

  या पाठ्यपुस्तकातील मथळ्यात पुरुषांची अडथळे आणि संधी यांना सामोरे जाण्याची दृश्य व अर्थपूर्ण मार्ग यांची माहिती मिळते.

- Larson, A. L., & Rahn, N. L. (2015). तरुण मुलांना शब्दसंग्रह शिकवण्यासाठी Sesame Street चा Word on the Street Initiative कार्यक्रम प्रयत्न करीत असतो. हा मुलांच्या आवडीचा परिणामकारक दूरदर्शन कार्यक्रम आहे.

प्रत्येक आठवड्यात ६ मिलियन (६० लाख) मुले हा कार्यक्रम बघतात. शब्दसंग्रह शिकवण्याच्या पारंपारिक पद्धतीला पूरक शिक्षण माध्यमातून देता येते.

या कार्यक्रमाच्या आशय विश्लेषणासाठी या कार्यक्रमाच्या ७ सीझनमधील १७० शब्द निवडण्यात आले. ७७% भागातील शब्दनिवड बरोबर होती. शब्दांविषयीच्या सूचना व पद्धतींमध्ये काही पद्धती पुन्हापुन्हा सारख्या आढळल्या, उदा. एखाद्या शब्दाचे प्रकटीकरण, त्याची उदाहरणे वगैरे व काही क्वचित आढळल्या उदा. व्याख्या. मुलांना शब्द शिकण्याच्या किती संधी आहेत हे या भागांमध्ये विविध प्रकारे आढळत होते. जास्तीत जास्त वापरात असलेले शब्द निवडून या कार्यक्रमाची उपयुक्तता वाढवता येईल. तसेच शिकण्याच्या संधी जास्तीत जास्त करून व पद्धती वाढवूनही उपयुक्तता वाढवता येईल.

- Polat, S. (2015). तुर्कीमध्ये २००५ पासून वापरात असलेल्या विधायक शिक्षण कार्यक्रमात इतर कौशल्यांबरोबरच क्लिष्ट विचारशक्तीचा मूलभूत कौशल्य म्हणून समावेश केला आहे. त्यामुळे २००५ पासून क्लिष्ट विचारशक्ती कौशल्याच्या अभ्यासात प्रचंड वाढ झालेली आहे. SSCI व ULAKBIM समाजशास्त्र डाटाबेसमध्ये निर्देशित असलेल्या, २००५ – २०१४ मध्ये प्रकाशित झालेल्या राष्ट्रीय नियतकालिकांमधील अनेक घटकांबाबतीत क्लिष्ट विचारशक्ती कौशल्याच्या संशोधनांचे व्यवस्थित परीक्षण व्हावे हा या अभ्यासाचा हेतू आहे. गुणवत्तापूर्ण आशय विश्लेषणाची पद्धत वापरून तसेच NVivo 10, SPSS 18 व मायक्रोसॉफ्ट एक्सेल कार्यक्रम वापरून २९ वेगवेगळ्या नियतकालिकांतील ९३ लेखांचे या प्रलेखात आशय विश्लेषणकेले आहे. यातील निष्कर्ष असे आहेत की २०११ – २०१३ मध्ये संशोधन अभ्यास लेख जास्त आहेत व ते स्त्री संशोधकांनी मांडलेले आहेत. त्यांनी सांख्यिकीय पद्धतीने वर्णनात्मक संशोधन रुपात भावी शिक्षकांचा संशोधन अभ्यास

केला आहे. असे आढळले की प्राथमिक शाळा पातळीवर एकच अभ्यास केला गेला व बालवाडी, इंग्लिश किंवा गणित वर्ग यावर एकही संशोधन अभ्यास नाही. प्रतिमान सुधारण्यावर एकही संशोधन नाही.

- Kardan, A. A., Aziz, M., & Shahpasand, M. (2015). स्वीकृत पद्धती (Adaptive System) म्हणजे परिस्थितीतील बदलानुसार कार्यप्रणाली जुळवून घेणाऱ्या स्वायत्त संस्था होत. e – शिक्षण पद्धतीत adaptive e – learning systems (AESs) उपयोजकांची आवड, त्यांचे ज्ञान व त्यांची ध्येये यांना सोयीच्या सेवा पुरवतात. e – शिक्षण व्यवस्थेत जुळवणीच्या क्षेत्रातील संशोधनाचा कल समजून घेण्यासाठी सर्व समावेशक पाहणी या प्रलेखात केली आहे. ४५ नियतकालिकातील २००० ते २०१२ मध्ये प्रकाशित १९० संशोधन लेखांचा (papers) चा आढावा घेऊन विश्लेषणकरण्यात आले. AESs ला जुळवणी सेवा पुरवण्यासाठी संशोधन लेखात वापरलेले तंत्रज्ञान व संशोधन ध्येय असलेले AESs मधील संशोधन लेखांचे क्षेत्र; तंत्रज्ञान व वापराच्या क्षेत्राचे संख्यात्मक विवेचन या दोन भागात माहितीचे वर्गीकरण करण्यात आले. वर्गीकरण पुढील मुद्यांवर आधारित होते – लेखांच्या प्रकाशनाचे वर्ष, प्रकाशनाचे वर्ष व सोयीचे तंत्रज्ञान, प्रकाशनाचे वर्ष व वापराचे क्षेत्र, सोयीचे तंत्रज्ञान व वापराचे क्षेत्र. तसेच या प्रलेखात AESs मधील संशोधनाची दिशा, सध्याची स्थिती व उघडपणे दिसणाऱ्या अडचणी यांवर चर्चा केली आहे. लेखाच्या अखेरीस, प्रत्येक क्षेत्रात होणाऱ्या संशोधनासाठी कोणते सोयीचे तंत्रज्ञान उत्तम ठरू शकेल याबद्दल सूचित केले आहे.
- Sampson, J. P. & etc. (2014). करिअर समुपदेशन व विकासाशी संबंधित साहित्याचा वार्षिक रिव्ह्यू घेऊन २०१३ मधील संदर्भ नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषणकेले गेले. या विश्लेषणासाठी ४ प्रमुख मुद्यांवर विचार केला गेला. १)

आशयाचे विषय (topics) २) तात्विक, संशोधन व प्रात्यक्षिके याबाबतीत लेखांच्या संख्येत वाढ ३) लेखांमधील विविधता (variation) ४) आशयातील विविधता. २४ नियतकालिकांतील ३५७ लेखांमध्ये ३६० अनन्य विषय आढळले. याचे निष्कर्ष असे होते की नियतकालिकांतील विषयांच्या आशयामध्ये हळूहळू वाढ होत आहे; तात्विक, प्रात्यक्षिके, संशोधन यात मर्यादित संकलन आहे. १) भविष्यातील विषय – आशय. २) तात्विक (थिअरी), प्रात्यक्षिके व संशोधन यांचे संकलन ३) शिक्षण व प्रशिक्षण ४) नियतकालिकाचे संपादकीय धोरण ५) नियतकालिकातील लेखांचे पुढील काळात आशय विश्लेषण– यासाठी या विश्लेषणात सूचना करण्यात आल्या आहेत.

करिअर समुपदेशन व विकास यासंबंधीचा २०१३ मधील साहित्याचा अभ्यास असे सांगतो की पूर्वीच्या व आत्ताच्या आशय विषयांमध्ये सलगता आहे. व्यक्तीचे स्वत्व व व्यक्तिमत्व, करिअर संसाधने व सेवा पुरवठा, व्यक्तींवर बाहेरील घटकांचा प्रभाव, तत्वे (theories) व शैक्षणिक, व्यावसायिक पर्याय हे ५ सर्वसाधारण आशय विषय आढळले. साहित्यातील बराचसा भाग संशोधन हा आहे.

रोजगारक्षमता, सुस्थिती, आर्थिक विकास यात सुधारणा व्हावी हे आपले ध्येय आहे. यासाठी जास्त समंजस व्यावसायिक वर्तणुकीची व परिणामकारक व्यावसायिक हस्तक्षेपाची गरज आहे. आपले ध्येय गाठण्यासाठी आपल्या व्यावसायिक साहित्याला पारंपारिक ताकदीला नवीन दिशा द्यावी लागेल.

## २.९ ग्रंथ (पुस्तके)

- Ahuja, R. (2011). सदर ग्रंथात संशोधन व संशोधनाच्या विविध पद्धतींविषयी माहिती आहे. त्यामध्ये आशय विश्लेषणया पद्धतीची सविस्तर माहिती दिली आहे.

- आगलावे प्रदीप. (n.d.). संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे. पुणे.

  आशय विश्लेषणही संशोधनाची एक पद्धती आहे. कोणत्याही विचाराचे, बातमीचे, लेखांचे, ग्रंथांचे आशय विश्लेषणकसे करतात याविषयी माहिती दिली आहे.

- कुंभार राजेंद्र. (२०१३). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन (प्रथमावृती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

  ग्रंथालय आणि माहिती शास्त्रातील संशोधन याविषयी माहिती या ग्रंथात दिली गेली आहे. यामध्ये आशय विश्लेषणअसे एक प्रकरण या ग्रंथात आहे. या प्रकरणात आशय विश्लेषणपद्धतीचे सविस्तर वर्णन केले आहे. आशय विश्लेषणाचा इतिहास, आशय विश्लेषणकसे करायचे?, आशय विश्लेषणाच्या पायऱ्या यांविषयी माहिती दिली आहे.

## २.१० पॉवर पॉइन्टमधील सादरीकरण

- Williamson, N. J. & etc. (1995). लायब्ररी ऑफ काँग्रेस तर्फे सादर झालेल्या सदर पॉवर पॉइन्टमधील सादरीकरणामध्ये लायब्ररी ऑफ काँग्रेस वर्गीकरण पद्धतीच्या ग्रंथांचे आशय विश्लेषणकरण्यात आले आहे. मशीनद्वारे वाचू शकणाऱ्या प्रकारात छापील ग्रंथांचे रुपांतर कसे करता येईल हे समजण्यासाठी त्या ग्रंथांचे आशय विश्लेषणकेले गेले.

- Brown, C. C. (2013). वेस्टर्न युनिव्हार्सिटीत सादर झालेल्या पॉवर पॉइन्टमधील सादरीकरणामध्ये आशय विश्लेषणाची माहिती प्रत्यक्षात सांगितली आहे. यामध्ये आशय विश्लेषणपद्धतीमध्ये सविस्तर सांगितले आहे. प्रत्यक्षात संशोधन अहवाल मांडताना आशय विश्लेषणाचा कसा उपयोग होतो हे नमूद केले आहे.

- Dysart, J. (2014). ग्रंथालय आणि संशोधन यांबाबत सेवांचे विश्लेषणकेले आहे. यामध्ये ग्रंथालय सेवांचा संशोधनावर होणारा परिणाम हा त्याच्या अर्थ व प्रभावासहित

अभ्यासला आहे.

- Kager, J. (2014). युटयूब या वेबसाईट वरून मिळालेल्या प्रेजेन्टेशनमध्ये आशय विश्लेषणही संशोधन पद्धती आहे, याविषयी विवेचन केले आहे. या संशोधन पद्धतीद्वारे आशयाचे विश्लेषणकसे केले जाते याविषयी विवेचन केले आहे.

## सारांश

प्रस्तुत वाचनसाहित्य आढाव्यामध्ये एकूण ३२ संदर्भांचा अभ्यास केला आहे. त्यापैकी पी. एच. डी. शोधप्रबंध १, एम. फील. प्रबंध १, नियतकालिकातील लेख २२ , पॉवर पॉइन्ट प्रेझेंटेशन ४, ग्रंथ ३ इ. चा आढावा घेतला आहे. प्रस्तुत संशोधन हे या सर्व आढाव्याशी पडताळणी केली असता वेगळे आहे अशी खात्री झाली आहे. आणि विषयाचा वेगळेपणा निष्कर्षातून स्पष्ट होतो.

संबंधीत विषयावरती आणखी इतर लेख आणि माहिती उपलब्ध आहे. परंतु प्रस्तुत शोध प्रबंधिकेसाठी वरील मर्यादित लेखांचा परामर्श घेतला आहे.

# संदर्भ


1. Ahuja, R. (2011). *Research Methods*. Jaipur: Rawat Publications.
2. Archibald, M. M. & etc. (n.d.). Current Mixed Methods Practices in Qualitative Research: A Content Analysis of Leading Journals.
3. Barrio Minton, C. A. & etc. (2014). Pedagogy in Counsellor Education: A 10 Year Content Analysis. *Counsellor Education & Supervision*, *58*, 162–177p.
4. Brown, C. C. (2013). *A Practical Introduction to Content Analysis*. Statistical and Data Series presentation, Western University. Retrieved from https://youtu.be/HUKPf00Z1Ms
5. Christa, C. & etc. (2014). Practitioner Response to Parental Need in Email Consultation: How Do They Match? A Content Analysis. *Child Youth Care Forum*, *43*, 553–567.
6. Das, T. K. (2013). A bibliometric analysis of contributions in the journal "Library Trends." *Library Philosophy and Practice (E-Journal)*, 1–11.
7. Denzil, C. (2014). *Content quality in web 2.0 services analysis, detection, systems and enhancement* (Thesis). Indraprastha Institute of Information Technology, Delhi.
8. Dysart, J. (2014). *Evaluating Library & Research Services: Meaningful Measures & Measuring Impact*. Power Point Presentation, Paris.
9. Evans, M. P. (2013). Men in Counseling: A Conent Analysis of the Journal of Counseling & Development and Counselor Education and Supervision 1981-2011. *Journal of Counseling & Development*, 467–474p.
10. Evolution of library and information science, 1965–2005: Content analysis of journal articles. (2014). *Journal of the Association for Information Science & Technology.*, *65*(7), 1446–1462.
11. Giesler, M. A., & Beadlescomb, T. (2015). Elevated or Erased? A Content Analysis of the Portrayal of Men in Introduction to Social Work Textbooks. *Journal of Men's Studies*, *23*(2), 47–60p.
12. Jayaraj, S. (1998, September 30). *Content analysis and evaluation of English textbooks of standard XII in Tamilnadu and Kerala*. Bharathiar University, Coimbatore.

13. Kager, J. (2014). *Research Methodology :Content Analysis*. Retrieved from www.youtube.com

14. Kardan, A. A., Aziz, M., & Shahpasand, M. (2015). Adaptive systems: a content analyis on technical side for e-learning environments. *Springer*.

15. King, T. T. & etc. (2014). What's the message? A content analysis of newspaper articles about assisted reproductive technology from 2005 to 2011. *Human Fertility*, *17*(2), 124–132.

16. Lalitha Bai. (2013). *Literature on Public Finance (1986-2010) : A Bibliometric Analysis based on EBSCO database*. Karunya University, Tamil Nadu. Retrieved from www.shodhganga.com

17. Larson, A. L., & Rahn, N. L. (2015). Vocabulary Instruction on Sesame Street: A Content Analysis of the Word on the Street Initiative. *Language Speetch and Hearing Services in Schools*, *46*, 207–221.

18. Lee, C.-M. (Angela), & Taylor, M. J. (2013). Moral education trends over 40 years : A content analysis of the Journal of Moral Education (1971-2011). *Journal of Moral Education*, *42*(4), 399–429p.

19. Mahesh, G., & Wadhwa, N. K. (2012). Web of Science based ranking of Indian library and information science journals. *COLLNET JOURNAL OF SCIENTOMETRICS AND INFORMATION MANAGEMENT*.

20. McGary, C. B. (1989). *Library censorship : a content analysis and a pictorial model for the continued existence of school library censorship*. University of Houston.

21. Pandita, R. (2014). DESIDOC Journal of Library and Information Technology (DJLIT): A Bibliometric Study (2003-12). *Library Philosophy and Practice (E-Journal)*.

22. Patil, Namita P., & Lihitkar, Shalini R. (2013). Content Analysis of Library Herald 2008-2011. *Research Front*, *1*(1), 55–62p.

23. Plathottam, G. (2008). *Press and its social responsibility in Northeast India a content analysis* (Thesis). North-Eastern Hill University.

24. Polat, S. (2015). Content Analysis of the Studies in Turkey on the Ability of Critical Thinking. *Educational Sciences Theory & Practices*, *15*(3), 659–670.

25. Prabakaran, R., & Lihitkar, Shalini R. (2015). Websites of Astronomy and Astrophysics Libraries in India and USA : A Webometric Study. *PEARL - A Journal of Library and Information Science*, *9*(3), 199–205p.

26. Pradhan, P., & Chandrakar, R. (2011). Indian LIS Literartue in International Journals with Specific Reference to SSCI Database : A Bibliometric Study. *Library Philosophy and Practice (E-Journal)*. Retrieved from http://unllib.unl.edu/LPP/
27. Sampson, J. P. & etc. (2014). A Content Analysis of Career Development Theory, Research and Practice 2013. *The Career Developement Quarterly (CDQ)*, *62*, 290–326p.
28. Satu, E., & Helvi, K. (2008). The qualitative content analysis process. *Journal of Advanced Nursing*, *62*(1), 107–115.
29. Shavnam Kumari. (2014). *Content analysis of gender perspective in cbse textbooks of hindi english and social study of viii standard*. University of Rajasthan, Jaipur.
30. Singh, K. P., & Bedi. (2014). Library Herald : A Bibliometric Study (2013-2012). *Library Herald*, *52*(1), 19–27p.
31. Thanuskodi, S. (2011). Library Herald Journal : A Bibliometric Study. *International Refereed Research Journal*, *2*(4), 68–76p.
32. Thavamani, K. (2013). Directory of Open Access Journals: A Bibliometric Study of Library and Information Science. *Collaborative Librarianship*, *5*(4), 246–255.
33. Tigga, U. P., Lihitkar, Shalini R., & Rajyalakshmi, D. (2005). Content Analysis of DESIDOC Bulletin of Information Technology (1997-2002). *DESIDOC Bulletin of Information Technology*, *25*(4), 5–11p.
34. Verma, A., Sonkar, S. K., & Gupta, V. (2015). A BIBLIOMETRIC STUDY OF THE LIBRAY PHILOSOPHY AND PRATICE (E-JOURNAL) FOR THE PERIOD 2005-2014" (2015). *Library Philosophy and Practice (E-Journal)*.
35. White, M. D., & Marsh, E. E. (n.d.). Content Analysis: A Flexible Methodology. *Library Trends*, *55*(1), 23–45p.
36. Williamson, N. J. & etc. (1995). *The Library of Congress classification: a content analysis of the schedules in preparation for their conversion into machine-readable form*. Library of Congress.
37. आगलावे, प्रदीप. (n.d.). संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे. पुणे.
38. बापते, विशाल आणि गेडाम ,ज्योती. (२०१५ - २०१६). “डेसिडॉक जर्नल ऑफ

लायब्ररी ॲन्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी" या नियतकालीकाच्या सन २०१० ते २०१५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या संशोधनपर लेखांचे आशय विश्लेषण. ज्ञानगंगोत्री, ३(४), १८पा.

39. कुंभार, राजेंद्र. (२०१३). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन (प्रथमावृती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

40. चव्हाण, निवृत्ती ज. (2013). ग्रंथालयशास्त्राच्या ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकातून प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आशय विश्लेषणाचा अभ्यास (शोधाप्रबंधिका). टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

# प्रकरण ३ आशय विश्लेषणसंज्ञा :पार्श्वभूमी


| **क्र.** | **शीर्षक** | **पृष्ठ क्र.** |
|---|---|---|
| ३.१ | आशय विश्लेषण | ३३ |
| ३.१.१ | आशय विश्लेषणाच्या व्याख्या | ३६ |
| ३.२ | आशय विश्लेषणाची उद्दिष्टे | ३७ |
| ३.३ | आशय विश्लेषणतंत्राचे महत्त्व | ३८ |
| ३.४ | आशय विश्लेषणाची गरज | ३९ |
| ३.५ | आशय विश्लेषणाच्या पायऱ्या | ४० |
| ३.६ | आशय विश्लेषणाचा इतिहास | ४१ |
| ३.७ | आशय विश्लेषण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या आज्ञावली | ४४ |
| | सारांश | ४५ |
| | संदर्भ | ४६ |

## ३.१ आशय विश्लेषण

माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी वापरलेल्या माध्यमाला ‘माहिती संप्रेषणाचे माध्यम’ म्हणतात. आशय विश्लेषणामध्ये या माध्यमाला ‘संहिता’ (Test) म्हणतात. ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्र, कविता, जाहिरात, कादंबरी, कायदे ग्रंथ, पत्र अशा साधनांमध्ये ही संहिता लिखित स्वरूपात तर भाषणे, चित्रपट, दृकश्राव्य फिती, छायाचित्रे यामध्ये ती दृकश्राव्य स्वरूपात आढळते. ग्रंथपालनाच्या परिभाषेत संहितेला ‘प्रलेख’ किंवा ‘वाचनसाहित्य’ म्हणतात.

आशय विश्लेषणाच्या संदर्भात प्रलेखांची ढोबळ वर्गवारी पुढील प्रमाणे :

१. वैयक्तिक प्रलेख – पत्रव्यवहार, आत्मचरित्र, दैनंदिनी इ.

२. कार्यालयीन दस्ताऐवज – आंतर कार्यालयीन पत्रव्यवहार, सभांसाठीच्या विषयपत्रिका, सभेचे इतिवृत्त इ.

३. बहुसंज्ञापन माध्यमे – ग्रंथ, वर्तमानपत्रे, नियतकालिके, चित्रपट, गाणी, नाटके इ.

विशिष्ट प्रलेखामध्ये समाविष्ट असलेले विचार म्हणजे आशय (content) होय. प्रलेखामध्ये समाविष्ट चित्र, शब्द, चिन्ह, विचार, कल्पना, देवाण – घेवाण करण्यासाठीची कोणतीही माहिती म्हणजे **आशय** होय आणि प्रलेखातील आशयाचा चिकित्सक पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे **आशय विश्लेषण** होय. हा चिकित्सक अभ्यास करताना आशयामध्ये वापरलेल्या चिन्हाची वारंवारिता, लेखामधील शब्दाचा अर्थ, वाक्यांची रचना या गोष्टी देखील लक्षात घेतल्या जातात. आशय विश्लेषणात प्रलेख अथवा साधनातील संदेशाचे वर्णन केले जाते. आशय विश्लेषणकरताना लेखकाचा लेख किंवा ग्रंथ लिहिण्यामागे कोणता हेतू आहे हे लक्षात घेऊन संदेश ग्रहणकर्त्यापर्यंत पोहोचवावा लागतो. परंतु लेखक व आशय विश्लेषक

यांचा त्या साधना कडे पाहण्याचा दृष्टीकोन सारखाच  असेल असे नाही. त्यामुळे ते अचूकपणे स्पष्ट करता येतीलच असे नाही.

आशयातील संदेशाचे आकलन होण्यासाठी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधनामध्ये नियतकालिक आणि वर्तमानपत्रातील आशयाचे विश्लेषणकेले जाते. पत्रव्यवहार, भाषणे, दैनंदिनी इत्यादींचे आशय विश्लेषणही ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात केले जाते, तर सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वेबसाईट्स, ई-स्त्रोत म्हणजे ई-नियतकालिके, पोर्टल्स (Portals) यांचे विश्लेषणदेखिल याच पद्धतीने केले जाते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधनाच्या दृष्टीकोनातून आशय विश्लेषणम्हणजेच वाचनसाहित्यातीलच आशयाचे विश्लेषणहोय. यामध्ये विविध विषयांवरील वाचनसाहित्याचे आशय विश्लेषणकेले जाते. उदा. – ललित वाङमय, शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र, विधी, समाजशास्त्र आणि इतिहास.

### ३.१.१ आशयविश्लेषणाच्या व्याख्या  (Definitions)

- बेरेलसन (Berelson, 1952) यांच्या मतानुसार **आशय विश्लेषणम्हणजे संप्रेषणातील प्रकट आशयाचे वस्तुनिष्ठ, पध्दतशीर आणि संख्यात्मक वर्णन** होय.

- विसाव्या शतकात प्रकट आशयाबरोबरच अप्रकट आशयाचे विश्लेषणकरण्याची प्रक्रियासुध्दा आशय विश्लेषणात समाविष्ट करण्यात आली. **अप्रकट आशयाचे विश्लेषणहे गुणात्मक आशय विश्लेषणअसते.**

- क्रिपेनडॉर्फ (Krippendorff, 2004) यांच्या मतानुसार **आशय विश्लेषणही प्रलेखातील आशयाच्या विश्लेषणाद्वारे पुनरावृत्तियोग्य आणि वैध निष्कर्ष काढण्याची संशोधन पध्दती** आहे.

  या पध्दतीमध्ये आशयाच्या विश्लेषणाआधारे संशोधन समस्येची उत्तरे शोधली जातात. आशय विश्लेषणाद्वारे काढलेले निष्कर्ष पुनरावृत्तियोग्य असले पाहिजेत, असा क्रिपेनडॉर्फ यांचा आग्रह आहे.

- आर.पी.वेबर (Weber, 1990) यांच्या मतानुसार **आशय विश्लेषणही वाचनसाहित्याआधारे वैध निष्कर्ष काढण्याची प्रक्रिया आहे. वैध निष्कर्ष म्हणजे विश्वासार्ह, अचूक निष्कर्ष होय, तर्कशुध्द निष्कर्ष होय.**

आशय विश्लेषणही संशोधनाची एक पद्धती मानता येईल कारण आशय विश्लेषणात प्रकट झालेल्या तसेच अप्रकट विचारांचे, आशयाचे विश्लेषणकेले जाते, संशोधन समस्येची उत्तरे शोधण्यासाठी देखील आशयाचे विश्लेषणकेले जाते.

## ३.२ आशयविश्लेषणाची उद्दिष्टे

बर्नार्ड बेरेल्सन यांनी आशय विश्लेषणतंत्राची काही उद्दिष्टे नमूद केली आहेत.

१. आशय वैशिष्ट्यांच्या निर्देशनाचा उद्देश : आशय वैशिष्ट्यांच्या निर्देश उद्देशामध्ये पुढील उद्देशांचा समावेश होतो.

   अ. आशय संज्ञापनाच्या दिशेने वर्णन करणे.

   आ. विद्वतेचे विकसन कशाप्रकारे होते, ते दर्शविणे.

   इ. आशय संज्ञापनाबाबत राष्ट्रा- राष्ट्रांमधील भिन्नत्व स्पष्ट करणे.

   ई. उद्दिष्टांच्या संबंधात संज्ञापन आशयाची तपासणी करणे.

उ. तांत्रिक स्वरूपाच्या संशोधनकार्याचे सहाय्य करणे.

ऊ. शैली लक्षणाचे शोधन करणे.

२. आशयाची कारणे शोधण्याचा उद्देश : आशयाची कारणे कोणती आहेत? हे पडताळून पाहणे हा आशय विश्लेषणाचा एक प्रमुख उद्देश आहे.

३. आशयाचे परिणाम बघणे : आशयाचे परिणाम कोणते आहेत? याचा शोध आशय विश्लेषणात घेतला जातो.

## ३.३ आशय विश्लेषणतंत्राचे महत्व

१. गुणात्मक विषयाचे परीमाणात्मक अध्ययन : भाषणे, लेख, कादंबऱ्या, संपादकीय हे सर्व गुणात्मक विषय आहेत. परंतु आशय विश्लेषणतंत्रात गुणात्मक विषयाचे स्वरूप आणि वैशिष्ट्यांची परीमाणात्मक व्याख्या, सारणी, आलेख इत्यादी माध्यमातून स्पष्टीकरण केले जाते.

२. संज्ञापन साधनाचे स्वरूप स्पष्ट करणे : संज्ञापनाच्या विविध साधनांचे स्वरूप स्पष्ट करण्यामध्ये आशय विश्लेषणतंत्राचे विशेष योगदान आहे. पुस्तक, भाषण, वृत्तपत्रे, रेडिओ, कार्यक्रम इत्यादी साधनांचा सामाजिक जीवनावर विशेष प्रभाव असतो. पण त्याचे स्वरूप अमूर्त असते. त्याचा योग्य अर्थ स्पष्ट करणे गरजेचे आहे. ते आशय विश्लेषणाद्वारे सहज शक्य होते.

३. संज्ञापनाच्या आधाराचे तुलनात्मक अध्ययन : प्रत्येक देशातील संज्ञापन साधनांचा आशय एकसारखा नसतो. म्हणून विविध देशांच्या संज्ञात्मक साधनांचे तुलनात्मक अध्ययन करणे आवश्यक असते.

४. प्रचार साधनाच्या प्रभावाचे अध्ययन : प्रचाराच्या साधनाचा लोकांवर प्रभाव पडतो. या प्रभावाच्या स्वरूपाच्या संबंधात आशय विश्लेषणतंत्राद्वारे शास्त्रीय अध्ययन करणे शक्य होते.

५. लोकमत जाणून घेण्यास मदत : आशय विश्लेषणतंत्राद्वारे लोकमत जाणून घेण्यास मदत होते. वृत्तपत्रांच्या संपादकांना लोकांनी पाठविलेल्या पत्रांच्या आशय विश्लेषणावरून लोकमताचा कल स्पष्ट करणे शक्य होते.

## ३.४ आशय विश्लेषणाची गरज

विविध क्षेत्रात तसेच विषयांमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारे संशोधन, सूक्ष्म विषयांची होणारी वाढ, माहिती साधनांमध्ये होणारे बदल (वेबसाईट्स, पोर्टल्स) यांमुळे उपयोजकांना आवश्यक नेमकी माहिती मिळविण्यासाठी फार अडचणी येतात. माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे होणाऱ्या नवनवीन साधनांची माहिती घेणे, तसेच विविध स्वरूपात उपलब्ध वाचनसाहित्याची माहिती घेणे आवश्यक झाले आहे. आशयविश्लेषणाद्वारे अशा साधनांमधील सूक्ष्म विषयांचे अवलोकन करणे, त्यांचा अभ्यास करणे आणि आवश्यक ज्ञानाची प्राप्ती वेळेत करणे सोपे जाते.

नियतकालिकांमध्ये एकाच विषयातील विविध पैलूंचे संशोधन करून मांडलेला संक्षिप्त संशोधन अहवाल असतो. अशा नियतकालिकांचा कल (Trend) काय? नियतकालिकांमध्ये कोणत्या विषयांसंबंधीत अधिक माहिती आहे? नियतकालिकांमधील लेखकांची लिहिण्याची पध्दत कोणती आहे? नियतकालिकांमध्ये भाष्य केलेल्या कोणत्या गोष्टी प्रत्यक्षात किती उपयुक्त आहेत? या सर्वांचा विचार केला जातो.

प्रलेख आणि इतर संप्रेषण माध्यमातील आशय आणि अर्थ नोंदविण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे आशय विश्लेषण. आशय विश्लेषणाद्वारे प्रलेखांचे त्यांच्या वैशिष्ट्यांच्या आधारे

विविध वर्गांमध्ये वर्गीकरण करता येते. कोणी, कोणाला, काय संप्रेषित केले, याचा अभ्यास आशय विश्लेषणामध्ये केला जातो. तसेच त्या संप्रेषणाचा संबंधितांवर काय परिणाम झाला याचाही अभ्यास आशय विश्लेषणामध्ये केला जातो. म्हणून आशय विश्लेषणाला ‘संप्रेषणाचा अभ्यास’ असेही म्हणतात.

सर्वसामान्य वाचक, श्रोते संप्रेषण माध्यमातील आशयाकडे ज्या भूमिकेतून पाहतात, त्यापेक्षा वेगळ्या भूमिकेतून आशयाची ओळख करून देण्यासाठी आशय विश्लेषणकेले जाते.

## ३.५ आशय विश्लेषणाच्या पायऱ्या

आशय विश्लेषणहे एक तंत्र आहे. आशय विश्लेषणतंत्रांची रूपरेषा तयार करण्यासंबंधीच्या विशिष्ट पायऱ्या आहेत. या पायऱ्यांनुसार आशय विश्लेषणाचे कार्य केले जाते.

१. समस्या निर्धारण : संशोधन समस्या वाचनसाहित्यातील आशयाशी संबंधित असेल तर आशय विश्लेषणही संशोधन पद्धती उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ ई साहित्यामध्ये कोणते विचारप्रवाह आहेत? ई साहित्याचा वापर केला जातो का? ई साहित्यामध्ये कोणत्या प्रकारची माहिती मोठ्या प्रमाणात मिळते? इ. माहिती आशयविश्लेषणाच्या आधारे जाणून घेता येते.

२. पूर्वानुमान मांडणे : संशोधन समस्ये वरील पूर्व संशोधन आणि पूर्व सिद्धांत विचारात घेऊन आशय विश्लेषणाच्या सुरुवातीलाच पूर्वानुमान मांडले जाते. संशोधनात संकलित केलेली माहिती वापरून पूर्वानुमानाची चाचणी केली जाते.

३. विश्लेषणाचे एकक ठरविणे : कोणत्या वाचनसाहित्याचे आशय विश्लेषणकरायचे हे ठरविले जाते. उदाहरणार्थ नियतकालिकांतील लेखांचे, ग्रंथाचे, ब्लॉगचे, प्रबंधांचे, वर्तमानपत्रातील लेखांचे इ.

४. नमुना निवड : आशय विश्लेषणाचे एकक निश्चित झाल्यावर लक्ष्य समूह निश्चित करून नमुना निवड केली जाते. यासाठी प्रथम नियतकालिक म्हणजे काय? लेख म्हणजे काय? हे निश्चित करावे लागते. आशय विश्लेषणासाठी नमुना निवड करावी लागते. त्याद्वारे संशोधनाची व्याप्ती व मर्यादा निश्चित होते.

५. प्रत्यक्ष माहितीचे विश्लेषण: प्रत्यक्ष आशय विश्लेषणकरताना कोणत्या चलाची किंवा विषयाची, उपविषयाची माहिती जास्त मांडली आहे याचे परीक्षण करणे म्हणजेच नियतकालिकामध्ये कोणत्या विषयाच्या लेखांवर जास्त भर दिला आहे, कोणत्या चलाची वारंवारिता जास्त आहे; लेखकांच्या, वर्षाच्या वितरणा प्रमाणे, विषयांच्या अनुषंगाने विश्लेषणकेले जाते. नियतकालिकामध्ये कोणत्या विषयाची किती माहिती प्रकाशित केली आहे? कोणत्या विषयावर सर्वात जास्त लेख आहेत? लेखांप्रमाणेच अहवाल, ग्रंथपरीक्षणे यांचा समावेश आहे का? याचे विवेचन केले जाते.

६. अहवाल लेखन : माहितीचे विश्लेषणाच्या आधारे काही निश्चित निष्कर्ष मांडले जातात. संशोधनात मिळालेल्या माहितीच्या आधारे काही विधाने केली जातात.

## ३.६ आशय विश्लेषण इतिहास

आशय विश्लेषणही एक आधुनिक पद्धती आहे. विसाव्या शतकापासूनच या पद्धतीची सुरुवात झाली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पत्रकारिते (Journalism) च्या विद्यार्थ्यांनी विविध वर्तमानपत्रांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी आशय विश्लेषणाचा वापर केला. यामध्ये आंतरराष्ट्रीय संबंध, खेळ आणि इतर विषयांना कोणत्या वर्तमानपत्रात किती स्थान दिले जाते याचा अभ्यास केला गेला.

- १९२० – १९३० च्या दशकातील आशय विश्लेषणाचा वापर

कोलंबिया विश्वविद्यापीठात १९२० ते १९२९ या दशकात पत्रकारितेच्या शाळेत आशय विश्लेषणाचे केंद्र सुरु करण्यात आले.

१९२६ मध्ये मेल्कोम विल्ली यांनी वर्तमानपत्रावर आधारित आशय विश्लेषणकेले.

याद्वारे १९३० मध्ये जे.एल.वूडलँड (J. L. Woodland) यांनी अमेरिकेतील वर्तमानपत्रात विदेशी बातम्यांना किती स्थान दिले जाते, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

थोडक्यात १९२० – १९३० च्या दरम्यान प्रचलित माहितीचे विश्लेषणकरून त्याच्या आशयाच्या आधारे निष्कर्ष मांडले गेले.

- १९३० – १९४० च्या दशकातील आशय विश्लेषणाचा वापर

१९३० – १९४० या दशकात आशय विश्लेषणांची संख्या वाढली आणि याचा उपयोग वर्तमानपत्रापुरता मर्यादित न राहता सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या अध्ययनासाठी उपयोगात आणला जाऊ लागला.

१९३२ मध्ये एफ.फेरिस (F. Faris) ने वर्तमानपत्राच्या माध्यमातून गुन्हेगारीचे प्रमाण जाणण्याचे प्रयत्न केले.

१९३८ मध्ये लॅसवेल (Lasswell) यांनी मनोवैज्ञानिक मुलाखतीमध्ये माहितीदात्यांच्या प्रतिक्रियेत आपल्याप्रति (Proself), आपल्या विरोधी (Anti-self), दुसऱ्यांच्या प्रति (Pro-others) तथा दुसऱ्यांच्या विरोधी (Anti-others) श्रेणीमध्ये विभाजित केले व त्यातून हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला की अशा प्रकारची प्रतिउत्तरे किती वेळा प्राप्त होऊ शकतात. या अभ्यासापासून आशय विश्लेषणाचे प्रयत्न वाढू लागले.

- १९५० – १९६० च्या दशकातील आशय विश्लेषणाचा वापर

  या दशकात आशय विश्लेषणाचा वापर पत्रकारितेपुरता मर्यादित न राहता अन्य क्षेत्र जसे मानसशास्त्र, इतिहास, शिक्षण, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, साहित्य यांच्या विश्लेषणात सुध्दा केला जावू लागला.

- १९६० – १९७० च्या दशकातील आशय विश्लेषणाचा वापर

  या काळातील माहिती तंत्रज्ञान म्हणजेच पर्यायाने संगणकाच्या वापराद्वारे आशय विश्लेषणात अधिक वैज्ञानिकता व अधिक तटस्थता आली आहे.

- १९८० च्या नंतर ....

  आशय विश्लेषणया पद्धतीचा वापर करून सामाजिक शास्त्रातील बऱ्याच प्रश्नांचे, स्थितींचे विश्लेषणकरणे सोपे होऊ लागले. उदा. १९८० मध्ये एका विशेष चित्रपटाच्या विश्लेषणासाठी या पध्दतीचा उपयोग केला, ज्यात गुजरातमधील सहकारी दुग्ध व्यवसायाला दर्शविले होते. २००० मध्ये प्रारंभ झालेल्या स्टार चैनलद्वारे प्रदर्शित टीव्हीवरील 'कौन बनेगा करोडपती' याचे अध्ययन केले गेले.

  तर एका अभ्यासात १९९९ – २००० मध्ये वर्तमानपत्रातून विषयवस्तू विश्लेषणाद्वारे सांप्रदायिक दंगे, जातीय हिंसा, चित्रपट व टेलिव्हिजनवरील हिंसा व लैंगिकतेचे स्वरूप आणि विशेषतः वृत्तपत्र व टीव्हीवरील जाहिराती, न्यायालयाद्वारे दिलेले निर्णय, न्यायपालिकेची न्याय करण्याची प्रक्रिया, न्यायालयीन कोठडीतील मृत्यू, न्यायालयाच्या माध्यमातून घटस्फोट, आई-वडिलांच्या मर्जीविरुध्द केलेले विवाह यावरील लेख व कथा इत्यादींवरील अध्ययन या पद्धतीद्वारे केले गेले.

## ३.७ आशय विश्लेषणासाठी वापरण्यात येणाऱ्या आज्ञावली

आशय विश्लेषणासाठी वापरण्यात येणाऱ्या काही आज्ञावली देखील ऑनलाईन उपलब्ध आहेत. काही आज्ञावली मोफत उपलब्ध होतात तर काही आज्ञावलींसाठी मूल्य द्यावे लागेते. या आज्ञावलींचे दोन प्रकार पडतात-

१. शब्दकोश आधारीत कार्यक्रम (Dictionary Base Programm)

२. आशय विश्लेषण आज्ञावली.

सदर आज्ञावली या प्रोपयटरी स्वरूपातील तर काही विनामुल्य स्वरूपातील आहेत. सध्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी एस. पी. एस. एस. ही आज्ञावली वापरली जाते.

CATPAC नावाच्या आज्ञावलीमध्ये कोणत्याही प्रकारचा मजकूर किंवा कल्पना यांचा सारांश इंटेलिजेन्ट पद्धतीने उपलब्ध होतो. ही आज्ञावली हाताळण्यास सोपी आहे.

शब्दकोश आधारीत कार्यक्रमामध्ये **Computer Programs for Text Analysis** ही आज्ञावली विनामुल्य उपलब्ध होते.

आशय विश्लेषणात वापरण्यात येणाऱ्या आज्ञावली पुढील प्रमाणे –

## सारांश

आशय विश्लेषणम्हणजे काय?, आशय विश्लेषणाच्या व्याख्या, आशय विश्लेषणाची उद्दिष्टे, आशय विश्लेषणाची गरज, आशय विश्लेषणाच्या पायऱ्या, आशय विश्लेषणाचा इतिहास, आशय विश्लेषणाचे महत्त्व इ. विषयी विवेचन केले आहे. थोडक्यात आशय विश्लेषण या संकल्पने विषयीचा आढावा सदर प्रकरणात घेतला.

## संदर्भ


१. Patil, Namita P., & Lihitkar, Shalini R. (2013). Content Analysis of Library Herald 2008-2011. *Research Front*, *1*(1), 55–62p.

२. आगलावे प्रदीप. (n.d.). संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे. पुणे.

३. बापते विशाल, आणि गेडाम ज्योती. (२०१५ - २०१६). “डेसिडॉक जर्नल ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी” या नियतकालीकाच्या सन २०१० ते २०१५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या संशोधनपर लेखांचे आशय विश्लेषण. ज्ञानगंगोत्री, ३(४), १८पा.

४. भोसले तरुजा. (२००८). संशोधन पद्धती (प्रथम). सिंधुदुर्ग: श्री साई प्रकाशन.

५. चव्हाण निवृत्ती ज. (2013). ग्रंथालयशास्त्राच्या ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकातून प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आशयविश्लेषणाचा अभ्यास (शोधाप्रबंधिका). टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

६. कऱ्हाडे बी. एम. (२००७). शास्त्रीय संशोधन पद्धती (दुसरी). नागपूर: पिंपळापुरे आणि कं. पब्लिशर्स.

७. कुंभार राजेंद्र. (२०१३). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन (प्रथमावृती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

# प्रकरण ४ लायब्ररी हेराल्ड या ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नियतकालिकाचे आशय विश्लेषण


| क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.१ | लायब्ररी हेराल्ड विषयी | ४८ |
| ४.२ | लायब्ररी हेराल्ड नियतकालिकातील आशय विश्लेषण | ४९ |
| ४.२.१ | वर्षाप्रमाणे लेखांचे विश्लेषण | ५० |
| ४.२.१.१ | २००७ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ५१ |
| ४.२.१.२ | २००८ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ७० |
| ४.२.१.३ | २००९ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ८२ |
| ४.२.१.४ | २०१० या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | ९२ |
| ४.२.१.५ | २०११ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १११ |
| ४.२.१.६ | २०१२ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १२७ |
| ४.२.१.७ | २०१३ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १४० |
| ४.२.१.८ | २०१४ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण | १५७ |
| ४.२.२ | विशेष अंक आणि सर्वसाधारण अंक | १७५ |
| ४.२.३ | शोधनिबंधांची लांबी | १७५ |
| ४.२.४ | लेखांचे विश्लेषण | १७७ |
| ४.२.५ | लेखक योगदान विश्लेषण | १७८ |
| ४.२.६ | अग्रेसर लेखक | १८० |
| ४.२.७ | मुख्य विषय पैलू | १८१ |
| ४.२.७.१ | ग्रंथालयाच्या प्रकारानुसार लेखांचे विश्लेषण | १८२ |
| ४.२.७.२ | ग्रंथालयातील सेवा, वाचनसाहित्य आणि संबंधित ग्रंथपालन व्यवसाय | १८३ |
| ४.२.७.३ | ग्रंथालयाच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक | १८४ |
| ४.२.७.४ | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान विषयाचे विश्लेषण | १८५ |
| ४.२.७.५ | ग्रंथसूचीय परीक्षण, उल्लेख निर्देश याविषयीची माहिती | १८६ |
| ४.२.८ | देशांप्रमाणे विश्लेषण | १८८ |
| | सारांश | १८८ |
| | संदर्भ | १८९ |

## ४.१ लायब्ररी हेराल्ड (Library Herald)

दिल्ली ग्रंथालय संघ भारतात सर्वात जुनी आणि सर्वात लक्षवेधक ग्रंथालय संघटना आहे. असोसिएशनने अनेक कार्यक्रम यावर हाती घेतले आहेत आणि असोसिएशन च्या छत्राखाली अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. दिल्ली ग्रंथालय असोसिएशन त्याचा संग्रह (Archive) कायम राखते.

दिल्ली ग्रंथालय संघ काही ग्रंथ व नियतकालिक प्रकाशित करते. 'लायब्ररी हेराल्ड' हे १९५८ पासून संघाकडून प्रकाशित होणारे नियतकालिक आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्राबाबत माहिती प्रकाशित करणारी अनेक नियतकालिके आहेत त्यापैकी इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारे 'लायब्ररी हेराल्ड' हे एक अग्रगण्य नियतकालिक आहे. 'लायब्ररी हेराल्ड' हे पिअर रिव्ह्यूड नियतकालिक आहे. यामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्राविषयी विविध मुद्द्यांवर लेख प्रकाशित केले जातात.

हे नियतकालिक वर्षातून ४ वेळा म्हणजे मार्च, जून, सप्टेंबर, डिसेंबर या महिन्यात प्रकाशित केले जाते. थोडक्यात हे त्रैमासिक आहे. या वर्षी नियतकालिकाचा ५४ वा खंड प्रकाशित होईल. १९५८ ते १९६१ या कालावधीत 'लायब्ररी हेराल्ड' चे पहिले संपादक श्री. पी. एन. कौला हे होते. 'लायब्ररी हेराल्ड' चा आय. एस. एस. एन. नं. ००२४-२२९२ आणि ऑनलाईन आय. एस. एस. एन. नं. ०९७६-२४६९ असा आहे. आत्तापर्यंत या नियतकालिकाचे संपादकत्व श्री. पी. एन. कौला (१९५८-१९६१) , श्री. एन. के. गोयल (१९६२-१९७९), प्रा. क्रिशन कुमार (१९७९-२००५), प्रा. सी. पी. वशिष्ट (२००६ ते आत्तापर्यंत) या ४ संपादकांनी भूषविले आहे. इंडियन सायटेशन इंडेक्स मध्ये रिसर्च इम्पॅक्ट फॅक्टर ०.१ आहे.

लेख लिहिण्यासाठी लेखकांना मार्गदर्शन म्हणून 'लेखकांसाठी सूचना' अशी माहितीदेखील दिली आहे. यामध्ये लेखकांनी किती शब्द मर्यादेपर्यंत लेख लिहावेत, संदर्भ सूची कशी असावी, तक्ते, आलेखांची रचना कशी असावी, छायाचित्रे कशी असावीत यासंबंधी माहिती दिली आहे. २००३ पासून या नियतकालिकामधील सर्व अंक (लेख) नियमितपणे ऑनलाईन प्रकाशित केले जातात.

२०१६ च्या माहिती नुसार भारतासाठी नियतकालिकाची वार्षिक वर्गणी रु. २,३००, ऑनलाईन वर्गणी रु. १,७२५ तर संग्रहासाठी (Archive) साठी रु. १,७२५ आकारली जाते. तर परदेशासाठी वार्षिक वर्गणी १५० $ (USD), ऑनलाईन 57 $ (USD) इतकी आहे.

'लायब्ररी हेराल्ड' या नियतकालिकामध्ये लेख लिहिण्याची शब्द मर्यादा ४०००-६००० शब्द, अपवादात्मक परिस्थितीत ८००० ते १०००० शब्द इतकी आहे. तर छोटे संभाषण १५०० ते ३००० शब्दांपर्यंत आणि कार्यशाळा, ग्रंथपरीक्षणे, अहवाल हे ८०० ते १५०० शब्दांपर्यंत लिहिले जावे अशी मर्यादा आहे.

## ४.२ लायब्ररी हेराल्ड नियतकालिकातील आशय विश्लेषण

'लायब्ररी हेराल्ड' या ग्रंथालयशास्त्र विषयाशी संदर्भात त्रैमासिकाच्या २००७ ते २०१४ या आठ वर्षातील लेखांचे विश्लेषणसदर प्रकरणात केले आहे.

### ४.२.१ शोधनिबंधाची संख्यात्मक निर्मिती

**सारणी क्र. १ शोधनिबंधाची संख्यात्मक निर्मिती**

| अ. क्र. | वर्ष | खंड क्र. | एकूण अंक | शोधनिबंधाची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४ | ५२ | ४ | ३३ | १०.७१ |
| २ | २०१३ | ५१ | ४ | २३ | ७.४७ |
| ३ | २०१२ | ५० | ४ | ५१ | १६.५६ |
| ४ | २०११ | ४९ | ४ | ४२ | १३.६४ |
| ५ | २०१० | ४८ | ४ | ३८ | १२.३४ |
| ६ | २००९ | ४७ | ४ | ५२ | १६.८८ |
| ७ | २००८ | ४६ | ४ | ३४ | ११.०४ |
| ८ | २००७ | ४५ | ४ | ३५ | ११.३६ |
| **एकूण** | | **८ खंड** | **३२ अंक** | **३०८** | **१००%** |


'लायब्ररी हेराल्ड' या नियतकालिकाचे प्रत्येक वर्षी मार्च, जून, सप्टेंबर, डिसेंबर या महिन्यात अंक प्रकाशित केले जातात. प्रत्येक वर्षी चार खंडात याप्रमाणे २००७ ते २०१४ या आठ वर्षात ३०८ लेख प्रकाशित झाले आहेत. २००७ मध्ये ३३(१०.७१%) लेख, २००८ मध्ये २३ (४.४७%) लेख, २००९ मध्ये ५१(१६.५६%) लेख, २०१० मध्ये ४२(१३.६४%) लेख, २०११ मध्ये ३८(१२.३४%) लेख, २०१२ मध्ये ५२(१६.८८%) लेख, २०१३ मध्ये ३४(११.०४%) लेख, तर २०१४ मध्ये ३५(११.२६%) लेख प्रकाशित झाले आहेत. २०१२ मध्ये ५२(१६.८८%) असे सर्वात जास्त लेखांचे प्रकाशन केले गेले. यामध्ये प्रो. दासगुप्ता यांच्या स्मरणार्थ सप्टेंबर महिन्यात २७ लेख प्रकाशित केले गेले, तर २००९ डिसेंबर मध्ये प्रो. कौला यांच्या स्मरणार्थ २२ लेख प्रकाशित केले गेले. सदर लेखांचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे .....

### ४.२.१.१ २००७ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.१ २००७ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | महिने | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २००७ | मार्च | ४५ | १ | ९ | २७.२७ |
| | जून | ४५ | २ | ११ | ३३.३३ |
| | सप्टेंबर | ४५ | ३ | ६ | १८.१८ |
| | डिसेंबर | ४५ | ४ | ७ | २१.२२ |
| | | | **एकूण** | **३३** | **१००** |

**आलेख क्र. १ २००७ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**




२००७ या वर्षी जून महिन्यातील लेखांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ११(३३.३३%) इतकी आहे. तर मार्च महिन्यात ९(२७.२७%), सप्टेंबर महिन्यात ६(१८.१८%), डिसेंबर महिन्यात ७(२१.२२%) इतके लेख लिहिले गेले.

**Year 2007, Volume-45, Issue-1 (March)**

Knowledge Society: Implications for the Indian Society

*T N Rajan*

कोणत्याही देशाच्या सामाजिक - आर्थिक प्रगतीसाठी ज्ञान हा मुख्य आधार असतो. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून माहिती तंत्रज्ञान, संपर्कमाध्यमांचा विकास यातून ज्ञानामध्ये प्रचंड भर पडली आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे भारत काही दशकातच महासत्ता बनेल. म्हणून भारत सरकारने वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रगतीसाठी access (वापर), concepts (संकल्पना), creation (निर्मिती), applications (प्रत्यक्ष वापराची साधने), services (सेवा) या गोष्टींवर आधारित NKC (2005) ची स्थापना केली आहे. ग्रंथालय व माहिती सेवा याचाच एक भाग आहेत. यासाठी व्यावसायिक व तज्ञ यांनी १० सूचना केल्या आहेत. लवकरच काही दशकात सामाजिक, आर्थिक प्रगतीसाठी ग्रंथालय व माहिती सेवा विभागामधून तज्ञ व्यावसायिक उदयास येतील. अशा तज्ञांद्वारे भारतीय समाजाला ज्ञानमय समाज बनविण्यासाठी NKC वचनबद्ध आहे. तज्ञांद्वारे केलेल्या सूचना, नवीन कल्पना वापरून योजना बनवितात. तर अशा योजनांची कार्यवाही NKC द्वारे सुरु आहे.

Open Access Journals - A Myth or Reality

*A. Ratnakar*

नियतकालिकांचे प्रकाशन १६६५ मध्ये फ्रान्स मध्ये सुरु झाले. त्यापूर्वी संशोधक आपले शोधनिबंध, लेख एकमेकांकडे पत्राद्वारे किंवा एखाद्या मध्यवर्ती संस्थेकडे पाठवायचे. खूप वर्षे ही चळवळ विद्वान लोक व संस्था यांपुरतीच मर्यादित होती. १८६९ मध्ये मॅकमिलन ग्रुप या व्यावसायिक प्रकाशनाने 'नेचर (Nature)' हे प्रकाशन सुरु केले. भारतातही विसाव्या शतकात प्रकाशनाने वेग घेतला व आता जवळजवळ ५००० प्रकाशने निर्माण झाली आहेत.

परंतु पुस्तकांचा खर्च, ठेवण्यासाठी जागा, ग्रंथालयाच्या अंदाजपत्रकावर भार, माहितीचे प्रचंड स्त्रोत व अद्ययावत तंत्रज्ञान यामुळे मुद्रित प्रकाशनाऐवजी संगणकावर प्रकाशन करणे सोपे झाले आहे. तसेच जुनी दफ्तरे, दस्तावेज सुद्धा संगणकावर संग्रहित केली जाऊ शकतात. अपेक्षा ही आहे की ही माहिती सर्वांसाठी खुली असावी. इंटरनेट मुळे जगात कोठूनही कुठेही माहिती पोहोचू शकते. यावर कोणाचेही स्वामित्व हक्क नसावेत अशी मागणी होत आहे. परंतु काही संशोधक, प्रकाशक यांना हे मान्य नाही. मानवी समाजाच्या प्रगतीसाठी हे लवकर व्हावे यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

Patents and Patenting in India: Some Aspects

*B M Gohel*

गेल्या काही शतकात जगात अनेक शोध लागले. काही संशोधकांनी आपले शोध मानवाच्या, जगाच्या कल्याणासाठी अर्पण केले. तर काहींनी या शोधाचे म्हणजेच बौद्धिक संपदेचे स्वामित्व हक्क स्वतःपाशी ठेवले. हे बौद्धिक संपदा स्वामित्व हक्क म्हणजेच पेटंट किंवा सनद होय. यामुळे इतरांना त्यांच्या परवानगीवाचून त्या शोधाचा वापर करता येत नाही. सरकारने काही काळासाठी हा हक्क दिलेला असतो. हे शोध वापरत मोठ्या प्रमाणावर उत्पादने, औषधनिर्मिती व मानवाचे कल्याण होऊ शकते. त्यामुळे ज्ञान गुप्त राहण्यापेक्षा त्याचा प्रसार होणे गरजेचे आहे.

Automate Your Library

*Moorttimatee Samantaray*

ग्रंथालय संगणकीकरणाचे प्रयत्न १९३० पासून सुरु झाले. १९९० पासून ग्रंथालयांमध्ये आज्ञावलीचा वापर सुरु झाला. याचे सदस्यांना माहिती मिळणे, कामकाजाचा वेग वाढणे, सूची

बनविणे, निर्णय घेणे, तालिका बनविणे, ती इंटरनेटवर ठेवणे, इतर ग्रंथालयांशी साधनवाटणी, ग्रंथपडताळणी करणे असे फायदे होतात. तसेच जुने ग्रंथांचे स्कॅन, डीजीटाईज करून संगणकावर जतन करण्यासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्यांची इच्छाशक्ती, स्वीकृती तसेच नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठीची आवड असली पाहिजे.

Network Information System

*Pushplata Srivastava*

आतापर्यंत ग्रंथालयांकडे ज्ञानभांडार म्हणून बघितले जात होते. परंतु आता ग्रंथालयांकडे ज्ञानाचा साठा करणे एवढीच संकुचित भूमिका न ठेवता ज्ञानाचा प्रसार करणे, ज्ञानाची देवाणघेवाण आणि बौद्धिक संपदेची वाढ होण्यासाठी आधार देणे ही भूमिका आहे. साक्षर समाजाला ज्ञानमय समाज बनविणे हे काम ग्रंथालये करू शकतात. त्यासाठी आपल्याला स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नेटवर्क स्थापून माहिती व ज्ञान यांचे आदान प्रदान करावे लागते. यासाठी ग्रंथपालांना संगणक व इंटरनेटचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

Impact of Internet on Library and Information Services

*Shehbad Husain Naqvi*

इंटरनेटमुळे आता ग्रंथालये स्थानिक न राहता वैश्विक झाली आहेत. जगाच्या एका टोकाला असणारा वाचक दुसऱ्या टोकाला असणाऱ्या ग्रंथालयातील संदर्भ पाहू शकतो. यासाठी ग्रंथालयाची वेब साईट अद्ययावत असणे आवश्यक आहे. ग्रंथपाल इंटरनेटवरून वेगवेगळ्या प्रकाशनांच्या पुस्तकांची मागणी नोंदवू शकतात, तसेच सदस्यांना ई-मेलमधून माहिती देवू शकतात.

Reading Habits of Rural Under-Graduate Students

*Sanjay K Kaushik, Jaswant Singh Khanchi*

या इंटरनेटच्या युगातही पुस्तक वाचनाची आवड व कौशल्य यामुळे ग्रंथालयांचे महत्व आहे. वाचनाच्या सवयीमुळे व्यक्तींची मानसिक जडणघडण व वाढ होत असते. लहानपणापासून मुलांना वाचनाची आवड लावणे ही जबाबदारी पालक, शिक्षक व ग्रंथपालांची आहे. मुलांच्या वाचनात विविधता असते - दैनिके, साप्ताहिके, चित्रपट व इतर विषयांची मासिके, साहसकथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह, स्पर्धापरीक्षेची पुस्तके, चरित्रे, विज्ञानकथा, शोधांच्या जन्मकथा इ. विशेषतः ग्रामीण भागातील मुलांना वाचनासाठी उद्युक्त करणे गरजेचे आहे.

Bibliography Usage and Practice: A Study through Tehran's Academic Counselling Centres

*Nosrat Riahinia, Ali Azimi*

ग्रंथसूची सध्याच्या युगात अनेक प्रकारात उपयोगी आहे जसे की, कौटुंबिक समुपदेशन, सामाजिक कौशल्यांमध्ये वाढ, मुलांच्या वाढत्या वयातील ताणतणावावर उपाय तसेच त्यांना व्यवसाय मार्गदर्शन वगैरे. Bibliography हा शब्द Bibious म्हणजे Book म्हणजेच पुस्तक व Therapia म्हणजे to cure म्हणजेच इलाज करणे या दोन शब्दांनी बनला आहे. पूर्वी रुग्णांना होणाऱ्या वेदनांपासून त्यांचे मन दुसरीकडे वळविण्यासाठी त्यांना पुस्तके वाचायला दिली जात. आता मोठमोठ्या रुग्णालयांत सुसज्ज ग्रंथालये असतात. त्यातील ग्रंथपाल रुग्णांना उपयोगी पडतील अशी पुस्तके पुरवू शकतात. आजारासंबधी माहिती देणारी पुस्तके, अशाच प्रकारच्या आजारातून बाहेर पडलेल्या व्यक्तींचे अनुभव सांगणारे ग्रंथ, रुग्णांचे मानसिक, भावनिक ताणतणाव घालवणारे साहित्य, धार्मिक पुस्तके अशांचा यात समावेश

होतो. लहान मुलांना राग किंवा आक्रमकपणावर ताबा, ताणतणावाचे नियमन, नातेसंबंध, सामाजिक बांधिलकी या गोष्टी अंगी बाणण्यासाठी पुस्तकांचा उपयोग होतो. त्यांच्याच वयाचे एखादे पुस्तकातील पात्र यशस्वीपणे असे प्रश्न सोडवत असेल, तर मुले त्यातून शिकतात. गोंधळलेल्या समाजासाठी आध्यात्मिक, भावनिक पुस्तके उपयोगी पडतात. मानसिक समस्या सोडवण्यासाठी समुपदेशकांनाही पुस्तकांचा उपयोग होतो. या सर्वांना मदत करण्यासाठी ग्रंथपालांना मानसशास्त्राची व समुपदेशनाची जाण असेल तर ते ग्रंथसूचीमध्ये उत्तम काम करू शकतात.

KUMAR (PSG), Fundamentals of information science. *Prof Krishan Kumar*

## **Year 2007, Volume-45, Issue-2 (June)**

Public Library as Rural Community Resource Centre

*C P Vashishth*

ग्रंथालय ही संस्था मुख्यतः 'स्वयं अध्ययन' या कल्पनेसाठी आधारभूत आहे. पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व्यक्तीला शिक्षित करू शकतात. पण त्या व्यक्ती शहाण्या बनतीलच असे नाही. परंतु स्वयं अध्ययन व्यक्तीला कुशल व शहाणे बनविते. निष्णात धनुर्धारी एकलव्य हे याचे आदर्श उदाहरण आहे. खेडोपाडी अजूनही शाळा, महाविद्यालये नसतात. तिथे ग्रंथालये स्वयं अध्ययनाचे केंद्र म्हणून उत्तम कामगिरी करू शकतात. खेड्यातील लोक शिकले, व्यवसाय कुशल झाले, त्यांचे राहणीमान सुधारले तर ते शहराकडे स्थलांतर करणार नाहीत. वाचन हा त्यांच्या फावल्या वेळेचा छंद व अभ्यास होऊ शकतो. त्यासाठी ग्रंथालयांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सहकार्य घेतले पाहिजे. त्यातून आरोग्य, धान्य उत्पादन, खते, बी-बियाणे, आजार, शेती, शिक्षण, शिष्यवृत्ती, कर्ज, रोजगार, कायदेशीर मदत, विश्लेषणयासंबंधीचे

सरकारचे अध्यादेश, विविध कल्याणकारी योजना यांची माहिती ग्रामीण जनतेला मिळू शकेल. अशा प्रकारे ग्रामीण भागातील ग्रंथालये देशाच्या विकासात मोठी मदत करू शकतात.

Price Rising Trends in Periodicals at DRDE Library, Gwalior: A Case Study

*Neerja Verma, Rajnish Tamrakar, Mridulata Shrivastava*

ग्वालियर येथील DRDE ग्रंथालयाने १९९७-२००६ या कालावधीतील २३ परदेशी व १० भारतीय नियतकालिकांच्या वाढत्या किंमतींचा आढावा घेतला. त्याप्रमाणे सर्व परदेशी व भारतीय नियतकालिकांनी त्यांच्या वर्गणीचे दर वाढवले आहेत. म्हणून ग्रंथालयाला सुद्धा आपल्या अंदाज पत्रकात वाढीव तरतूद करावी लागत आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात होणारे संशोधन नियतकालिकांमधून प्रकाशित होत असते. ग्रंथालये त्यांच्या अंदाज पत्रकातील ७०-७५% भाग नियतकालिकांवर खर्च करतात. वाढत्या वर्गणीमुळे खर्चाचा ताळमेळ घालणे त्यांना अवघड होत आहे.

Multimedia and its Elements for Modern Library System

*Vinod Gautam*

मल्टीमिडिया Multimedia हा शब्द Winser Macey याने १९०९ मध्ये प्रथम वापरला. Multi म्हणजे खूप आणि Media म्हणजे संपर्क यंत्रणा किंवा माध्यम. म्हणून Multimedia म्हणजे उगमापासून अंतिम ठिकाणापर्यंत संदेश पोहोचवणारी अनेक माध्यमे होय. यामध्ये text, sound, graphics, animation आणि video यांचा एकाचवेळी उपयोग करतात. या माध्यमांचा उपयोग शेती, ध्वनीक्षेपण, प्रकाशन, व्यवसाय, मनोरंजन अशा विविध क्षेत्रात होतो. विकसित तसेच काही विकसनशील देशांमध्ये सूचना देण्यासाठी माध्यमांचा

उपयोग करतात. एकाचवेळी व्यक्ती हा संदेश पाहत असते, ऐकते त्यामुळे तो मनावर ठसतो. सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये मल्टीमिडीयाचा चांगला उपयोग होऊ शकतो. अशिक्षित किंवा अर्धशिक्षित लोकांसाठी कुटुंब कल्याण कार्यक्रमातून शिक्षण विषयक, आरोग्य विषयक कार्यक्रम दाखवता येतात. शैक्षणिक संस्थांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने शैक्षणिक कार्यक्रम ठसठशीत व खूप आवडणारे करता येतात. या प्रकारे मल्टीमिडिया हे व्यावसायिकांच्या हातातील उत्तम साधन आहे.

RSS Based Information Services in Libraries: A Study

*N S Harinarayana, Mallinath Kumbar, P Pradeep*

सदर लेखात RSS (Real Simple Syndication) म्हणजे काय व त्याचा ग्रंथालयात वापर याविषयी विवेचन आहे. XML आधारित RSS चा वापर प्रचलित जागरुकता सेवा व निवडक माहितीचे प्रसारण या सेवा परिणामकारकरित्या देण्यासाठी होतो. ग्रंथपाल याचा वापर करून संशोधक, उपयोजक यांना त्यांच्या विषयाची माहिती इ-मेल द्वारे पाठवू शकतात. या द्वारे विविध प्रकारच्या माहितीचा वापर केला जाऊ शकतो. उपयोजकांच्या दृष्टीने उपयुक्त अशा सेवांचा वापर सध्या भारतात मोठ्या प्रमाणावर केला जात आहे.

Changing Role of Information Professionals in Digital Era

*Jyoti Gupta*

ज्ञान हे आधुनिक समाजाचे मौल्यवान साधन आहे. आधुनिक समाजाची प्रगती लेखक, विद्वान, संशोधक यांच्याकडून निर्माण होणाऱ्या ज्ञानावर अवलंबून असते. माहिती तंत्रज्ञानातील प्रगती व इंटरनेटमुळे ज्ञानाचा प्रचंड साठा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे ग्रंथपालांवरील जबाबदारीही वाढली आहे. पूर्वी त्यांचे काम त्यांच्या ग्रंथालयापुरते मर्यादित

होते. आता त्यांना इंटरनेट वरील जागतिक आभासी ग्रंथालयासाठी काम करावे लागेल. त्यासाठी त्यांना विविध छापील माहितीची तसेच संगणकावरील आभासी ग्रंथालयातील माहितीसाठ्याची माहिती करून घ्यावी लागेल. तसेच ते वापरण्याची कौशल्ये आत्मसात करावी लागतील. वेब पाने तयार करणे, संगणकीय जाळ्यावर काम करणे, सर्च इंटरफेसची रचना करणे इत्यादी कौशल्ये अंगी बाणवावी लागतील. त्यासाठी प्रशिक्षण, अनुभव, चर्चासत्रे, परिषदा व परिसंवाद यांचे आयोजन करावे लागेल. पुढील काळात ग्रंथपालांमध्ये ज्ञान, कौशल्ये व वैयक्तिक गुणवत्ता यांचे एकीकरण असण्याची गरज आहे.

Emerging Trends in Medical Librarianship–Proceedings of Medical Library Association of India-2006: An Analysis

*Rajeev Kumar*

सध्याच्या माहिती युगात लोक आपल्या आरोग्याबद्दल जागरूक झाले आहेत. त्यांना आरोग्य सेवेची माहिती हवी असते. त्यांना उत्तम सेवा देण्यासाठी वैद्यकीय आणि आरोग्यशास्त्र संस्था परिषदा, व्याख्याने आयोजित करतात व लोकांना अद्ययावत माहिती पुरवतात. त्यासाठी त्यांना आधुनिक माहिती यंत्रणांवर अवलंबून रहावे लागते. ही गरज वैद्यकीय ग्रंथालये पुरवू शकतात. ग्रंथालयांमध्ये वेगवेगळे आजार, त्यावरील संशोधन, आधुनिक औषधे व उपचार पद्धती, रुग्णांचे अनुभव या विषयांवरील पुस्तके असतात, तसेच रक्तदात्यांची यादी, वैद्यकीय सेवा देणाऱ्या संस्थांची माहिती असते. हे सर्व आरोग्य सेवा पुरवणाऱ्यांना किंवा रुग्णांना क्षणात उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे वैद्यकीय ग्रंथालये ही डॉक्टर, रुग्ण व संशोधक यांच्यासाठी वरदान ठरू शकतात.

Public Library and Tourism Information: A Congenial Approach

*Susanta Kumar Senapati*

सार्वजनिक ग्रंथालय हे लोकांसाठी स्थानिक माहिती केंद्र असते. तिथे सर्व प्रकारचे ज्ञान आणि माहिती लोकांना क्षणात उपलब्ध होते. येथे सर्व प्रकारच्या लोकांना मुक्त प्रवेश असतो. ग्रंथालयांमध्ये ज्ञानकोश, शब्दकोश, माहिती पुस्तिका, हस्तलिखिते, मार्गदर्शक पुस्तके, राजपत्रे, नकाशांची पुस्तके, पंचांगे संग्रहित असतात. इंटरनेटच्या माध्यमातून ही संगणकीय माहिती कोणालाही उपलब्ध होऊ शकते. जगभरात पर्यटनासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यामागे विश्वबंधुत्वाची भावना व परकीय चलन मिळविणे हे मुख्य उद्देश असतात. आपल्या देशात अनेक धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू आहेत, ज्या जगभरच्या पर्यटकांना आकर्षित करू शकतात. पर्यटन मंत्रालयाने जर सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये या पर्यटन स्थळांची माहिती, ठिकाणे, नकाशे, जाण्या-येण्याचे मार्ग, निवासाच्या सोयी, छायाचित्रे या गोष्टी उपलब्ध करून दिल्या तर घरगुती व व्यावसायिक पर्यटनात वाढ होऊ शकेल. तेथील स्थानिक लोकांचे व्यवसाय वाढतील व पर्यायाने देशाचा विकास होईल.

Use of Library Manager Free Ware Administrative Software: A Practical Out Look

*Khaiser Nikam, Jaya kumara*

ग्रंथालयामध्ये संगणक यंत्रणा ग्रंथ संपादन, सूची, प्रसार, नोंदी यासाठी वापरली जाते. १९३०-१९६० मध्ये ग्रंथालयांचे संगणकीकरण होऊ लागले. १९९० पासून इंटरनेट, संगणक आज्ञावली व संगणक यंत्रे यात खूपच प्रगती झाली. सद्विद्या महाविद्यालय ग्रंथालयाने (Sadvidya Composite Pre-University College Library) Library Manager Freeware Administrative Software नावाची संगणक प्रणाली वापरण्यास सुरुवात केली. यात ग्रंथपाल हे विद्यार्थी, कर्मचारी, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे यांच्या नोंदी सहज करू शकतात. तसेच त्यातून मासिक व वार्षिक बिले, पुस्तक परत न केल्यास होणारा दंड यांचे

हिशेब आपोआप होतात. प्रकाशकांकडून पुस्तकांची मागणी नोंदविता येते. शिवाय वेगवेगळ्या प्रकारचे अहवाल निर्माण करता येतात व छापता येतात . तसेच बार कोड ही आपोआप निर्माण करता येतात. या प्रणालीमुळे एक ग्रंथपाल सुद्धा पूर्ण ग्रंथालयाचे काम सहजपणे करू शकतो.

Public Libraries in Tehran (Iran): Conditions and Issues

*Nosrat Riahinia*

तेहरान (इराण) मधील ८० पैकी ६० ग्रंथालयांची प्रश्नावलीसाठी (Random) निवड करण्यात आली. त्यातील ३८ ग्रंथालयांनी प्रतिसाद देऊन प्रश्नावली भरून पाठविल्या. याप्रमाणे पदवीधारक ग्रंथपालाची नेमणूक, सुसज्ज व विस्तार करण्यायोग्य इमारती, निधी, संगणक यंत्रे व संगणक प्रणालीचा वापर, योग्य दृकश्राव्य तंत्रज्ञानाचा वापर करणे हे ग्रंथालयाच्या विकासासाठी गरजेचे आहे असे अनुमान निघाले.

## Year 2007, Volume-45, Issue-3 (September)

Rural Information System Initiatives in India

*C P Vashishth*

भारतातील ८०% जनता खेड्यात राहते. देशाच्या विकासासाठी शिक्षणाची गंगा या लोकांच्या दारापर्यंत जायला हवी. छोटी गावे, खेडी, तळागाळातील लोक यांच्यापर्यंत शिक्षण, पुनर्निर्माण, व्यावहारिक माहिती पोहोचावी, यासाठी तेथे सार्वजनिक ग्रंथालये निर्माण झाली पाहिजेत. यासाठी राजाराममोहन रॉय लायब्ररी फौंडेशन (RRRLF), राजीव गांधी फौंडेशन आणि स्वयंसेवी संस्था कार्य करीत आहेत. खेड्यातील लोक निरक्षर असले तरी त्यांच्याकडे पिढ्यानपिढ्या ज्ञानाचा प्रचंड साठा असतो. त्यांच्यातील एखाद्या साक्षर माणसाला

ग्रंथालयाची जबाबदारी देऊन इतरांनाही साक्षर करता येईल व पूर्वापार चालत आलेले लोकसंगीत, लोककथा, लोकनाट्य, लोकनृत्य, उत्सव, खाद्य चालीरीती, पारंपारिक औषधे या अमूल्य ठेव्याचे जतन व संवर्धन करता येईल. त्यामुळे जर ग्रंथालयांची दारे ग्रामीण जनता किंवा तळागाळातील लोक यांच्यासाठी उघडली तर त्यांना वाचनाची सवय लागेल, साक्षरता प्रसार होईल, त्यांचा फावला वेळ छंद व अभ्यासात जाईल, व्यवसायांचे ज्ञान वाढेल, त्यांचे राहणीमान सुधारेल व त्यांचा तसेच पर्यायाने देशाचा विकास होईल.

Agricultural Information Communication and Adoption of Innovative Practices: A Review

*Moses M Naga, A Alem W Longchar*

मानवाचे जीवनमान सुधारण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाची मोठी गरज आहे. विशेषतः भारतातील ८०% जनता खेड्यात रहात असल्यामुळे त्यांच्या पर्यंत माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार होणे गरजेचे आहे. हे लोक जास्त करून शेती व पूरक उद्योग करतात. निरक्षरतेमुळे ते पारंपारिक पद्धती, शेजारी व नातेवाईक यांचे सल्ले यावर अवलंबून असतात. ते शेतकी ग्रंथालयाचा फारसा उपयोग करून घेत नाहीत ज्याची कारणे निरक्षरता, ग्रंथालयाबद्दल भीती किंवा नाखुशी व वेळेचा अभाव ही आहेत. शेतीचे उत्पादन वाढण्यासाठी शेतकऱ्यांपर्यंत प्रगत ज्ञान व साधनांची माहिती पोहोचली पाहिजे. त्यासाठी संवाद, प्रात्यक्षिके, जत्रा, प्रदर्शन, सिनेमा व प्रशिक्षण या गोष्टी करता येतील. तसेच शेतकऱ्यांकडून पारंपारिक ज्ञान व नाविन्यपूर्ण कल्पना घेता येईल. शेतीशी संबंधीत उद्योगांनी शेतकी ग्रंथालये निर्माण करून शेतकऱ्यांपर्यंत तसेच पूरक लघुउद्योग करणाऱ्यांपर्यंत ज्ञान व माहिती पोहोचवावी जेणे करून शेतीचा विकास होईल.

Information Resources and Services on Aqua Sciences and Fisheries in India

भारताला ७००० कि.मी. पेक्षा जास्त लांबीचा समुद्र किनारा आहे. त्यामुळे मासेमारी हा विपुल प्रमाणात रोजगार व उत्पन्न देणारा व्यवसाय होऊ शकतो कारण त्याच्याशी संबंधीत अनेक उद्योग आहेत, जे मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देऊ शकतात. या उद्योगाच्या विकासासाठी माहिती, शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान या गोष्टी आवश्यक आहेत. मच्छीमारांना मासेमारी वरील साहित्य, जलशास्त्र, पर्यावरण, अर्थव्यवस्था, आधुनिक यंत्र सामग्री, हवामानाचे अंदाज, समुद्र प्रवाहाची माहिती, जगात कोणत्या माशांना मागणी आहे याची माहिती व पुरवठा, विपणन असे विषय हे सर्व समजावून देणे गरजेचे आहे. मासेमारी वरील आधारित मोठ्या उद्योगांनी ग्रंथालये (मत्स्यालयाची ग्रंथालये) निर्माण करून पत्रके, पुस्तके, संगणक, दृकश्राव्यफिती यांच्याद्वारे अद्ययावत ज्ञान, आधुनिक सामग्री, सरकारची धोरणे व सवलती, वित्तपुरवठा, बाजाराची माहिती, बाजारभाव इ. बाबी मच्छीमारांपर्यंत पोहोचवल्या पाहिजेत, ज्यामुळे केवळ खाण्यासाठी मासे पकडणे एवढेच यांचे स्वरूप न राहता तो विपुल धन मिळवून देणारा महाउद्योग होईल.

Non-Users of Circle Libraries in Chennai: A Survey

*Ramesh Babu, S K Asok Kumar, P Govinda Reddy*

परिणामकारक सार्वजनिक ग्रंथालय सेवा ही कोणत्याही देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, शास्त्रीय व तांत्रिक विकासासाठी पायाभूत मानली जाते. मद्रास विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागाने ग्रंथालयाचे उपयोजक नसणाऱ्यांबाबत संशोधन केले. लोकांनी ग्रंथालय सेवा न घेण्याची पुढील काही कारणे त्यात सांगितली आहेत.

वर्गणी भरू शकण्याची क्षमता नसणे, जास्त वर्गणी, ग्रंथालयाच्या अस्तित्वाबद्दल माहिती नसणे, कामकाजाची वेळ गैरसोयीची, वेळ नसणे, हवी असलेली पुस्तके उपलब्ध नसणे किंवा ग्रंथालयातच नसणे, ग्रंथालयाचे फायदे माहीत नसणे अशी कारणे आहेत.

या पाहणीतून लक्षात आले की ग्रंथालयाचे उपयोजक नसणाऱ्यांमध्ये पुरुष, पदवीधर, २१-३० वयातील लोक, सरकारी कर्मचारी यांचे प्रमाण जास्त आहे. तसेच वेळेचा व प्रोत्साहनाचा अभाव हे प्रमुख कारण आहे. नाविन्यपूर्ण पद्धती, उपकरणे, व तंत्रज्ञान यांद्वारे या आव्हानाचा सामना करता येईल.

Use of Collection and Services of TIRC of DRDE Gwalior: A Case Study-

*Neerja Verma, Rajnish Tamrakar, Mridulata Shrivastava*

ग्वाल्हेरच्या दूरदृष्टी असलेल्या महाराज शिंदे यांनी वन उत्पादने व खाण उत्पादने यांवर संशोधन करण्यासाठी १९४७ मध्ये एक प्रयोगशाळा काढली. मध्यप्रदेश सरकारने १९७३ मध्ये Defence Research & Development Establishment (DRDE) या नावाने नूतनीकरण केले. त्याचा एक विभाग Technical Information Research Centre (TIRC) आहे. तेथील संग्रह व सेवा याचा अभ्यास केला असता खालील गोष्टी आढळून आल्या.

हे एक विशेष ग्रंथालय आहे. याचे उपयोजक तज्ञ लोक आहेत. जवळजवळ सर्वजण येथील संग्रह व सेवेचा वापर करतात. हे उपयोजक जुन्या, नवीनतम किंवा इंटरनेटवरील नियतकालिकांचा वापर करतात. येथे इंटरनेटचा वापर, सर्च सेवा, CD ROM, डेटाबेस सर्च सेवा यावर भर दिला जातो.

हे तज्ञ व्यस्त असल्याने ते ताज्या माहितीची फोटोप्रत काढतात. तशी सोय येथे आहे. मुख्यत्वे येथील उपयोजक संशोधक, विद्वान व शास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांना त्यांचे कामासंबंधी प्रश्न सोडविण्यासाठी तसेच अहवाल व शोध निबंध लिहिण्यासाठी या ग्रंथालयाचा उपयोग होतो.

Medical College Libraries of Punjab: A Study

*Amritpal Kaur, Navneet Kaur*

गेल्या पाच दशकांपासून वैद्यकशास्त्राच्या माहितीमध्ये प्रचंड भर पडल्यामुळे वैद्यकशास्त्राचा अभ्यास फार गुंतागुंतीचा व आव्हानात्मक झाला आहे. वैद्यकशास्त्राच्या विद्यार्थी व संशोधकांपर्यंत सर्व माहिती व संशोधन पोहोचवण्यात वैद्यक ग्रंथालयाची सर्वात महत्वाची भूमिका आहे. विद्यार्थी, संशोधक व वैद्यकीय व्यावसायिक यांना रुग्णांची काळजी घेण्यासाठी नवीन कल्पना, दृष्टीकोन, सिद्धांत व अद्ययावत उपाययोजना याची माहिती ग्रंथालयाकडून मिळते. पंजाबमधील वैद्यकीय ग्रंथालयांचा अभ्यास करण्यात आला. ग्रंथालये अद्ययावत करण्यासाठी येणाऱ्या अडचणी म्हणजे निधीची कमतरता, अपुरे व अकुशल मनुष्यबळ, स्त्रोतांच्या प्रचंड किंमती व नेटवर्क नसणे या आहेत.

या पाहणीत आढळले की ३९% शिक्षक शिकविण्यासाठी, ३१% शिक्षक संशोधनासाठी, २% शिक्षक स्वतःच्या विकासासाठी, २५% शिक्षक प्रकाशनाच्या तयारीसाठी व ३% शिक्षक मनोरंजनासाठी ग्रंथालयाचा वापर करतात. ग्रंथालयात पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालिके, तांत्रिक अहवाल, शोधनिबंध, परिषदा व परिसंवादाचे अहवाल, ऑनलाईन ग्रंथ व नियतकालिके आहेत. परिपूर्ण होण्यासाठी तेथे भाषांतराची सोय, दृकश्राव्य संग्रहाची, नेटवर्कची गरज आहे.

## Year 2007, Volume-45, Issue-4 (December)

Library and Information Support Services for Socio-Economic Development of Bangladesh

*Roknuzzaman, M Nasiruddin Munshi*

सध्याच्या काळात कोणत्याही क्षेत्रातील प्रगतीसाठी माहिती हा घटक फार महत्त्वाचा आहे. माहितीचे मुख्य स्त्रोत म्हणजे ग्रंथालये. बांगलादेशमध्ये ६६५ पेक्षा जास्त विशेष ग्रंथालये व माहिती केंद्रे आहेत. सामाजिक – आर्थिक विकासासाठी त्यांच्या कार्याची पाहणी केली गेली. उपयोजकांना खालील विभागातील सामाजिक – आर्थिक माहितीची गरज असते- शेती, बालक व युवक, महिला, संस्कृती, संपर्क, अर्थशास्त्र, शिक्षण, रोजगार व बेरोजगारी, ऊर्जा, पर्यावरण, वांशिकता, अन्न व पोषण, गृहनिर्माण, उद्योग, ग्रामीण विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य, कायदे, मनुष्यबळ, नियोजन व प्रशासन, राजकारण, लोकसंख्या, सार्वजनिक आरोग्य, साधनसंपत्ती, विज्ञान व तंत्रज्ञान, सामाजिक समस्या, समाजकल्याण, पर्यटन, व्यापार, वाहतूक व शहर विकास. या ग्रंथालयांमध्ये पुस्तके, नियतकालिके, संशोधन अहवाल, संसाधने आहेत. त्यांनी ती उपयोजकांपर्यंत पोहोचवली पाहिजेत व अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे.

Electronic Journals: Impact on Scholarly Communication, User and Library

*Shiv Kumar, V K Grover*

वेगवेगळ्या परिषदा, परिसंवाद यातून विद्वानांचा संपर्क होत असतो. व यातून प्रचंड माहिती जगभर उपयोजकांपर्यंत पोहोचत असते. लिखित स्वरूपातील नियतकालिकांपेक्षा इलेक्ट्रोनिक नियतकालिक लवकर उपयोजकांपर्यंत पोहोचते कारण ते संगणक किंवा CD-

ROM किंवा नेटवर उपलब्ध असते. याचा सर्वात जास्त वापर वैद्यकीय संस्था करतात. सर्च प्रणालीमुळे (Net) लेखक, प्रकाशन, विषय यांचा उल्लेख केल्यास क्षणात माहिती उपलब्ध होते. त्यामुळे संशोधकांना सोयीचे जाते. यासाठी ग्रंथालयांमध्ये संगणक, संगणक प्रणाली व प्रशिक्षित ग्रंथपाल असणे गरजेचे आहे. या गोष्टींमुळे छापील नियतकालिके व पुस्तके मागवणे, त्यांचे जतन करणे, त्यांची सूची बनविणे व उपयोजकांना कपाटातून काढून देणे या गोष्टी कमी होतील, तसेच जागाही कमी लागेल व विद्वानांचा मोठ्या प्रमाणावर एकमेकांशी संपर्क होऊ शकेल.

User Education in Networked Environment with special Reference to National Institute of Technology Libraries in India

*Jitendra Shrivastava, H B Nandwana*

संगणक, संगणक प्रणाली व इंटरनेटमुळे ग्रंथालयांमध्ये प्रचंड प्रमाणावर माहिती उपलब्ध आहे. त्यासाठी उपयोजकांना संगणकावर काम करणे, on-line किंवा web संसाधने यांचे ज्ञान करून घेणे गरजेचे झाले आहे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षित करावे लागेल. उपयोजकांना ग्रंथालय सेवा, सुविधा संसाधने व सर्च प्रणाली शिकवण्यासाठी व्याख्याने, प्रात्यक्षिके, दृकश्राव्य सूचना, ग्रंथालय सहल, वैयक्तिक मदत, लिखित मजकूर इ. मार्ग आहेत. ग्रंथालयांचा जास्तीत जास्त उपयोग होण्यासाठी उपयोजकांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम NIT ने हाती घेतला पाहिजे. त्यासाठी अभ्यासक्रमात त्याचा समावेश करावा लागेल. NIT ग्रंथालयांना त्यांची video-film बनविता येतील ज्यामध्ये वेगवेगळे विभाग, सेवा, संग्रह ठळकपणे उपयोजकांना दाखविता येतील.

Evaluation of the Library Software Course Instructions in Tehran Universities and Comparison Between DOS and Windows Based Pars Azarakhsh Library Software

*Nosrat Riahinia, Ali Azimi*

सध्याच्या माहिती युगात ग्रंथालयांमध्ये संगणक प्रणालीमुळे माहिती मिळवण्याचा व कामकाजाचा वेग खूपच वाढला आहे. Pars Azarakhsh Company ने युनेस्कोच्या ग्रंथालय प्रणालीप्रमाणे बनविलेले Lib.Software प्रथम DOS प्रणालीचे होते. नंतर त्यांनी त्याला windows – base केले व नंतर Web वर आधारित केले. त्याची किंमत जास्त असूनही इराण (तेहरान) मधील अनेक ग्रंथालयांनी त्याचा वापर केला. वेळेचे महत्त्व, उच्चप्रतीची व भरपूर (qualitative & quantitative) माहिती, माहिती संसाधनांमधील महत्त्वाचे बदल व माहिती-आशयामधील बदल हे चार महत्त्वाचे घटक त्यास कारणीभूत आहेत. ग्रंथपालांनी फक्त लेखी प्रणाली न शिकता संगणकावर प्रात्यक्षिक शिक्षण घेणे गरजेचे आहे. तसेच संगणक आज्ञावली विकत घेताना ती Upgrade करणे हेही करारात नमूद असायला हवे. पाहणीप्रमाणे ग्रंथालय माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांना DOS based संगणकप्रणाली पेक्षा Windows based संगणकप्रणाली वापरायला सोपी व समाधानकारक वाटते.

Information Technology Challenge for University Library Personnel

*Manjit Kaur, Sewa Singh*

माहितीच्या विस्फोटामुळे ग्रंथालयांवर प्रचंड दबाव आला आहे. उपयोजकांना ही माहिती वेळेवर, विषयानुरूप, चाळणी लावलेली व सहज मिळावी असा त्यांचा आग्रह असतो.

संगणकामुळे कामाचा भार कमी होतो व चुकाही कमीत कमी होतात. कमीत कमी जागा, जास्तीत जास्त टिकाऊपणा, माहितीचे सहज, सुलभ व वेगवान दळणवळण ही नवीन तंत्रज्ञानाची वैशिष्ट्ये आहेत. प्रकाशित साहित्याच्या किमतीत वाढ, चलनवाढ व मोठ्या प्रमाणावर होणारे संशोधन व माहिती ही पण संगणकाच्या वापराची काही कारणे आहेत. त्यामुळे आता ग्रंथालय संस्कृती बदलत आहे. ग्रंथपालांनी संगणक व संगणक प्रणालींचे अद्ययावत ज्ञान मिळवून त्याचा प्रत्यक्ष वापर केला पाहिजे व हे ज्ञान उपयोजकांपर्यंत पोहोचवले पाहिजे, ज्यायोगे बाजारातील नवीन वाढत्या मागणीप्रमाणे त्यांना पुरवठा करता येईल.

Information Seeking Behaviour of Agriculture Scientists working in the Select ICAR Institutions in Delhi, and the Punjab Agricultural University, Ludhiana: A Study

*K P Singh*

कोणत्याही परिस्थितीत ग्रंथालयांनी उपयोजकांच्या समाधानाला अग्रक्रम दिला पाहिजे. उपयोजकांचे समाधान करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या गरजा जाणून घेणे. दिल्ली व पंजाब येथील ७०० शेतकी शास्त्रज्ञांचे माहिती – ग्रहण – वर्तन समजून घेताना ३७५ शास्त्रज्ञांनी प्रतिसाद दिला, त्यात खालील गोष्टी आढळून आल्या.


ग्रंथालयाची जागा हवेशीर, उजेड असणारी, धूळविरहित किंवा वातानुकूलित असावी. ग्रंथालयांमध्ये आतापर्यंतची नियतकालिके व इतर कागदपत्रे असावीत. ग्रंथालयांमध्ये पुस्तके, प्रकाशने मागवताना त्या विषयातील तज्ञांचा सल्ला घ्यावा, संगणकीकरण व नेटवर्कची व्यवस्था व्हावी.

### ४.२.१.२  २००८ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.२ २००८ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २००८ | मार्च | ४६ | १ | ५ | २१.७४ |
| | जून | ४६ | २ | ८ | ३४.७८ |
| | सप्टेंबर | ४६ | ३ | ४ | १७.३९ |
| | डिसेंबर | ४६ | ४ | ६ | २६.०९ |
| | | | **एकूण** | **२३** | **१००** |

**आलेख क्र. २  २००८ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**




२००८ या वर्षी मार्च महिन्यात ५(२१.७४%), जून महिन्यात ८(३४.७८%), सप्टेंबर महिन्यात ४(१७.३९%), डिसेंबर महिन्यात ६(२६.०९%) अशी प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या आहे. जून महिन्यातील लेखांची संख्या सर्वात जास्त आहे.

**Year 2008, Volume-46, Issue-1 (March)**

Autonomous College Libraries in Chennai: A Survey of Faculty Perception

*P Nageswara Rao, B. Ramesh Babu*

ह्या लेखात चेन्नईमधील स्वायत्त महाविद्यालये व त्यांची ग्रंथालये यांचा अभ्यास केला गेला आहे. ग्रंथालय सेवा, सुविधा व संसाधने यांबाबत महाविद्यालयातील अध्यापकांची काय मते आहेत व ते याबाबतीत कितपत समाधानी आहेत या गोष्टींचा अभ्यासात समावेश होता. २५ महाविद्यालयातील ३७५ अध्यापकांकडून माहिती घेण्यात आली, माहितीचे पृथक्करण करून ग्रंथालय सेवेमध्ये सुधारणा होण्यासाठी काही सूचना केल्या गेल्या.

Students and Faculties' Searching Behaviour and the Internet: Use of Search Engines for Retrieval of Scholarly Information

*B S Biradar, G R Rajashekar, B T Sampath Kumar*

सध्याच्या माहिती युगात, इंटरनेटवर प्रचंड माहितीचा साठा उपलब्ध आहे. फक्त ती माहिती शोधण्याचे कौशल्य व वृत्ती उपयोजकांमध्ये असावी लागते. विद्यापिठातील काही विद्यार्थी व अध्यापक सर्च इंजिनांचा वापर कसा करतात, याची पाहणी केली गेली. यात असे आढळले की १००% विद्यार्थी व ९७.९१% अध्यापक इंटरनेटवरील माहिती मिळवण्यासाठी सर्च इंजिनांचा वापर करतात. त्यासाठी ते मित्रांची मदत घेतात, तसेच इंटरनेटवरही मदत मिळवतात. ते गुगल व याहू या सर्च इंजिनांचा सर्वात जास्त वापर करतात.

The Contribution of Philanthropic Organizations to Collection Development in Nigerian Academic Libraries

*A B Oshinaike, O M Bankole, A A Oyelude*

नैऋत्य नायजेरियातील ग्रंथालयांच्या विकासात परोपकारी संस्थांचा किती सहभाग असतो याची पाहणी केली गेली. प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षणे यांचा अंतर्भाव करून माहिती गोळा केली गेली. १७ संस्थांपैकी ५ संस्था नमुना पद्धतीने निवडल्या गेल्या. या अभ्यासात असे कळले की परोपकारी संस्था पुस्तकांच्या देणग्या देतात आणि त्याचा सकारात्मक परिणाम होऊन ग्रंथालयातील पुस्तकांचा संग्रह वाढतो. Book Aid International ही संस्था ग्रंथालयांची सर्वात मोठी देणगीदार संस्था आहे. तसेच या देणग्यांमध्ये सर्व शाखांच्या पुस्तकांचा समावेश नसतो. देणगीदारांनी पुस्तकांच्या निवडीबाबत संस्थांमधील (विषयांशी) संबंधित व्यक्तींशी विचारविनिमय करावा ज्यायोगे संस्थांच्या आवश्यक गरजा पूर्ण होतील.

Information Environment in Rural India: Impediments to Free Flow of Information

*Arvind K Sharma*

या लेखामध्ये, मध्यप्रदेश राज्यातील ग्वाल्हेर जिल्ह्यातील ग्रामीण भागात माहिती प्रसारणामध्ये काय अडथळे येतात याचा अभ्यास केला गेला आहे. ६६७ प्रतिसादांच्या पाहणीमध्ये पुढील गोष्टी आढळल्या. ८३.०५% व्यक्ती हिंदी भाषेतील वाचन साहित्याच्या अभ्यासाला प्राधान्य देतात. वेळेची व पैशांची कमतरता ही माहिती मिळवण्याबाबत मोठी समस्या आहे. फक्त ४.३४% (६६७ पैकी २९) व्यक्तींना इंटरनेटबद्दल माहिती आहे. १८.१४% (६६७ पैकी १२१) व्यक्तींना संगणकाविषयी तसेच ३६.१३% (६६७ पैकी २४१) व्यक्तींना मोबाईल विषयी ज्ञान आहे. १.९४% (६६७ पैकी १३) व्यक्ती त्यांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इंटरनेट तंत्रज्ञानाचा उपयोग करतात. पण जास्तीत जास्त म्हणजे २६७ व्यक्तींनी वेळेवर माहिती न मिळाल्याने माहितीचे फायदे घेतले नाहीत.

**Year 2008, Volume-46, Issue-2 (June)**

Information Use Pattern by the Academicians: A Case Study of NIFT Centres in India

*S Gopalakrishnan, B Ramesh Babu, S Gopalakrishnan*

या माहिती युगात माहितीच्या स्फोटामुळे, वेगवेगळया प्रकारची, वेगवेगळया पात्रतांची व उपयोगांची माहिती मोठ्या प्रमाणावर वारंवार शोधणे गरजेचे झाले आहे. ही शोधाशोधीची प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची आहे की विशिष्ट कौशल्ये आत्मसात केल्याशिवाय परिणामकारक माहिती मिळविणे अवघड जाते. सर्वच शाखांच्या बाबतीत हे लागू पडते. या लेखात फॅशन तंत्रज्ञान शैक्षणिक संस्थांमधील व्यक्तींच्या माहितीच्या उपयोगाच्या पद्धतीचा अभ्यास केला गेला आहे. भारतामध्ये फॅशन तंत्रज्ञानातील शिक्षणाला राष्ट्रीय पातळीवर महत्व आहे. भारत सरकारच्या कापड उद्योग मंत्रालयाने फॅशन तंत्रज्ञान संबंधित अभ्यासांसाठी ७ संस्था स्थापन केल्या आहेत. National Institute of Fashion Technology in India ची ही ७ केंद्रे भारताच्या विविध भागात कार्य करीत आहेत.

Library Security Systems: Metamorphism

*Shobha Kulkarni, Sushama Powdwal*

मानवाचा विकास व प्रगतीसाठी ग्रंथालये या महत्वाच्या संस्था आहेत. ज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रगतीमुळे ग्रंथालयातील ग्राहकांच्या मागण्या वाढत आहेत व संसाधनांमध्येही वाढ होत आहे. भावी पिढ्यांसाठी या संसाधनांचे रक्षण करणे ही ग्रंथालयांची जबाबदारी आहे व त्यासाठी ग्रंथालये वेगवेगळ्या सुरक्षा यंत्रणांचा वापर करीत आहेत. दुर्दैवाने तंत्रज्ञानावर

आधारित सुरक्षा उपाय करूनही ग्रंथालय सुरक्षेचा प्रश्न सोडवता आलेला नाही. त्यासाठी या लेखात काही मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत.

The Impact of Open Access on Scholarly Communication and its Future

*Shiv Kumar, Jivesh Bansal*

गेल्या दोन दशकांमध्ये नियतकालिकांच्या वाढत्या किंमती व निधीची कमतरता यांमुळे ग्रंथालयांसमोर आव्हान उभे राहिले आहे. त्यांना त्यांच्या संशोधन व विकास कार्यक्रमांसाठी नियतकालिकांची पुरेशी वर्गणी भरणे अवघड झाले आहे. सध्या वेबच्या माध्यमातून विद्वानांच्या लेखांच्या प्रकाशनाने माहिती विश्वात नवीन मार्ग उपलब्ध झाले आहेत. खुल्या वापराची (Open Acess) मुभा असलेल्या नियतकालिकांमुळे शास्त्रीय संशोधनाचा वापर सोपा झाला आहे. त्यामुळे शास्त्रीय संपर्क व विद्वानांचा संपर्क यावर चांगला परिणाम झाला आहे. खुल्या वापराला (Opern Acess) निश्चितच उज्वल भवितव्य आहे.

The Goa Public Libraries Act, 1995: A Critical Study

*B B Satpute*

या लेखात गोव्यामधील ग्रंथालय कायद्याच्या इतिहासाचा वेध घेतला आहे. यामध्ये गोवा सार्वजनिक ग्रंथालये कायद्याची उद्दिष्टे व कायद्यातील तरतुदींची चर्चा केली आहे. लेखकाने या कायद्याचे विश्लेषणकेले आहे.

Tackling Digital Divide in Kerala and the Possible Role of Libraries

*Laila T Abraham, N Nikesh*

या लेखामध्ये Digital Divide ची विलक्षण कल्पना, त्यापुढील आव्हाने व पुढाकार यांबाबत, विशेष करून केरळ राज्याच्या बाबतीत चर्चा केली आहे. केरळ राज्याने राज्यपातळीवर प्रयत्न केले आहेत तसेच वेगवेगळ्या राष्ट्रीय उपक्रमांमध्ये भाग घेतलेला आहे. या लेखात केरळ राज्यातील ग्रामीण ग्रंथालयांच्या स्थितीचे परीक्षण केले आहे व ग्रामीण भागात ही ग्रंथालये समाजाची माहिती केंद्रे म्हणून भूमिका पार पाडू शकतील का याचे विवेचन केले आहे.

Managing Conflict in Central University Libraries in Delhi
*S M Abbas*

दिल्लीच्या मध्यवर्ती विद्यापीठ ग्रंथालयातील ग्रंथालय व्यावसायिक त्यांचे वरिष्ठ, कनिष्ठ किंवा महत्वाच्या व्यक्ती यांच्या बरोबरचे वाद कसे मिटवतात याचे या लेखात सर्वेक्षण केले आहे. त्यात असे आढळले की ZHL येथील ग्रंथालय व्यावसायिक वरिष्ठांशी नम्रपणे वागतात व एकत्र येऊन कनिष्ठ व इतरांबरोबरचे वाद मिटवतात. वाद मिटवण्यासाठी एकत्र येणे ही पद्धत DULS व JNUL येथे जास्तीत जास्त वापरली जाते.

Library in a Network Environment

*Prabhat Singh Rajput, G H S Naidu*

सध्याच्या काळात भारतामध्ये उत्तम ग्रंथालय सेवा देण्यासाठी नेटवर्क सेवा उपलब्ध असणे हे गरजेचे आहे, हेच वास्तव आहे. या लेखात देशातील INFLIBNET, DELNET, NICNET इत्यादी यशस्वी ग्रंथालय नेटवर्क संबंधी विवेचन केले आहे. यामध्ये नेटवर्कची व्याख्या, गरज, उद्दिष्टे व उपयोग स्पष्ट केले आहेत. तसेच जागतिक माहिती नेटवर्क, संगणक

संपर्क नेटवर्क व भारतातील नेटवर्क विकास यांची चर्चा केली आहे. लेखाच्या शेवटी नेटवर्कचे प्रकार व महत्वाची ग्रंथालय नेटवर्क यांची माहिती दिली आहे.

## Year 2008, Volume-46, Issue-3 (September)

Impact of Information Communication Technology in Rural Areas of Uttar Pradesh: Bridging The Divide

*Saurabh Shukla, J N Gautam*

सध्या ग्रामीण भारताची अवस्था बिकट आहे. विस्तार प्रचंड आहे, प्रश्न व आव्हाने भरपूर आहेत, पण स्वतःला बदलण्याची क्षमता सुद्धा आहे. प्रगत तंत्रज्ञानामुळे खेडोपाडी दूरध्वनी व इंटरनेट उपलब्ध आहेत. माहिती संपर्क तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शिक्षण, आरोग्य, शेती, सामाजिक विकास इत्यादी क्षेत्रात संशोधन होऊन सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय विकास व पर्यायाने मोठ्या प्रमाणावर मानवी जीवनाचा विकास होत आहे. यातून ग्रामीण जनतेला रोजगाराच्या नवीन संधी मिळत आहेत. विकास तंत्रज्ञानकेंद्रित न राहता विकासाचा केंद्रबिंदू ग्रामीण जनता असली पाहिजे.

Public Libraries in Delhi Satisfying Information Needs of Their Users

*Laleta Kanaujia, P K Walia*

M.Phil पदवीच्या संशोधन कार्यात दिल्लीमधील ८ सार्वजनिक ग्रंथालयांची पाहणी करून माहिती जमा केली गेली. यामध्ये UNESCO Public Library Manifesto, 1994 व Public Library Enquiry Committee (UK) यांनी तयार केलेली ‘सार्वजनिक ग्रंथालयांची कार्ये’ सांगितली आहेत. तसेच प्रगत देशांमधील सार्वजनिक ग्रंथालयांच्या उपयोजकांच्या माहिती गरजा व माहिती वापराच्या पद्धती यावरही प्रकाश टाकला आहे.

लेखाच्या शेवटी महत्वाची निरीक्षणे नोंदवलेली आहेत व सार्वजनिक ग्रंथालयातील संग्रह, सेवा व सुविधा यांमध्ये सुधारणा होण्यासाठी सूचना केल्या आहेत.

A Statistical Analysis of Cited Books Occurring in LIS Postgraduate Dissertations

*Nosrat Riahinia, Fateme Zandian*

या लेखात, तेहरान येथील ग्रंथालय माहिती शास्त्र प्रबंधांमध्ये इंग्रजी व फारसी भाषेतील मुद्रित व डिजिटल पुस्तकांचा उपयोग कसा केला गेला याचा अभ्यास करण्यात आला आहे. २००१ – २००६ या काळात प्रबंधांसाठी उपयोग केलेल्या पुस्तकांची तसेच उल्लेखांची मोजदाद करण्यात आली व Tukey and Levene's HSD पद्धतीने परीक्षण करण्यात आले. तेहरानमधील उच्च शिक्षण देणाऱ्या ५ विद्यापीठातून ग्रंथालय माहिती शास्त्र विद्यार्थ्यांच्या सर्व प्रबंधांची पाहणी करण्यात आली. या पाहणीतून निष्कर्ष निघाले की इंग्रजी मुद्रित व डिजिटल पुस्तकांपेक्षा मुद्रित फारसी पुस्तकांचा जास्त वापर होतो. फारसी डिजिटल पुस्तकांचा वापर होताना दिसत नाही. सर्वात जुन्या प्रबंधाला ६ वर्षे झाली व सर्वात अलिकडच्या प्रबंधाला १ वर्ष झाले. त्यामुळे ६ ला २ ने भाग देऊन लेखकांनी पुढील ३ प्रकारात विभागणी केली – १ ते २ वर्षे जुने, ३ ते ४ वर्षे जुने व ५ ते ६ वर्षे जुने. नवीनतम प्रबंध व डिजिटल इंग्रजी पुस्तकांचा वापर यात संबंध दिसून आला. विद्यापीठ प्रबंधांमध्ये एकमेकांच्या उल्लेखांचा काही संबंध आढळून आला नाही.

An Examination of the Effectiveness of Personnel Management in Nigerian University Libraries

*Oyekanmi Oladele Samuel*

नायजेरियातील २ विद्यापीठांच्या शैक्षणिक ग्रंथालयांची, व्यक्तिगत व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी पाहणी करण्यात आली. यात ग्रंथालयातील परिणामकारक व्यक्तिगत व्यवस्थापनामागची कारणे व परिणामांची पातळी यांचा अभ्यास करण्यात आला. एकून १३० कर्मचाऱ्यांना प्रश्नावली देऊन माहिती घेण्यात आली. या माहितीमध्ये सविस्तर उत्तरे व chi - square पृथक्करणाचा समावेश होता. या पाहणीत असे दिसून आले की ग्रंथालय अभ्यासाचे प्रमाणपत्र असणे हे व्यक्तिगत व्यवस्थापनासाठी आवश्यक आहे. तसेच हेही दिसून आले की नायजेरियामध्ये व्यक्तिगत व्यवस्थापन परिणामकारक ठरत आहे.

**Year 2008, Volume-46, Issue-4 (December)**

Impact of Information Communication Technology in Rural Areas of Uttar Pradesh: Bridging the Divide

*Saurabh Shukla, Dr. J N Gautam*

सध्या ग्रामीण भारताची अवस्था बिकट आहे. विस्तार प्रचंड आहे, प्रश्न व आव्हाने भरपूर आहेत, पण स्वतःला बदलण्याची क्षमता सुद्धा आहे. प्रगत तंत्रज्ञानामुळे खेडोपाडी दूरध्वनी व इंटरनेट उपलब्ध आहेत. माहिती संपर्क तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शिक्षण, आरोग्य, शेती, सामाजिक विकास इत्यादी क्षेत्रात संशोधन होऊन सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय विकास पर्यायाने मोठ्या प्रमाणावर मानवी जीवनाचा विकास होत आहे. यातून ग्रामीण जनतेला रोजगाराच्या नवीन संधी मिळत आहेत. विकास तंत्रज्ञानकेंद्रित न राहता विकासाचा केंद्रबिंदू ग्रामीण जनता असली पाहिजे.

Community Information Services in Bangladesh: A case study on Community Information Centre (CIC)

*Md. Anwarul Islam, Dr Muhammad Mezbah-Ul-Islam*

समाजात कोणत्याही उपक्रमासाठी माहितीच्या शक्तीचा उपयोग करावा लागतो. माहिती मिळू शकली तरच तिला काही किंमत असते. समाजाला उपलब्ध असलेल्या संसाधनांचा सर्वात उत्तम उपयोग करण्यासाठी, तसेच त्यांचे दैनंदिन प्रश्न सोडवायला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत मिळण्यासाठी समाजाला माहितीची गरज असते. बांगलादेशात जास्तीत जास्त लोक खेड्यांमध्ये राहतात. असे आढळून आले की खेड्यातील लोकांपर्यंत सरकारी उपक्रम व सेवा पोहचत नाहीत. पारंपारिक ग्रंथालयांमधून समाजाला माहिती मिळते. परंतु या व्यवस्थेत माहिती संपर्क तंत्रज्ञान साधने नसल्यामुळे ग्रामीण जनतेला माहिती संपर्क तंत्रज्ञान सुविधा मिळत नाहीत. या अभ्यासात सार्वजनिक ग्रंथालयांमधून समाजाला मिळणाऱ्या माहिती सेवेच्या तरतुदींमध्ये येणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला आहे. तसेच समाजाला माहिती संपर्क तंत्रज्ञानावर आधारित माहिती केंद्रांची गरज आहे हेही सांगितले आहे. समाजाची माहिती केंद्रे आधुनिक माहिती सुविधा कशाप्रकारे देत आहेत, याचे परीक्षण केले आहे. तसेच ही माहिती केंद्रे बांगलादेशातील ग्रामीण समाजाचा विकास कसा करू शकतील याचा विचार केला आहे. समाजाची माहिती केंद्रे व ग्रामीण ग्रंथालये यांच्यात उत्तम सहकार्य असावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे व बांगलादेशातील समाजाला मिळणाऱ्या माहिती सेवांमधील सुधारणांसाठी काही परिणामकारक उपाय सुचवले आहेत.

Information Needs and Search Strategies of the Co-Ed College Students in Shillong: A Case Study

*Jiarlimon Khongtim, Ridalak Marbaniang*

या लेखामध्ये, शिलाँग येथील सहशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा व माहिती शोधाच्या पद्धती यांविषयी चर्चा केली आहे. या अभ्यासात विद्यार्थी वापरत असलेले वेगवेगळे माहिती स्त्रोत व माहिती शोधात येणाऱ्या अडचणी यांविषयी माहिती दिली आहे. तसेच विद्यार्थी माहितीचा मुख्य स्त्रोत म्हणून ग्रंथालयाचा वापर करतात किंवा नाही हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थी माहितीचा मुख्य स्त्रोत म्हणून ग्रंथालयाचा वापर करत नसतील तर त्यामागील कारणे शोधण्याचाही प्रयत्न केला आहे.

Physical Science Reference Sources on the Web: An Evaluative Study

*BT Sampath Kumar*

विद्वान व अध्यापक त्यांच्या शैक्षणिक कामासाठी माहितीची देवाणघेवाण (प्रसारण व पुनर्प्राप्ती) करतात. या देवाणघेवाणीच्या पद्धतीवर इंटरनेटच्या विशेषतः वेब स्त्रोतांच्या वापरामुळे खूपच परिणाम झाला आहे व या पद्धतींमध्ये बदलही झाले आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील लोक वेब स्त्रोतांचे मूल्यांकन कसे करतात व वेब स्त्रोतांचा अधिकृतपणा, व्यापकता, किंमती, टिकाऊपणा व उपयोग याबाबत त्यांची मते काय आहेत याचे या लेखात विवेचन केले आहे. या अभ्यासात असे दिसून आले की पृथक्करणात जास्तीत जास्त व्यक्तींनी वेब संदर्भातील स्त्रोतांना 'चांगले' असा शेरा दिला. तसेच ते वेब संदर्भातील स्त्रोतांच्या सध्याच्या स्थितीबद्दल समाधानी आहेत. पण बहुतांश व्यक्तींना असे वाटते की वेब स्त्रोत मुद्रित स्त्रोतांपेक्षा जास्त महत्वाचे  नाहीत.

Libraries Through the Ages in Delhi: A Historical Perspective

*Dr R K Bhatt*


सतत लष्करी आक्रमणे, त्यानंतरची जाळपोळ, लुटालूट यांमुळे दिल्ली शहरातल्या मालमत्तेची हानी झालीच पण सांस्कृतिक हानी सुद्धा झाली. ११९२ – ९३ मध्ये कुतुबुद्दीन ऐबकने दिल्लीवर ताबा मिळवला. १७३९ मध्ये नादीरशहा, त्याच्यानंतर अहमदशहा दुराणी, १८०३ मध्ये इंग्रज यांनी दिल्लीवर कब्जा केला. १८५७ च्या समरात दिल्लीला झळ पोहोचली. दुर्दैवाने आक्रमकांनी जाळपोळीमध्ये ग्रंथालयांना लक्ष्य केले व इंग्रजांनीही ग्रंथालयांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे दिल्लीतील ग्रंथालयांचा विकास होऊ शकला नाही. इतर ग्रंथालयांप्रमाणे दिल्ली ग्रंथालय माहिती देऊ शकत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात दिल्लीमध्ये प्रचंड बदल होऊन दिल्ली शहर शिक्षण व ग्रंथालय चळवळीचे केंद्र बनले. या लेखामध्ये ग्रंथालयांची त्यावेळची अवस्था व सध्याच्या परिस्थितीतील बदललेले स्वरूप यांचा खोलवर आढावा घेण्यात आला आहे.

### ४.२.१.३ २००९ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.३ २००९ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २००९ | मार्च | ४७ | १ | ८ | १६.६७ |
| | जून | ४७ | २ | ९ | १८.७५ |
| | सप्टेंबर | ४७ | ३ | ९ | १८.७५ |
| | डिसेंबर | ४७ | ४ | २२ (प्रो. कौला स्मरणार्थ ) | ४५.८३ |
| | | | **एकूण** | ४८ | १०० |

**आलेख क्र. ३ २००९ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**




२००९ या वर्षातील लेखांचे विश्लेषणमार्च ८(१६.६७%), जून ९(१८.७५%), सप्टेंबर ९(१८.७५%), डिसेंबर २२(४५.८३%) असे दिसून येते.

**Year 2009, Volume-47, Issue-1 (March)**

Libraries' Role in National Development

*Prof. C P Vashishth*

राष्ट्राच्या विकासामध्ये समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक, राजकीय, सांस्कृतिक उपक्रमांचा तसेच उद्योगधंदे व इतर क्षेत्रातील उपक्रमांचा समावेश होतो. धन, सामग्री व मनुष्यबळ या ३ गोष्टी विकासासाठी आवश्यक असतात. यातील मनुष्यबळ सर्वात महत्वाचे आहे कारण कोणत्याही उपक्रमांसाठी मनुष्यबळाची गरज असते. जगातील सर्व सरकारे सर्वांगीण व्यक्तीविकासावर लक्ष केंद्रित करून आहेत. हे ध्येय साध्य करण्यासाठी सरकारे सर्व पातळ्यांवर आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा देत आहेत. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन प्रयोगशाळा निर्माण करणे व त्यांना अद्ययावत माहिती संसाधनांनी युक्त असलेल्या ग्रंथालये व माहिती केंद्रांचा आधार देणे हे काम सरकार करत असते. या सुविधांमध्ये वेगवेगळ्या माध्यमांचा म्हणजे मुद्रण, डिजिटल, २४ तास उपलब्ध असलेल्या इंटरनेट जोडणी सह संगणक व्यवस्था यांचा समावेश होतो. उदा. UGC Infonet Digital Library Consortium १९ वेबसाईटच्या माध्यमातून १५९ विद्यापीठांना ५५८४ नियतकालिकांचा वापर करू देते. तसेच ९ इतर वेबसाईटमधून पुस्तकांचा वापर करू देते. ग्रंथालय माहिती शास्त्राच्या व्यावसायिकांना संसाधनांचा परिणामकारक वापर करता येण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्ये, सेवा, विषयाचे ज्ञान, डाटाबेस हाताळणी, सर्च इंजिनांचा वापर इत्यादी क्षमतांचा विकास करावा लागेल.

Developing Reading Habits and Skills in Schools

*E Adeche Apeji*

शिक्षक – ग्रंथपाल व्यक्तींची शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये नेतृत्वाची भूमिका असते. या प्रक्रियेमध्ये विद्यार्थी चौकसपणे प्रश्न विचारतात व उत्तरे शोधतात. या पद्धतीमुळे एक गोष्ट स्पष्ट होते की विद्यार्थ्यांना स्वेच्छेने वाचनाबद्दल प्रेम निर्माण होणे आवश्यक आहे. वाचनाबद्दलच्या प्रेमाचे पुढे वाचन संस्कृतीमध्ये रुपांतर होते. या लेखात सांगितले आहे की शिक्षक – ग्रंथपाल हे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाच्या सवयी व कौशल्ये रुजवायला मदत करू शकतात. या सवयी व कौशल्यांमुळे पुढे वाचन संस्कृती उदयास येऊ शकते. वाचनाच्या सवयी व कौशल्ये यांचा विकास करण्याच्या प्रक्रियेबाबत या लेखात चर्चा केली आहे.

Information Seeking Behaviour of Teachers and Students in Selected Schools

*Poonam Rani, V K J Jeevan*

शाळेतील विद्यार्थी व शिक्षक कोणते माहिती स्त्रोत वापरतात, त्यांना शाळेच्या ग्रंथालयाचा उपयोग करताना कोणत्या अडचणी येतात याचा अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली पद्धतीने सर्वेक्षण करण्यात आले. शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांच्या माहिती शोधण्याच्या सवयी व वर्तणूक याचीही माहिती या सर्वेक्षणात घेण्यात आली. या माहितीतून असे कळले की शाळेतील विद्यार्थी व शिक्षक इतर कोणत्याही माहिती स्त्रोतांपेक्षा पुस्तकांचा जास्त उपयोग करतात. अभ्यासक्रम व अध्यापनाच्या तयारीसाठी नियतकालिकांचा जास्त उपयोग केला जातो. अध्ययन – अध्यापन प्रक्रियेमध्ये शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वेगवेगळी संसाधने कशी वापरतात याचा अभ्यास या लेखात करण्यात आला आहे, तसेच ग्रंथालयांसाठी काही सूचना केल्या आहेत.

Students’ Use of Various Information Sources and Need for Information Literacy Education in Kurukshetra University

*Dr Manoj K Joshi, Dr Sanjeev Sharma*

या लेखाच्या अभ्यासासाठी विद्यापीठाच्या ४ विभागातील प्रथम वर्ष पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रश्नावली देण्यात आली व त्यांच्या माहिती साक्षरता शिक्षणाच्या गरजांचे सर्वेक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांना जास्त करून विषयाच्या अभ्यासासाठी माहितीची गरज असते (४६.८%). ९५% पेक्षा विद्यार्थ्यांना प्रत्येक आठवड्यात माहितीची गरज असते. ग्रंथालय (७४.३%) व अध्यापक ५५% हे त्यांचे मुख्य स्त्रोत आहेत. त्यांना कागदपत्रे शोधासाठी (७५.५%), कागदपत्रांच्या वापरासाठी (७९.६%) आणि इंटरनेटच्या वापरासाठी (७०.२%) मदत लागते. मुद्रित तसेच इंटरनेट संसाधने स्वतः वापरण्यात त्यांना फारसे यश मिळत नाही. ७५.३% विद्यार्थ्यांनी लेखांच्या तयारीसाठी उपयोग केलेल्या कागदपत्रांचा उल्लेख केला. ७७.८% विद्यार्थी MS – Word वापरू शकतात. सध्याची साधने व व्यवस्था अपुरी आहेत व माहिती साक्षरता अभ्यासक्रमाचा समावेश करावा लागेल.

Making Sense of the Retrieval Effectiveness of Web Search Engines

*Bikika Laloo Tariang*

इंटरनेट सर्च इंजिनांच्या परिणामाविषयी लिहिलेल्या साहित्याचा या लेखात आढावा घेण्यात आला आहे. या साहित्याचा योग्य शीर्षके व उपशीर्षके देऊन आढावा घेण्यात आला आहे. तसेच यात जास्त करून १९९० पुढील साहित्याचा समावेश आहे. यासाठी सर्वात जास्त उपयोग नियतकालिकांचा करण्यात आला, संबंधित वेबसाईट्स सुद्धा वापरण्यात आल्या. Information Today व JASIS ही सर्वात जास्त वापरलेली नियतकालिके आहेत.

A 2003–2007 Citation Analysis of Library Herald

*Dr Nosrat Riahinia*

२००३ ते २००७ या कालावधीतील लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकामधील लेखांचा उल्लेख निर्देशाचा अभ्यास सदर लेखात केला गेला आहे.

**Year 2009, Volume-47, Issue-2 (June)**

Use of Electronic Resources in Learning: Some Constraints
*Prof C P Vashishth*

शिक्षण व विद्वत्ता यांच्यावर ई- संसाधनांच्या परिणामांचा या लेखात विचार केला आहे. नवीन तंत्रज्ञान वातावरणात ग्रंथालय माहिती शास्त्राच्या व्यावसायिकांच्या नवीन भूमिकेकडे निर्देश केला आहे. संगणकीकरणाचे अनेक फायदे असले तरी संगणकाच्या पडद्यावरील अक्षरांच्या दीर्घकाळ वाचनाने वाईट परिणाम होऊ शकतात. तसेच e – संसाधनांची सुरक्षित विल्हेवाट ही मोठी समस्या आहे. ई - संसाधने आवश्यक राक्षस आहेत आणि आपल्याला त्यांच्याबरोबर रहावे लागणार आहे.

Scholarly Engineering Journals in Iran: From Readers to Authors
*Fatemeh Zandian, Nosrat Riahinia*

इराणमधील अभियांत्रिकीच्या विद्वत नियतकालिकांचा अभ्यास करण्यात आला. विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन मंत्रालयाने बनविलेल्या यादीतून नियतकालिके निवडली गेली. या नियतकालिकांच्या संपादकांना ई – मेलने प्रश्नावली पाठवण्यात आली. या माहितीतून पुढील निष्कर्ष निघाले.बहुतांश अभियांत्रिकी नियतकालिके ही विद्यापीठे, व्यावसायिक संस्था व मंत्रालये यांच्याशी संलग्न होती. या नियतकालिकांना आंतरदेशीय वाचक आणि वर्गणीदार यांना आकर्षित करता येत नाही. हस्तलिखितांच्या मूल्यांकन प्रक्रियेला नेहमीच खूप वेळ लागतो, तरी पण हस्तलिखितांचे मूल्यांकन काळजीपूर्वक व अचूकपणे केले गेले.

Development of Public Libraries in Goa

*B B Satpute*

या लेखामध्ये गोवा राज्यातील ग्रंथालय कायद्यासाठीच्या चळवळीचे चित्र उभे केले आहे. गोवा सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचे फायदे, तोटे व सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासावर कायद्याचा परिणाम याविषयी लिहिले आहे. सार्वजनिक ग्रंथालयाचा स्वतंत्र कारभार असावा अशी अपेक्षा केली आहे. सरकारकडून जास्तीत जास्त मदतीची गरज, ग्रामीण सार्वजनिक ग्रंथालयांच्या नेटवर्कची स्थापना या गोष्टी ठळकपणे निदर्शनास आणल्या आहेत. ग्रामीण समाजाला शिक्षित करण्यासठी खेड्यांमध्ये प्रत्येकाच्या दारापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे. गोवा राज्याची अलगद व वेगात प्रगती होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांचा वापर करून घेता येईल. उच्च दर्जाची सार्वजनिक ग्रंथालय सेवा ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचावी यासाठी गोवा राज्यात ग्रामीण ग्रंथालयांचे जाळे असावे व त्यासाठी मजबूत व सक्षम प्रशासकीय व्यवस्थेची तरतूद असावी. गोवा राज्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढण्यासाठी ग्रंथालय सुविधांना अतिशय महत्व आहे. या सर्व मुद्द्यांचा परामर्श या लेखात घेतला आहे.

Wipo Treaties on IPR

*Manjusha Gadkari, Mangala Ahirwade*

Symptoms and Strategies of Technostress among the Students of SNCET College Library: A Study

*K Sangeetha, K Vijaya Kumar, K Nithyanandham*

विद्यार्थ्यांवर तंत्रज्ञानाच्या ताणाचा परिणाम होतो का याचा अभ्यास करणे मनोरंजक आहे. विद्यार्थ्यांनी कबूल केले की संगणक त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा महत्वाचा भाग आहे. संगणकाविषयी अधिक ज्ञान मिळवावे व संगणकावर काम करण्याचे कौशल्य आत्मसात करावे याविषयी ते सहमत झाले. या लेखात मुख्यतः विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा जो ताण जाणवतो

त्याची लक्षणे अभ्यासली गेली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या सूचना सांगितल्या व रोजच्या दिनचर्येमध्ये ताण कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्नांचा विचार केला. ग्रंथालयाचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तंत्रज्ञानाचा ताण कमीत कमी व्हावा याचा विचार हा या लेखाचा उद्देश आहे.

Measuring Impact of Web Sources in ILA Conference Proceedings: A Citation Analysis

*R V Chikate, S K Patil*

**Year 2009, Volume-47, Issue-3 (September)**

Web 2.0 and Library 2.0: Innovative Technologies for Building Libraries of Tomorrow with Examples of their Applications at the INFLIBNET Centre

*Dr Jagdish Arora*

आधुनिक ग्रंथालय इमारती मध्ये वेब २.० म्हणजेच लायब्ररी २.० या तंत्रज्ञानाचा वापर याबद्दल सदर लेखात विवरण केले आहे. सध्या इनफ्लीबनेट मध्ये वेब २.० चा होणारा वापर हे उदाहरण आहे.

Web Credibility of Autonomous College Websites in Tamil Nadu: A Study

*P Nageswara Rao, A M Narendra Kumar, B Ramesh Babu*

विकसनशील देशांमध्ये माहिती संपर्क तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे वेब आधारित विश्वसनीय माहितीला खूप मागणी आहे. अनेक उपयोजकांच्या अभ्यासातून हे निश्चित होते की एखाद्या वेबसाईटला भेट देण्याचे ठरविण्यासाठी साईटवरील माहितीवर विश्वास बसावा लागतो. अलिकडच्या दशकांमध्ये शैक्षणिक वातावरणात माहिती संपर्क तंत्रज्ञानाचे उपयोजन

व वेब चा वापर हळूहळू सातत्याने वाढला आहे. तामिळनाडूमधील स्वायत्त महाविद्यालयाच्या वेबसाईटच्या विश्वसनीयतेच्या विविध अंगांचा या लेखामध्ये विचार केला आहे.

Evaluation of the Teaching and the Effect of Library Use Course at the Federal College of Education, Abeokuta, Nigeria

*Fredrick Olatunji Ajegbomogun*

नायजेरियामधील Abeokuta येथील Federal College of Education मध्ये चालविला जाणारा 'ग्रंथालयाचा वापर' या अभ्यासक्रमाच्या परिणामाचे या लेखात मूल्यांकन केले आहे. या महाविद्यालयाच्या ५ शाळांमधून प्रश्नावली देऊन माहिती गोळा करण्यात आली. विद्यार्थ्यांना दिलेल्या ५५० प्रश्नावलींपैकी ५४० परत मिळाल्या (९८%) व ग्रंथपालांचा १००% प्रतिसाद मिळाला. मर्यादित सुविधा असूनही ग्रंथपाल उपयोजकांना पुरेशा सूचना देतात. 'ग्रंथालयाचा वापर' अभ्यासक्रमाच्या उपयोजकांच्या सर्वेक्षणातून कळले की विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या वापराचे पुरेसे ज्ञान आहे व OPAC चा वापर व CD - ROM सुविधांमुळे त्यांची वाचनाची सवय वाढली आहे पण इंटरनेट वापरामध्ये ते मागे पडतात. यावरून हे दिसते की या अभ्यासाचा विद्यार्थ्यांवर सकारात्मक व अर्थपूर्ण परिणाम होतो. हे शिक्षण अधिक परिणामकारक होण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थेच्या on - line सेवांबरोबर नेटवर्किंगची व इंटरनेट जोडणीची शिफारस करण्यात आली आहे.

Use of the Libraries of Colleges of Education in Punjab

*Nirmal Singh*

पंजाब येथील शिक्षण महाविद्यालयांमधील M.Ed अभ्यासक्रमाचे विद्यार्थी ग्रंथालयाचा उपयोग करतात का याची प्रश्नावली देऊन पाहणी केली गेली. १५

महाविद्यालयांमधील १४४ विद्यार्थ्यांची ग्रंथालयाबद्दलची मते जाणून घेतली गेली. यामध्ये उपयोजक ग्रंथालयाला किती वेळा भेट देतात, भेट देण्याचे प्रयोजन, ग्रंथालय सेवांबाबत जागरुकता, कागदपत्रांचा वापर, संगणकांच्या वापराबाबत जागरुकता, संसाधने व सेवा यांबद्दल समाधान इत्यादी मुद्द्यांवर चर्चा केली आहे. सर्वेक्षणातून दिसले की पुष्कळसे उपयोजक संशोधनासाठी ग्रंथालयाला सतत भेट देतात. अनेक उपयोजकांना आंतरग्रंथालय कर्ज योजनेबद्दल माहिती नव्हती. या अभ्यासाच्या आधारावर या महाविद्यालयांमधील ग्रंथालय सेवा सुधारण्याच्या दृष्टीने काही सूचना केल्या आहेत.

Information and Communication Technology (ICT) Literacy among the Staff of Banaras Hindu University Library System: A Case Study
*Rajesh Kumar Singh, Anil Agarwal, Jawahar Lal*

जगामध्ये सर्वत्र शिक्षण, माहिती व संपर्क तंत्रज्ञान या क्षेत्रांचा विकास होत आहे. माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचा ग्रंथालयांच्या कामकाजावर परिणाम होणे अटळ आहे. विकासाच्या बरोबरीने वाटचाल होण्यासाठी ग्रंथालयांनी माहिती संपर्क तंत्रज्ञानाच्या परिणामांवर लक्ष केंद्रित केले आहे. बनारस हिंदू विद्यापीठाच्या ग्रंथालय व्यवस्थेच्या कर्मचाऱ्यांचा माहिती संपर्क तंत्रज्ञान साक्षरतेसंबंधात अभ्यास केला गेला. व्यावसायिक, निमव्यावसायिक व अव्यावसायिक या सर्वांचा या पाहणीत समावेश होता. प्रश्नावली पद्धतीने हा अभ्यास केला गेला. सध्या तेथे काम करीत असलेल्या ४१ व्यावसायिकांपैकी २२ जण (५३.६५%), ८८ निमव्यावसायिकांपैकी ३४ जण (३८.६३%) तर ५७ अव्यावसायिकांपैकी २०जण (२८.८६%) माहिती संपर्क तंत्रज्ञान साक्षर आहेत. बाकीचे सर्वजण माहिती संपर्क तंत्रज्ञान साक्षर नाहीत. या सर्वांनी माहिती संपर्क तंत्रज्ञान साक्षरतेची पातळी वाढवणे गरजेचे

आहे. त्यासाठी प्रशिक्षण व माहिती संपर्क तंत्रज्ञानाच्या पुरेशा पायाभूत सुविधा या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत.

Automating Islamia College of Science and Commerce Library, Srinagar (India) Using SOUL Software

*Mohammad Hanief Bhat*

भारतातील लहानशा राज्यातील, मर्यादित कर्मचारीसंख्या व संसाधने असलेल्या महाविद्यालय ग्रंथालयाचे स्वयंचलितकरण झाले. हा अनुभव इतरांना सांगणे हा या लेखाचा हेतू आहे. श्रीनगर येथील Islamia College of Science and Commerce च्या ग्रंथालयाचे CDS / ISIS व SOUL संगणक प्रणाली वापरून स्वयंचलितकरण केले गेले. देशातील मर्यादित कर्मचारी संख्या व मर्यादित निधी असलेल्या इतर ग्रंथालयांपुढे हे उदाहरण ठेवता येईल. कर्मचारीवर्ग उत्साही असला तर मर्यादित सुविधा व कमी कर्मचारी असूनही ग्रंथालयाचे स्वयंचलितकरण करता येते.

## Year 2009, Volume-47, Issue-4 (December)


लायब्ररी हेराल्ड च्या वरील खंडात प्रो. पी. एन. कौला यांच्या जीवनाविषयीचे विवेचन केले आहे. एकूण २२ लेखांद्वारे प्रो. पी. एन. कौला हे एक शिक्षक म्हणून, ग्रंथपाल म्हणून, दिल्ली पब्लिक लायब्ररीचे एक सभासद म्हणून, उत्तम प्राध्यापक म्हणून कसे होते या बाबतचे माहिती दिली आहे. पद्मश्री म्हणून त्यांचे योगदान, त्यांचा एकूणच जीवनपट यासंदर्भात माहिती सदर लेखांत सांगितली आहे.

### ४.२.१.४ २०१० या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.४ २०१० या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २०१० | मार्च | ४८ | १ | १० | २३.८१ |
| | जून | ४८ | २ | १० | २३.८१ |
| | सप्टेंबर | ४८ | ३ | ८ | १९.०५ |
| | डिसेंबर | ४८ | ४ | १४ | ३३.३३ |
| | | | एकूण | ४२ | १०० |

**आलेख क्र. ४ २०१० या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**




२०१० या वर्षातील लेखांचे विश्लेषणमार्च १०(२३.८१%), जून १०(२३.८१%), सप्टेंबर ८(१९.०५%), डिसेंबर १४(३३.३३%) असे दिसून येते.

**Year 2010, Volume-48, Issue-1 (March)**

Poor Reading Culture: A Barrier to Students Patronage of Selected Secondary School Libraries in ADO Local Government Area of Ekiti state, Nigeria

*Francis Adesoji Fabunmi*

स्वातंत्र्यपूर्व काळात शालांत परीक्षा उत्तीर्ण होणे सुद्धा सोपे नव्हते. कारण तो अभ्यासक्रम अवघड असे. त्यात भाषेवर – स्थानिक व इंग्रजी प्रभुत्त्व मिळवावे लागे. त्यासाठी पाठांतर, वाचन व लेखन यावर प्रचंड मेहनत घ्यावी लागे. सध्याच्या काळात संगणक व इतर माध्यमे, कठोर आर्थिक वास्तव, समाजाची मागणी व अपुरी ग्रंथालय व्यवस्था यामुळे वाचन संस्कृती रसातळाला गेली आहे. शाळेतील मुलांची वाचन संस्कृती यावर अकिती, नायजेरिया येथे पाहणी केली गेली व आढळून आले की वाचनाचे प्रमाण फारच कमी आहे. वाचन २ प्रकारचे असते – मोठ्याने (प्रकट) वाचणे व मनात वाचणे. मोठ्याने वाचून वक्तृत्वकला बहरते व मनात वाचताना वाचनाचा वेग खूप वाढून भरपूर वाचन होते. देशाच्या विकासासाठी सुजाण, सुशिक्षित तसेच ज्ञान व कौशल्य मिळवणारे विद्यार्थी घडवणे गरजेचे आहे. हे काम ग्रंथालये करू शकतात. त्यासाठी ग्रंथालयांमध्ये भरपूर मनोरंजक व माहितीपर साहित्य ठेवून प्रशिक्षित ग्रंथपालांकडून त्यांना वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे. नायजेरियाच्या ग्रंथालयांमध्ये साहित्य, दृकश्राव्य माहिती व शिक्षित ग्रंथपालांची तसेच निधीची  कमतरता आहे.

Role of Academic Law Libraries with Special Reference to NALSAR (National Academy of Legal Studies and Research) University of Law Library, Hyderabad

*S D Vyas Dr*

आपल्या देशात आंतरराष्ट्रीय पातळीचे कायदे सल्लागार निर्माण होण्यासाठी विधी महाविद्यालये व संस्थांवर मोठी जबाबदारी आहे. ग्रंथालयांमध्ये लिखित व इलेक्ट्रोनिक माहितीचा प्रचंड साठा असतो. कायदे सतत बदलत असल्यामुळे विधी ग्रंथपालांना आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे लागते. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे IPR, Copyright, Cyber law, patents, trademarks इ. नवीन विषय उदयाला आले आहेत. विधी ग्रंथपालांना माहिती व्यवस्थापन या नात्याने इले. डाटाबेस, नियतकालिके, संगणक आज्ञावली, बारकोडिंग, सुरक्षाव्यवस्था (security systems) Inventory, पुस्तकांची जलद देवाण-घेवाण या गोष्टींमध्ये कौशल्य मिळवावे लागेल. ग्रंथालयात Wi-fi तंत्रज्ञानाने उपयोजकांच्या Lap-top वर जलद माहिती पोहोचू शकेल. उपयोजकांचे समाधान याला ग्रंथालय शास्त्रात अग्रक्रम असल्यामुळे खालील बाबी ग्रंथालयात असाव्यात - ग्रंथ, नियतकालिके यांची सुव्यवस्था, इलेक्ट्रोनिक सुविधा, अद्ययावत माहिती, सेवा, सुसज्ज इमारत व मदतीला तत्पर ग्रंथपाल. NALSAR संस्थेत या सर्व बाबी आढळून येतात. येथे सुसज्ज इमारत, उच्च प्रतीचे शिक्षण, विद्यार्थ्यांची काळजी, नोकरीची संधी, प्रत्येकाला नोकरी (placement) याकडे लक्ष दिले जाते. या संस्थेने कायदे – शिक्षणाला न्याय शिक्षण बनविले आहे.

Iranian Academic Library Buildings: A Study of Library Facilities and Status

*Nosrat Riahinia Dr, Ali Azimi*

सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये ग्रंथालये गुरुकिल्ली आहेत. ग्रंथालयांनी शिक्षण प्रसारात भाग घ्यावा यासाठी त्यांच्याकडे पायाभूत सुविधा (Infrastructure) हव्यात. यादृष्टीने इराणमधील विद्यापीठांची पाहणी केली गेली त्यात पुढील मुद्दे विचारात घेतले गेले. पुरेश्या खिडक्या, प्रकाशयोजना व्यवस्थित, वातानुकूलन यंत्रणेचे व्यवथित काम, दमटपणावर

नियंत्रण, परिषद सभागृह, संगणक साईट, वाचनकक्ष, स्वतंत्र स्वयंपाकगृह, उपाहारगृह, प्रसाधनकक्ष, नकलपत्र काढण्याची व्यवस्था, तपासणी व सुरक्षाव्यवस्था, फर्निचर व कपाटे सुयोग्य व प्रमाणात, आतील भिंती लवचिक व हलक्या वजनाच्या लाकडी, किंवा धातूची विभागणी, बाहेरील सुखद दृश्य भविष्यातील गरजांसाठी सुयोग्य ठरतील अशा प्रकारे ग्रंथालयांचे बांधकाम, रचना व नूतनीकरण झाले पाहिजे. त्यासाठी तज्ञ ग्रंथपाल व तज्ञ वास्तुरचनाकार यांचे सल्ले घेतले पाहिजेत. या पाहणीमध्ये सर्वात जास्त गुण तेहरान विद्यापीठ (Teharan United Central Library) केंद्रीय ग्रंथालयाला मिळाले व सर्वात कमी गुण Tarbiat Moallem Union Central library ला मिळाले.

Apartment Libraries: A Proposal

*S Ally Sornam Dr, P Chandru, J Franklin*

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. महानगरांमध्ये निवासासाठी टोलेजंग इमारती बांधल्या जात आहेत ज्यामध्ये वाहनतळ, व्यायामशाळा, पोहण्याचा तलाव, बाग सर्वकाही असते पण ग्रंथालय नसते. 'त्रिची' शहरातील ५ इमारतींमधील १०० जणांना प्रश्नावली देण्यात आल्या. त्यातील ६९ जणांनी प्रतिसाद दिला. प्रतिसाद देणाऱ्यांमध्ये जास्तीत जास्त महिला, पदवीधर नसलेले, ३१ – ४० वयोगटातील, विवाहित, नोकरदार असे लोक होते. जास्तीत जास्त लोकांना (९४%) इमारतीत ग्रंथालय हवे होते. त्यांना खेळ, सामान्यज्ञान, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी यावरील पुस्तके, कादंबऱ्या, वर्तमानपत्रे व मासिके वाचण्यासाठी हवी होती. त्यांना स्वतंत्र ग्रंथपाल हवा होता व वर्गणी देण्याची तयारी होती. इमारतीत ग्रंथालय असण्याचे फायदे असे आहेत; रहिवाश्यांची ओळख, एकोपा सामाजिक जाणीव, दूरदर्शन, इंटरनेटच्या आहारी गेलेल्यांची त्यापासून सुटका, नोकरीच्या संधींसाठी स्पर्धा परीक्षांची तयारी,

तरुण होतकरू मुलांना तेथे ग्रंथपाल बनण्याची संधी, इमारतीमध्ये ग्रंथालय बांधताना रचना, फर्निचर, साहित्य यासाठी स्थानिक ग्रंथालयांचा सल्ला घ्यावा.

Use of Rare Materials in Select Libraries in Karnataka: A Study

*P. Sarasvathy Dr, D. Giddaiah, Selvaraja A*

भारतातील कर्नाटक राज्याला कला व संस्कृती यातील प्राचीन स्त्रोतांचा समृद्ध वारसा मिळालेला आहे. तेथील ९ ग्रंथालयांमध्ये मिळून ८०,००० च्या वर दुर्मिळ सामग्री आहे ज्यामध्ये दुर्मिळ छापील पुस्तके, हस्तलिखिते (manuscripts) भूर्जपत्रे, छापील नियतकालिके, नकाशे, दुर्मिळ छायाचित्रे, चित्रे, रेखाटने, रत्ने, नाणी, पुराणवस्तूंचा समावेश आहे. विद्यार्थी, संशोधक, लेखक, शिक्षक, सरकारी अधिकारी, परदेशी विद्वान या ग्रंथालयांचा उपयोग करतात. ही सर्व सामग्री वेगवेगळ्या भाषांमध्ये, वेगवेगळ्या स्वरुपात आहे व शतकानुशतके जतन करण्यात आली आहे. यातील काही दुर्मिळ सामग्री अस्सल, अप्रकाशित आहे. काही पुस्तकांची छपाई आता बंद झाली आहे. त्यांचे कागद जीर्ण झाले आहेत. असे दुर्मिला ग्रंथ, भूर्जपत्रे विघटन होऊन नष्ट होऊ नयेत यासाठी व कायमस्वरूपी जतन करण्यासाठी digitization सारखे प्रयत्न व्हायला हवेत.

Evaluation of Websites Used by Social Scientists of North East India

*Bikika Laloo Tariang*

ईशान्य भारतातील समाजशास्त्र संशोधकांना विचारण्यात आले की ते कोणत्या वेबसाईट चा जास्तीत जास्त उपयोग करतात. जे लोक वेबसाईट बनवतात त्यांना त्यातील बलस्थाने, कमतरता समजावी व त्यांना त्यात सुधारणा करता याव्यात यासाठी त्यांच्या (design) व आशय यावरून गुणवत्तेचे गुणांकन केले गेले. या पाहणीत आढळले की या वेबसाईट्स जगातल्या इतर वेबसाईट्सपेक्षा कमी गुणवान नाहीत. त्या आकर्षक आहेत व त्यात

भरपूर रंग व उचित छायाचित्रे आहेत. आशयाच्या दृष्टीने पहिले तर त्या आकलनशील (comprehensive) आहेत. त्यात विषयाच्या दृष्टीने संगतवार सर्व तपशील आहेत. शिवाय त्यात इतर दुवे (hyper links), कधीकधी इतर संस्थांच्याही links दिलेल्या असतात. त्या नियमितपणे अद्ययावत होत असतात. काही वेबसाईट रोजच्या रोज अद्ययावत केल्या जातात. त्या इतिहास, संस्कृती व अर्थव्यवस्था या विषयांवर भर देत असल्यामुळे शास्त्रज्ञांपेक्षा समाजशास्त्र व मानवतावाद यांच्या अभ्यासकांना त्या जास्त उपयोगी आहेत. यातील कमतरता म्हणजे dead links किंवा Under construction page. बाकी या Web sites उपयोजकांवर छाप पाडण्यात यशस्वी झाल्या आहेत.

Use of Web Resources by the Students of Zakir Hussain College of Engineering and Technology, AMU Aligarh

*Sudharma Haridasan, Musheer Ahmad Khan*

एकविसाव्या शतकात माहितीच्या प्रचंड साठ्यामुळे जलद माहिती शोधण्याचे तंत्र जाणून घेणे व त्याचा अभ्यास करणे आवश्यक झाले आहे. Web वरील माहिती २४ X ७ उपलब्ध असल्यामुळे ते सर्वात मोठे ग्रंथालय बनले आहे. अलिगढच्या Zakir Hussain College of Engineering & Technology Aligarh Muslim University मधील विद्यार्थी व शिक्षक यांचे web बाबतीतले अनुभव व अडचणी जाणून घेतल्या गेल्या, त्यात असे आढळून आले. १००% विद्यार्थी व शिक्षक web वापरतात, पण त्यांना त्याचे तंत्रशिक्षण द्यावे लागेल. ते जलद माहिती, अभ्यास व संशोधनासाठी web चा वापर करतात. ज्ञान वाढविणे किंवा करियर विकास हा त्यांचा हेतू नसतो. Search engine (जास्त करून google), Book marks, key word search जास्त लोकप्रिय आहेत. त्यामुळे त्यांची क्षमता व कौशल्य वाढते. उपयोजकांना Downloading व Printing ची सोय उपलब्ध व्हावी

व Internet connectivity सर्व विभाग आणि प्रयोगशाळांना उपलब्ध व्हावी. तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी link वरील माहितीचा अचूकपणा व विश्वासार्हता या गोष्टी तपासून घ्याव्यात.

**Year 2010, Volume-48, Issue-2 (June)**

School Library of Future

*C P Vashishth Prof*

भारताने 'शिक्षणाचा हक्क' कायदा पारित केलेला आहे. शिक्षणाचा मुख्य स्त्रोत म्हणजे ग्रंथालये. आपल्या संस्थेतील विद्यार्थी भारतात इतरत्र किंवा प्रगत जगातील कोणत्याही शाळेत सामावून जाऊ शकेल इतका त्याचा विकास होण्यासाठी संग्रह व सेवा अद्ययावत असल्या पाहिजेत. ग्रंथपालांची भूमिकाही महत्त्वाची असल्यामुळे इतर शिक्षकांच्या सारखाच त्यांचा दर्जा, पगार व सेवाशर्ती या गोष्टी असाव्यात. शाळेत पाउल टाकणाऱ्या बालकाला ग्रंथालयाचे आकर्षण असते. तिथे त्याला पुस्तके मिळतात ज्यातून त्याला मनोरंजन, ज्ञान, शिक्षण, माहिती, प्रोत्साहन व नवनिर्माणाचा आनंद मिळतो. त्यासाठी या प्रकारची योग्य पुस्तके ग्रंथालयात असावीत व मुलांनी ती वाचावीत, त्यांच्यात आवड निर्माण व्हावी व वाढावी यासाठी ग्रंथपालांनी प्रयत्न करावेत.

Collaboration in Research Publications in Library and Information Science

*Dr V K J Jeevan*

माहितीच्या युगात एकीकडे वेगवेगळी संशोधने, परिषदांचे अहवाल, प्रकाशने यांची मागणी वाढत आहे, तर दुसरीकडे कामसू, तत्पर व अभ्यासू लेखक व्यावसायिकांची मागणीही वाढत आहे. वर्ष २००३ व २००४ मधील caliber येथील परिषदा येथील परिषदा ILA (Indian Library Association) व SIS (Society for Information Science) यांच्या परिषदा यामध्ये प्रकाशित झालेल्या निबंधांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये आढळले की

४४% (articles) निबंध एकेका लेखकाने लिहिले होते. त्यातही ६३% लेखक ग्रंथपाल होते, २५% शिक्षक, ८% विद्यार्थी व ४% इतर होते. ३८% निबंध दोन लेखकांनी मिळून लिहिलेले होते. त्यातही काही ठिकाणी पहिला किंवा दुसरा लेखक ग्रंथपाल होते. शिक्षकांचे सहभागी इतर शिक्षक किंवा विद्यार्थी असतात, व ते शिक्षण व संशोधन याच क्षेत्रातले असतात तर ग्रंथपालांना ज्ञानाचा वाढता ओघ असलेले ग्रंथालय सांभाळत संशोधन करावे लागते.

Insights into the Library: Professional Competencies, Responsibilities and Interpersonal Skills of Today's Librarians

*Md. Ziaur Rahman, Sabahat Nausheen*

इंटरनेटवर आता एक जागतिक ग्रंथालयच खुले झाले आहे. ग्रंथ जतन करणे व त्यांची देवाणघेवाण एवढीच ग्रंथपालांच्या कामाची कौशल्ये न राहता त्यांना आता नवीन पद्धतीने नवीन माहिती शोधणे, मिळवणे, वापरणे व उपयोजकांपर्यंत पोहोचवणे ही नवीन कौशल्ये आत्मसात करावी लागतील. त्यांची कौशल्ये, त्यांचा दृष्टीकोण, भूमिका, जबाबदारीची जाणीव व क्षमता यांनी ते या स्पर्धेत टिकून राहतील. स्वतःला बदलण्याची गरज समजून घेणे, तशी इच्छा असणे, तशी क्षमता अंगी बाणवणे, सहकाऱ्यांशी सौजन्य व आदराने वागणे, त्यांच्याशी विचारविनिमय करणे व उपयोजकांचे समाधान होईल अशी जास्तीत जास्त पात्रतेची सेवा देणे, दुसऱ्याचे लक्षपूर्वक ऐकून घेणे व सकारात्मक आणि आनंदी वर्तन हे गुण ग्रंथपालामध्ये असले पाहिजेत. तसेच कामाचा ताण सहन करणे, लवचिकता, वेगवेगळया उपयोजकांचे शंकासमाधान करणे (deal), अभ्यासाची आवड, समर्पणवृत्ती (कामाला), नेतृत्वगुण, संशोधन व मागोवा घेणे (follow-up track down) ही कौशल्येही त्यांना शिकावी लागतील. तिरकस टोमणे, मतभेद, विसंवाद या गोष्टींमुळे कर्मचाऱ्यांमध्ये (staff) नकारात्मक तणावाचे वातावरण

निर्माण होते. या गोष्टी टाळल्या पाहिजेत. सहकाऱ्यांमध्ये परस्पर विश्वास व मैत्रीचे नाते निर्माण होणे हे उत्तम आरोग्यदायक वातावरण व उत्तम सेवा यासाठी उपयोगी ठरू शकते.

Comparison of Online Information Providers Relevance: Scientific Publishers and Information Vendors

*Fatemeh Zandian, Dr Riahinia Nosrat*

माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात उपयोजकांपर्यंत माहितीचा पुरवठा करणारे २ गट आहेत एक म्हणजे माहिती विक्रेते व दुसरे शास्त्रीय माहितीचे प्रकाशक. प्रकाशकांची माहिती त्यांच्या प्रकाशनापुरती असते पण विक्रेते विविध प्रकाशनांची निवडक व संबंधित माहिती पुरवू शकतात.माहिती ही विषयाशी संबंधित असणे हा माहिती शास्त्रातला महत्वाचा विचार आहे. महत्वाचे प्रकाशक व विक्रेते यांच्या on – line माहितीचा अभ्यास व पाहणी केली असता असे आढळून आले की शास्त्रीय प्रकाशकांमध्ये Oxford Journals सर्वात जास्त संबंधित व समर्पक होती व ISI Web of Knowledge विक्रेत्यांमध्ये सर्वात जास्त समर्पक होते.

User Satisfaction in Public Libraries of Raipur City: A Survey

*Dr Maya Verma, Santoshi Patel*

सार्वजनिक ग्रंथालये कोणाही व्यक्तीला आयुष्यभर स्वयंशिक्षणाची संधी देत असल्यामुळे ती सामाजिक व आर्थिक बदलांसाठी उत्प्रेरक (catalyst) ठरू शकतात, तसेच ती औपचारिक शिक्षण पद्धतीला पर्याय होऊ शकतात. यासंदर्भात रायपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या उपयोजकांची पाहणी केली गेली. हे उपयोजक कोण आहेत, कसे आहेत (characteristics), ते कोणती संसाधने वापरतात व ग्रंथालयाच्या स्थानाच्या वापरावर परिणाम होतो का या मुद्यांचा अभ्यास करण्यात आला.  यात असे आढळून आले की स्त्री

उपयोजकांपेक्षा पुरुष उपयोजकांची संख्या जास्त आहे. (गैरसोयीची वेळ किंवा वेळ नसणे ही कारणे आहेत.) वर्तमानपत्रे व सामान्यज्ञानाची पुस्तके वाचणाऱ्यांची संख्या खूप आहे. ग्रंथालयाच्या स्थानाचा विचार केला जातो. माहिती तंत्रज्ञान व ई-संसाधने या बाबतीत रायपूर येथील सर्व ग्रंथालये मागे पडली आहेत. जास्तीत जास्त ग्रंथालये पारंपारिक पद्धतीची आहेत. २१ व्या शतकातील आव्हाने स्वीकारण्यासाठी, उपयोजकांच्या माहितीच्या गरजांची पूर्ती करण्यासाठी त्यांनी सज्ज व्हायला हवे.

Public Libraries in Jammu & Kashmir State: An Overview

*Dr Meghna Dhar*

सार्वजनिक ग्रंथालये आधुनिक जगाचा अविभाज्य भाग बनली आहेत व देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकासात त्यांची महत्वाची भूमिका आहे. जम्मू – काश्मिर मधील सार्वजनिक ग्रंथालयांची वाढ, विकास, कार्य व सेवा या मुद्द्यांवर पाहणी केली, त्यात खालील गोष्टी आढळल्या. सार्वजनिक ग्रंथालये राज्य व केंद्रशासनाच्या सुट्ट्या सोडून इतर दिवशी खुली असतात. राज्य संशोधन ग्रंथालयात संस्कृत, पर्शियन व तिबेटी भाषांमधील ८००० हस्तलिखिते (manuscripts) आहेत. या अमूल्य ठेव्याचे जास्तीत जास्त संगणकीकरण (digitalization) झाले आहे. इतर ग्रंथालयातही ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक विषयांवर तसेच लष्कर व तत्वज्ञान या विषयांवरील साहित्य आहे. लहान मुलांना आवड लागावी म्हणून विशेष विभाग आहेत. उपयोजकांसाठी परिसंवाद आयोजित केले जातात व २३ एप्रिलला दरवर्षी जागतिक पुस्तक दिवस दुर्मिळ पुस्तकांचे प्रदर्शन ठेवून साजरा केला जातो. कर्मचाऱ्यांना (Staff) प्रशिक्षण दिले जाते व M.Lib / B.Lib अशा अभ्यासक्रमांना पाठविले जाते. सर्व साहित्याचे जतन करण्यासाठी आधुनिकीकरण व संगणकीकरणाचा कार्यक्रम आखला गेला आहे व लवकरच ही सर्व माहिती

संसाधनांच्या मार्फत इंटरनेटवर येईल. ग्रंथालय सेवा समाधानकारक आहे. पुढील विकासासाठी ग्रंथपाल व ग्रंथालय अधिकारी यांनी परिश्रम घ्यावेत.

Job Satisfaction and Organizational Commitment of Academic Librarians in Nigerian Universities

*K A Owolabi, M O Salaam*

ग्रंथालये त्यांच्या उपयोजकांना माहितीचा पुरवठा करण्याचे महत्वाचे कार्य करीत असतात. त्यांचा कर्मचारी वर्ग किती कार्यतत्पर, प्रवृत्त (motivated) व कामाबद्दल समाधानी आहे. यावर त्यांचे यश अवलंबून असते. नायजेरियातील ७ विद्यापिठातील ८० शैक्षणिक ग्रंथपालांचे कामाबद्दल समाधान व संस्थेशी बांधिलकी या मुद्द्यांवर परीक्षण करण्यात आले. त्यात असे आढळले की आकर्षक पगार व भत्ते यांमुळे जास्तीत जास्त ग्रंथपाल समाधानी आहेत व संस्थेशी बांधिलकी असण्यात वय हा घटक परिणाम करतो. जास्त वयाच्या व्यक्ती तरुण व्यक्तींपेक्षा कामातील समाधान ही एक आनंददायी, सकारात्मक भावनिक स्थिती आहे. एखाद्याचे कामाशी संबंधित सुसंगत मानसिक, शारिरीक व सामाजिक उत्तम वर्तन म्हणजेच कामाचे समाधान. त्यामुळे ग्रंथालय व्यवस्थापनाने आनंदी, उत्साही वातावरण निर्माण केले पाहिजे. तसेच ग्रंथपालांनी संगणक यंत्रणा, इंटरनेट आणि कौशल्ये आत्मसात केल्यास त्यांना कामाचा ताण येणार नाही. यासाठी त्यांना विशेष भत्ते मिळाले की ते समाधानी राहतील.

## Year 2010, Volume-48, Issue-3 (September)

Towards an Integrated Rural Development Information System in India

*Dr M R Rawtani, JPS Ahuja*

भारतातील ६०% पेक्षा जास्त जनता खेड्यात राहते. भारताचा विकास होण्यासाठी ग्रामीण विकास होणे गरजेचे आहे. यासाठी १९८६ मध्ये ग्रामीण विकास मंत्रालयाने CRISP संगणकीकृत ग्रामीण माहिती यंत्रणा उपक्रमाची (Project) सुरुवात केली. त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये संगणक व संगणक प्रणाली यांचा पुरवठा केला. कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामकाज करणे सोपे व्हावे यासाठी माहिती देणारी Daily नावाची Intranet site विभागाने तयार केली. वेगवेगळया मागण्या, ठराव, परवानग्या व निधीपुरवठा on – line करता येते. संगणक आज्ञावलीमुळे कामातला वेग व पारदर्शीपणा वाढला आहे. स्थानिक भाषा, पाण्याचे स्त्रोत भूविकास, ग्रामीण बाजार, स्वयंसेवी संस्थांसंबंधी माहिती, जमिनीच्या नोंदी अशा सर्व गोष्टी संगणकावर संकलित केल्या जातात. यासाठी खेडोपाडी वीज, रस्ते, संगणक, इंटरनेट पोचणे गरजेचे आहे. लोकांना संगणक साक्षर करणे व संगणकावर स्थानिक भाषेचा वापर करता येणे हेही आवश्यक आहे. राजकीय व अधिकारी वर्गाची मजबूत इच्छाशक्ती, कार्यतत्पर यंत्रणा व उपयोजक यांच्यामुळे ग्रामीण विकास झपाट्याने होईल.

Library and Information Centres in Maharashtra: A Comparative Study
*Dr Shalini R Lihitkar*

राष्ट्रीय विकास योजनांमध्ये राष्ट्रीय माहिती यंत्रणेसाठी पायाभूत सुविधा – योजनांना अग्रक्रम दिला आहे. माहिती यंत्रणा ही उपयोजक व छापील किंवा इलेक्ट्रॉनिक संसाधनांच्या माहितीचे विश्र्व यातील दुवा आहे. महाराष्ट्रातील ३८ माहिती केंद्रे देत असलेल्या सेवांचे परीक्षण करण्यात आले. त्यात खालील गोष्टी आढळून आल्या.

३८ पैकी २८ केंद्रांमध्ये पूर्णवेळ ग्रंथपाल आहेत. १० पैकी काही ठिकाणी शास्त्रज्ञ काम पाहतात. काही ठिकाणी ग्रंथपालाची जागा रिक्त आहे. जास्तीत जास्त केंद्रांमध्ये पुस्तके, नियतकालिके, संशोधन अहवाल, CD ROM database, on – line database,

ई-नियतकालिके आहेत. काही केंद्रे एकमेकांना जोडलेली आहेत.

३६ केंद्रांकडे माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा व इंटरनेट जोडणी आहे. खूप केंद्रे अंशतः संगणकीकृत आहेत. काहींची संगणकीकरणाची अजून सुरुवातही नाही. बहुतांशी केंद्रांकडे BSNL जोडणी आहे. जवळजवळ सर्व सेवा मोफत आहेत. काही केंद्रे सर्च व कागदपत्रे देणे (document delivery) यासाठी शुल्क घेतात. सर्व ग्रंथपालांना वाटते की networking, resources sharing ची गरज आहे.

State of Primary School Libraries in Uttar Pradesh: A Study of Azamgarh District

*Dr MP Upadhyay, RP Bajpai*

लहान मुलांना प्रत्येक गोष्टीचे कुतूहल असते. ते शमविण्याचे महत्वाचे साधन म्हणजे ग्रंथालय. प्राथमिक शिक्षणाचे जे महत्व आहे तेच प्राथमिक शाळा ग्रंथालयाचे आहे. ग्रंथालयामुळे मुलांना वाचनाची व स्वयंशिक्षणाची सवय लागते, शिक्षकांना शिकवण्यासाठी व स्वतःच्या विकासासाठी साहित्य मिळते, शाळेच्या शैक्षणिक उद्दिष्टांची पूर्ती होण्यास मदत होते. मुले स्वतःच्या क्षमता जाणू व वाढवू शकतात. उत्तरप्रदेश आझमगढ जिल्ह्यातील प्राथमिक शाळा ग्रंथालयांचे परीक्षण करण्यात आले. त्यात असे आढळून आले की सरकारी प्राथमिक शाळा २१३२ आहेत. साधारणपणे त्यांमध्ये प्रत्येकी ५०० पुस्तके आहेत ICT संसाधने नाहीत.

कोणत्याही शाळेत ग्रंथालयाला स्वतंत्र जागा किंवा ग्रंथपाल नाही. शिक्षकांना पुस्तकांचे वर्गीकरण, सूची, मांडणी याचे ज्ञान नाही. खेड्यातील किंवा दुर्गम भागातील मुलांना घरीही ज्ञानासाठी संसाधने नाहीत व शाळेतही नाहीत. मुले वाचनापासून पर्यायाने शिक्षणापासून

वंचित राहू नयेत यासाठी सरकारने ग्रंथालय कायदा वापरून ग्रंथालयांचा योजनाबद्ध विकास करावा.

Library 2.0: are Shillong Libraries Ready for It?

*Jiarlimon Khongtim*

उपयोजकांच्या वाढत्या मागणीमुळे व बदलत्या गरजांमुळे त्यांचे समाधान करण्यासाठी ग्रंथालय व्यावसायिक वेगवेगळे मार्ग शोधत असतात. त्यातील एक म्हणजे ग्रंथालय २.० यामध्ये उपयोजक ग्रंथालय सेवा – सुविधा – कार्य यांचे मूल्यांकन करतात व त्यात सुधारणा सुचवतात. ही संकल्पना Michael Casey याने २००५ मध्ये Blog वर मांडली.

ग्रंथपालांनी उपयोजकांची निवड करावी व त्यांच्या योग्य सूचनांचा काळजीपूर्वक विचार करावा. कारण उपयोजक चुकीच्या सूचनाही करू शकतील. ग्रंथालय व त्यातील सामग्रीच्या संरक्षणाला प्राधान्य द्यावे लागेल. मनुष्यबळाची कमतरता, उपयोजकांना सामोरे जाणारे कर्मचारी प्रशिक्षित नसणे, उपयोजकांना feed – back चा उपयोग किंवा महत्व माहीत नसणे किंवा त्यांनी तो भरून देणे टाळणे या गोष्टींमुळे या योजनेची हानी होऊ शकते. या गोष्टी टाळल्या तर ही योजना सर्वत्र विशेषतः ईशान्य भारतात यशस्वी होऊ शकते.

The Digital Library: Its Future Has Arrived

*Dr Suryakant, O S Shekhar Singh*

डिजिटल (digital) ग्रंथालय हे जागतिक आभासी (virtual) ग्रंथालय आहे. यामध्ये संस्थेबाहेर असलेल्या माहिती व कागदपत्रांपर्यंत पोचण्याची तरतूद (Provision) असते. याचा मुख्य उद्देश योग्य व्यक्तीला, योग्य वेळी योग्य व त्वरित माहिती मिळणे हा असतो. तसेच उपयोजकांना माहिती देण्याची व वापरण्याची संधी मिळते. आतापर्यंतचे छापिल साहित्य

संगणकावर ठेवल्यास जगात कोणालाही, कोठूनही ते उपलब्ध होऊ शकेल. माहिती हस्तांतरण करणे अतिशय सोपे, सहज व अत्यंत कमी वेळात होते. कागदपत्रांची कागदावर छापील (Print) प्रत काढल्यास ती अतिशय सुबक व स्वच्छ असते. Digital माहितीमुळे जागेची व वेळेची बचत होते. माहितीचा विस्फोट, ग्रंथालयाचे अंदाजपत्रक (बजेट), जागेची अडचण, माहितीची प्रचंड मागणी, नवीन तंत्रज्ञान यामुळे digital ग्रंथालये उदयास येत आहेत व व्यावसायिक उपयोजकांना वेळेत व गुणवत्तापूर्ण सेवा देत आहेत.

## Year 2010, Volume-48, Issue-4 (December)

Issues and challenges of Indian Library Education and Service in a Knowledge Society

*Dr. Sunil Kumar*

एक यंत्र अनेक माणसांचे काम करते पण ते हाताळणारा माणूस तितकाच कुशल असावा लागतो. ग्रंथालयातही ज्ञानाच्या प्रचंड साठ्याचे संगणकीकरण झाल्यामुळे ग्रंथपालांना तंत्रज्ञानाची नवीन कौशल्ये शिकून घ्यावी लागतील. सध्या ग्रंथालय माहिती शास्त्र शिक्षणात ३ महत्वाच्या बाबी आहेत. अभ्यासक्रम  विकास, पायाभूत सुविधा आणि अभ्यासक्रमात वेळोवेळी होणारे बदल. अभ्यासक्रमात पारंपारिक व तंत्रज्ञानयुक्त अशा दोन्ही अभ्यासांचा समतोल ठेवावा लागेल. देशभर समान अभ्यासक्रम ठेवावा लागेल. ग्रंथपालांना निर्णय घेणारे, (knowledge workers) सध्याच्या ग्रंथालयांपुढे ग्रंथासुचीय सेवा, परवाने, संमतीपत्र, शास्त्रज्ञांच्या संगणकापर्यंत ज्ञानाचा पुरवठा, database आणि ग्रंथालय सूची मधून इलेक्ट्रोनिक प्रकाशनाची जोडणी ही आव्हाने आहेत. पायाभूत सुविधा, शैक्षणिक सामग्री, संगणक यंत्रे व प्रणाली, वर्गीकरण व सूची करण्यासाठी साहित्य  इ. सोयींनी या आव्हानांचा सामना करता येईल. तसेच नोकरीच्या संधी व ग्रंथालय विद्यार्थी यात समतोल ठेवावा लागेल.

Assessing Information Literacy Competency of ISLM Graduate Students of Dhaka University: An analysis

*MD. Anwarul Islam, Dr Salma Chowdhury*

सध्याच्या माहिती युगात सर्वांनीच माहिती – साक्षर झाले पाहिजे. माहिती शोधणे, तिचे मूल्यांकन (गुणांकन) करणे व तिचा परिणामकारक वापर करणे याला माहिती साक्षरता म्हणतात. या संदर्भात ढाका विद्यापिठाच्या ISLM पदवीधर विद्यार्थ्यांच्या माहिती साक्षरता क्षमतेचा अभ्यास केला गेला. माहिती कोणत्याही स्त्रोताकडून मिळाली तरी ती जाणून घेण्याची क्षमता असावी लागते. ISLM पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये ही क्षमता मर्यादित स्वरूपाची होती. कारण त्यांच्या अभ्यासक्रमात माहिती साक्षरतेच्या अभ्यासाचा समावेश नव्हता. त्यामुळे त्यांना या क्षेत्रातील आव्हानांचा सामना करावा लागतो. भरपूर लेखन, चर्चा, धोरण व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये माहिती साक्षरता अभ्यासक्रमाचा समावेश या गोष्टींनी माहिती साक्षर समाज घडू शकेल.

Information Literacy in Indian Agricultural Universities: A study of Punjab Agricultural University

*Yogita Sharma*

गुगल सर्चवर माहिती साक्षरता या संदर्भात १०,६०,००० वेबपाने आहेत. यावरून या विषयाचे महत्व समजून येते. पंजाब शेतकी विद्यापिठातील पदव्युत्तर विद्यार्थी, शिक्षक व संशोधन करणाऱ्यांचे या बाबतीत प्रश्नावली देऊन परीक्षण करण्यात आले. त्यात खालील गोष्टी आढळून आल्या. उपयोजकांना संशोधनाचे प्रकाशन करणे, शिकवणे, अभ्यास पूर्ण करणे, स्पर्धा परीक्षांची तयारी करणे व सामान्यज्ञान वाढवणे यासाठी माहितीची गरज असते. त्यांना माहितीचे स्वरूप, पद्धत याचे पूर्ण ज्ञान आहे. माहिती वापरण्यापूर्वी ते माहितीची सत्यता पडताळून पाहतात. भविष्यात उपयोगी पडावी म्हणून ते ही माहिती साठवून ठेवतात (save)

किंवा त्याची छापील प्रत काढतात. एकंदरीत त्यांना मिळणाऱ्या माहितीविषयी ते समाधानी आहेत व त्यांची माहिती साक्षरता गुणवत्ता समाधानकारक आहे. शिक्षक, ग्रंथपाल, यांनी माहिती साक्षरतेवर वरचेवर उपक्रम राबवल्यास व या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश केल्यास साक्षरता प्रसारास वेग येईल.

Are Librarians Ready for The Future of Librarianship in View of the Development of Organisations

*Jamal Ahmad Siddiqui*

या माहिती युगात पूवीप्रमाणे ग्रंथांचे जतन करणे व त्यांची देवाणघेवाण एवढेच काम ग्रंथपालांचे राहिलेले नाही. माहितीचे इलेक्ट्रोनिक स्वरूप, त्यातील गुंतागुंत, प्रचंड प्रमाणात वाढलेली माहिती व तिच्या वाढलेल्या किंमती यांमुळे ग्रंथपालांपुढे अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. उपयोजकांचे समाधान हे तर त्यांचे प्रमुख कार्य आहे. नवीन तंत्रज्ञान शिकून घेणे, सस्मित सेवा, कामातील तत्परता व कौशल्य, सहकाऱ्यांशी सुसंवाद व उपयोजकांशी सौजन्याने व चतुराईने वागणे या गुणांच्या आधारावर ते ही आव्हाने पेलू शकतात. त्यांचे प्रशिक्षण, ग्रंथालयाचे स्वयंचलितकरण, उत्तम यंत्रे, संग्रह व सूची यांची योग्य व्यवस्था, कागदपत्रांची वेगवान छपाई व पुनर्निर्माण असे उपक्रम राबवल्यास ते उत्तम प्रकारे ग्रंथालयाची धुरा सांभाळू शकतात.

Use of E- Resources in College Libraries of Delhi

*Dr Gurdev Singh, Taruna Arora*

सध्याच्या शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये इलेक्ट्रोनिक संसाधने हा माहितीचा मुख्य स्त्रोत असतो. दिल्लीच्या महाविद्यालयांमधील विद्यार्थी व शिक्षकांच्या ई संसाधनांच्या वापराचा अभ्यास करण्यात आला. यावरून असे लक्षात आले की जरी ई संसाधने उपलब्ध असली तरी त्यांचा वापर म्हणावा तसा होत नाही (up to mark). संगणक व इतर यंत्रांची कमतरता, प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता, उपयोजकांची मागणी नसणे, आर्थिक पाठींबा न मिळणे, संगणक व

इतर संसाधने उपलब्ध नसणे इत्यादी गोष्टींमुळे विद्यार्थी व शिक्षक ई संसाधनांचा उपयोग करण्यात मागे पडत आहेत.

Design and Development a Web-Enabled Directory of Library and Information Science Teachers in India: A Proposed Model

*KP Singh, Esther Moirangthem, Nandi Negi*

कोणत्याही छापिल किंवा on – line डिरेक्टरी मधून आपल्याला व्यक्ती, संस्था व त्यांचे पत्ते आणि इतर माहिती मिळते. LIS शिक्षकांच्या Web डिरेक्टरीमधून एखाद्याला भारतातील LIS शिक्षकांची विविध स्वरूपातील अद्ययावत, विश्र्वसनीय व खरी माहिती संकलित रुपात मिळते. यामध्ये त्यांच्या वैयक्तिक माहितीशिवाय व्यावसायिक माहितीही मिळते ज्यात त्यांची विशेष कामगिरी, आवडी, प्रकाशने, कामाचा अनुभव, योजना (Projects), विद्वानांशची संघटना इत्यादी माहितीचा समावेश असतो. या डिरेक्टरीत Feed back, पान असते ज्यात कोणी वैयक्तिक सूचना करू शकतो. यातील होमपेजवर LIS विभागांची व तपशीलवार माहिती असते. कोठे कोणते कोर्सेस सुरु आहेत, त्याची पात्रता, प्रवेशप्रक्रिया, पत्ता व शिक्षकांसंबंधी माहिती यांचा यामध्ये समावेश असतो. ही भविष्यातील web directory आहे. ज्यामुळे उपयोजकांना LIS संबंधी सर्व माहिती मिळेल व LIS व्यावसायिक एकमेकांच्या संपर्कात राहून चर्चा करू शकतील.

Problems and Prospects of Reading Habits of Early Teenagers

*Partha Sarathi Mandal*

ग्रंथालये ही वाचनाची मंदिरे आहेत. ज्यांना ज्ञान हवे, मानसिक ताणतणावापासून मुक्ती हवी अशा सर्वांसाठी त्यांची दारे उघडी असतात. विद्यार्थ्यांनी क्रमिक अभ्यासाशिवाय इतरही पुस्तके वाचावीत ज्यामुळे त्यांच्या विचारांच्या कक्षा रूंदावतील. वाचन न केल्यास त्यांचे विचार व ज्ञान संकुचित राहतील. म्हणून सर्व लहान तरुण मुलांना (teenagers) वाचनाची

सक्ती केली पाहिजे. शिक्षक, पालक, ग्रंथपाल, संस्थांचे अधिकारी, सरकार यांची मुलांना वाचनाची सवय लावण्याबाबत उदासीनता, बोजड व ठराविक अभ्यासक्रम, पायाभूत सुविधा नसणे, अपुरी ग्रंथालय सेवा, इलेक्ट्रॉनिक वस्तू व माध्यमे यांचा अतिवापर या गोष्टींमुळे मुलांना वाचनाची सवय लागत नाही. वाचनाने व्यक्ती नवीन कौशल्ये शिकते, वस्तुस्थिती कळते. ज्ञान वाढते, विचारांना चालना मिळते, कल्पनाशक्तीला वाव मिळतो, मन स्वस्थ व संतुलित राहते. व्यक्ती आमूलाग्र बदलू शकते. निरक्षर व्यक्ती विद्वान बनू शकते. यासाठी मुलांना वाचनाची सवय लावली पाहिजे.

Resources and Services of the Government Polytechnic College Library, Amritsar: A case Study

*Dr H S Chopra, Gurmeet Singh*


असे म्हटले जाते की ग्रंथालयाविना शिक्षण संस्था म्हणजे आत्म्याशिवाय शरीर, इंजिनशिवाय वाहन. इतके शैक्षणिक संस्थेत ग्रंथालयाला महत्व आहे. तंत्रनिकेतन महाविद्यालय म्हणजे तंत्रशिक्षण देणारी संस्था. भारतामध्ये तंत्रनिकेतन म्हणजे सिव्हिल, मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे (Engineering) (डिप्लोमा) पदविका अभ्यासक्रम चालवणाऱ्या शैक्षणिक संस्था. त्यामुळे या संस्थेचे ग्रंथालय म्हणजे शैक्षणिक व विशेष ग्रंथालयाचे मिश्रण असते. अमृतसर (पंजाब) येथील तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या ग्रंथालय सेवांचा अभ्यास करण्यात आला, त्यात असे आढळून आले – तेथे क्रमिक पुस्तके, इतर पुस्तके (कथा, कादंबऱ्या इ.) संदर्भासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे, दृकश्राव्य संग्रह व गरीब विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी इत्यादी सुविधा समाधानकारक आहेत. प्रशिक्षित ग्रंथपाल उपयोजकांना आस्थापूर्वक, परिणामकारक मार्गदर्शन करतात. येथे फोटोकॉपी मशिन बसवलेले आहे. ना नफा ना तोटा तत्वावर येथे फोटोकॉपी काढून मिळतात. उपयोजक या ग्रंथालयाबद्दल समाधानी आहेत. ग्रंथालय स्वयंचलित झाले तर अधिक उत्तम.

### ४.२.१.५ २०११ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.५ २०११ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २०११ | मार्च | ४९ | १ | ९ | २३.६८ |
| | जून | ४९ | २ | ११ | २८.९५ |
| | सप्टेंबर | ४९ | ३ | ७ | १८.४२ |
| | डिसेंबर | ४९ | ४ | ११ | २८.९५ |
| | | | एकूण | ३८ | १०० |

**आलेख क्र. ५ २०११ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**




२०११ या वर्षातील लेखांचे विश्लेषणमार्च ९(२३.६८%), जून ११(२८.९५%), सप्टेंबर ७(१८.४२%), डिसेंबर ११(२८.९५%) असे दिसून येते. डिसेंबर व जून महिन्यातील लेखांचे वितरण सारखे आहे.

### Year 2011, Volume-49, Issue-1 (March)

Leadership Skills

*J C Binwal*

सध्याच्या ग्रंथालयांना पारंपारिक व डिजिटल अशा दोन्ही स्वरूपाचे काम करावे लागते. इतर संस्थांप्रमाणेच त्यांनाही गुणवत्ता, सेवा, नाविन्य व उत्पादनक्षमता या मुद्द्यांचा

विचार करावा लागतो. त्यासाठी त्यांना तंत्रज्ञान, व्यवस्थापन व नेतृत्व यांचा समतोल राखावा लागतो. परिणामकारक व्यवस्थेसाठी नेतृत्व फार महत्वाचे आहे. उत्तम नेतृत्व म्हणजे दूरदृष्टी, कार्य, मूल्ये, वातावरण (उत्तम) व वर्तणूक यांचा संगम. हे गुण प्रशिक्षण व अनुभवाने एखादी व्यक्ती शिकू शकते. नेत्याला भावी काळाचा अंदाज घेऊन योजना आखता आल्या पाहिजेत व त्याप्रमाणे सहकारी व अनुयायी यांच्याकडून यशस्वीरीत्या राबवता आल्या पाहिजेत. त्यासाठी सहकाऱ्यांमध्ये परस्पर विश्वासाचे व प्रोत्साहनाचे वातावरण निर्माण करता आले पाहिजे. त्याच्यामध्ये विशेषतः ग्रंथालय नेत्यामध्ये उपयोजकांचे समाधान, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कामाबद्दल निष्ठा, पारदर्शीपणा ही मूल्ये असावीत. सकारात्मक विचार करणाऱ्या उत्साही व्यक्तींमधून नेता घडविता येतो.

Building Library Collection in E-environment: Challenges & Opportunities

*C P Vashishth*

भारताला ज्ञानाचा स्त्रोत बनविण्यामध्ये सध्याच्या ग्रंथपालांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी आहे. या वाटचालीला शाळेच्या ग्रंथालयापासून सुरुवात करता येईल. मुलांना पुस्तक वाचण्याची सवय लागावी तसेच आधुनिक साधने वापरण्याचे ज्ञान मिळावे यासाठी ग्रंथपालांनी प्रयत्न करावेत. ग्रंथालयातली सामग्री व माहिती वाढवावी. उपयोजकांच्या गरजेप्रमाणे पुस्तके व माहिती साठवावी. शक्य असेल तर कामाच्या वेळेनंतरही ग्रंथालये खुली असावीत. महाविद्यालयांमध्ये क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके, नियतकालिके, स्पर्धा परीक्षांची पुस्तके असे साहित्य असावे. दृकश्राव्य माहिती, ब्रेललिपीतील पुस्तके तसेच ई- साधने असावीत व विद्यार्थ्यांना त्याचा वापर करू द्यावा. ग्रंथपालांपुढील अडचणी म्हणजे पायाभूत सुविधा नसणे, अपुरा संग्रह, इतर संस्थांशी जुळणी (Link) नसणे, वाचकांसाठी अपुरी जागा, माहिती तंत्रज्ञान शास्त्राच्या राजपत्रांचा उपयोग करण्याची अक्षमता. या आव्हानांचा सामना करत पुढे जावे लागेल.

Indian Citation Index (ICI): A Dream of Indian Research Community Comes True

*Prakash Chand*

ICI देशाच्या विद्वतजगताची संशोधन क्षमता व ताकद दाखविण्यासाठी आवश्यक आहे. गेली ५० वर्षे जगाच्या डाटाबेसमध्ये भारतीय नियतकालिकांचा वाटा (Journals) फक्त १% इतका कमी आहे. आता उपयोजक ICI चा उपयोग करू शकतात. धोरणे ठरविणारे, निर्णय घेणारे अधिकारी ICI प्रमाणे पृथक्करण व मूल्यांकन करू शकतात. आतापर्यंत संशोधकांना त्यांचे प्रबंध SCI नियतकालिकांमध्ये पाठवण्यास सांगितले जात होते. आता हा रोख बदलू शकतो. तसेच स्थानिक भाषांमधील Applied शास्त्रे, समाजशास्त्र व मानवता यावरील साहित्याचे मापन व मूल्यांकन होण्यासाठी ICI आवश्यक आहे. कारण या साहित्याला आंतरराष्ट्रीय उल्लेखनिर्देश डाटाबेसमध्ये जागा नाही.

Equitable Library Services and Information Support for Distance Education

*Dr Manorama Tripathi, V K J Jeevan*

परंपरागत शिक्षण – व्यवस्था विद्यार्थ्यांचे शिक्षण, प्रशिक्षण व अद्ययावत ज्ञानाची मागणी पूर्ण करू शकत नाही. म्हणून देशातील मानव संसाधन विकास विभागाने दूर – शिक्षणाचा पर्याय पुढे आणला आहे. सर्वांसाठी आयुष्यभर शिकण्याच्या दृष्टीने त्यामध्ये सर्व सुविधा व तंत्रज्ञान आहे. यामध्ये ग्रंथालयांना खूप महत्व आहे. दूर शिक्षण व्यवस्थेमध्ये एक राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, १३ राज्य मुक्त विद्यापीठे व १०६ दुहेरी पद्धतीच्या संस्था आहेत. यामध्ये ग्रंथालयांची भूमिका अशी आहे - त्यांनी दूर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना छापिल तसेच ई- साहित्य पुरवावे. ग्रंथपालांना हे उपयोजक कोण आहेत, त्यांच्या गरजा, स्थान व शिक्षणाचे स्वरूप माहिती असावे. त्यांनी या उपयोजकांना जागा, अभ्यासिका, संगणक

प्रयोगशाळा पुरवाव्यात. जनजागृतीसाठी व उपयोजकांच्या माहितीसाठी त्यांनी जनसंपर्क अभियान व मेळावे भरवावेत. ग्रंथालय वेब साईट्स अद्ययावत असाव्यात. ICT चा पुरेपूर वापर करावा.

Evaluation of an Educational Website Based on a Well-structured Standard

*Dr Nosrat Riahinia, Mohammad Attaran, Asefeh Asemi*

इराणमधील शाळांसाठी Roshd ही एक राष्ट्रीय वेबसाईट आहे. ही एक शैक्षणिक web – site आहे व इराण मंत्रालयाशी संलग्न आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या कक्षापातळीनुसार ती आशय पुरवत असते. या वेबसाईटचे १० जणांकडून मूल्यांकन केले गेले. त्यातील मुद्दे याप्रमाणे होते - विद्यार्थ्यांच्या वय व कक्षा याप्रमाणे योग्य आशय असणे, उपयोजकांना निवडीचे व वाटाघाटी चे स्वातंत्र्य, आशयाचा नेमकेपणा, अचूकपणा व संकलन, तर्कशुद्ध आशय, शिक्षणाच्या विविध पद्धती, शिकण्यासाठी साधने, मल्टिमिडिया, ॲनिमेशन, रंग व आवाज यांचा वापर, इतर वेबसाईट्सशी जोडणी (link), उपयोजकांच्या प्रश्नांना वेळेवर उत्तरे, सहकार्य, फीडबॅक व युजर फ्रेंडली इंटरफेस. या परीक्षणातून आढळले की Roshd चे सादरीकरण मध्यम होते.याच मानकांनुसार इतर शैक्षणिक वेबसाईटचेही परीक्षण करता येईल.

Prescriptive/Diagnostic Assessment of Information Literacy Competency of Science, Engineering and Technology Students of Higher Education Institutions in Delhi

*Taruna Joshi*

ज्ञान मिळविणे व वापरणे हे सध्याच्या शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे. त्याचबरोबर ज्ञानाचा वापर व त्यात सुधारणा करण्यासाठी उपयोजकाचा कल व क्षमता यांचा विकास करणे हेही शिक्षणाचे काम आहे. आधुनिक तंत्रज्ञान व संसाधनांचा उपयोग करता येणे हे सध्याच्या

महाविद्यालीन विद्यार्थ्यांसमोर आव्हान आहे. त्यांना माहिती कौशल्ये शिकवून सज्ञान करता येईल. पण त्यासाठी त्यांची माहिती – साक्षरता योग्यता पातळी ठरवणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे त्यांना प्रशिक्षण देता येईल. ही पडताळणी ३ प्रकारची आहे.

1) Prescriptive / Dignostic – विद्यार्थ्यांचे आधीचे (पूर्व) ज्ञान व कौशल्य पडताळणे.
2) Formative – शिक्षकांनी Course मध्ये on – line किंवा प्रत्यक्ष सूचना देवून फीडबॅक देणे (अभ्यास व प्रात्यक्षिके)
3) Summative – अंतिम मूल्यांकन करणे.

निरीक्षणे – जास्तीत जास्त विद्यार्थी Techno - savvy असतात. ते त्यांचा laptop वापरतात. सर्च (जास्तकरून Google) करून माहिती मिळवून save करतात. ग्रंथालयाच्या छापिल साहित्यात फारसे लक्ष घालत नाहीत. इतर विद्यार्थ्यांशी चर्चा करतात. माहिती साक्षरता योग्यता परीक्षणाने विद्यार्थ्यांना काय माहीत आहे, काय माहीत असायला हवे पण माहीत नाही हे कळेल. तसेच त्यांना प्रशिक्षणातून काय अपेक्षा आहेत हेही समजेल.

A Study of Library Users with Special Reference to B.S. Abdur Rahman University Library, Chennai

*Dr P Panneerselvam*

ग्रंथालयाचे प्रमुख कार्य आहे उपयोजकांचे समाधान. त्यासाठी त्यांना अद्ययावत रहावे लागेल. शैक्षणिक संस्थांच्या ग्रंथालयांवर जास्तच जबाबदारी असते. कारण तेथे तरुण पिढी वाढत असते. त्यादृष्टीने चेन्नईच्या B.S. Abdur Rahman विद्यापीठ ग्रंथालयाचे अवलोकन करण्यात आले. विद्यार्थी, संशोधन करणारे विद्वान, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या ग्रंथालयाचे उपयोजक आहेत. हे सर्व ग्रंथालयात सप्ताहात किती वेळा येतात, किती वेळ असतात, कशासाठी येतात (कोणत्या साहित्यासाठी), त्यांची आवड काय आहे व ते समाधानी आहेत का हे प्रश्न विचारात घेतले गेले. निरीक्षणे – हे ग्रंथालय अद्ययावत असल्यामुळे उत्तम कार्य

करीत आहे व उपयोजकांना समाधानकारक सेवा देत आहे. त्यांच्याकडे साहित्याचा व दृकश्राव्य साधनांचा भरपूर साठा आहे. e – learning व on line संसाधनांची सध्याच्या उपयोजकांवर मोठी छाप (Impact) पडते.

**Year 2011, Volume-49, Issue-2 (June)**

Towards The Provision of Information Needs and Library Services for Rural Community Development: Challenges for Democratic Government in Nigeria

*Francis Adesoji Fabunmi*

उत्तम नागरिकत्वाच्या विकासासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीला नागरिकाचे मूलभूत हक्क, कर्तव्य, सरकारची त्यांच्या बाबतीतली जबाबदारी याची माहिती असणे आवश्यक आहे. ही माहिती ग्रंथालये देवू शकतात. याचबरोबर कुटुंब – आरोग्यसेवा, गुंतवणुकीच्या संधी, सरकारची धोरणे, बँकाच्या सुविधा यासारखी इतर माहितीही त्यांच्याकडून मिळते.

नायजेरिया - लोकशाही सरकार हे लोकांच्यासाठी असलेले सरकार असते. बहुसंख्य जनता ग्रामीण भागात रहात असल्यामुळे त्यांच्या विकासासाठी ग्रामीण भागात ग्रंथालये सुरु केली पाहिजेत. ग्रामीण लोकांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांना ग्रंथालयाची ओढ नसते. त्यामुळे ग्रंथपालांनी फिरत्या विक्रेत्यांप्रमाणे त्यांच्यापर्यंत पोचले पाहिजे व विविध माहिती त्यांच्यापर्यंत पोचवली पाहिजे. ग्रामीण भागातील लोक खूप बाबतीत स्वयंपूर्ण असतात. त्यांच्याकडे परंपरागत हस्तकला, लोककला, लोकसंगीत वगैरेचा समृद्ध वारसा असतो. ग्रंथालयांच्या मार्फत तो जतन करून जगापुढे आणता येईल. निरुद्योगी लोकांना काम मिळेल.

अशा प्रकारे ग्रामीण भागातील ग्रंथालये जनतेच्या मूलभूत गरजा, सांस्कृतिक जीवन, शिक्षण याबाबतीत मदत करू शकतील.

Electronic Databases: Provisions of Protection

*Dr S D Vyas, Priya Rai*

इंटरनेटच्या युगात एका क्लिकवर उपयोजकाला हवी ती माहिती काही क्षणात मिळत असली तरी त्या माहितीमागील संशोधनासाठी भरपूर पैसा व अनेक माणसांचे श्रम व वेळ खर्च झालेले असतात. त्यामुळे डाटाबेस बनवणाऱ्यांना त्यांची बुद्धी व कौशल्ये वापरून जमविलेल्या माहितीतून नफा मिळावा असे वाटते. त्यासाठी त्यांना Copy – rights हवे असतात. ज्यांनी मूळ संशोधन केले आहे त्यांना हे हक्क प्राप्त होतात. उपयोजकाला हे संशोधन वापरायचे असेल तर मूळ संशोधकाचा ऋण – निर्देश (Acknowledgement) करून त्यातील काही भाग वापरू शकतो, पुन्हा लिहू शकतो किंवा स्वतःचे विचार मांडू शकतो. हा एक प्रकार आहे. दुसऱ्या प्रकारात, जिथे आशयासाठी भरपूर गुंतवणूक झालेली असते तिथे १५ वर्षांपर्यंत तो आशय वापरता येत नाही. यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्यांची गरज आहे. आणि डाटाबेस वापरणाऱ्या सर्वांनी त्याचे पालन करावे.

Faculty Image of Librarians: How They See Us?

*Dr Manoj K Joshi*

महाविद्यालय व विद्यापीठातील शिक्षक व ग्रंथपाल नेहमी एकमेकांच्या संपर्कात असतात. शिक्षक त्यांच्या संशोधनासाठी किंवा शिकविण्यासाठी उपयोगी असलेल्या साहित्याची ग्रंथपालांकडे मागणी नोंदवतात. तसेच ग्रंथालय साहित्याचे ते उपयोजकही असतात. हरियाणाच्या महाविद्यालय व विद्यापीठातील शिक्षकांकडून ग्रंथपालांची वेगवेगळ्या निकषांवर माहिती घेण्यात आली. ते निकष असे होते सक्षम, भेटू देणारे, (approachable), मैत्रीपूर्ण (मित्रासारखे), मदत करणारे व उत्साही. सगळ्यात जास्त विद्यापीठ शिक्षकांना ग्रंथपाल 'भेटू देणारे' वाटले तर महाविद्यालय शिक्षकांना ते सक्षम वाटले. स्त्रीशिक्षिकांना ग्रंथपाल ज्ञान असलेले व उत्साही वाटले तर पुरुष शिक्षकांना ते मदत करणारे व संघटीत वाटले.

काहींना ते मिसळणारे, अनुभवी, सौजन्यशील व चांगला पेहराव करणारे वाटले. सक्षम हा मुद्दा सोडला तर बाकीचे मुद्दे वैयक्तिक स्वभावाशी निगडीत होते.

LIS Education in India: Challenges for Students and Professionals in The Digital Age

*V Senthurvelmurugan*

सध्या भारतामध्ये पारंपारिक व डिजिटल अशी दोन्ही प्रकारची ग्रंथालये असतात. परंतु ग्रंथालय शाळांना त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान व कौशल्य विकसित करण्यामध्ये अपयश आले आहे. त्यामुळे LIS शिक्षणामध्ये आता ग्रंथालयाशी संबंधित विषयांबरोबरच संगणक वापर, संख्याशास्त्र, माहितीशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र व संशोधन यांचाही समावेश करण्यात येतो. यामध्ये प्रमाणपत्र, पदविका, पदवी, M.Phil व Ph D अभ्यासक्रम आहेत. LIS शिक्षणामध्ये अनेक नवीन शाळांचा उदय, किमान पात्रताही नसणे, अपुरा शिक्षकवर्ग, ग्रंथालय सुविधा नसणे किंवा अपुऱ्या असणे, अद्ययावत अभ्यासक्रम नसणे, सुसज्ज इमारत नसणे इत्यादी अडचणी आहेत. या अडचणी दूर करून सक्षम ग्रंथपाल तयार केले पाहिजेत. ग्रंथालय व्यावसायिकांना माहिती तंत्रज्ञानावर आधारित संसाधने व डाटाबेस वापरण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. गुणवत्तेमधील प्रगती यापुढील काळातील आव्हानांसाठी अत्यावश्यक व अपरिहार्य आहे.

Technological March from Web 1.0 to Web 3.0: A Comparative Study

*Dr K P Singh, Bebi, Dipti Gulati*

वेबसेवा म्हणजे एका यंत्राकडून (machine) दुसऱ्या यंत्राकडे नेटवर्कमधून माहितीच्या देवाणघेवाणीला आधार देणारी संगणक प्रणाली. तीन टप्प्यांमध्ये इंटरनेटचा विकास (प्रगती - growth) झाला. Web 1.0 हे माहितीची जोडणी करणे (connecting) व नेटवर नेणे याबद्दल होते. Web 2.0 मध्ये उपयोजक एकमेकांशी जोडले गेले. Web 3.0 हे अर्थ लावणे

(representing meanings), माहितीशी जोडणे व अशा प्रकारे काम करणे की आपला इंटरनेटचा अनुभव जास्त समर्पक, उपयोगी व आनंददायी असेल अशा प्रकारे बनविले गेले. Web 2.0 मुळे उपयोजकांना web – pages उघडणे सोपे झाले. Web 3.0 उपयोजकांशी जास्त संपर्कात आहे आणि ते एक प्रकारच्या कृत्रिम बुद्धिमत्तेकडे (Artificial intelligence) नेत आहे.

Preservation and Conservation of Manuscripts: A Case Study of A. C. Joshi Library, Panjab University, Chandigarh

*Dr Ranjana Vohra, Aarti Sharma*

हस्तलिखित म्हणजे हाताने लिहिलेले पुस्तक किंवा कागदपत्र. चंदिगढ येथील पंजाब विद्यापिठाच्या ग्रंथालयामध्ये १४९३ हस्तलिखितांचा मोठा संग्रह आहे. त्यातील काही दुर्मिळ आहेत. या हस्तलिखितांमध्ये भारताचा अतिशय मौल्यवान असा सामाजिक, सांस्कृतिक व शाब्दिक इतिहास आहे. हा सांस्कृतिक वारसा जतन करणे व समाजाच्या उपयोगासाठी तो समाजासमोर आणणे ही ग्रंथालयाची जबाबदारी आहे. ही हस्तलिखिते नैसर्गिक साधनांपासून बनलेली असल्यामुळे प्रकाश, उष्णता (दमटपणा), आर्द्रता, पाणी, आग, बुरशी, किडे, प्रदूषण, धूळ, अयोग्य हाताळणी यांमुळे त्यांची झीज होणे, तुकडे पडणे, डाग पडणे, नष्ट होणे हे धोके संभवतात.

ती सुरक्षित रहावीत यासाठी de – acidification, lamination यांसारखे उपाय करावेत. आग व पाणी यांपासून ती सुरक्षित ठेवावीत. नैसर्गिक कीटकनाशकांचा उपयोग करावा. चंदीगढचे ग्रंथालय अधिकारी प्रयत्न करीत आहेत पण अजून बरेच काही करायला हवे आहे.

Unravelling the Mystery of Our Role Model

*Dr Shri Ram Gupta*

मुंबई विद्यापीठाच्या LIS विभागाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. श्री. राम गुप्ता यांना एक प्रश्न विचारण्यात आला. 'ग्रंथपालांनी कोणाला आदर्श मानावे?' यावर त्यांनी 'रामभक्त हनुमान' असे उत्तर दिले. हनुमान शक्तीमान व बुद्धीमान (दोन्ही) होता. परंतु आपली शक्ती किंवा बुद्धी त्याने स्वतःच्या फायद्यासाठी कधीही वापरली नाही. स्वतःला विसरून तो रामभक्तीत लीन झाला. स्वतःची बुद्धी, शक्ती व वेळ त्याने रामकार्यासाठी व रामाची निरपेक्ष सेवा करत व्यतीत केला. रामाच्या सेवेची एखादी संधी मिळाली की त्याला आनंद होई. तो सदाचरणी होता. हनुमान व श्रीराम हे सेवक – स्वामी संबंधाचे अत्त्युच्य उदाहरण आहे. त्याने श्रीरामांकडून कसलीच अपेक्षा केली नाही. तरी करुणामय श्रीरामांनी त्याच्या सेवेवर प्रसन्न होऊन अजरामर होण्याचा आशीर्वाद दिला.

ग्रंथपाल हे उपयोजकांना सेवा देण्यासाठी बांधिल आहेत. त्यामुळे त्यांचे उपयोजकांशी सेवक स्वामी असेच नाते असते. श्री हनुमानाचा आदर्श समोर ठेवून त्यांनी आपला वेळ, बुद्धी, शक्ती उपयोजकांच्या ग्रंथालय गरजा पूर्ण करण्यासाठी दिला व उपयोजकांच्या समाधानाचा ध्यास घेतला तर त्यांचे काम Thankless Job न राहता आनंदमय सेवा होईल.

## Year 2011, Volume-49, Issue-3 (September)

Evidence-based Librarianship: Implications for Indian Librarians

*Dr Perin V Marolia*

EBL मुळे विज्ञानावर आधारित उत्तम पुराव्यांमुळे महत्वाचे निर्णय घेण्याची प्रक्रिया सुलभ होते. परिणामकारक निर्णयांसाठी समर्पक माहिती फार महत्वाची ठरते. पुराव्याच्या पायावर आधारलेली पद्धत प्रथम वैद्यकीय क्षेत्रात सुरु झाली व आता इतर क्षेत्रातही ती वापरतात. EBL म्हणजे सर्वात उत्तम पुराव्याचा महत्वाच्या निर्णयापर्यंतचा विकास. EBL प्रक्रियेचे टप्पे असे आहेत -

1) प्रश्नाची तपशीलवार मांडणी

2) प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरावा (evidence) शोधणे

3) पुराव्याचे मोल (Appraisal)

4) निष्कर्षांशी जोडणी (Application)

5) नवीन निष्कर्षांचे मूल्यांकन

6) प्रश्नाची नवीन स्वरुपात मांडणी

LIS व्यावसायिकांनी संशोधन करून निष्कर्षांचे (सकारात्मक किंवा नकारात्मक) अहवाल बनवावेत व इतरांपर्यंत ते पोहोचवावेत (Sharing) त्यांनी EBL प्रक्रिया जास्तीत जास्त समजून घ्यावी व तिचा उपयोग करावा.

Evaluation of the Scientific Productions (SPs) of the Faculty Members (FMs) in Iran: *A case study*

*Dr Nosrat Riahinia, Dr Asefeh Asemi, Dr Fatemeh Zandian*

तेहरान (इराण) येथील Univercity of Tarbiat Modarres (UTM) या विद्यापिठातील शेतकी विभागातील शिक्षकांच्या २००१ – २००६ मधील वैज्ञानिक उत्पादनांचा अभ्यास करण्यात आला. ही शास्त्रीय उत्पादने पुस्तक, हस्तलिखिते, परिसंवाद, परिषद अहवाल, संशोधने व प्रबंधावर देखरेख (supervision) या स्वरुपात होती. या अभ्यासातील निरीक्षणे अशी होती -

६२ शिक्षकांनी प्रश्नावलीला प्रतिसाद दिला, त्यात फक्त एक महिला होती. हे सर्वजण जास्त करून इलेक्ट्रॉनिक संसाधने वापरतात. पर्शियन भाषेतील पेपर्स व जर्नल्सचे प्रमाण लॅटिनमधील पेपर्स व जर्नल्सपेक्षा जास्त आहे. सेमिनार पेपर्सचे प्रमाण सर्वात जास्त व रिसर्च प्रोजेक्टचे प्रमाण सर्वात कमी आहे. शिक्षकांचा संशोधनातील रस (आवड), परकीय भाषांचे ज्ञान, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विज्ञान संशोधन केंद्रांशी संपर्कात असणे, अंदाजपत्रकातील तरतूद व संगणक, इंटरनेट व नेटवर्क्स यांचे ज्ञान व कौशल्य या गोष्टी शास्त्रीय पद्धतीवर परिणाम करतात.

Open Access Movement for Managing Intellectual Informatics

*Dr C Beena, N S Archana*

ओपन ॲक्सेस म्हणजे एखादा वाचक एखादे वैज्ञानिक प्रकाशन इंटरनेटवर वाचू शकतो, डाउनलोड करू शकतो किंवा छापू शकतो. याशिवाय एखाद्या कायदेशीर गोष्टीसाठी वापरू शकतो व एखाद्या व्यावसायिक नसलेल्या उद्देशासाठी विनामोबदला वाटू शकतो (distribute). Intellectual Informatics म्हणजे संगणक तंत्रज्ञान वापरून माहितीतल्या बौद्धिक निष्कर्षांचे एकत्रीकरण करणे, साठवणे, वर्गीकरण करणे. माहिती व्यवस्थापनामध्ये ओपन ॲक्सेस साधने व तंत्रे वापरून प्रचंड सुधारणा होण्यास वाव आहे. ही साधने माहिती व्यवस्थेमध्ये प्रचंड क्रांती घडवू शकतात. ग्रंथालय व्यावसायिक नवीन माहिती मिळवू, बनवू, दाखवू शकतात. तर उपयोजक अत्यंत कमी किमतीला माहितीचा उपयोग करू शकतात.

Use of Social Networking Sites by the Research Scholars: A Study of Guru Nanak Dev University, Amritsar.

*Dr KP Singh, Malkeet Singh Gill*

इंटरनेट व वेब ॲप्लिकेशन मधील सुधारणांमुळे सर्व वयोगटातील लोकांना २४ तास संपर्कात राहणे व शिक्षण घेणे शक्य झाले आहे. वेब २.० वर आधारित सोशल नेटवर्किंग साईट्सचा जन्म झाला आहे. शिक्षण व संशोधन क्षेत्रातील विद्वानांना ही ॲप्लिकेशन कितपत उपयोगी व परिणामकारक वाटतात याचा अभ्यास करण्यासाठी अमृतसरच्या गुरुनानक देव विद्यापिठातील संशोधन करणाऱ्या विद्वानांना प्रश्नावली देण्यात आली. यात असे आढळले की

- ७०% विद्वान २० – ३० वयोगटातील आहेत. जास्तीत जास्तजण वैयक्तिक संगणक किंवा लॅपटॉप वापरतात. आपले कुटुंब, मित्र यांच्याशी संपर्क करणे व उपयोगी माहिती मिळवणे हे उद्देश असतात. फेसबुक ही सर्वात आवडती साईट आहे. त्यांना या साईट वापरणे सोपे व सोयीचे जाते. पण वेळही खूप जातो. संदेश पाठवणे, फोटो, व्हिडीओ पाठवणे, मित्र

बनवणे, गट बनवणे यातून हे लोक वैयक्तिक व व्यावसायिक माहिती अद्ययावत ठेवून संपर्कात राहतात. ग्रंथालयांना या साईट वापरून नवीन सुविधा विकसित करून उपयोजकांना चांगल्या प्रकारे सेवा पुरवता येतील.

## Year 2011, Volume-49, Issue-4 (December)

Scarcity of Scholarly in Nigeria

*Dr E-Adeche Apeji, Precious Iziegbe Obe*

१९६६ मध्ये नायजेरीयामध्ये लष्करी राजवट आली, नायजेरियाची अर्थव्यवस्था गडगडली, अनेक प्रमुख प्रकाशने बंद पडली. त्यामुळे विद्वत्ताप्रचुर पुस्तके दुर्मिळ झाली (कमतरता, दुर्भिक्ष) विद्यार्थी व शिक्षक यांना त्यांच्या कार्यासाठी पुस्तके मिळत नव्हती. याच्यावर उपाय शोधण्यासाठी एक सर्वेक्षण केले गेले. त्यात पुस्तकांच्या कमतरतेची पुढील कारणे आढळली.

निधी नाही, लेखकांची कमी संख्या, प्रकाशकांची संख्या पुरेशी नाही, उत्पादनाच्या अपुऱ्या सुविधा, राष्ट्रीय पुस्तक धोरण अस्तित्वात नाही, अपुरे कागद कारखाने, वाचनसंस्कृती रसातळाला गेलेली, ग्रंथालयव्यवस्था चांगली नाही.

या अडचणी दूर करण्यासाठी कागद कारखाने, प्रकाशाने सुरु व्हायला पाहिजेत. तसेच लेखक, प्रकाशक, शैक्षणिक ग्रंथालये यांना निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी नायजेरियाच्या शिक्षणविभागाला आपली गुणवत्ता सुधारली पाहिजे. विद्वत्ता व शिक्षण यांचा स्तर उंचावण्यासाठी योग्य व भरपूर पुस्तके उपलब्ध करून द्यायला हवीत.

Effect of Information Literacy (IL) Group Training on Information Seeking Behaviour (ISB)

*Dr Asefeh Asemi, Dr Nosrat Riahinia, Dr Ali Alibeigi Beni*

माहिती साक्षरता म्हणजे माहिती शोधणे, परत मिळवणे, पृथक्करण करणे आणि वापरणे यासंबंधीची कौशल्ये अंगी असणे पण त्याबरोबरच माहिती – शोधन वर्तणूकही असायला हवी. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी विद्यापीठात प्रवेश ही आयुष्यातील सर्वात महत्वाची गोष्ट असते. या नवीन वातावरणात अभ्यास, संशोधन, अभ्यास, इतरांशी वैज्ञानिक संपर्क या गोष्टी साधण्यासाठी तो ISB च्या सुयोग्य पद्धती वापरतो आणि त्याद्वारे त्याला माहिती – साक्षरतेची पातळी वाढवावी लागते. नाहीतर तो यशस्वी होणार नाही.

इराणमधील Ishfahan विद्यापीठातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या माहिती साक्षर विद्यार्थ्यांच्या गटाला ISB चे प्रशिक्षण दिले गेले.

इराणमधील विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणातून दिसले की या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना त्यांचे व्यक्तिमत्व, क्षमता, गरजा समजल्या. ते संपर्क कौशल्ये, सामाजिक कौशल्ये शिकले. गटावर चर्चेमधून त्यांना प्रोत्साहन मिळाले.

अशा प्रशिक्षणातून संशोधन कौशल्ये, तर्कशुद्ध विचारपद्धती इत्यादी सकारात्मक क्षमता विद्यार्थ्यांमध्ये येऊ शकतात.

An Analytical Study of Literature on Information Literacy
*Dr Prashant P Deshmukh*

माहिती साक्षरता हा शब्दप्रयोग Zurkowski यांनी १९७४ मध्ये प्रथम वापरला. ज्या लोकांना माहिती संसाधनांचा उपयोग आपल्या कामामध्ये करता येतो त्यांना माहिती साक्षर म्हणतात. माहिती साक्षरतेबद्दल १९८१ – २०१० मधील २३ आंतरराष्ट्रीय भाषांमधील ३९०१ लेखांचे (articles) पृथक्करण करण्यात आले. त्यात आढळले की २००३ पासून प्रबंध प्रकाशनांचा कल वाढलेला आहे. तसेच त्यातील ३८५ प्रबंध उच्च शिक्षणाशी संबंधित होते. यामध्ये भारतीय लेखकांपेक्षा परदेशी लेखकांची संख्या जास्त होती.

जास्तीत जास्त माहिती ग्रंथालयांमध्ये मिळते. त्यामुळे ग्रंथालयातील संसाधने शिकून, वापरून माहिती जास्त बुद्धी कौशल्याने व परिणामकारकरित्या वापरता येईल.

Periodicals Use Pattern by Faculty Members of JNN College of Engineering, Shivamogga

*Dr B S Biradar, K T Santhosh Kumar, C Chetan Kumar*

उपयोजकांच्या गरजा पुरवणे हा ग्रंथालयाचा प्रमुख उद्देश असतो. उपयोजकांना माहितीचा खजिना खुला करताना अद्ययावत माहितीसाठी नियतकालिकांचा उपयोग होतो.

JNN अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक नियतकालिकचा कशाप्रकारे उपयोग करतात, याबाबत सर्वेक्षण करण्यात आले. ११० प्रश्नावली दिल्या गेल्या, त्यापैकी ९६ भरून मिळाल्या. त्यात असे आढळले की - ते सप्ताहातून एकदा भारतीय व परदेशी नियतकालिके वाचतात. त्यांना मुद्रित व इलेक्ट्रॉनिक दोन्ही प्रकारचे साहित्य आवडते. परंतु त्यांनी विषयवार नियतकालिकांचा, सूचीचा जास्तीत जास्त उपयोग करणे अपेक्षित आहे. त्यांना मागील अंक सापडत नाहीत कारण मार्गदर्शन मिळत नाही किंवा मांडणी विस्कळीत असते. त्यामुळे नियतकालिकांचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा यासाठी ग्रंथापालांनी आवश्यक त्या सुविधा व मार्गदर्शन पुरवावे.

Public Library Scenario in North East India with Special Reference to Mizoram

*Surbhi Saini*

प्रत्येक नागरिकाला त्याचा बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासासाठी ज्ञान मिळवण्याचा मूलभूत हक्क दिलेला आहे. नागरिकांनी अक्षर वाङ्मय वाचले, समकालीन साहित्य वाचले, त्यांना भारत व त्यांच्या राज्याचा सांस्कृतिक वारसा कळाला की त्यांना खूप समाधान वाटते. त्यांना हे साहित्य पुरवणे हे सार्वजनिक ग्रंथालयांचे काम आहे. सार्वजनिक

ग्रंथालयांची स्थापना व विकास हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. सार्वजनिक ग्रंथालयांना राजा राममोहन रॉय लायब्ररी फाउंडेशन (RRRLF) मदत करते. ईशान्य भारतातील राज्ये भौगोलिक स्थान, दळणवळणाच्या सुविधा नसणे यामुळे इतर राज्यांपासून विलग झाली होती. मिझोरम व मणिपूरमध्ये ग्रंथालय कायदा आहे, सर्वसाधारणपणे येथील सार्वजनिक ग्रंथालये स्वयंसेवी संस्थांकडून चालवली जातात. ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणासाठी लोकांचा ठामपणा, सरकारचा पाठिंबा व चांगली धोरणे बनविणारे तज्ञ या गोष्टींची गरज आहे. नागरिकांसाठी e – संसाधने वापरण्याच्या कार्यशाळा, प्रशिक्षण यांचे आयोजन तसेच ग्रंथालये व ग्रंथालय कर्मचाऱ्यांची पुनर्रचना यातून माहिती साक्षरतेचा प्रसार होईल व तेथील नागरिक सार्वजनिक ग्रंथालयांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतील.

Growth of LIS Research During Golden Jubilee of Maharashtra State

*Dr Anil Nanaji Chikate, Dr Shalini R. Lihitkar, Dr Sharmila Gadge-Chikate*

कोणत्याही विषयातील संशोधन ही नाविन्यपूर्ण बौद्धिक कामगिरी असते. संशोधनामुळे बौद्धिक संपदेमध्ये भर पडते. पर्यायाने राष्ट्राच्या समृद्धीतही भर पडते.

सन २०१० मध्ये महाराष्ट्र राज्याने आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले. त्यानिमित्ताने केलेल्या अभ्यासात महाराष्ट्राची वाढ व विकास आणि राज्यातील ग्रंथालय विद्यालयांमधील संशोधनाचा विकास यात संबंध दिसून आला. या अभ्यासात LIS मधील १३० पी.एच.डी. पदवीधारकांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात असे आढळले की -

LIS मधील पहिली Ph.D पदवी पुणे विद्यापीठाकडून १९८६ मध्ये प्रदान करण्यात आली. जास्तीत जास्त Ph.D आहेत. पदव्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने दिल्या आहेत. तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावमधून एकही Ph.D पदवी नाही. पुरुष व महिलांचे पदवीधारकांचे प्रमाण ८४:४६ आहे. २५ Ph.D प्रबंधांचा विषय माहिती तंत्रज्ञान

क्षेत्राशी संबंधीत आहे. काही विद्यापीठांना अनेक वर्षांचा इतिहास आहे परंतु Ph.D चे प्रमाण कमी आहे. तर काही अलिकडच्या विद्यापीठांमध्ये हे प्रमाण जास्त आहे.


गुणवत्ता सुधारण्यासाठी, गुणवत्ता निर्देशांकासाठी (Quality indicator) विद्यापीठांमध्ये कडक प्रवेश प्रकिया सुरु केली पाहिजे.

### ४.२.१.६ २०१२ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.६ २०१२ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २०१२ | मार्च | ५० | १ | ९ | १७.३१ |
| | जून | ५० | २ | ७ | १३.४६ |
| | सप्टेंबर | ५० | ३ | २७ (प्रो.दास गुप्ता स्मरणार्थ ) | ५१.९२ |
| | डिसेंबर | ५० | ४ | ९ | १७.३१ |
| | | | **एकूण** | **५२** | **१००** |

**आलेख क्र. ७ २०१२ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**



२०१२ या वर्षातील लेखांचे विश्लेषणमार्च ९(१७.३१%), जून ७(१३.४६%), सप्टेंबर २७(५९.९२%), डिसेंबर ९(१७.३१%) असे दिसून येते. सप्टेंबर महिन्यात प्रा. दासगुप्ता यांच्या स्मरणार्थ २७ (५९.९२%) लेख प्रकाशित झाले त्यांची संख्या सर्वात जास्त आहे.

## Year 2012, Volume-50, Issue-1 (March)

Benefits of RFID technology for libraries: An Indian perspective

*Dr Nabi Hasan*

उपयोजकांना अत्त्युच्च दर्जाची सेवा गेण्यासाठी ग्रंथालयांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान व सामग्रीचा उपयोग केला जातो. त्यातील एक तंत्रज्ञान म्हणजे RFID – रेडिओ फ्रिक्वेंसी आयडेंटिफिकेशन – हे रेडिओ लहरी व मायक्रोचिप तंत्रज्ञानावर आधारित आहे. हे साधन ग्रंथालय सामग्री ओळखणे, सामग्रीचे स्थान शोधणे (track), विश्लेषणकरणे, शोधणे ही कामे करते. तसेच पुस्तकांची देवाण – घेवाण, नूतनीकरण, पुस्तके योग्य मांडणीवर नसल्यास इशारा, अचूक व सक्षम सूची, पुस्तकांची सुरक्षा, कामाचा व सेवेचा वेग वाढणे, उपयोजकांचे समाधान होणे हेही फायदे होतात. तसेच  पुस्तके परत करण्याच्या BOX (Book Drop Box) मध्ये पुस्तके टाकल्यास उपयोजकांना त्यांची पावती मिळू शकते. कर्मचाऱ्यांचा वेळ वाचल्यामुळे ते उपयोजकांकडे वैयक्तिक लक्ष पुरवू शकतात. तसेच त्यांची संख्या कमी असली तरी चालते. या तंत्रज्ञानाची किंमत खूप आहे. परंतु कमीत कमी मनुष्यबळामध्ये जास्तीत जास्त गुणवत्तेची सेवा व सुरक्षा मिळते. यासाठी हे तंत्रज्ञान ग्रंथालयांमध्ये जरूर वापरावे.

Determining the Information Literacy Competence (ILC) of MA students in Tarbiat Moallem University, Iran

*Dr Nosrat Riahinia*

माहिती साक्षरता म्हणजे एखाद्याने माहितीचा परिणामकारक वापर करून एखादा प्रश्न समजून घेऊन सोडवणे. Tarbiat Moallem विद्यापीठ, इराण येथील M.A. चे विद्यार्थी त्यांच्या माहितीच्या गरजा भागविण्यास सक्षम आहेत का, त्यांच्यात माहिती साक्षरतेचे प्रमाण किती आहे याचा अभ्यास करण्यात आला. त्यात असे आढळले की -

या विद्यार्थ्यांची माहितीची गरज ओळखण्याची क्षमता उच्च पातळीची होती. पुढे त्यांनी संशोधन, शिक्षण या क्षेत्रात परिणामकारक कामगिरी करण्यासाठी हे आवश्यक आहे या विद्यार्थ्यांची माहिती साक्षरतेची पातळी सरासरीपेक्षा वरची आहे. तरीही ती उच्चतम होण्यासाठी विद्यापिठातील जबाबदार व्यक्तींनी प्रयत्न करायला हवेत. तसेच ग्रंथपाल, इतर शिक्षक व विद्यार्थी यांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत.

Use of E- Resources by Chemists and Physicists: A case study of Punjab University, Chandigarh

*Sakshi, Joginder Singh*

काळाप्रमाणे ई संसाधनांचे महत्व वाढले आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रचंड प्रमाणावर ई संसाधने उपलब्ध आहेत व ती लोकप्रियही आहेत. शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये छापिल साहित्यापेक्षा त्याची मागणी जास्त आहे. चंदिगढ येथील पंजाब विद्यापीठाच्या (फिजिक्स) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र (chemistry) या शाखांमधील प्राध्यापक, पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी (PG) व संशोधन करणारे विद्वान यांना प्रश्नावली देऊन त्यांच्याकडून ई संसाधनांबाबत माहिती घ्हेण्यात आली. त्यात असे आढळले की -

१००% प्राध्यापक व संशोधक यांना e– संसाधनांबाबत माहिती आहे. अध्यापनासाठी व संशोधनासाठी ते त्यांचा वापर करतात. ५०% हून जास्त पदव्युत्तर विद्यार्थी विद्यापीठात internet वापरतात. परंतु internet चा वेग (speed) कमी असल्यामुळे व प्रशिक्षण नसल्यामुळे त्यांना e – संसाधनांचा भरपूर उपयोग करता येत नाही. ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांना

आवश्यक सुविधा पुरवून व माहिती साक्षरतेचे प्रशिक्षण देवून e – संसाधनांच्या वापराची व्यवस्था करता येईल.

Use and Assessment of Digital Information Resources: An User's Perspective of GGSIP University Library

*Amit Kumar Deval*

ग्रंथालयाच्या कामकाजाची गुणवत्ता वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान, साधने व संगणक प्रणाली विकसित झाली आहे. उपयोजक छापिल साहित्याबरोबरच e – संसाधने व digital माहितीचा पण वापर करतात. या संदर्भात पाहणी करण्यासाठी GGSIP विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या ६० उपयोजकांना प्रश्नावली देण्यात आली. त्यातून मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे होती. ३४ उपयोजक digital माहिती संसाधने नेहमी वापरतात. २० जण कधीतरी वापरतात. तर ६ उपयोजक कधीच वापरत नाहीत. शिकण्यासाठी, शिकवण्यासाठी, संशोधनासाठी, अभ्यास करण्यासाठी ही संसाधने वापरली जातात. त्यामुळे digital माहितीचा संग्रह वाढवणे, इंटरनेटच्या सुविधा पुरवणे तसेच उपयोजकांना विशेष प्रशिक्षण देऊन digital माहिती संसाधनांविषयी जागरूक करणे या गोष्टी अतिशय आवश्यक झाल्या आहेत.

Network of Rural Libraries in Madhya Pradesh: A Study

*Dr Arvind K. Sharma, Jaswant Singh Jayant*

ग्रामीण भागात शहरांप्रमाणे शिक्षणाच्या सोयी नसतात. तेथील निरक्षर लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा व निरक्षर, प्रौढ साक्षर व साक्षर लोकांच्या माहितीच्या गरजा भागवाव्यात यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची खूप गरज आहे. २६ जाने. २००३ पासून मध्यप्रदेशमध्ये ग्रामीण ग्रंथालये निर्माण होत आहेत. अशा ६० ग्रंथालयांकडे प्रश्नावली पाठवली असता ५७ ग्रंथालयांनी तिला प्रतिसाद दिला. त्यातून पुढील माहिती मिळाली.

ग्रंथालय सांभाळणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्ती उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या

आहेत. त्यांना रु. ५०० ते रु. १००० इतके कमी वेतन देण्यात येते. त्यावर ते समाधानी नाहीत. ग्रंथालयांमध्ये पुस्तके, नियतकालिके, सरकारी प्रकाशने व वर्तमानपत्रे असतात. खूप ग्रंथालयांमध्ये दूरदर्शन संच तर काही ठिकाणी रेडीओ आहेत. निधीची कमतरता, पुस्तकांचा तुटवडा, ज्ञान व माहिती मिळवण्याबाबत उदासीनता, सार्वजनिक ग्रंथालय कायद्याची तरतूद नसणे व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण नसणे या कारणांमुळे उपयोजकांच्या मागण्या पूर्ण होऊ शकत नाहीत.

State of Libraries and Librarianship in Odisha: An Observation

*Dr. Rabindra K. Mahapatra, Dr. Kamal Lochan Jena, Dr. Dillip K. Swain*

सध्याच्या काळात ग्रंथालये महत्वाची माहिती केंद्रे बनली आहेत व ग्रंथपालांना माहितीच्या विश्र्वातील तज्ञ समजले जाते. ग्रंथालयांकडे प्राचीन ज्ञान व संस्कृतीचा अमूल्य ठेवा असतो. ओरिसा सारख्या विकसनशील राज्याकडे सांस्कृतिक वारसा आहे. परंतु येथे विद्यार्थी, शिक्षक, ग्रंथपाल, प्रकाशन, राजकारणी अशा सर्व पातळ्यांवर ग्रंथालयाचा वापर व ग्रंथालयाचा विकास या बाबी दुर्लक्षित आहेत. राज्यात चांगल्या ग्रंथव्यावसायिकांची कमतरता नाही. पण अपुऱ्या पायाभूत सुविधा, कमी वेतन, मनाचा योग्य कल नसणे, असमाधानकारक कार्यपद्धती यांमुळे ग्रंथालय व्यावसायिकांना चांगल्या यंत्रणा निर्माण करण्याचा उत्साह वाटत नाही. येथील ग्रंथालये अजूनही अद्ययावत झालेली नाहीत. ओरिसामधील शिक्षण, अभ्यास व सांस्कृतिक व्यवस्था खालावू नये यासाठी राज्य सरकारला योग्य दिशेने ग्रंथालयांचा विकास करावाच लागेल.

Use of Critical Incident Technique for Collecting Data in Health Care Settings of Nepal

*Dr Mohan Raj Pradhan*

CIT या तंत्रात (Critical Significance) असलेली मानवी वर्तणुकीची प्रत्यक्ष निरीक्षणे गोळा केली जातात आणि त्याचा पद्धतशीर अभ्यास केला जातो.

नेपाळमध्ये वैद्यकीय सेवा देणाऱ्यांना, उत्तम सेवा देण्यासाठी माहितीची गरज भासते. त्यांना कोणत्या माहितीची गरज असते, ती ते कोठून मिळवतात व तिचा उपयोग कसा करतात याची CIT तंत्राने निरीक्षणे गोळा केली गेली (प्रश्नावली).

यामध्ये असे आढळले की, माहितीची गरज पुढील कारणांसाठी पडते १) अभ्यास – अध्ययन २) रुग्णाची काळजी (care) ३) अध्यापन ४) संशोधन ५) प्रशासन

आजाराचे निदान, त्यावर उपाययोजना (treatment), रोगांना प्रतिबंध, अशाच प्रकारच्या इतर रुग्णांची माहिती, त्यांचे उपचार व रुग्णांचे अनुभव अशा स्वरुपाची विस्तृत माहिती मिळाल्यास तज्ञांना रुग्णांवर उपचार करणे सोपे जाते.

**Year 2012, Volume-50, Issue-2 (June)**

Scholarly Communication Reconsidered

*Dr Sanjaya Mishra*

कोणत्याही क्षेत्रातले विद्वान औपचारिक किंवा अनौपचारिक रितीने माहिती मिळवून ती वापरतात, याला विद्वानांचा संपर्क (Scholarly Communication) म्हणतात. या व्यवस्थेमध्ये संशोधक, नियतकालिकांचे प्रकाशक, प्रकाशन व ग्रंथालये यांचा समावेश होतो. नियतकालिकांच्या प्रकाशनामध्ये चार आव्हाने आहेत (Peer - review) नियतकालिकाची छाप, नियतकालिकांची किंमत आणि डिजिटल प्रकाशनाला वाव (Perpetual access to Digital Publications). आधुनिक तंत्रज्ञानाने सर्वत्र किंमती होत असताना, नियतकालिकांच्या किंमती मात्र निर्देशांकापेक्षा (consumer price Index) वाढत आहेत. खरेतर डिजिटल स्वरूपातील नियतकालिके काही काळानंतर ‘जवळजवळ शून्य किंमतीला’ उपलब्ध झाली पाहिजेत. JIF वर आधारित प्रलेखांच्या मूल्यांकनावरून महत्व ठरविले जाते.

परंतु इतर पर्याय उपलब्ध आहेत. ग्रंथपालांनी OA नियतकालिके, OA संग्रह, अभिप्राय (Peer - review) याविषयी जागरूक रहावे. विद्वानांनी त्यांचे कार्य जगापुढे आणण्यासाठी, अध्ययन व अध्यापनाची सामग्री OER स्वरुपात आणण्यासाठी सामाजिक माध्यमांचा (social media) वापर करावा. यामुळे बौद्धिक माहितीत खूप वाढ होईल, तसेच गुणवत्तापूर्ण, समर्पक माहिती योग्य वेळेत मिळण्याचा मार्ग सुकर होईल.

Providing Language-Related Information: A Fresh Look in the Digital Environment

*Dr. (Mrs) Perin V Marolia*

आपल्यापैकी प्रत्येकालाच कधी ना कधीतरी औपचारिक लिखाणामध्ये अचूक, योग्य शब्दांची गरज भासते.

विद्यार्थी, अध्यापक, संशोधक, प्रकाशक, लेखक, वक्ते, जाहिरात बनविणारे, शुभेच्छापत्र बनविणारे व इतर व्यावसायिक यांना अचूक शब्द शोधावे लागतात. त्यासाठी शब्दकोशांची (Dictionary) मदत होते.

ऑक्सफर्ड डिक्शनरी ही सर्वात लोकप्रिय प्रमाणित डिक्शनरी आहे. ती CD वर आणि २००० सालापासून on – line उपलब्ध आहे. तंत्रज्ञानातील ठराविक तांत्रिक शब्द, त्यांचे अर्थ, यमक जुळणारे शब्द, व्याख्या, प्रतिशब्द, समर्पक शब्द, शब्दाचा उगम, पर्यायी शब्द, समानार्थी व उलट अर्थाचे शब्द, आद्याक्षरांचे संपूर्ण शब्द इत्यादी माहिती मिळवण्यासाठी मुद्रित व on – line असे दोन्ही स्त्रोत उपलब्ध आहेत व त्यांच्या संग्रहात सतत भर पडत आहे. ग्रंथपालांनी अशा स्त्रोतांची माहिती घेऊन संग्रह करावा व उपयोजकांमध्ये इंटरनेटवरील विश्र्वसनीय, अधिकृत, प्रमाणित स्त्रोतांबद्दल जागृती करावी.

The Study of Ergonomic Conditions in Iranian Libraries and Their Relationship with Demographic Factors

*Ahmad Shabani, Roghayeh Rezaee Aderyani, Nosrat Riahinia, Fatemeh Naderikharaji*

कोणत्याही संस्थेचे यशापयश त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर व ते देत असलेल्या सेवेवर अवलंबून असते. कर्मचाऱ्यांचे आरोग्य व क्षमता यांचा विविधांगी अभ्यास म्हणजे ergonomics. शिक्षणाचा अभाव, मानसिक व शारिरीक (disabilities) क्षमता नसणे आणि व्यावसायिकांचे अज्ञान यामुळे कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित व आरामदायी वातावरण मिळू शकत नाही.

Isfahan विद्यापीठ, इराण येथील ग्रंथालयांमधील ग्रंथपाल कोणत्या परिस्थितीत काम करतात याची माहिती घेतली गेली. त्यात असे आढळले की ते चांगल्या ergonomic परिस्थितीत काम करत नाहीत.

ग्रंथपालांना पुस्तके उचलून न्यावी लागतात. ती मांडणीवर ठेवावी लागतात. संगणकावर काम करण्यासाठी त्यांची आसनव्यवस्था चांगली नसते, ग्रंथालयात खेळती हवा नसते, पुरेसा प्रकाश नसतो, विश्रांतीसाठी अपुरा वेळ मिळतो. यामुळे त्यांचे आरोग्य बिघडू शकते. तसेच ग्रंथालयात सुरक्षेसाठी आग प्रतिबंधक यंत्रणा नसते किंवा तिच्याकडे लक्ष पुरविले जात नाही. ग्रंथपालांचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी त्यांना आरोग्य विषयक प्रशिक्षण द्यायला हवे कारण ग्रंथालये ही माहिती केंद्रे आहेत व समाजाच्या विकासात त्यांची महत्वाची भूमिका आहे.

IIPM Knowledge Resource Center (KRC) Significance of information collection and Services in Plantation and Agribusiness Education and Research in India – A Case Study

*K N Madhu*

भारत हा कृषीप्रधान देश आहे. येथे ७०% जनता शेतीवर उदरनिर्वाह करते. या लोकांना शेती व्यवसायासाठी मार्गदर्शन मिळाले तर त्यांचा व पर्यायाने देशाचाही विकास होईल. IIPM (The Indian Institute of Plantation Management) ही संपूर्ण आशियामध्ये नावलौकिक मिळविलेली संस्था विद्यार्थ्यांना शेतीव्यवसाय (Agribusiness) व वृक्षारोपण व्यवस्थापन (plantation management) यामध्ये पदव्युत्तर शिक्षण देते. येथील ज्ञान संसाधन केंद्र (KRC – Knowledge Resource Centre) माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे योग्य व्यक्तीला योग्य वेळी योग्य माहितीचा पुरवठा करते. या केंद्रांकडे विशेष करून चहा, कॉफी, रबर, मसाले यांच्याशी संबंधित शेतीविषयी माहितीच्या स्त्रोतांचा प्रचंड साठा आहे. येथे ९० हून जास्त संगणकांचा व इंटरनेट चा वापर केला जातो. येथील ग्रंथालयात हस्तलिखिते, वेगवेगळया विषयांवरील पुस्तके, CD, दृकश्राव्य माहिती, प्रबंध, वर्तमानपत्रे यांचा संग्रह आहे.

येथील अध्यापक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी तसेच बाहेरील जगातील शास्त्रज्ञ व वेगवेगळया महामंडळांचे अधिकारी या ग्रंथालयाचा वापर करतात. हे एक उत्तम माहिती केंद्र आहे.

Use of E-Journals by Agricultural Scientists: A Case Study of the ICAR Libraries in Delhi

*Dr. KP Singh, BebiMs.*

संशोधन व विकास कार्यक्रमांमध्ये नियतकालिकांचा महत्वाचा सहभाग असतो. माहिती तंत्रज्ञानातील सुधारणांमुळे लिखित (Print) नियतकालिकांचा ओघ आता e – नियतकालिकांकडे वळला आहे. e – नियतकालिकांचे काही फायदे आहेत, जसे – उपलब्धता, वेग, डाऊनलोडिंग, कमी किमतीत प्रकाशन, कमी जागा, अनेकांना एकाचवेळी पाहता येणे. दिल्ली येथील ४ शेती संशोधन संस्थांमधील शेती – शास्त्रज्ञ e – नियतकालिकांचा वापर कसा करतात हे जाणून घेण्यासाठी ९४ शास्त्रज्ञांना प्रश्नावली देण्यात आली. सर्व

शास्त्रज्ञांना e – नियतकालिकांबद्दल माहिती आहे व ते त्यांचा उपयोग संशोधनासाठी, अध्यापनासाठी व स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी करतात. ग्रंथालय परिपत्रक (Bulletin), ई – मेल सेवा व ग्रंथालय वेब पेज वरून त्यांना नवीन e – नियतकालिकांची माहिती मिळते. १००% उपयोजक e – नियतकालिकांचा उपयोग करतात व त्यांचे शुल्क कमी असते, त्यामुळे ग्रंथालयांनी विषयांना अनुसरून जास्तीत जास्त e – नियतकालिकांची वर्गणी (subscribe) भरावी, तसेच उपयोजकांसाठी माहिती – साक्षरतेच्या कार्यशाळांचे आयोजन करावे म्हणजे जास्तीत जास्त लोकांना e – नियतकालिकांचा फायदा होईल.

Exploring Dual Career Option for Library Professionals: Symbiosis between library and teaching positions

*Dr. V K J Jeevan*

सर्व अभ्यासक्रमांमध्ये ग्रंथालय शास्त्र हा एकाच विषय असा आहे की या विभागामध्ये काम करणाऱ्यांना शिक्षकांपेक्षा दुय्यम दर्जाची वागणूक देण्यात येते. शिक्षकांप्रमाणेच ग्रंथापालांमध्येही समर्पित भाव (dedication), खरेपणा, गांभीर्य, संशोधक वृत्ती हे गुण असतात. खरेतर ग्रंथालय शास्त्र किंवा कोणत्याही विषयातील शिक्षकांना ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी सतत ग्रंथालयाची व तेथील लोकांची गरज भासते. परंतु (ग्रंथालयात काम करणाऱ्यांच्या) ग्रंथपालांच्या कामाचे मूल्यमापन इतर ग्रंथपालांकडून न होता ते शिक्षकांकडून होते. साहजिकच ग्रंथपालांचे महत्व कमी होते. शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांना सर्वात जास्त मान दिला जातो. शिक्षकांप्रमाणेच ग्रंथपाल उच्चशिक्षित, लायक व आपल्या विषयातील तज्ञ असतात. शिवाय शिक्षकांच्या नोकऱ्या त्यांची प्रमाणपत्रे पाहून दिल्या जातात, शिकवण्याचे कौशल्य पडताळले जात नाही. मग त्याच पात्रतेच्या ग्रंथपालांनी का शिकवू नये? त्यांनाही आवड असेल तर अध्यापनाची संधी मिळायला हवी. म्हणजे स्वतःचा अभ्यास व प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव याद्वारे ते विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन करू शकतील. शिक्षकांनीही

अधूनमधून ग्रंथालयात काम केल्यास त्यांना तेथील आव्हाने लक्षात येतील व जबाबदारी कळू शकेल व अशा रितीने परस्पर आदराचे व विश्वासाचे वातावरण निर्माण होईल.

**Year 2012, Volume-50, Issue-3 (September)**

२०१२ च्या व्हाल्युम नं. ५० मध्ये प्रो. दास गुप्ता यांच्या स्मरणार्थ एकूण २७ लेख प्रसिद्ध झाले आहेत. डॉ. रंगनाथन, बी. एस. केशवन, सी. एस. कृष्णमुर्ती, एम. एस. सैनी, मदन मोहन कश्यप, प्रो. आर. सत्यनारायण यांच्या दास गुप्ता यांसोबत असलेल्या काही आठवणी, २०१२ साली त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारे लेख, आदर्श शिक्षक, चांगले गुरु- मित्र, चांगले ग्रंथपाल - ग्रंथालय व्यावसाईक अशा त्यांच्या वेगवेगळया भूमिकांबद्दल भरभरून बोलणारे लेख या अंकात प्रसिद्ध झाले. त्याद्वारे प्रो. दास गुप्त या मानवतावादी ग्रंथालय व्यावसायीकाची माहिती मिळाली.

**Year 2012, Volume-50, Issue-4 (December)**

Reading Habits in School Going Girls in City Area

*Dr. Baiju K Nath, Razeena*

दूरदर्शन नसलेल्या काळात मुले फावल्या वेळात खेळत असत किंवा वाचन करीत. सध्याच्या काळात मुलांना दूरदर्शनवरील कार्यक्रम, खेळ, मालिका तसेच व्हिडीओ गेम, इंटरनेटवरील गेम (खेळ) यांचे खूप आकर्षण आहे. त्यामुळे वाचन संस्कृतीचा लोप होवू लागला आहे. वाचन हे स्वयंशिक्षणाचे मोठे साधन आहे. मनोरंजन करणारी पुस्तके, बोधकथा, थोरांची चरित्रे वाचून मुले पुढे सुजाण नागरिक बनतात. त्या दृष्टीने मुलांचा कल जाणून घेण्यासाठी केरळमधील कालिकत येथील शाळेत जाणाऱ्या ७०२ मुलींना २१ प्रश्नांची प्रश्नावली देण्यात आली. त्यात असे आढळले की - या मुलींना वाचन आवडते. त्या जास्त करून मासिके, लघुकथा, विनोदांची पुस्तके, कवितासंग्रह, क्रमिक पुस्तके वाचतात. खूप मुली शाळेतील ग्रंथालयातून पुस्तके नेतात. जवळजवळ सर्व मुलींकडे (डिक्शनरी)

शब्दकोश आहे. पण त्याचा वापर क्वचित होतो. त्यांना वाचन महत्वाचे वाटते पण शाळा, घरचा अभ्यास, शिकवण्या, खेळ, घरकाम, दूरदर्शन पाहणे यात वेळ गेल्यामुळे वाचनाला वेळ मिळत नाही. शिक्षकांनी व पालकांनी मुलींना काय वाचावे, कसे वाचावे हे शिकवून मार्गदर्शन करावे. त्यांना न आवडणारी पुस्तके त्यांच्या माथी मारून त्यांची वाचनाची आवड कमी होते. त्यांना भेट म्हणून पुस्तके द्यावीत. ग्रंथपालांनी मुलांच्या वयाला अनुसरून, त्यांना आवडतील अशी पुस्तके ग्रंथालयात ठेवावीत. लेखक, प्रकाशक, शिक्षक, पालक व ग्रंथपाल यांच्या सांघिक प्रयत्नांनी मुलांना वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांची वाढ व विकास होईल.

Information Use Pattern by Arts and Science Teachers of Sahyadri Science and Arts College: A Comparative Study

*D Vinay Kumar, P Manjunath*

सध्याच्या माहिती युगात माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध आहे व ग्रंथालये माहितीचा उगम व उपयोजक यांमधील दुवा आहेत. मुलांना घडविणारे शिक्षक माहिती शोधण्यासाठी कितपत इच्छुक असतात याची पाहणी करण्यासाठी सह्याद्री आर्टस् व सायन्स महाविद्यालय (शिवमोगा, कर्नाटक) येथील ९० अध्यापकांना प्रश्नावली देण्यात आली.त्यात असे आढळले की - कला शाखेतील अध्यापकांपेक्षा विज्ञान शाखेतील अध्यापक ग्रंथालयाचा जास्त वापर करतात. पुस्तके, मासिके, नियतकालिके, संदर्भ पुस्तके व इंटरनेटवरील माहिती ही त्यांच्या वाचनाची सामग्री असते. अध्यापन, संशोधन, लेख लिहिणे, व्याख्यान देणे, स्पर्धा परीक्षांची तयारी, परिषदांमध्ये भाग घेणे व स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवणे यासाठी त्यांना ग्रंथालयातील साहित्याचा उपयोग होतो. ते ग्रंथालयाबद्दल समाधानी आहेत. परंतु इंटरनेट सुविधेबाबत असमाधानी आहेत. त्यासाठी त्यांना सायबर कॅफेमध्ये जावे लागते. म्हणून ग्रंथालय अधिकाऱ्यांनी त्यांना पुरेशा सुविधा – इंटरनेट, प्रिंटर, स्कॅनर, फॅक्स वगैरे – पुरवाव्यात व e – संसाधनांचे प्रमाण वाढवावे ही अपेक्षा आहे.

Collection and Management of Information Resources: A Case Study of Samyuktha Karnataka Newspaper Library

*K Sarojadevi, Dr S Padmamma*


वर्तमानपत्रांना समाजाचा आरसा म्हटले जाते. वर्तमानपत्रे आपल्याला देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक बाबींविषयी माहिती पुरवत असतात. वर्तमानपत्राचे ग्रंथालय हे विशेष ग्रंथालय असते. वर्तमानपत्राच्या वेगवेगळ्या विभागांना – बातमीदार, संपादक, व्यवस्थापन – आवश्यक असलेल्या माहितीचा तेथे संग्रह असतो. या विभागांना हवी ती माहिती तत्काळ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथालयात संगणकीकरण व e – संसाधनांचा वापर अत्यावश्यक झाला आहे. कर्नाटकातील 'संयुक्त कर्नाटक' या लोकप्रिय कानडी दैनिकाच्या ग्रंथालयात कशाप्रकारे माहितीचा संग्रह केला जातो याविषयी आढावा घेण्यात आला. या दैनिकाच्या ग्रंथालयाचे उपयोजक प्रकाशनाचे कर्मचारीच असतात. ग्रंथालयात कानडी भाषेतील दुर्मिळ पुस्तके व संदर्भ – पुस्तके यांचा संग्रह आहे दरवर्षी वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके यांचे गठ्ठे बनतात. तसेच वर्तमानपत्रे स्कॅन करून CD बनवतात. या ग्रंथालयात digitalization ची नुकतीच सुरवात झाली आहे. digital पद्धतीने संग्रह जतन केल्याने त्याचे आयुष्य वाढेल, उपयोग वाढेल व हा प्रचंड खजिना पुढील पिढीला सुपूर्त करता येईल.

### ४.२.१.७ २०१३ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.७ २०१३ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २०१३ | मार्च | ५१ | १ | ९ | २६.४७ |
| | जून | ५१ | २ | ९ | २६.४७ |
| | सप्टेंबर | ५१ | ३ | ८ | २३.५३ |
| | डिसेंबर | ५१ | ४ | ८ | २३.५३ |
| | | | एकूण | ३४ | १०० |

**आलेख क्र. ८ २०१३ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**




२०१३ या वर्षातील लेखांचे विश्लेषणमार्च ९(२६.४७%), जून ९(२६.४७%), सप्टेंबर ८(२३.५३%), डिसेंबर ८(२३.५३%) असे दिसून येते. मार्च व जून महिन्यात तसेच सप्टेंबर व डिसेंबर महिन्यात सारखेच लेख प्रकाशित झाले आहेत.

**Year 2013, Volume-51, Issue-1 (March)**

Internet-based Information Seeking Behaviour and Utilisation by Doctors at Federal Medical Centre (FMC), Abeokuta, Ogun State, Nigeria

*Fredrick Olatunji Ajegbomogun*

इंटरनेटमुळे माहितीचे जाळे जगभर पसरलेले आहे. एक बटण दाबले की हवी ती माहिती काही सेकंदात संगणकावर दिसते. सर्व क्षेत्रांमधील लोक या सुविधांचा उपयोग करून घेतात.

नायजेरीयामधील फेडरल मेडिकल सेंटर (FMC) येथील डॉक्टर इंटरनेटवरील माहितीचा उपयोग कसा करून घेतात, याचा अभ्यास केला गेला.

हे डॉक्टर इंटरनेटवर आधरित माहिती मिळवून त्याचा उपयोग करतात. यातून नवीन कल्पनांना सामोरे जातात. त्यांच्या कामाची गुणवत्ता सुधारते, ते सहजपणे रुग्णांचे निदान करून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देवू शकतात. तसेच त्यांच्या व्यवसायासाठी, अध्यापनासाठी, संशोधनासाठी व स्वतःचे ज्ञान वाढविण्यासाठी त्यांना या माहितीचा उपयोग होतो. त्यांना इंटरनेटवरून माहिती शोधता व वापरता येते. त्यांना on line नियतकालिकांचा व डाटाबेसचा त्यांच्या कामासाठी खूप उपयोग होतो. माहितीचे अतिशय संथ गतीने होणारे डाऊनलोडिंग ही त्यांच्यापुढील मोठी अडचण आहे.

इंटरनेटमुळे डॉक्टर आपापले ज्ञान व अनुभव इतरांपुढे ठेवू शकतात. तसेच इतरांचे अनुभव माहीत करून घेऊ शकतात. यामुळे वैद्यकीय ज्ञानाचा प्रसार होईल व रोगांचे निदान व त्यावरील उपाययोजना या गोष्टी सहजसाध्य होतील.

School System in the University of Kerala: A proposal for Reorienting the Department Libraries

*Dr PK Suresh Kumar*

भारतीय विद्यापिठांमध्ये काही ठिकाणी विभागीय ग्रंथालये असतात, तर काही ठिकाणी मध्यवर्ती ग्रंथालय असते. केरळ विद्यापिठाच्या ग्रंथपालांच्या मुलाखती घेऊन त्याचा अभ्यास करण्यात आला. विभागीय (Department) ग्रंथालयाचे काम हे अध्ययन, अध्यापन व संशोधन कार्यांना आधार देणे असते. या विभागाकडून चालविले जाणारे

अभ्यासक्रम (Courses), विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षकांची संख्या व विभागप्रमुखांची मागणी यावर ग्रंथालयाचा लहानमोठेपणा, पुस्तकांची संख्या, ग्रंथपालांची संख्या व लागणारा निधी या गोष्टी अवलंबून असतात. यासंबंधी कोणतेही धोरण वासमान कार्यक्रम नाही. येथील प्रत्येक विभागाचे स्वतंत्र ग्रंथालय आहे व त्यात संबंधित विषयावरील निवडक पुस्तकांचे संग्रह आहेत. येथे उच्चशिक्षित ग्रंथपाल आहेत व ग्रंथालयाचे नियंत्रण विभाग प्रमुख करतात. काही ठिकाणी (Automation) स्वयंचलितकरण झालेले आहे व संगणक प्रणाली वापरली जाते. पण उपयोजकांचे समाधान होण्यासाठी अजून बरीच प्रगती करावी लागेल.

Libraries of Colleges of Education in Dehradun

*Bhanu Partap, Manoj K. Joshi*

इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेपेक्षा शिक्षण घडविणाऱ्या महाविद्यालयांवर जास्त जबाबदारी असते. तेथील शिक्षण खूप महत्वाचे असते कारण तेथील आजचे विद्यार्थी उद्याचे शिक्षक असतात व शिक्षक झाल्यावर ते देशाच्या भावी नागरिकांना शिकवणार असतात. उदात्त हेतूने शिक्षक महाविद्यालय काढणाऱ्या संस्थाचालकांचा काळ जाऊन आता नफा मिळवण्याच्या उद्देशाने धनवान लोक शिक्षक महाविद्यालये काढतात. उत्तराखंडची राजधानी डेहराडून येथील २९ पैकी २७ शिक्षक महाविद्यालयांची ग्रंथालयाच्या संदर्भात पाहणी केली गेली. बहुतांशी महाविद्यालये स्वतःच्या आर्थिक बळावर उभी राहिलेली (खाजगी) आहेत. ती ग्रंथपालांना अध्यापकांचा दर्जा देत नाहीत. त्यांच्याकडे पुस्तक निवडीचे निश्चित धोरण नाही. फक्त एका महाविद्यालयानेe – नियतकालिकांची वर्गणी भरलेली आहे. पुष्कळशा ग्रंथालयात पायाभूत सुविधा कमकुवत आहेत. फक्त ५ ग्रंथालयात संगणक प्रणाली वापरतात व त्याहून थोड्या ग्रंथालयात इंटरनेटची जोडणी आहे. ही महविद्यालये अलीकडेच स्थापन झाली आहेत. त्यामुळे माहिती संपर्क तंत्रज्ञान (ICT) वापरून ही ग्रंथालये लवकरच उत्तम सेवा पुरवू लागतील अशी आशा आहे.

Mapping of Research Output of Animal Science Division in ICAR

*Harish Kumar Tripathi, Hans Raj, Suresh Kumar*

शेतकी विज्ञानामध्ये प्राणीशास्त्राला खूप महत्व आहे. ICAR च्या १८ प्राणीशास्त्र संशोधन संस्थांकडील १६१० संशोधनांचे पृथक्करण करण्यात आले. त्यामध्ये नियतकालिक लेख, (१०३९), परिषदांमध्ये मांडलेले संशोधन (३६०), पुस्तकांतील प्रकरणे (१७१) व पुस्तके (४०) यांचा समावेश होता. यात इंडियन जर्नल ऑफ ॲनिमल सायन्स आणि इंडियन व्हेटेरिनरी जर्नल, प्राणीशास्त्राच्या वैज्ञानिक विश्वात लोकप्रिय आहेत असे आढळले. जास्त करून शास्त्रज्ञांना त्यांची प्रकाशने नियतकालिकात प्रकाशित होणे आवडते. एकेकट्या लेखकाने केलेल्या कामापेक्षा लेखकांनी एकत्रितपणे केलेले काम जास्त आहे. त्याचप्रमाणे IVRI, CIRG व NDRI यंचा प्रकाशनांमध्ये मोठा वाटा आहे व निम्म्याहून जास्त प्रकाशने २००९ – १० या काळातील आहेत. या अभ्यासामुळे उपयोजक, विद्वान व व्यावसायिकांना वरच्या श्रेणीतील नियतकालिके व शास्त्रज्ञ यांची माहिती मिळू शकते.

Information Seeking Needs of Political Science Teachers of Colleges of University of Delhi: *A Case Study*

*Dr. Gurdev Singh, Taruna Arora*

अध्यापन व संशोधन विमध्ये माहितीचे अनन्य साधारण महत्व आहे. ग्रंथालये अध्यापकांना ही माहिती पुरवू शकतात. त्यासाठी त्यांच्याकडे अध्यापकांना गरज असणारीमाहिती व संसाधने यांचा पुरेसा साठा असला पाहिजे- दिल्ली विद्यापिठाच्या महाविद्यालयीन राज्यशास्त्र (Political) अध्यापकांच्या माहितीच्या गरजा, शोधन, वर्तन व ग्रंथालयाबद्दलची मते यांचा प्रश्नावली देऊन व मुलाखती घेऊन अभ्यास करण्यात आला. त्यात असे आढळले की - फक्त ४% अध्यापक ३५ वर्षे अनुभव असलेले आहेत. जास्तीत जास्त अध्यापक तरुण व कमी अनुभव असलेले आहेत. व्याख्यानाची तयारी करणे, ज्ञान

अद्ययावत करणे, पुस्तके घेणे किंवा परत करणे, वर्तमानपत्रे / मासिके / लेख / संदर्भ पुस्तके वाचणे, संशोधनाचे लेख लिहिणे, फावला वेळ घालवणे ही त्यांची ग्रंथालयाला भेट देण्याची कारणे आहेत. त्यांच्या मते संदर्भ पुस्तके, नियतकालिके, CD – ROM database, प्रबंध वगैरेंचा संग्रह कमी आहे (कारण नियतकालिके फार महाग असतात.) हे संग्रह उपलब्ध व्हावेत अशी त्यांची अपेक्षा आहे. ग्रंथालयाचा कर्मचारीवर्ग त्यांना माहिती, कागदपत्राची निवड करण्यात व स्थान दाखवण्यात मदत करतो. ग्रंथालयाने सशुल्क e – नियतकालिके व पुस्तके वगैरेंचा संग्रह वाढविल्यास व e – संसाधनांचा वापर केल्यास अध्यापक ग्रंथालयाचा जास्त उपयोग करून घेऊ शकतील.

Delhi Public Library System: The Biggest Public Library Network in India

*Dr Anjana Chattopadhyay*

दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १९५१ मध्ये झाली. सर्वात मोठे सार्वजनिक ग्रंथालय जाळे (Network) अशी त्याची प्रसिद्धी आहे. सर्वांना मोफत सुविधा पुरविण्याबरोबरच हे ग्रंथालय सामाजिक – सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी योग्य व्यासपीठ आहे. हे ग्रंथालय उभारण्यासाठी युनेस्कोने आर्थिक व तांत्रिक पाठबळ दिले. दिल्लीच्या विविध भागांमध्ये ग्रंथालयाच्या गाड्या फिरत असत व लोकांना त्यांच्याबद्दल खूप आकर्षण व जिव्हाळा असे. सध्याच्या काळातही प्रत्येकाला त्याचे ध्येय गाठण्यासाठी माहितीची पर्यायाने ग्रंथालयाची गरज असते. दिल्ली सार्वजनिक ग्रंथालय लोकांच्या वाचनाच्या सवयी, कौशल्ये व बुद्धिमत्ता वाढावी यासाठी सतत प्रयत्नशील आहे. या संस्थेचे १ मध्यवर्ती ग्रंथालय, ४ विभागीय ग्रंथालये, २४ उपविभागीय ग्रंथालये, ३ ज्ञाती (community) ग्रंथालये, ११रिसेटलमेंट कॉलनी ग्रंथालये, १ ब्रेल ग्रंथालय, १ तिहार कारागृह ग्रंथालय, ६० फिरत्या सुविधा व २२ भरणा सुविधा अशाप्रकारचे जाळे पसरलेले आहे. ४ फिरत्या गाड्या दिल्लीच्या दूरदूरच्या कोपऱ्यांपर्यंत उपयोजकांना पुस्तके पुरवत असतात. भारतात प्रकाशित झालेल्या

प्रत्येक पुस्तकाची १ प्रत दिल्ली ग्रंथालयाकडे असते. दिल्ली ग्रंथालय उपयोजकांसाठी, तसेच पुढच्या पिढीसाठी या पुस्तकाचे तसेच त्याच्या संगणकीय आवृत्तीचे जतन करते. येथील बाजाघर (Bajaghar) नावाच्या उत्कृष्ट संगीतकक्षामध्ये दुर्मिळ ग्रामोफोन तबकड्यांचे जतन केलेले आहे. तसेच प्रसिद्ध व्यक्तींची भाषणेही आहेत. येथे उपयोजकांना वेगवान इंटरनेट सुविधा मोफत उपलब्ध आहे. अशाप्रकारे हे ग्रंथालय माहिती व ज्ञान देऊन सक्षम तरुण पिढी घडवत आहेत.

**Year 2013, Volume-51, Issue-2 (June)**

A Survey of Human Capacity Building (HCB) of Special Libraries in Oyo-state, Nigeria

*Olayinka Folorunso, Peter Olufemi Owoeye*

एखादा विषय समजून घेणे, त्यातील कौशल्ये शिकणे, माहितीचा मार्ग शोधणे, ज्ञान व प्रशिक्षण घेणे या सर्व गोष्टींमध्ये एखाद्याची तयारी करून घेणे या प्रक्रियेला HCB म्हणतात. ही प्रक्रिया करतानाच व्यक्ती किंवा संस्था व पर्यायाने समाजाला मूल्ये, कल, संबंध, वर्तणूक, संसाधने याचेही शिक्षण व प्रोत्साहन दिले जाते. नायजेरियातील ओयो राज्यातील १० विशेष ग्रंथालयातील HCB कार्यक्रमाबद्दल माहिती घेण्यासाठी ८१ कर्मचाऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आल्या. त्यावरुन असे निष्कर्ष निघाले - या माहितीयुगात टिकून राहण्यासाठी विशेष ग्रंथालयांमध्ये HCB प्रक्रिया राबवलीच पाहिजे. कारण येथे काम करणाऱ्या व्यक्तींना

समाजातील घटकांना तातडीने आवश्यक माहिती पुरवायची असते. जर क्षमता वाढवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न झाले नाहीत तर कर्मचारी सक्षमतेने कार्य करणार नाहीत. त्यासाठी संस्थांना, कर्मचाऱ्यांसाठी ज्ञान, कौशल्ये यांची प्रशिक्षणे आयोजित करून, कर्मचाऱ्यांना प्रगत देशातील ग्रंथालयांमध्ये पाहणीसाठी पाठवून त्यांना भत्ते देऊन प्रोत्साहित केले पाहिजे व अंदाजपत्रकात तशी वाढीव तरतूद केली पाहिजे.

Internal Evaluation of the Department of Library and Information Studies in Kharazmi University

*Nosrat Riahinia, Yazdan Mansourian, Maryam Emami*

विद्यापिठातील उच्च शिक्षणातून विविध क्षेत्रातील तज्ञ लोकांची जडणघडण होते. त्यामुळे एखाद्या विद्यापिठातील शिक्षणाने कितपत आपली उद्दिष्टे सध्या केली आहेत याचे शैक्षणिक मूल्यमापन होणे गरजेचे झाले आहे. Kharazmi विद्यापिठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे असेच शैक्षणिक मूल्यमापन केले गेले. त्यात अध्यापक, विद्यार्थी, पदवीधर विद्यार्थी व व्यवस्थापक (managers) यांना प्रश्नावली देऊन व मुलाखती घेऊन पाहणी केली गेली. या पाहणीत असे आढळले की - सध्याचे विद्यार्थी, पदवीधर विद्यार्थी, अध्यापक, व्यवस्थापक या विभागाच्या कामाबद्दल समाधानी आहेत. अध्यापकांची संख्या, संशोधने यांमध्ये वाढ झालेली आहे. विद्यार्थी संगणक व्यवस्थेबद्दल असमाधानी आहेत, तसेच त्यांना अभासक्रम काळानुरूप असावा व त्यात प्रात्यक्षिकांचा जास्त समावेश असावा, असे वाटते कारण त्यांना व्यवसायासाठी प्रत्यक्ष अनुभव व व्यावसायिक कौशल्य यांची गरज आहे. विभागाने यावर विचार करून त्याप्रमाणे अभ्यासात बदल करावेत तसेच शैक्षणिक व अध्यापन संसाधने, सुविधा पुरवाव्यात जेणे करून समाजाच्या गरजा व बाजाराची मागणी पुरवणारे तज्ञ निर्माण होतील.

Selection Committee for Senior Library Positions

*Dr. V K J Jeevan*

आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेनुसार तसेच सरकारच्या ध्येयधोरणांनुसारएखाद्या पदासाठी व्यक्तीच्या निवडीचा निकष फक्त त्या व्यक्तीची गुणवत्ता हाच असला पाहिजे. त्यामुळे ग्रंथालयाच्या वरिष्ठ पदावरील व्यक्तीची निवड करताना फक्त मुलाखत घेणे योग्य नाही. कारण निवड समितीचे सदस्य आणि उमेदवार यांच्यात परस्परसंबंध असू शकतो. सर्वात लायक उमेदवाराची उच्च पदावर निवड होण्यासाठी निवडप्रक्रिया पारदर्शी असली पाहिजे. गैरसोयीची व अतार्किक अर्ज पद्धत, उमेदवारांची यादी नसणे, जाहिरात किंवा मुलाखती रद्द करणे यांसारखे घोळ टाळले पाहिजेत. मुलाखत घेणाऱ्या व्यक्ती उमेदवारांपेक्षा जास्त ज्ञान असणाऱ्या तज्ज्ञ व्यकी असल्या पाहिजेत. उमेदवारांना अर्ज स्वीकारल्याची पावती देणे, अर्ज नाकारण्याची करणे सांगणे, सर्वांना समान संधी देणे, कार्यशाळा घेणे, आक्रमक मुलाखतीपेक्षासहृदय मुलाखत घेणे, मुलाखतीचे ध्वनीमुद्रण करणे, उमेदवाराची निवड न झाल्यास कारणे देऊन दिलगिरी व्यक्त करणे, उमेदवारांकडून मुलाखतीसंबंधीfeedback घेणे, अर्जाची पावती, वर्गीकरण, निकाल (result) या नोंदी वेबसाईटवर दाखवणे यासारख्या गोष्टी केल्यास निवडीबद्दल शंका राहणार नाही. गोपनीयतेच्या नावाखाली समाजाला, ही निवडप्रक्रिया कशी होती व एखादी विशिष्ट व्यक्ती का निवडली गेली हे समजून घेण्याचा हक्क डावलला जाऊ नये.

Activity Profile of Chemistry Research in Some Select Universities of Uttar Pradesh

*Sandhya Dwivedi*

भारतामध्ये, संशोधनासाठी सर्वात आवडीचा विषय म्हणजे रसायनशास्त्र. या विषयात सर्वात जास्त संशोधने प्रकाशित झाली आहेत. रसायनशास्त्राच्या उपशाखा आहेत– ऑरगॅनिक, इनऑरगॅनिक व फिजिकल.

उत्तरप्रदेशमधील ३ केंद्रीय व ३ राज्यस्तरावरील विद्यापिठांमध्ये २००० ते २००९ या काळात रसायनशास्त्राच्या ३ उपशाखांमधील संशोधन कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. या कालखंडाचे २००० – २००४ व २००५ – २००९ असे विभाजन करण्यात आले. या अभ्यासात असे आढळून आले की - केंद्रीय विद्यापिठांनी राज्य विद्यापिठांपेक्षा जास्त संशोधने प्रकाशित केली. अलिगढ मुस्लिम विद्यापिठाने सर्वात जास्त संशोधने केली. ऑरगॅनिक केमिस्ट्रीला संशोधनासाठी प्राधान्य दिले गेले. अलाहाबाद विद्यापिठाने २००५ – २००९ कालखंडात जास्त संशोधने केली तर दीनदयाळ उपाध्याय विद्यापिठाने याच कालखंडात कमी संशोधने केली. याच कालखंडात ऑरगॅनिक केमिस्ट्रीची संशोधने वाढली, तर इनऑरगॅनिक केमिस्ट्रीची संशोधने कमी झाली.

Use and Impact of IEEE, ASME and DELNET: A Case Study with Special Reference to Faculty Members of Engineering Colleges Affiliated to North Maharashtra University, Jalgaon Maharashtra

*Ravindra M Mendhe, Anil S Kamble, Dr. Pratibha G Taksande*

या माहितीच्या युगात on line माहितीचा प्रसार फार झपाट्याने होतो कारण तिला भौगोलिक सीमांच्या मर्यादा नसतात. on line माहितीच्या उत्पादनांमध्ये प्रचंड वाढ होत असल्यामुळे उपयोजकांना त्यांच्या गरजा भागविणे सोपे जाते, पण त्यासाठी माहिती कशी शोधायची व कशी वापरायची याची कौशल्ये आत्मसात करावी लागतात. उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाच्या जळगाव येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातील अध्यापकांचे माहिती – शोध – वर्तन अभ्यासले गेले. त्यात असे आढळले की - या विद्यापीठात on line संसाधनांच्या वापरामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. जास्तीत जास्त अध्यापक या on line संसाधनांचा उपयोग करून घेतात. अध्यापन, संशोधन, व्यक्तिमत्व विकास, इतरांशी संपर्क, ज्ञान ग्रहण, विषयाची विस्तृत माहिती यासाठी ते या संसाधनांचा वापर करतात. IEEE ह्या on line संसाधनांचा जास्त वापर

होतो व ASME व DELNET संसाधनेही वापरली जातात. बरेच अध्यापक या संसाधनांचा रोज उपयोग करतात. इंटरनेटचा मर्यादित वापर व वेळ नसणे ह्या त्यांच्यासमोरील अडचणी आहेत.

Explicit Knowledge Inventory: A Case Study

*Dr. B.G. Mukhyadal, Dr. A. Vaishnava, Dr. SS Sonwane SS*

औरंगाबाद येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयातील संग्रहाची माहिती घेऊन अभ्यास करण्यात आला.

या ग्रंथालयातील, ग्रंथालय व माहिती शास्त्रावरील बरेचसे साहित्य (५१.२५%) परदेशात प्रकाशित झाले आहे. ४८.७५% साहित्य भारतात प्रकाशित झाले. ग्रंथालयात या शास्त्रातील मराठी व हिंदी पुस्तकांचे प्रमाण नगण्य आहे. या संग्रहात परिषदांचे अहवाल, परिसंवादांचे अंक व सामान्य पुस्तके यांचे प्रमाण ६९.५९% आहे. १६ सशुल्क नियतकालिके, २९ सशुल्क e - नियतकालिके यांचा संग्रह आहे. पी.एच.डी. प्रबंध, प्रलेख, शब्दकोश इत्यादींचे प्रमाण १४.२१% आहे. दृकश्राव्य व डिजिटल संग्रह किरकोळ आहे व मुद्रित संग्रह ९.२५% आहे. तसेच ११४ निःशुल्क e - नियतकालिके आहेत. १९५८ – २०१२ या कालखंडात ग्रंथालय व माहितीशास्त्राशी संबंधित संग्रह कमी कमी होत गेला. या विषयातील पुस्तकांचे सरासरी प्रमाण एका उपयोजकाला ३८.७८% पुस्तके असे आहे. वर्षानुवर्षे न वापरली गेलेली पुस्तके बाजूला काढून नवीन पुस्तकांना जागा केली पाहिजे. पण या ग्रंथालयात फक्त हरवलेली पुस्तके (दंड घेऊन) संग्रहातून काढून टाकली जातात.

## **Year 2013, Volume-51, Issue-3 (September)**

Libraries on The Clouds: A New Wave of Technology

*Prof Shashi Prabha Singh*

१९९० मध्ये इंटरनेटचा उदय झाला, तेव्हापासून ग्रंथालयांचे स्वरूप बदलून गेले. फक्त स्वतःकडील सामग्रीचा वापर एवढ्यापुरते ग्रंथालय मर्यादित न राहता जोडणी झालेल्या ग्रंथालयातील सामग्री, तसेच नेटवरील सामग्रीचाही वापर केला जाऊलागला. तंत्रज्ञानाचा विकास होत होत cloud computing हे नवीन तंत्रज्ञान आता उपलब्ध झाले आहे. ह्यामध्ये माहितीचा अमर्यादितसाठा, प्रचंड वेग, वाढीव सुरक्षा, माहिती परत मिळवण्याची सोय(recovery), कमी खर्च असे अनेक फायदे आहेत. उपयोजकांनाही गुगलडॉक्स, फेसबुक अशी क्लाऊडवर आधारित संसाधने वापरायची सवय झालेली आहे. त्यामुळे ग्रंथालयांनी अत्यंत कमी खर्चाचे हे तंत्रज्ञान वापरल्यास, भरपूर विश्वसनीय सामग्री जास्त कार्यक्षमतेने वापरता येईल. ग्रंथालयांसाठी निधीची तरतूद अतिशय कमी असते व उपयोजकांच्या मागण्या सतत वाढत असतात. त्यामुळे क्लाऊड कम्प्युटिंग व वेब कोलॅबरेशन सारख्या उपायांनी उपयोजकांना कमी खर्चात जास्त परिणामकारक, कार्यक्षम व समाधानकारक सेवा देता येईल. क्लाऊड तंत्रज्ञानात पाण्याच्या मीटरप्रमाणे जेवढी माहिती तेवढे शुल्क असल्यामुळे खर्च कमी येतो. हे तंत्रज्ञान वापरायला सोपे (User friendly), जगात कोठूनही वापरता येण्यासारखे असल्यामुळे लोकप्रिय आहे व ग्रंथालयांना याचा निश्चितच फायदा होईल.

An Assessment of Users' Satisfaction with Library Services at Ekiti State University Library, Ado-Ekiti, Nigeria

*Olayinka Folorunso, Femi Joseph Folorunso*

उपयोजकांच्या माहितीच्या गरजा भागविण्यासाठी व त्यांना समाधानकारक सेवा देण्यासाठी ग्रंथालयातील सामग्री व कागदपत्रांचे व्यवस्थित संकलन केलेले असणे गरजेचे आहे. तसेच उपयोजकांना मानसिक शांतता व आरामदायी वातावरण पुरविणे हेही आवश्यक आहे.

नायजेरियातील Ekiti राज्यविद्यापीठ ग्रंथालयाकडून उपयोजकांना कितपत समाधानकारक सेवा देण्यात येतात, याचा प्रश्नावली देऊन व काही मुलाखती घेऊन अभ्यास करण्यात आला.

या अभ्यासात खालील गोष्टी आढळल्या. येथे ग्रंथालयाकडून उपयोजकांना संदर्भ, सूचना, मार्गदर्शन इत्यादी मदत मिळते. पण त्यांना आंतरग्रंथालय कर्ज सेवा, मायाक्रोफिल्म वाचन सेवा, वर्तमानपत्रे वाचन सेवा इत्यादींबाबत माहिती नाही. निम्म्याहून जास्त उपयोजक सेवेबाबत समाधानी आहेत, पण बाकीचे नाहीत. समाधानकारक सेवेसाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण, अनुक्रमिक प्रकाशने व संदर्भ यांचा पुरवठा व्हावा, शैक्षणिक काळामध्ये ग्रंथालये २४ तास खुले असावे व सुट्ट्यांच्या काळात सकाळी ८ ते संध्याकाळी ८ पर्यंत खुले असावे अशा अपेक्षा आहेत. या सुविधांचा उपयोजकांना निश्चित फायदा होईल.

ग्रंथालयात विद्वान, शास्त्रज्ञ, संशोधक यांच्या विचारांचा, साहित्याचा संग्रह असतो. तो उपयोजकांपर्यंत पोहोचवणे ही ग्रंथालयाची जबाबदारी आहे.

Appearance and Content Characteristics of Nursery Libraries in the View of Children's Literature Professionals in Tehran

*Fatemeh Zandian, F. Bakhtiari, Nosrat Riahinia*

लहान वयातील अनुभवांचा थेट परिणाम मुलांच्या व्यक्तिमत्वावर होत असतो. लहान मुलांच्या आयुष्यातील पहिली काही वर्षे फार महत्वाची आणि उत्तम असतात. या वयात मूल भरभर शिकते. म्हणून याच वयात त्यांना वाचनाची व अभ्यासाची सवय लावली तर त्यांना आयुष्यभर ही सवय राहील. तेहरान (इराण) येथील लहान मुलांच्या ग्रंथालयांचे स्वरूप नीटसे स्पष्ट नाही. खूपशा लहान मुलांच्या केंद्रांकडे ग्रंथालयच नाही आणि जर असेल तर व्यवस्थितपणाचा अभाव असलेली मांडणीवरील काही पुस्तके असे त्याचे स्वरूप आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मते जे मूल कधीही पुस्तक वाचत नाही किंवा एखादी गोष्ट(कथा) ऐकत नाही ते मूळ आरोग्यसंपन्न नसते. या दृष्टीने बालवाडी ग्रंथालय कसे असावे व त्यातील सामग्री कोणती असावी यासाठी बालसाहित्य तज्ञांचे दृष्टीकोन समजून घेण्यात आले. त्यांचे सल्ले खालीलप्रमाणे होते. बालवाडी ग्रंथालयाची स्वतंत्र जागा असावी व ती खेळती हवा,

सूर्यप्रकाश असलेली असावी. फर्निचर, मांडणीवगैरे वस्तू मुलांच्या सुरक्षेचा विचार करून बनवाव्या. ग्रंथालयात आकर्षक सजावट व रंगसंगती असावी. तेथे मुलांना आवडणारी पुस्तके, दृकश्राव्यसंसाधने, खेळणी, शैक्षणिक खेळ, रंग व हस्तकलांचे साहित्य असावे. मुलांना गोष्टी सांगाव्यात, मोठ्याने वाचन करावे, कविता म्हणाव्यात, विधायक लघुकथा व चित्रपट दाखवावेत. या ग्रंथालयाचा ग्रंथपाल उत्साही व मुलांविषयी आपुलकी वाटणारा असावा. तसेच व्यवस्थापनाने बालग्रंथालयासाठी सढळ हाताने निधीची तरतूद करावी कारण आजची मुले उद्याचे नागरिक, नेते व देशाचे भविष्य आहेत.

INFLIBNET and Its Usage Among Research Scholars and Faculty Members in Universities of Tamilnadu

*Dr. S Ramesh, T Yuvaraj*

संशोधन करणारे विद्वान आणि अध्यापक INFLIBNET सेवेचा वापर कसा करतात याचे मूल्यांकन (evaluate) करणारा हा पहिलाच लेख आहे. यासाठी तामीळनाडूमधील ३ विद्यापीठातील ५६३ जणांना (संशोधक,विद्वान) प्रश्नावली देऊन हे सर्वेक्षण केले गेले.याची निरीक्षणे नोंदवताना शतमान, स्तंभालेख, पाय आकृती () यांचा वापर केला गेला.

INFLIBNET म्हणजे Information and Library Network हे युजीसी चे स्वायत्त आंतरविद्यापीठ केंद्र आहे. ते भारतातील शैक्षणिक व संशोधन संस्थांमध्ये ग्रंथालय व माहिती संसाधने व सेवा यांच्या शेअरिंगसाठी पायाभूत सुविधा निर्माण करते. तामिळनाडूमधील संशोधक व विद्वान यांनाही सुविधा वापरताना काही अडचणी येतात. तरीही या सुविधेमुळे सर्वसाधारण गुणवत्तेमध्ये वाढ होते असे त्यांचे मत आहे. त्यांच्या प्रमुख अडचणी म्हणजे त्यांना हे नेट वापरण्याचे ज्ञान नाही किंवा त्यांना संगणकाचे फारसे ज्ञान नाही. त्यामुळे त्यांना e - संसाधनांचा वापर करता येत नाही. यासाठी त्यांना तज्ञांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

**Year 2013, Volume-51, Issue-4 (December)**

Library Profession at Cross Roads: Challenges Before Library Associations in India

*Dr SR Gupta*

Information Literacy, Health Literacy, Health Information Literacy-What are they about?

*Sangeeta Narang, B K Sen, Archana Shukla*

सध्याच्या माहितीयुगात, माहितीचा प्रचंड साठा इंटरनेटवर उपलब्ध आहे. उपयोजकांना ही माहिती कोठून, कशी मिळवावी व कशी वापरावी याचे शिक्षण देणे गरजेचे झाले आहे. उपयोजकांनी हे ज्ञान मिळवून आपल्या माहितीच्या गरजा भागविण्याचे कौशल्य आत्मसात करणे याला माहिती साक्षरता म्हणतात. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीने, आरोग्यविषयक निर्णय घेण्यासाठी गरज असलेली मूलभूत माहिती व सेवा मिळवण्याच्या, वापरण्याच्या, समजून घेण्याच्या क्षमतेला (त्या प्रमाणात) आरोग्यसाक्षरता म्हणतात. माहिती साक्षरता व आरोग्य साक्षरता यांच्या विकासातून यू.एस. मेडिकल लायब्ररी असोसिएशनने २००३ मध्ये आरोग्य माहिती साक्षरता अभियान सुरु केले. यामध्ये, आरोग्यविषयक माहितीची गरज ओळखणे, या माहितीचा स्त्रोत शोधणे. माहितीचा विशिष्ट परिस्थितीसाठी कुशल व परिणामकारक वापर करणे व उत्तम आरोग्याचे निर्णय घेण्यासाठी माहितीचा उपयोग करणे या क्षमतांचा अंतर्भाव होतो. भारतामध्ये वैद्यकीय महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये असे अद्ययावत कार्यक्रम बनत नाहीत. येथील सांस्कृतिक व भाषिक गुंतागुंतीमुळे अशा कार्यक्रमांची फार आवश्यकता आहे. सरकार GDP च्या ४.१% आरोग्यावर खर्च करते. म्हणून येथील प्रचंड लोकसंख्या लक्षात घेता, नागरिकांना सक्षम करण्यासाठी वरील सर्व साक्षरता कार्यक्रम तातडीने राबवण्याची गरज आहे. विद्यार्थी, संशोधक व आम जनतेच्या फायद्यासाठी

आपल्या संस्थांमधील अध्यापक, ग्रंथपाल व इतर गुंतवणूकदार यांनी एकत्र येऊन असे कार्यक्रम बनवावेत, स्वीकारावेत व त्यांचा वापर करावा.

Availability and Utilisation of Information Communication Technology Resources by Distance Education Students: A Case Study of Emmannuel Alayande College of Education, Oyo, Nigeria
*Olorunfemi Doreen Yemisi, K A Owolabi, Chidinma F Ajike, Josephy Kayode, C Odu-Mojoyionola*

काही मुलांना परंपरेप्रमाणे वर्गात बसून शिक्षण घेणे शक्य होत नाही. अशा मुलांसाठी व्यक्तिगत पातळीवर शिक्षण व सूचना देणे याला दूरशिक्षण व्यवस्था म्हणतात. विद्यार्थ्याला मुद्रण (पुस्तके) तसेच माहिती संपर्क तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांतून हे शिक्षण दिले जाते. यात संगणक, इंटरनेट, ई – मेल व वर्ल्डवाईड वेब (www) इ. यांचा समावेश होतो. Emmannuel Alayande College of Education, Oyo, Nigeria येथील दूरशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माहिती संपर्क तंत्रज्ञान संसाधनांची उपलब्धता व वापर यांचा अभ्यास करण्यात आला. त्यासाठी २०० विद्यार्थ्यांना प्रश्नावली देण्यात आली. या अभ्यासातून असे निष्कर्ष निघाले की - जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना विविध माहिती संपर्क तंत्रज्ञान संसाधनांची ओळख आहे. ते वेगवेगळ्या कारणांसाठी व जास्त करून शिक्षणासाठी या संसाधनांचा उपयोग करतात. त्यांचा जास्त भर मोबाईल फोन व इंटरनेटवर असतो. अनियमित वीजपुरवठा ही त्यांच्यापुढील मुख्य समस्या आहे. तेथील माहिती संपर्क तंत्रज्ञान संसाधने अपुरी आहेत, इंटरनेटचा वापर सर्वाधिक होतो व त्यासाठी सायबर कॅफेचा जास्तीत जास्त वापर व उपयोग होतो. निधीची कमतरता, संगणक कौशल्याचा अभाव आणि दूरसंपर्क सेवा सक्षम नसणे याचाही दूर शिक्षणावर विपरीत परिणाम होतो.

Security and Protection Status: The Case of the Central Libraries of State Universities in Tehran
*Sara Behimehr, Nosrat Riahinia*

ग्रंथालये माहिती केंद्रे असतात व तिथे अनेक शतकातील अशा सामग्रीचा संग्रह असतो की ज्याला ऐहिक व अध्यात्मिक महत्व असते. या अमूल्य ठेव्याचे जतन व रक्षण करणे अतिशय आवश्यक आहे. प्रदूषण, वातावरण, कीटक, आग, अपघात यांमुळे या संग्रहाचे नुकसान होऊ शकते, तसेच अज्ञानामुळे मानवांकडून अयोग्य हाताळणी, स्त्रोत व उपकरणांची चोरी यामुळे संग्रहाला हानी पोहोचते. संग्रहाचे जतन व सुरक्षेच्या दृष्टीने तेहरानमधील Alzahra, Tarbiat Modares, Kharazmi, Tehran या ४ विद्यापिठातील मध्यवर्ती ग्रंथालयांची पाहणी केली गेली. या पाहणीमध्ये असे आढळले की - त्यांच्याकडे व्यवस्थित लिहिलेली अशी कोणतीही योजना नाही. Kharazmi ग्रंथालयाची इमारत जुनी, पडझड झालेली, पाईपमधून पाण्याची गळती होणारी अशी आहे व तिची रचना ग्रंथालयासाठी झालेली नाही. या उलट संग्रहाच्या जतन व सुरक्षेचे महत्व लक्षात घेऊन २००९ सालात Tarbiat Modares ग्रंथालयाची उभारणी झालेली आहे. तरी तेथे अजूनही सुधारणेला वाव आहे. तेहरान विद्यापीठ ग्रंथालयात जागा, वेळ व भरपूर उपयोजक यांच्या प्रमाणात व्यवस्था ठीक आहे. Alzahra व Tehran ग्रंथालयांच्या अवतीभोवती जमिनीखाली पाणी आहे ही काळजी करण्यासारखी बाब आहे. जतन व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्वात उत्तम Alzahra ग्रंथालय, नंतर क्रमाने Tarbiat Modares ग्रंथालय, Tehran ग्रंथालय आहेत व शेवटी Kharazmi ग्रंथालयाचा क्रमांक येतो.

Citation Analysis of Doctoral Theses submitted to Bundelkhand University (Jhansi) and Dr. Harisingh Gour University (Sagar) in the discipline of Library and Information Science: A comparative study

*Jyoti Gupta, V P Khare*

बुंदेलखंड विद्यापीठ, झाशी व डॉ. हरीसिंग गौर विद्यापीठ,सागर येथे सादर झालेल्या LIS शाखेच्या प्रबंधांच्या पुरवण्यांमधील उल्लेखांचा अभ्यास करण्यासाठी १९९२ – २००९ या काळातील ६३ प्रबंध पुरवण्यांमधील १३४८२ उल्लेखांचे पृथक्करण करण्यात आले.

उल्लेखांचे सरासरी प्रमाण प्रत्येक प्रबंधामागे २१८.६ असे होते. दोन्ही विद्यापीठांमध्ये जास्तीत जास्त उल्लेखाचे स्त्रोत पुस्तके व नियतकालिके होती.जास्तीत जास्त उल्लेखलेले साहित्य अमेरिकेतील होते. उल्लेखलेल्या नियतकालिकांत प्रथम क्रमांक ILA Bulletin चा होता व IASLIC Bulletin चा त्यापाठोपाठ होता. UGC च्या नवीन निर्देशांमुळे उत्तरप्रदेशमधील विद्यापीठांनी २००७ पासून एकाही विद्यार्थ्याची संशोधनासाठी नावनोंदणी केली नाही. त्यामुळे २००६– २००९ या काळात बुंदेलखंड विद्यापीठाच्या संशोधकांनी केलेले उल्लेख कमी आहेत. मध्यप्रदेशातील विद्यापीठे व केंद्रीय विद्यापीठे यांनी स्वतःची धोरणे आखली व २०११ पर्यंत संशोधनासाठी विद्यार्थ्यांची नावनोंदणी केली. गेल्या वर्षी उत्तरप्रदेश मधील सर्व विद्यापीठांसाठी संयुक्त परीक्षा घेण्यात आली व प्रत्येक विद्यापीठ आता विविध शाखांमधील संशोधनासाठी विद्यार्थांची निवड करीत आहे.

Citation Pattern in Ph.D. Theses in Library and Information Science at S.N.D.T. Women's University, Mumbai during 1996–2012

*Parul Zavery*

ग्रंथालय व माहिती शास्त्र शाखेच्या सादर केलेल्या पीएच डी प्रबंधांसाठी वापरलेल्या विविध माहिती स्त्रोतांच्या उपयोग व प्राधान्याचा अभ्यास करण्यासाठी S.N.D.T. महिला विद्यापीठ, मुंबई येथील १९९६ – २०१२ काळातील ९ (LIS) प्रबंधांचा अभ्यास करण्यात आला. या सर्व ९ प्रबंधांमध्ये १७८९ उल्लेख आढळले. प्रत्येक प्रबंधाचे मानवी परीक्षण झाले. या उल्लेखांचे पृथक्करण केल्यावर पुढील निष्कर्ष निघाले - नियतकालिकातील लेख हे जास्तीत जास्त प्राधान्याने उल्लेखाचे स्त्रोत आहेत. एकट्या लेखकाने लिहिलेल्या लेखांचे जास्तीत जास्त उल्लेख आहेत. परदेशी उगम असलेल्या (नियतकालिकातील) लेखांचे उल्लेख जास्त आहेत. पण इतर देशातील पुस्तकांपेक्षा भारतीय पुस्तकांचे जास्त संदर्भ आहेत. भारतीय नियतकालिकांपेक्षा परदेशी साहित्याचे जास्त उल्लेख आहेत. बहुतांशी, सातत्याने उल्लेख झालेली नियतकालिके ग्रंथालय व माहितीशास्त्र शाखेची आहेत. Journal of the

American society for Information Science हे सर्वात उल्लेखनीय नियतकालिक आहे. भारतीय ग्रंथालय व माहितीशास्त्र नियतकालिकांमध्ये Library Herald सर्वात जास्त उल्लेखनीय आहे.


### ४.२.१.८ २०१४ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण

**सारणी क्र. १.८ २०१४ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**

| वर्ष | | Vol. No. | Issue No. | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|
| २०१४ | मार्च | ५२ | १ | ९ | २५.७१ |
| | जून | ५२ | २ | ९ | २५.७१ |
| | सप्टेंबर | ५२ | ३ | ८ | २२.८७ |
| | डिसेंबर | ५२ | ४ | ९ | २५.७१ |
| | | | एकूण | ३५ | १०० |

**आलेख क्र. ९**

**२०१४ या वर्षी प्रकाशित लेखांचे विश्लेषण**




२०१४ या वर्षातील लेखांचे विश्लेषणमार्च ९(२५.७१%), जून ९(२५.७१%), सप्टेंबर ८(२२.८७%), डिसेंबर ९(२५.७१%) असे दिसून येते. तीन महिन्याचे लेखांचे वितरण सारखे आहे. तर एका सप्टेंबर महिन्याचे लेखांचे वितरण २२.८७% इतके आहे.

**Year 2014, Volume-52, Issue-1 (March)**

Public library service in the NCT of Delhi: Present and future

*Prof. P B Mangla*

शिक्षणामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाची महत्वाची भूमिका असते व ग्रंथालयाला जनतेचा भक्कम पाठींबा असतो. म्हणून सार्वजनिक ग्रंथालयाला, लोकांनी लोकांसाठी चालवलेले लोकांचे ग्रंथालय असे म्हणतात. सार्वजनिक ग्रंथालयासंबंधी मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे आहेत. ग्रंथालयाला मिळणारा निधी करमुक्त असावा. ग्रंथालयाने जनतेला निःशुल्क सेवा पुरवावी. पारंपारिक सुविधांबरोबर व्याख्याने, चर्चा, प्रदर्शने भरवावीत. इंटरनेट व आधुनिक संसाधनांचा वापर करावा. देशाच्या सर्व भागात सार्वजनिक ग्रंथालये असावीत. सार्वजनिक ग्रंथालय कायद्याचा वापर व्हावा.डॉ. एस.आर. रंगनाथन यांना ग्रंथालय चळवळीचे जनक म्हणतात. त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयाची गरज ओळखली व ग्रंथालयांचा विकास व कायदा यांसाठी प्रयत्न केले. दिल्ली हे ऐतिहासिक शहर आहे. तेथेहिंदू, बौद्ध, जैन, मोगलव इंग्रज या सर्व राजवटींमध्ये ग्रंथालये अस्तित्वात होती. सध्या तेथे काही खाजगी, काही विशिष्ट समाजाची व काही नगरपालिकांनी आर्थिक मदत केलेली सार्वजनिक ग्रंथालये आहेत. दिल्लीच्या लोकसंखेच्या मानाने १५% पेक्षा कमी लोकांना सार्वजनिक ग्रंथालय सुविधा मिळते. खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकदारांनी पुढे येऊन देशातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ परिणामकारक होण्यासाठी हातभार लावावा.

Library herald: A bibliometric study (2003–2012)

*K P Singh, Bebi*

एप्रिल १९५८ मध्ये दिल्ली लायब्ररी असोसिएशनचे Library Herald हे त्रैमासिक प्रथम प्रकाशित झाले. यामध्ये डॉ. एस.आर.रंगनाथन, गोयल, दलाल, पी.एन.कौला अशा थोर लोकांचेलेख होते. या नियतकालिकाचे वेळोवेळी ग्रंथालय व माहिती शास्त्रातील विविध

भागांविषयी विशेष अंक प्रकाशित होतात. याची भारतातील वार्षिक वर्गणी रु. १५००/- व परदेशात US $ ५० आहे. सन २०१० पासून लायब्ररी हेराल्डचे on line प्रकाशन सुरु झाले.

या नियतकालिकात लेख, पुस्तक परीक्षणे, संशोधन अहवाल, परिसंवाद अहवाल, वार्षिक अहवाल अशी सामग्री असते. २००३ – २०१२ याकाळात ४० भागांमध्ये २३४ लेख प्रकाशित झाले. एकट्या लेखकाने लिहिलेल्या लेखांची संख्या सर्वात जास्त आहे, त्या खालोखाल २ लेखकांनी मिळून लिहिलेल्या लेखांची संख्या आहे. ३ किंवा ४ किंवा अधिक लेखकांनी मिळून लिहिलेल्या लेखांची संख्या खूप कमी आहे.

सन २००३ मध्ये सर्वात जास्त लेख लिहिले गेले व २००५ मध्ये सर्वात कमी लेख लिहिले गेले. जवळजवळ ८१% लेख भारतीय संशोधकांचे होते. तेहरानच्या Nosrat Riahinia यांनी सर्वात जास्त लेख लिहिले. ४७% लेख ६ ते १० पानी होते व जास्तीत जास्त लेखांनी ६ ते १० संदर्भ दिले होते. सर्वाधिक लेख शैक्षणिक ग्रंथालये व माहिती संपर्क तंत्रज्ञानाशी संबंधित होते.

Biobibliometric study on Dr. Sambhu Nath De-A pioneer in cholera research

*Susanta Koley, B K Sen*

शंभूनाथ डे (Sambhu Nath De) हे वैद्यक क्षेत्रातले संशोधक होते व त्यांनी कॉलरा या रोगावरील संशोधनाचा पाया घातला. त्यांचा जन्म १ फेब्रुवारी १९१५ ला चंदननगर, बंगाल येथे झाला. वयाच्या ३०व्या वर्षी त्यांचा पहिला लेख प्रकाशित झाला. ३७ – ४० या वयात त्यांनी सर्वाधिक लेख लिहिले. सन १९७३ पर्यंत ते कोलकता मेडिकल कॉलेजमध्ये कार्यरत होते. त्यापुढेही त्यांनी बोस इंस्टिटयूटमध्ये संशोधन सुरु ठेवले. त्यांना कोलकता विद्यापीठ व लंडन विद्यापीठाकडून गौरवण्यात आले.

शंभूनाथ डे यांनी एकून ४७ लेख लिहिले, त्यातील एक अप्रकाशित राहिला. यातील १३ लेख एकट्याने व ३४ लेख इतरांबरोबर लिहिले. १९४४ – १९५३ मध्ये १७ लेख, १९५४ – १९६३ मध्ये १७ लेख, १९६४ – १९७३ मध्ये ११ लेख व १९७४– १९८४ मध्ये २ लेख अशी त्यांची कामगिरी आहे. त्यांनी के.पी. सेनगुप्ता यांच्याबरोबर सर्वात जास्त एकत्र काम केले. भारतात तसेच परदेशातही त्यांचे लेख प्रकाशित झाले. शंभूनाथ डे यांचे १५ एप्रिल १९८५ रोजी निधन झाले. ते हयात असे पर्यंत त्यांच्या कार्याचे महत्व कोणाच्या लक्षात आले नाही. त्यांना राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परितोषिकेही मिळाली नाहीत. ते गेल्यावर १९९० मध्ये त्यांच्या सन्मानार्थ करंट सायन्सचा (current science) विशेष अंक निघाला. त्यांचे कार्य इतरांना प्रेरणा देत राहील.

Evaluation of reading development and parents' participation in state secondary schools: Barriers and challenges

*Maryam Emami, Nosrat Riahinia*

वाचन हे ज्ञान मिळवण्याचे उत्तम साधन आहे. लहानपणीच वाचनाची सवय लागली की ती मोठेपणीही कायम राहते.

शालेय मुलींच्या वाचनाच्या आवडी व सवयी जाणून घेण्यासाठी Alborz Province येथील ४ सरकारी शाळांमधील मुलींच्या वाचनाबद्दल माहिती घेण्यात आली. त्यात असे आढळले की - निम्म्याहून थोड्या जास्त मुली शाळेचे ग्रंथालय किंवा सार्वजनिक ग्रंथालयाच्या सभासद होत्या.त्यांना स्वतःला वाचनाची आवड असते. तसेच पालक (जास्त करून आई ), भावंडे, मित्र, शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याकडून वाचनासाठी प्रोत्साहन मिळते. जवळजवळ निम्मे पालक अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचनाला प्रोत्साहन देतात, काहीजण अभ्यास झाल्यावर परवानगी देतात तर फारच थोडे शिक्षाही करतात. वाचनाचा छंद, मनोरंजन, गृहपाठाची तयारी, स्पर्धापरीक्षांची तयारी, ज्ञानोपासना, आजूबाजूच्या जगाची माहिती

घेणे,संदर्भ या गोष्टींसाठी मुली पुस्तके वाचतात. पालकांची शिक्षणाबद्दल आस्था, जागरुकता यांचा मुलींच्या शिक्षणावर नक्कीच परिणाम होतो. पुस्तकांच्या किंमती जास्त असणे, प्रचंड गृहपाठ, दूरदर्शनवरील कार्यक्रम, खेळ, वाचनाची नावड किंवा आळशीपणा व पालकांचे असहकार्य हे वाचनापुढील मोठे अडथळे आहेत. पुस्तकांच्या किंमती कमी करणे, मुलींना भेट म्हणून पुस्तके देणे, त्यांना वाचनकौशल्ये शिकवणे अशा उपायांनी वाचनसंस्कृती वाढू शकेल. पालक व शाळाचालक यांच्या सहकार्याने मुली सुजाण वाचक व पुढे उत्तम नागरिक बनतील.

Internationalisation of library and information science education: Adopting choice based credit system (CBCS) in Indian universities with special reference to library and information science in Mizoram University

*Pravakar Rath, Moorttimatee Samantaray*

RFID technology: A performance differentiator

*Veena Prakashe, Komal Rathor*

सध्या सर्व क्षेत्रांमध्ये RFID तंत्रज्ञानाचा विकास होत आहे. RFID म्हणजे रेडीओ फ्रिक्वेंसी आयडेंटिफिकेशन. याव्यवस्थेचे ३ भागआहेत –tags, Readers, host computer system हे तंत्रज्ञान जास्त परिणामकारक, सोयीचे व कमी खर्चाचे असल्यामुळे खूप लोकप्रिय आहे. सन १९९० पासून अमेरिकन कंपन्यांनी हे तंत्रज्ञान वापरण्यास सुरुवात केली. सन २००० पासून जगातील अनेक ग्रंथालयांनी त्यांच्या कामकाजासाठी हे तंत्रज्ञान वापरण्यास मान्यता दिली.

RFID तंत्रज्ञान प्रथम दुसऱ्या महायुद्धात वापरले गेले. शत्रूची विमाने ओळखण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग केला गेला. सध्या हे तंत्रज्ञान सुरक्षेसाठी (security) वापरले जाते. रेडिओ लहरींचा वापर करून वस्तू, पुस्तके ओळखणे व त्यांचे स्थान शोधणे अतिशय सोपे झाले आहे. शिवाय हे इतके वेगात कार्यक्षमतेने व अचूकपणे केले जाते की त्यामुळे मनुष्यबळ व वेळ या

गोष्टी वाचतात. हे तंत्रज्ञान अजून अंतिम टप्प्यात आलेले नाही, त्यामुळे काही अडचणी उद्भवतात. तरीही याचा सर्वत्र प्रसार होत आहे, विशेषतः ग्रंथालयात याचा वापर सुरु झाला आहे.

**Year 2014, Volume-52, Issue-2 (June)**

Web Scale Discovery Services/Tools: Transforming Access to Library Resources

*H R Sujatha, M Bhaskara Reddy*

Information Literacy Skills of the Faculty and Students of Pandit Bhagwat Dayal Sharma University of Health Sciences (PBDSUHS), Rohtak

*Suman Lata, Sanjeev Sharma*

वैद्यकीय शिक्षणामध्ये माहिती साक्षरतेला फार महत्व आहे. तातडीने एखादी माहिती शोधण्याचे कौशल्य प्राप्त करणे हे वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी अतिशय आवश्यक झालेले आहे. रोहतक येथील पंडित भागवत दयाळ शर्माआरोग्यशास्त्र विद्यापीठ (Health Sciences) येथील अध्यापक व विद्यार्थी यांच्या माहिती साक्षरता कौशल्यांविषयी जाणून घेण्यासाठी, प्रश्नावली पद्धतीने अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात असे आढळले की - सर्वांना आपल्या माहितीच्या गरजा स्पष्टपणे सांगता आल्या. ते विविध माहितीस्त्रोत व on line databases या संबंधात जागरुक आहेत. अध्यापकांना विद्यार्थ्यांपेक्षा जास्त माहितीचा उपयोग करून घेता येतो. काहींना माहिती शोधाचे मूलभूत तंत्रही माहीत नसताना, आपल्याला खूप येत आहे असे वाटते. त्यांना संशोधन,अध्ययन, अध्यापन, प्रोजेक्ट, संदर्भ, विषयाचे ज्ञान व सामान्यज्ञान यासाठी माहितीची गरज लागते. क्रमिक पुस्तके, नियतकालिके, परिषदा, आरोग्यसंस्था, प्रबंध, संदर्भपुस्तके, वैद्यकीय डाटाबेसेस, इंटरनेट, विकिपीडिया व on line

निःशुल्क वैद्यकीय सेवा यांमधून माहिती मिळवतात.ते Pub Med व Medline या डाटाबेसेसचा जास्त उपयोग करतात.

वैद्यकीय व्यावसायिक जीवन रक्षक असतात. त्यांचा वेळ अमूल्य असतो. त्यांचा वेळ वाचवता आला तर ते अधिक जीव वाचवू शकतील. यासाठी वैद्यकीय ग्रंथालय व्यावसायिकांनी पुढाकार घेऊन त्यांच्यासाठी माहिती साक्षरता व ग्रंथालय वापर यांच्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमांचे वारंवार आयोजन केले पाहिजे. तसेच आरोग्यशास्त्राच्या अभ्यासक्रमामध्ये माहिती साक्षरतेच्या अभ्यासाचा समावेश केला पाहिजे.

Assessing the Information Needs of Faculty Members of Hindi in Various Colleges of University of Delhi: A Case Study
*Dr. Gurdev Singh, Monika Sharma*

कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा सर्वांगीण विकास ग्रंथालयावर अवलंबून असतो.म्हणून उपयोजकांना आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या माहितीच्या स्त्रोतांचा संग्रह महाविद्यालय ग्रंथालयामध्ये असावा लागतो. दिल्ली विद्यापीठाच्या काही महाविद्यालयांमधील हिंदी विषयाच्या अध्यापकांच्या माहितीच्या गरजा जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण केले गेले. त्यात ९६ अध्यापकांकडून प्रश्नावली व मुलाखत पद्धतीने माहिती घेण्यात आली. त्यात असे आढळले की- सर्व अध्यापकांचे पदव्युत्तर शिक्षण झालेले आहे. काहींकडे Ph.D ची पदवी आहे. महिला अध्यापकांची संख्या पुरूष अध्यापकांपेक्षा जास्त आहे. संशोधनासाठी, पुस्तके व लेख लिहिण्यासाठी, व्याख्यानासाठी, ज्ञान अद्ययावत करण्यासाठी अध्यापक माहितीचा उपयोग करतात. माहिती मिळवण्यासाठी ते इंटरनेट, क्रमिक पुस्तके, नियतकालिके,संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, परिषदांचे अहवाल, प्रबंध यांचा वापर करतात. पुष्कळसे अध्यापक रोज ग्रंथालयाला भेट देतात व त्यांना ग्रंथालय कर्मचाऱ्यांची चांगली मदत होते.

अध्यापकांची मुख्य समस्या अशी आहे की त्यांना तालिकेचा किंवा OPAC चा उपयोग कसा करतात ते माहीत नाही. ग्रंथालयाने अध्यापकांना आवश्यक असणाऱ्या माहितीचा पुरेसा

संग्रह ठेवावा. कार्यक्षम व पात्रता असलेल्या ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी त्यांनां मार्गदर्शन करावे. तसेच ग्रंथालयाने इंटरनेट सुविधा पुरवल्यास त्यांना अद्ययावत माहिती अल्प काळात मिळेल. संस्थेच्या विकासासाठी अधिकाऱ्यांनी ग्रंथालयाचा विकास करावा.

Reading Habits among the Coffee Planters in Karnataka State: A Study
*K N Madhu*
प्रत्येकाच्या आयुष्यात वाचनाला फार महत्व असते. वाचनामुळे व्यक्तीचे व्यक्तीमत्व घडते, ज्यायोगे व्यक्ती सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनातसक्षम भाग घेऊ शकते. भारतात, वृक्षलागवड करणाऱ्यांना वाचनाची किती आवड आहे, याचा अभ्यास मागे पडला आहे. म्हणून कर्नाटक राज्यातील कॉफीची झाडे लावणाऱ्यांच्या वाचनाच्या सवयींचा अभ्यास केला गेला. त्यात असे आढळले की - यातील पुष्कळ लोक ज्ञान मिळवण्यासाठी व मनोरंजनासाठी वाचन करतात. निम्म्याहून जास्त लोक रोज वाचन करतात. जास्तीत जास्त लोक कानडीला प्राधान्य देतात. त्या खालोखाल इंग्रजीचा क्रमांक आहे, हिंदी वाचन करणारे फारच थोडे आढळले. ते ज्ञान मिळवणे, मनोरंजन व स्पर्धा परीक्षांची तयारी यासाठी वाचन करतात. परंतु मोबाईल, लॅपटॉप, दूरदर्शन यांचा वापर करण्यात व गप्पा मारण्यात त्यांचा खूप वेळ (वाया) जातो. त्यामुळे या साधनांवर थोडी बंधने घातल्यास त्यांचा अमूल्य वेळ वाया जाणार नाही. हाच वेळ सत्कारणी लावून निवडक वाचन केल्यास ते ह्या स्पर्धेच्या जगात स्वतःला सक्षम बनवतील.

Attitude of Junior and Senior Post-primary School Students in Ado-odo/Ota Local Government Area of Ogun State to The Use of Library and Library Materials and The Successes They Achieve in Examinations
*Esse, Ugwunwa Chinyere*
शालेय विद्यार्थी जे यश मिळवतात त्या यशामध्ये ग्रंथालयाच्या वापराचा किती सहभाग (वाटा) असतो, याचा अभ्यास करण्यासाठी Ogun राज्यातील विद्यार्थ्यांना प्रश्नावली देण्यात आली. सातवीचे १०० व दहावीचे १०० अशा २०० विद्यार्थ्यांकडून माहिती घेऊन

Chi - Square पद्धतीने परीक्षण करण्यात आले. या पाहणीतून असे सिद्ध झाले की माध्यमिक शाळांमधील लहान – मोठ्या (Junior, Senior) विद्यार्थ्यांचे यश किंवा त्यांचा कल या दोन्ही गोष्टी ग्रंथालयाच्या वापरावर अवलंबून नसतात. (ग्रंथालयाचा वापर परिणाम करीत नाही.) यात सुधारणा होण्यासाठी ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी व वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करावेत, तसेच त्यांना माहिती व तंत्रज्ञान साक्षरतेची कौशल्ये शिकवावीत. बाल साहित्याची जाण असलेले ग्रंथालय कर्मचारी त्यांना वाचनाची गोडी लावू शकतील.

Literature Review on Copyright Infringement and Protection
*Jnanendra Narayan Singh*

या माहितीयुगात, माहिती तंत्रज्ञानामध्ये वेगाने प्रगती होत आहे.जगभरातील इंटरनेट उपयोजकांमध्ये माहितीची देवाणघेवाण होत असते. त्यामुळे Internet Piracy हा वैश्विक मुद्दा झाला आहे कारण तो आर्थिक बाबतीत महत्वाचा ठरतो. ग्रंथपालांना copy right सामग्री हाताळण्याची, त्या प्रक्रियेची माहिती असते व मार्गदर्शक तत्त्वेही माहित असतात. हे नियम पाळले गेले नाही तर संस्थेवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. व्यवस्थित काळजी घेण्याने संस्थेचा नावलौकिक कायम राहतो व आर्थिक नुकसानही टळते.

असे निदर्शनास येते की उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था अध्यापक व विद्यार्थी यांना copy right कायदा व बौद्धिक संपदा स्वामित्व हक्क यांविषयी माहिती देण्याची काळजी घेत नाहीत. इंटरनेटवरील डिजिटल माहितीचे copy right असू शकतात, याची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली पाहिजे. त्यांनी योग्य स्रोत वापरावेत व त्यांचे संदर्भ द्यावेत. उपयोजकांना माहितीचा पुरवठा करणे हे ग्रंथालयाचे प्रमुख कार्य असते. निधीअभावी ग्रंथालयांना अनेक नियतकालिकांची वर्गणी भरणे शक्य होत नाही. म्हणून त्यांनी open access नियतकालिके असावीत या मागणीचा पाठपुरावा करावा.

कॉपीराईट कायदा १९५७ हा बौद्धिक संपदेचे नियमन करणारा अद्ययावत, आधुनिक व सभ्य मार्ग आहे. परंतु त्याचे पालन करण्यात खूप अडचणी आहेत. भारत सरकारने कायद्याच्या रक्षणासाठी सक्षम यंत्रणा व न्यायालये यांची स्थापना करावी.

Expanded Schedule for Area Tables in Dewey Decimal Classification (DDC-23) for Rendering Indian States and Districts
*Dr K P Singh*

DDC (The Dewey Decimal Classification) हे एक सामान्यज्ञान संरचना साधन आहे. (General knowledge organization tool) वाढत्या ज्ञानाबरोबर ते सतत अद्ययावत होत असते. १२५ कोटी लोकसंख्या असलेला भारत देश 'जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले लोकशाही राष्ट्र' म्हणून ओळखला जातो. तसेच क्षेत्रफळाच्या दृष्टीने त्याचा सातवा क्रमांक आहे. तसेच सर्व प्रकारच्या ग्रंथालयांमध्ये DDC च्या वापराबाबत भारताचा प्रथम क्रमांक आहे. DDC – २३ मध्ये भारतातील राज्यांचे Area Table Numbers आहेत, पण जिल्ह्यांचे नाहीत. या बाबतीतील भारतीय ग्रंथालयांची अडचण दूर करण्यासाठी या लेखात Schedule (यादी) विस्तारित केले आहे. यामध्ये ७०० हून जास्त नोंदी आहेत. त्यात भारतातील राज्ये, केंद्रशासित प्रदेश (Union Territories), जिल्हे यांशिवाय धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, पर्यटन स्थळे, या सर्वांचा समावेश आहे. तसेच या सूचीचा अधिक विस्तार करण्यास वाव ठेवला आहे.

## Year 2014, Volume-52, Issue-3 (September)

Libraries and Information Services: *Challenges Ahead*
*Ravinder Kumar Chadha*

इंटरनेटच्या वेगवान प्रसारामुळे काही लोकांच्या मनात शंका होती की आता ग्रंथालय व ग्रंथपालांची गरज आहे का? पण उलट झाले. ग्रंथपालांची गरज पूर्वीहूनही जास्त आहे कारण माहितीच्या या महासागरात कुशल नावाड्याप्रमाणे ते मार्ग शोधत अंतिम स्थानापर्यंत

पोहोचतात व इतरांनाही मार्गदर्शन करतात. असे असले तरी ग्रंथालयांपुढे काही आव्हाने आहेत. माहिती पुरवणे हा व्यवसाय झाला आहे, तसेच इतर साधने व संसाधने यांचा खर्च यामुळे प्रचंड निधीची आवश्यकता असते. संगणक, संगणक प्रणाली, इंटरनेट व इंटरनेटचे जाळे यांची कौशल्ये ग्रंथपालांना आत्मसात करावी लागतात. कॉपीराईटच्या कायद्याचे पालन करावे लागण्यासाठी कायद्याचे ज्ञान व कोणती माहिती सशुल्क आहे याचे ज्ञान असावे लागते. उपयोजकांना अचूक व अद्ययावत माहिती त्वरित हवी असते, तशी ती त्यांना पुरवावी लागते. ग्रंथालयांना मुद्रित व डिजिटल माहितीच्या संग्रहाचे जतन करावे लागते. त्यामुळे अद्ययावत माहिती व तंत्रज्ञानाची कौशल्ये शिकणे व उपयोजकांनाही शिकवणे, पुरेसा निधी मिळणे, कायदेशीर मदत मिळणे व उपयोजकांचे समाधान होणे ही सध्याच्या ग्रंथालय सेवेपुढील आव्हाने आहेत.

Information Ethics: Issues and Challenges for Librarians in Nigeria a Case Study of Ekiti State University

*Abiodun Ayodele Osunrinde*

ग्रंथालय व्यावसायिकांना माहितीच्या तत्वांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या तत्वांच्या बाबतीत काही नियम आहेत, जे त्यांना मदत करू शकतात. याबाबतीत Ekiti राज्यविद्यापीठाच्या ग्रंथपालांना कोणत्या अडचणी येतात याचा प्रश्नावली देऊन अभ्यास करण्यात आला. या अभ्यासातून खालील माहिती मिळाली. उपयोजकांना आवश्यक असलेल्या माहितीच्या सर्व स्त्रोतांबाबत मदत करण्यासाठी या सर्वांची तयारी आहे. तसेच सर्वजण उपयोजकांच्या तसेच कर्मचाऱ्यांच्या माहितीच्या खाजगीपणाचे रक्षण करतात. सहकाऱ्यांशी आदराने, विश्वासाने वागावे व संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे कल्याण व हक्क यांचे रक्षण करावे या बाबत सर्वांचे एकमत आहे. पुष्कळशा ग्रंथपालांनी समान व खुल्या माहितीची मागणी केली. तसेच त्यांना माहिती संसाधनांवर नियंत्रण मान्य नाही. ग्रंथालय

व्यावसायिकांच्या अभ्यासक्रमात 'माहितीची तत्वे' अभ्यासाचा समावेश केला तर त्यांना मदतच होईल. यामध्ये प्रात्यक्षिके, केसस्टडी यांवर भर असावा.

University Library Services for The Differently-abled People: *A Pilot Study*
*Sharmistha Mitra, Archana Shukla, B K Sen*

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ६ ते ७ प्रतिशत व्यक्ती विकलांग आहेत. गरिबी, कुपोषण, नवीन रोग, अपघात, हिंसाचार इत्यादी कारणांमुळे हे प्रमाण वाढतच आहे. UNESCO व IFLA यांनी विकलांग व्यक्तींसह सर्वांना समान ग्रंथालय सेवा देण्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे आखून दिली आहेत. यासंदर्भात कलकत्ता विद्यापीठ व जडवपूर यांची पाहणी केली गेली. यामध्ये काही विद्यार्थी यांना प्रश्न विचारले गेले. तसेच इतर विद्यापीठांच्या मध्यवर्ती ग्रंथालयांचा वेबवरून अभ्यास करण्यात आला. दोन्ही विद्यापिठे फक्त दृष्टीदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना सुविधा पुरवतात. त्यांच्याकडे इतर विकलांग विद्यार्थ्यांसाठी पुरेशा सोयी नाहीत व ग्रंथालयांची रचना त्यांच्या योग्य नाही. कलकत्ता विद्यापीठात ब्रेल पुस्तके, श्राव्य सुविधा आहेत. जडवपूर विद्यापीठात ब्रेल पुस्तके, श्राव्य सुविधा, उताराचा रस्ता, चाकांच्या खुर्च्या, प्रसाधन गृहे या सुविधा आहेत. विकलांग विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात ३% राखीव जागा आहेत. या सुविधांबरोबरच या विद्यार्थ्यांसाठी ध्वनीमुद्रित पुस्तके, बोलणारा कॅलक्युलेटर, कर्णबधीर विद्यार्थ्यांसाठी खुणांच्या भाषेची व्यवस्था इत्यादी सुविधा असाव्यात, तसेच त्यांच्या सहज वावराला योग्य अशा सोयी इमारतींमध्ये असाव्यात.

Digital Preservation of Cultural and Historic Resources of India: The Role of Libraries and Government of India
*Mahuya Chakrabarty Adhikary, TM Vasudevan*

मूळ मुद्रित साहित्याचे, माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जतन व रक्षण करणे व त्याच्या नोंदी (documentation) करून ठेवणे याला डिजिटल जतन म्हणतात. असे केल्याने विद्वान व संशोधक मोठ्या प्रमाणावर या माहितीचा वापर करू शकतात. या कार्यपद्धतीमध्ये, माहितीचे ट्रेडमार्क, पेटंट, कॉपीराईट यांचे भान ठेवावे लागते. सामग्रीचे डिजिटल जतन

करण्याच्या स्थानांतर (migration) व प्रतिकृती बनविणे (emulation) या दोन पद्धती आहेत. दोन्ही पद्धतींमध्ये जतन करणाऱ्यांना इंटरनेट, संगणक व संगणक प्रणालीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. याशिवाय वेगवेगळे File Format, बौद्धिक संपदा कायदा, सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या पद्धती या सर्वांचेही ज्ञान असणे आवश्यक आहे. जुनी दफ्तरे, कागदपत्रे, हस्तलिखिते, भूर्जपत्रे यांचे काळजीपूर्वक स्कॅनिंग करावे लागते. तसेच यातील डाग, कीटकांच्या खुणा काढून टाकून स्वच्छ प्रतिमा घ्यावी लागते. रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांचे डिजिटल जतन करून त्यांची CD बनवली आहे. पुस्तकांच्या मायक्रोफिल्म काढून त्यांचे जतन करता येते. हजारो वर्षांपासूनचे ज्ञान, इतिहास, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा यांचे रक्षण व जतन करण्यासाठी भारत सरकार. नॅशनल अर्काइव्हज व इतर अनेक संस्था व ग्रंथालये जबाबदारीने प्रयत्न करीत आहेत, जेणे करून हा ठेवा पुढील पिढ्यांकडे सुपूर्त करता येईल.

## Year 2014, Volume-52, Issue-4 (December)

Emerging Role of Public Libraries

*Kala Anjan Dutta*

कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात ३ जागा (space) अशा असतात की जेथे व्यक्तिमत्वाचा विकास होतो. पहिली जागा म्हणजे घर, दुसरी जागा म्हणजे कामाचे ठिकाण व तिसरी जागा म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय. ग्रंथालये ज्ञानाचे भांडार असतात व इंटरनेटमुळे माहितीचा संग्रह सतत वाढत असतो. विविध क्षेत्रातील असंख्य व्यक्ती अद्ययावत ज्ञान मिळवण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना भेट देतात.त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालये समाजकेंद्रे बनली आहेत. येथे विद्यार्थी, शिक्षक, पालक, व्यावसायिक, नोकरी शोधणारे उमेदवार, लेखक, संशोधक, निवृत्त व्यक्ती असे सर्वजण एकत्र येतात. त्यामुळे त्यांना एकमेकांना मदत करता येऊ शकेल.

सार्वजनिक ग्रंथालये समाजाला एक व्यासपीठ पुरवू शकतात, जेथे व्याख्याने, नाट्य, नृत्य, संगीत, चर्चासत्रे, प्रदर्शने, विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील. उपयोजकांकडून नाविन्यपूर्ण कल्पना घेता ययेतील व नवीन निर्मिती सुद्धा करता येईल. याचबरोबर उत्तम पुस्तकांचे वाचन, कवितावाचन, अंधश्रद्धेवर प्रहार करणारी नाटके, विनोदी कार्यक्रम, राजकीय प्रहसनं आयोजित करून समाजाला पुरोगामी बनवता येईल. माहिती व ग्रंथांचा संग्रह करून उपयोजकांपर्यंत पोहोचवणे एवढीच संकुचित भूमिका न ठेवता सार्वजनिक ग्रंथालयें ज्ञानमय समाज घडवून देशाच्या विकासाला हातभार लावू शकतात.

Indian Journal of Animal Research - A Bibliometric Study

*K Thavamani*

कोणत्याही (सर्व) स्वरुपात प्रकाशित झालेल्या ज्ञानाच्या पद्धतींचा अभ्यास व मापन म्हणजे Bibliometric Study हा अभ्यास संशोधनांच्या विषयांसंबंधी माहिती घेण्यासाठी, तसेच संशोधनाचे मूल्यांकन करण्यासाठी उपयोगी पडतो. २००७ – २०१३ या काळात भारतात प्रकाशित झालेल्या Indian Journal of Animal Research प्रकाशनातील शोधनिबंधांचा अभ्यास करण्यात आला. यासाठी २०८३ लेखक व ५७४ निबंधांचा विचार करण्यात आला. यामध्ये सर्वात जास्त प्रकाशने (११३) सन २०१३ मध्ये प्रकाशित झाली. बहुतांशी निबंध (९५%) अनेक लेखकांनी मिळून लिहिलेले होते. सर्वात जास्त म्हणजे १६ प्रकाशने देऊन J.J.Chungath लेखकांमध्ये प्रथम क्रमांकावर आहेत. हरयाणामधून सर्वात जास्त म्हणजे ६६ प्रकाशने प्रकाशित झाली. एकेकट्या लेखकांची फक्त २६ प्रकाशने आहेत. यावरून असे दिसते की अनेक लेखकांनी मिळून संशोधन करण्याकडे संशोधकांचा कल आहे.

Student Awareness of Information Literacy and Resource-based Student-centered Learning: An Analytical Studysadhyachy

*Bhupinder Singh*

सध्याच्या माहितीयुगात,माहितीचा प्रचंड संग्रह व त्यातील क्लिष्टता यामुळे एखाद्या व्यक्तीला वैयक्तिक, शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लागणारी माहिती शोधताना खूप अडचणी येतात. यासाठी त्याला माहिती साक्षरतेची कौशल्ये शिकणे गरजेचे आहे. यापुढील काळात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध स्त्रोत वापरावे लागणार आहेत.Resource Based learning चे मुख्य उद्दिष्ट असे आहे की विध्यार्थ्यांनी स्वतंत्र अभ्यासाची कौशल्यं शिकावीत त्यासाठी त्यांच्या क्षमतेनुसार त्यांना संसाधने पुरवली जातात. यातून विध्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते व ते त्यांच्या आवडीच्या विषयातील योग्य माहिती शोधून तिचा उपयोग करतात. या प्रक्रियेमध्ये गृहपाठ, प्रोजेक्ट व विद्यार्थी गटांचे सहकार्य यांचा समावेश असतो. येथे शिकवणारे कोणी नसते, फक्त साधने व संसाधने वापरण्यात मदत लागू शकते. ग्रंथपाल ही जबाबदारी घेऊ शकतात कारण त्यांना या बाबतीतले ज्ञान असते व ग्रंथालयातच माहितीचा मोठा संग्रह असतो. यासाठी अध्यापक व ग्रंथपाल यांच्या मध्ये सहकार्य असले पाहिजे व त्यांच्यासाठी माहिती साक्षरता प्रशिक्षणाचे आयोजन केले पाहिजे.

प्रगत देशांमध्ये अशा प्रकारच्या शिक्षणाचा विचार परिणामकारक ठरू शकतो. परंतु भारतासारख्या विकसनशील देशात, संसाधनांची कमतरता व विविध शिक्षण संस्कृतीमुळे हे अवघड आहे. परत भाषेची अडचण (इंग्रजीचे अज्ञान) आहेच. यासाठी अभ्यासक्रमात माहिती साक्षरता विषयाचा अंतर्भाव करावा व शिक्षक, ग्रंथपाल व अधिकारी व्यक्तींनी एकजुटीने प्रयत्न करून, माहिती साक्षरता कार्यक्रमांची आखणी करून RBSCL ला पाठिंबा द्यावा.

Perceptions of The Primary Stakeholders on Fisheries Information Services in Kerala State: An Evaluation Study

*M Jayapradeep, Dr R Raman Nair*

कोणत्याही क्षेत्रात, विकासासाठी माहितीची गरज लागतेच. केरळमधील मासेमारी व मत्स्यशेती करणाऱ्यांच्या माहितीच्या गरजांविषयी सर्वेक्षण केले गेले.

केरळमधील सामाजिक, आर्थिक विकासात मासेमारी व्यवसायाचे महत्वाचे स्थान आहे. तरीही हा समाज सामाजिक, आर्थिक बाबतीत मागे पडला आहे. सरकारकडे संसाधने पुरेशी आहेत. पण व्यावसायिकांच्या गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्यांना सुविधा पुरवल्या जात नाहीत. मत्स्यशेती करणाऱ्यांना विपणन, रोग, हवामान, बीज, आपत्ती, अनुदान कल्याणकारी योजना यांची माहिती हवी असते. मासेमारी करणाऱ्यांना विपणन, हवामान, समुद्रातील प्रवाह, अनुदान कल्याणकारी योजना यांची माहिती हवी असते. तसेच बाजारात कोणत्या माशांची मागणी आहे, बाजारभाव काय आहेत यांचीही माहिती हवी असते. गुंतवणूकदार मत्स्यालय ग्रंथालये, स्वयंसेवी संस्था, ग्रामीण ग्रंथालये यांना सरकारी संस्थांची ग्रंथालये व सरकारी कचेऱ्या यांच्यापेक्षा प्राधान्य देतात. मोबाईल फोन, इंटरनेट, दूरदर्शन व रेडिओ यांच्या मार्फत मत्स्यव्यावसायिकांना माहिती पोहोचवता येते. तंत्रज्ञान हाताशी आहेच फक्त व्यवस्थेत सुधारणा करून माहिती प्रसारणात प्रगती केली, तर मत्स्यव्यवसायाचा वेगाने विकास होईल.

Use of Computer and Its Impact on Academic Performance of Faculty Members and Research Scholars: A Case Study of Kuvempu University

*Dr. B.T. Sampath Kumar, Prof. Mallinath Kumbar, B. Sharath*

माहिती संपर्क तंत्रज्ञानाने माहितीच्या विश्वात क्रांती घडवून आणली आहे, तसेच शिक्षण व अध्यापन पद्धतींवरही मोठा परिणाम केला आहे. Kuvempu विद्यापिठातील अध्यापक व संशोधन करणारे विद्वान यांना संगणकाचा वापर व उपयोग यांबाबत प्रश्न विचारण्यात आले. त्यातून पुढील माहिती मिळाली. सर्वजण दररोज संगणकाचा वापर करतात. अध्यापक घरी व विद्यापीठ विभागामध्ये संगणक वापरतात तर संशोधक विद्वानांना विद्यापीठ ग्रंथालय व मित्र यांच्या घरी जावे लागते. संशोधन, अध्यापन, प्रोजेक्ट यासाठी ते संगणक व इंटरनेटचा वापर करतात. LCD, टेलिफोन व स्कॅनर ही त्यांची माहिती संपर्क तंत्रज्ञान साधने

आहेत. ते Word Processing Software व MS – Power Point वापरतात. वीज नसणे, संगणकांची कमतरता असणे व संगणक वापरण्याचे ज्ञान व कौशल्ये नसणे या काहीजणांच्या पुढील समस्या आहेत.

संगणकांच्या उतरत्या किंमती, माहिती संपर्क तंत्रज्ञान संसाधनांमधील वाढ व त्यांच्या वापराबाबतचा उपयोजकांचा सकारात्मक कल यांमुळे संशोधनांच्या निर्मितीमध्ये वाढ झालेली आहे. अध्यापन कौशल्याची पातळी वर गेली आहे. अध्यापक व संशोधन करणारे विद्वान हे शब्दसंग्रह वाढवण्यात, नवीन गोष्टी सहज शिकण्यात पारंगत झाले आहेत व त्यांचा आत्मविश्वासही वाढला आहे.

Evaluating The Quality Levels of the Central Library Services at Kharazmi University of Tehran: Applying LibQUAL

*Maryam Emami, Nosrat Riahinia*

तेहरान येथील Kharazmi विद्यापिठातील मध्यवर्ती ग्रंथालय सेवेचे LibQUAL साधन वापरून मूल्यांकन केले गेले. त्यासठी ग्रंथालयाच्या १८० उपयोजकांना प्रश्नावली देण्यात आली. त्याचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे होते. परिणामकारक सेवा, माहितीवर नियंत्रण याबाबतीत उपयोजक असमाधानी आहेत. ग्रंथालयातील वातावरण, स्त्रोत व ग्रंथालय कर्मचारी यांच्याबाबतही ते असमाधानी आहेत. ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्ये पार पाडावीत व व्यवस्थापनाने त्यांच्या प्रशिक्षणाची सोय करावी, अभ्यासिका कक्षाचा विस्तार करावा, ग्रंथालयाची वेळमर्यादा वाढवावी, संगणकांची संख्या वाढवावी, प्रशिक्षित ग्रंथालय कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी व त्यांनी उपयोजकांना माहितीबाबत मदत करावी, डाटाबेस व संसाधनांचा वापर करता यावा या उपयोजकांच्या मागण्या आहेत. LibQUAL साधनाने ग्रंथालय गुणवत्ता पातळीचे मूल्यमापन केल्यामुळे व्यवस्थापनाला उपयोजकांना समाधानकारक सेवा पुरवण्यासाठी ग्रंथालय कार्यामध्ये सुधारणा करता येतील.

Free and Open Source Software Movement in LIS Profession in Nepal

*Rajendra Neupane*

माहितीच्या विश्वात संगणक प्रणालीला खूप महत्व आहे. निःशुल्क व खुल्या संगणक प्रणाली स्त्रोतांमुळे माहितीचा प्रसार वेगात होऊ शकतो. त्यासाठी Free and Open Source Software movement (FOSS) सुरु झाली आहे. जगभरच्या ग्रंथालयांमध्ये ही चळवळ लोकप्रिय आहे. ह्या कार्यक्रमाची नेपाळमधील सध्याची स्थिती व कार्यक्रम पुढे आणण्याचे ग्रंथालयमाहिती शास्त्र संस्थांचे प्रयत्न याचे सर्वेक्षण केले गेले. यासाठी मोठ्या ग्रंथालयांच्या वेबसाईट व ग्रंथालयशास्त्राशी संबंधित व्यावसायिक, FOSS संबंधित संस्था यांच्याकडून माहिती घेतली गेली. नेपाळ हे विकसनशील राष्ट्र असल्यामुळे FOSS मुळे कमी किंमत व वापराचे स्वातंत्र्य हे फायदे होतील. तसेच त्यांना स्थानिक माहिती संपर्क तंत्रज्ञान प्रणाली विकसित करण्याची संधी मिळेल. शाळा, महाविद्यालये या प्रणालींचा कायदेशीररित्या वापर करू शकतील. आर्थिक बचत होत असल्यामुळे ग्रंथालयांच्या स्वयंचलित करणासाठी निधी उपलब्ध होईल. ग्रंथालय माहिती शास्त्राचे व्यावसायिक हा कार्यक्रम ग्रंथालयात राबविण्याचे प्रयत्न करीत आहेत. नेपाळ लायब्ररी असोसिएशन व त्रिभुवन विद्यापीठाच्या ग्रंथालय माहिती शास्त्र विभागाने याबाबतीत प्रशिक्षणे आयोजित करावीत. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी महाग व्यावसायिक प्रणालीला पर्याय उपलब्ध होतील व कमी बजेट असलेल्या प्रत्येक ग्रंथालयाला त्यांचा वापर करता येईल.

## ४.२.२ विशेष अंक आणि सर्वसाधारण अंक

एकूण ३२ अंकांपैकी किती अंक विशेष आणि किती सर्वसाधारण आहेत याची माहिती खालील सारणी वरून लक्षात येईल.

**सारणी क्र. २ विशेष अंक आणि सर्वसाधारण अंक**

| अ. क्र. | वर्ष | खंड क्र. | एकूण अंक | विशेष अंक | सर्वसाधारण अंक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४ | ५२ | ४ | ० | ४ |
| २ | २०१३ | ५१ | ४ | ० | ४ |
| ३ | २०१२ | ५० | ४ | १ सप्टेंबर | ३ |
| ४ | २०११ | ४९ | ४ | ० | ४ |
| ५ | २०१० | ४८ | ४ | ० | ४ |
| ६ | २००९ | ४७ | ४ | १ डिसेंबर | ३ |
| ७ | २००८ | ४६ | ४ | ० | ४ |
| ८ | २००७ | ४५ | ४ | ० | ४ |
| **एकूण** | | **८ खंड** | **३२ अंक** | **२** | **३०** |

२००७ ते २०१४ या कालावधीमधील "लायब्ररी हेराल्ड" या नियतकालिकाच्या एकूण ८ खंडांमधील प्रसिद्ध झालेल्या ३२ अंकांमध्ये सप्टेंबर २०१२ (खंड ५०) व डिसेंबर २००९ (खंड ४७)मध्ये प्रसिद्ध झालेले अंक विशेष अंक आहेत. या खंडांमध्ये व्यक्तीविषयक अशा विशेष अंकांसाठी सर्वात जास्त लेखांचे प्रकाशन केले गेले. २०१२ मध्ये प्रो. दासगुप्ता यांच्या स्मरणार्थ सप्टेंबर महिन्यात २७ लेख प्रकाशित केले गेले, तर २००९ डिसेंबर मध्ये प्रो. कौला यांच्या स्मरणार्थ २२ लेख प्रकाशित केले गेले.

## ४.२.३ शोधनिबंधाची लांबी

"लायब्ररी हेराल्ड" च्या सन २००७ ते २०१४ मध्ये प्रकाशित झालेल्या अंकांमध्ये एकूण ३०८ लेख प्रकाशित झाले आहेत. या शोधनिबंधाची लांबी किती आहे याची माहिती पुढील सारणी मध्ये मिळते.

## सारणी क्र. ३ शोधनिबंधाची लांबी

| पृष्ठ संख्या | शोधनिबंध संख्या | % |
|---|---|---|
| १ | ९ | २.९२ |
| २ | ३२ | १०.३८ |
| ३ | १४ | ४.५४ |
| ४ | २१ | ६.८१ |
| ५ | १४ | ४.५४ |
| ६ | ७ | २.२७ |
| ७ | १३ | ४.२२ |
| ८ | १६ | ५.१९ |
| ९ | २८ | ९.०९ |
| १० | २० | ६.४९ |
| ११ | २५ | ८.११ |
| १२ | १६ | ५.१९ |
| १३ | १७ | ५.५१ |
| १४ | १६ | ५.१९ |
| १५ | ७ | २.२७ |
| १६ | १२ | ३.८९ |
| १७ | १२ | ३.८९ |
| १८ | ९ | २.९२ |
| १९ | ६ | १.९४ |
| २० | २ | ०.६४ |
| २१ | ० | ० |
| २२ | १ | ०.३२ |
| २३ | ३ | ०.९७ |
| २४ | १ | ०.३२ |
| २५ | २ | ०.६४ |
| २६ | ० | ० |
| २७ | २ | ०.६४ |
| २८ | १ | ०.३२ |
| ३४ | २ | ०.६४ |
| | ३०८ | १०० |

वरील सारणीनुसार सर्वात जास्त म्हणजे ३४ पृष्ठ संख्या असलेले लेख २ (०.६४%) इतके आहेत  तर सर्वात कमी म्हणजे १ पृष्ठ संख्या असलेले लेख ९ (२.९२%) इतके आहेत.

यावरून असे दिसून येते की, जास्त पृष्ठ संख्या असलेले लेख कमी प्रमाणात लिहिले जातात तर  कमी पृष्ठ संख्या असलेले लेख जास्त प्रमाणात लिहिले जातात.


## ४.२.४ लेखांचे विश्लेषण

लेखांचे विश्लेषणकरताना खालील बाबींचा अंतर्भाव केलेला आहे.

**सारणी क्र. ४  लेखांचे विश्लेषण**

| शीर्षक | वेगवेगळे शीर्षक असलेल्या लेखांचे विश्लेषण | % |
|---|---|---|
| लेख | २३९ | ७८ |
| ग्रंथपरीक्षण | २७ | ९ |
| बातम्या आणि विशेष कार्यक्रम | २६ | ८ |
| अहवाल | १६ | ५ |
| **एकूण** | **३०८** | **१००** |

**आलेख क्र. १०   लेखांचे विश्लेषण**




लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकामध्ये  विविध विषयांवरील लेख, ग्रंथपरीक्षण, बातम्या आणि विशेष कार्यक्रम, अहवाल अशा शीर्षकांखाली लेखनाचे विश्लेषण केल्याचे

दिसून येते. लेख २३९(७८%), ग्रंथपरीक्षण २७(९%), बातम्या आणि विशेष कार्यक्रम २६(८%), अहवाल १६(५%) असे विश्लेषणकेले आहे.

यावरून असे दिसून येते की, सर्वात जास्त असलेल्या लेखामध्ये ग्रंथालयांच्या विकासासाठी आवश्यक माहिती दिसून येते तर ग्रंथपरीक्षण, बातम्या आणि विशेष कार्यक्रम व अहवाल याद्वारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विकासासंबंधित माहिती प्रकाशित केली आहे.


## ४.२.५ लेखक योगदान विश्लेषण

लेखक योगदान विश्लेषणकरताना एक लेखक, दोन लेखक, तीन लेखक व तीन पेक्षा अधिक लेखक या पैलूंचा अंतर्भाव करून माहितीचे विश्लेषणकेले आहे. त्याची माहिती खालील सारणी क्र. १० मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ५ लेखक योगदान विश्लेषण**

| लेखकांची संख्या | लेखांची संख्या | % |
|---|---|---|
| एक लेखक | १६६ | ५३.९० |
| दोन लेखक | ७३ | २३.७० |
| तीन लेखक | २८ | ९.१० |
| तीन पेक्षा जास्त लेखक | २ | ०.६४ |
| लेखक नसलेले | ३९ | १२.६६ |
| **एकूण** | **३०८** | **१००** |

**आलेख क्र. ११ लेखक योगदान विश्लेषण**



वरील माहिती नुसार एक लेखक असणाऱ्या लेखांची संख्या जास्त म्हणजेच १६६(५३.९०%) इतकी आहे. दोन लेखक असणाऱ्या लेखांची संख्या ७३(२३.७०%), तीन लेखक असणाऱ्या लेखांची संख्या २८(९.१०%), तीन पेक्षा जास्त लेखक असणाऱ्या लेखांची संख्या २(०.६४%), लेखक नसलेल्या लेखांची संख्या ३९(१२.६६%) इतकी आहे. लेखक नसलेले लेख म्हणजेच  अहवाल, बातम्या आणि कार्यक्रम असे लेख आहेत.

यावरून असे म्हणता येईल की, एकच लेखक असणारे लेख तुलनेने जास्त आहेत. म्हणजेच एकाच व्यक्तीची ठाम मते पहायला मिळतात. वैयक्तिकरित्या संशोधन करून माहिती मिळवून ती प्रसारित करणे असा संशोधक लेखकांचा कल दिसून येतो.

**सारणी क्र. ६ लेखक योगदान विश्लेषण**

| वर्ष | खंड क्र. | एकूण अंक | एक लेखक | दोन लेखक | तीन लेखक | तीन पेक्षा अधिक लेखक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | ५२ | ४ | १६ | १२ | २ | - | ३० |
| २०१३ | ५१ | ४ | १४ | ८ | ६ | १ | २९ |
| २०१२ | ५० | ४ | ३८ | ७ | १ | १ | ४७ |
| २०११ | ४९ | ४ | २० | ६ | ६ | - | ३२ |
| २०१० | ४८ | ४ | २० | १२ | ३ | - | ३५ |
| २००९ | ४७ | ४ | ३१ | ७ | ३ | - | ४१ |
| २००८ | ४६ | ४ | ८ | ११ | ३ | - | २२ |
| २००७ | ४५ | ४ | १९ | १० | ४ | - | ३३ |
| **एकूण** | **८** | **३२** | **१६६** | **७३** | **२८** | **२** | **२६९** |

प्रत्येक वर्षासाठी एक, दोन, तीन व तीन पेक्षा जास्त लेखकांचे योगदान वरील सारणी वरून दिसून येते. यामध्ये २०१२ साली एक लेखक असणाऱ्या लेखांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ३८ इतकी आहे. तर २००८ साली एका लेखक असणाऱ्या लेखांची संख्या सर्वात कमी म्हणजे ८ इतकी आहे. २०१० व २०१४ या  साली दोन लेखक असणाऱ्या लेखांची संख्या

जास्त म्हणजे १२ इतकी आहे तर २०११ या  साली दोन लेखक असणाऱ्या लेखांची संख्या कमी म्हणजे ६ इतकी आहे. २०११ व २०१३ या वर्षी तीन लेखकांनी लिहिलेल्या लेखांची संख्या ६ इतकी आहे. २०१२ व २०१३ या वर्षी तीन पेक्षा जास्त लेखक असणारे लेख प्रत्येकी १ आहेत.

### ४.२.६ अग्रेसर लेखक

लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकमध्ये ग्रंथालय व माहिती शास्त्रातील अत्यंत विद्वान व अभ्यासू लेखकांचे लेख प्रकाशित होत असतात. या लेखकांनी सन २००७ ते २०१४ या कालावधीत त्यानी लिहिलेल्या लेखांचे योगदान त्यांच्या नावासह खालील सारणी क्र. ६ मध्ये दिलेली आहे. वरील कालावधीत या नियतकालिकामध्ये एकूण  २२७ इतके लेखकांनी लेख लिहिले आहेत. त्यापैकी ७ लेख ते ३ लेख लिहिणाऱ्या लेखकांची नावे व संख्या खालील सारणीत दिलेली आहे.

**सारणी क्र.७ अग्रेसर लेखक**

| Author | No. of Article |
|---|---|
| Riahinia Nosrat | 7 |
| Vyas S. D. | 5 |
| Vashishth C. P. | 5 |
| Emami Maryam | 3 |
| Tripathi Manorama | 3 |
| Prerna | 3 |
| Satija M. P. | 3 |
| Sen B. K. | 3 |
| Singh K. P. | 3 |

Riahinia Nosrat  या लेखिकेचे लेख लिहिण्यातील योगदान सर्वात जास्त म्हणजे ७ इतके आहे. ५ लेख लिहिणाऱ्या लेखकांची संख्या २ इतकी आहे. ३ लेख लिहिणाऱ्या लेखकांची

संख्या ६ इतकी आहे तसेच २ लेख लिहिणाऱ्या लेखकांची संख्या ३५ इतकी आहे. १ लेख लिहिणाऱ्या लेखकांची संख्या १८३ इतकी आहे. काही लेख दोन, तीन किंवा तीन पेक्षा जास्त लेखकांनी मिळून लिहिलेले आहेत.

## ४.२.७ मुख्य विषय पैलू

खालील मुख्य विषय दशांश वर्गीकरण पद्धतीच्या (DDC) च्या १९ व्या आवृती प्रमाणे तयार केलेले आहेत.

**सारणी क्र. ८ मुख्य विषय पैलू**

| अनु. क्र. | विषय | | लेखांची संख्या | % |
|---|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक ग्रंथालय (Academic Library ) | शाळा | ८ | २.६० |
| | | महाविद्यालय | ६ | १.९५ |
| | | विद्यापीठ | ७ | २.२७ |
| २. | सार्वजनिक ग्रंथालय (Public Library) | | १२ | ३.९० |
| ३. | विशेष ग्रंथालय (Special Library) | | ८ | २.६० |
| ४. | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (Information Communication Technology) | | ६२ | २०.१३ |
| ५. | ग्रंथालय सेवा (Library Services) | | १२ | ३.९० |
| | ग्रंथालय संग्रह (Library Collection) | | १२ | ३.९० |
| ६. | व्यक्तीविषयक (Personalities) | | ४९ | १५.९१ |
| ७. | ग्रंथसुचीय परीक्षण (Bibliometrics) | | ४ | १.३० |
| ८. | उपयोजक अभ्यास (User Study) | | १३ | ४.२२ |
| ९. | उपयोग अभ्यास (Use Study) | | १५ | ४.८७ |
| १०. | माहिती साक्षरता (Information Literacy) | | ११ | ३.५७ |
| ११. | ग्रंथपालन व्यवसाय (Library Profession) | | १५ | ४.८७ |
| १२. | संशोधन (Research) | | २ | ०.६५ |
| १३. | उल्लेख निर्देश (Citation Analysis) | | ३ | ०.९७ |
| १४. | ग्रंथ परीक्षण (Book Review) | | २७ | ८.७७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | अहवाल (Report) | १६ | ५.१९ |
| १६. | कार्यक्रम (Events) | २६ | ८.४३ |
| | **एकूण** | **३०८** | **१००** |

वरील सारणी वरून असे दिसून येते की, माहिती संप्रेषण तंत्रज्ञान या विषयावरील लेखांची संख्या सर्वात अधिक म्हणजे ६२ (२०.१३%) इतकी आहेत तर सर्वात कमी लेख संशोधन या विषयावरील म्हणजे २ (०.६५%) इतके आहेत.

वरील मुख्य सारणी वरून खालील प्रमाणे त्याचे उपविभाग तयार करून त्याचे विस्तृत विश्लेषणखालील सारण्यांमध्ये केलेले आहे.


### ४.२.७.१ ग्रंथालयाच्या प्रकारानुसार लेखांचे विश्लेषण

ग्रंथालयाच्या प्रकारानुसार म्हणजेच शैक्षणिक, विशेष व सार्वजनिक या प्रकारांमध्ये ग्रंथालयांची विभागणी करून जी माहिती प्राप्त झालेली आहे त्याची माहिती खालील सारणी क्र ७.१ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ८.१ ग्रंथालयाच्या प्रकारानुसार लेखांचे विश्लेषण**

| विषय | लेखांची संख्या | % |
|---|---|---|
| शैक्षणिक ग्रंथालय | २१ | ५१.२२ |
| ● शाळा | ८ | |
| ● महाविद्यालय | ६ | |
| ● विद्यापीठ | ७ | |
| सार्वजनिक ग्रंथालय | १२ | २९.२७ |
| विशेष ग्रंथालय | ८ | १९.५१ |
| **एकूण** | **४१** | **१००** |

**आलेख क्र. १२ ग्रंथालयाच्या प्रकारानुसार लेखांचे विश्लेषण**



वरील माहिती प्रमाणे ग्रंथालयाच्या प्रकारानुसार शैक्षणिक ग्रंथालयांची (Academic Library) माहिती असलेले लेख २१(५१.१२%), सार्वजनिक ग्रंथालयांची (Public Library) माहिती असलेले १२(२९.२७%) आणि विशेष ग्रंथालयाची (Special Library) माहिती असलेले ८(१९.५१%) अशा प्रकारे विश्लेषणकेले आहे.

वरील माहितीवरून असे दिसून येते की, शैक्षणिक ग्रंथालयातील सेवक वर्ग जास्त प्रमाणात लेख लिहीत आहेत. शैक्षणिक ग्रंथालयांची संख्या जास्त असल्याने व त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार नियतकालिकातील लेख लिहिणे बंधनकारक असल्याने त्याचे प्रमाण जास्त आहे.


### ४.२.७.२ ग्रंथालयातील सेवा, वाचनसाहित्य आणि संबंधित ग्रंथपालन व्यवसाय

ग्रंथालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा, वाचनसाहित्य, ग्रंथपालन व्यवसाय या उपविषयांवर प्राप्त झालेली माहिती खालील सारणी क्र. ७.२ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ८.२ ग्रंथालयातील सेवा, वाचनसाहित्य आणि संबंधित ग्रंथपालन व्यवसाय**

| विषय | लेखांची संख्या | % |
|---|---|---|
| ग्रंथालय सेवा | १२ | ३०.७७ |
| वाचनसाहित्य | १२ | ३०.७७ |
| ग्रंथपालन व्यवसाय | १५ | ३८.४६ |
| **एकूण** | **३९** | **१००** |

**आलेख क्र. १३ ग्रंथालयातील सेवा, वाचनसाहित्य आणि संबंधित ग्रंथपालन व्यवसाय**




ग्रंथालयीन सेवा व ग्रंथालयातील वाचनसाहित्य याविषयी माहिती देणारे लेख अनुक्रमे १२(३०.७७%), १२(३०.७७%) आहेत. हे सदर नियतकालिकात प्रकाशित झाले आहेत, तसेच ग्रंथपालन व्यवसायास आवश्यक गोष्टींविषयी माहिती सांगणारे १५(३८.४६%) लेख देखील प्रसिद्ध झाले आहेत.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ग्रंथपालन व्यवसायावर सर्वात जास्त लेख लिहिले गेले आहेत. याचाच अर्थ ग्रंथपालन क्षेत्रातील व्यक्ती आपल्या व्यवसायाविषयी अत्यंत जागरूक आहेत.

### ४.२.७.३ ग्रंथालयातील साधनसाहित्यांच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक


ग्रंथालयातील साधनसाहित्यांच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक की ज्यामध्ये उपयोजक अभ्यास, उपयोग अभ्यास आणि माहिती साक्षरता या विषयांवर उपलब्ध असणाऱ्या लेखांची संख्या खालील सारणी क्र. ७.३ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ८.३ ग्रंथालयाच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक**

| विषय | लेखांची संख्या | % |
|---|---|---|
| उपयोजक अभ्यास (User Study) | १३ | ३३.३३ |
| उपयोग अभ्यास (Use Study) | १५ | ३८.४६ |

| | | |
|---|---|---|
| माहिती साक्षरता | ११ | २८.२१ |
| **एकूण** | **३९** | **१००** |

**आलेख क्र. १४ ग्रंथालयाच्या वापराचे मापन करण्यासाठी आवश्यक घटक**




ग्रंथालयातील संग्रह व सेवा यांचा वापर किती प्रमाणात होत आहे व हा वापर कसा वाढवता येईल या विषयी माहितीसाठी उपयोजक अभ्यास, उपयोग अभ्यास आणि माहितीची साक्षरता या संबंधित लेख प्रकाशित केले गेले. त्याचे विश्लेषणपुढीलप्रमाणे - उपयोजक अभ्यास १३ (३३.३३%) लेख, उपयोग अभ्यास १५(३८.४६%) लेख आणि माहितीची साक्षरता ११(२८.२१%) लेख असे आहे.

वरील घटकांचा विचार करता असे दिसून येते की उपयोग अभ्यास (Use Study) या विषयांवर लेख लिहिणाऱ्या लेखकांचे प्रमाण जास्त आहे कारण ग्रंथालयातील सेवक आपल्या ग्रंथालयात असणारे वाचन साहित्य जास्तीत जास्त प्रमाणात वापरण्यात यावे याविषयी दक्ष असतात.

### ४.२.७.४ माहिती संप्रेषण तंत्रज्ञान विषयाचे विश्लेषण


सदरचा अभ्यास करताना संशोधकाला असेही आढळून आले आहे की या कालावधीत **माहिती संप्रेषण तंत्रज्ञान या** विषयावर एकूण ६२ लेख प्रकाशित झालेले आहेत.

त्यांचे उपविषयानुसार खालीलप्रमाणे विभाजन केलेले आहे. त्याची माहिती खालील सारणी क्र. ८.४ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ८.४ माहिती संप्रेषण तंत्रज्ञान विषयाचे विश्लेषण**

| विषय | लेखांची संख्या | % |
|---|---|---|
| नेटवर्क्स | १० | १६.१३ |
| ग्रंथालय संगणकीकरण | १२ | १९.३६ |
| अंकीय साधने | १० | १६.१३ |
| संप्रेषण तंत्रज्ञान | २० | ३२.२५ |
| वेब आधारीत | १० | १६.१३ |
| **एकूण** | **६२** | **१००** |

**आलेख क्र. १५ माहिती संप्रेषण तंत्रज्ञान विषयाचे विश्लेषण**




सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती तंत्रज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, त्यासंबंधीचे ६२ लेख प्रकाशित झाले आहेत. यामध्ये नेटवर्क्स १० (१६.१३%), ग्रंथालय

संगणकीकारण १२(१९.३६%), अंकीय साधने १०(१६.१३%), संप्रेषण तंत्रज्ञान २० (३२.२५%), वेब आधारीत १०(१६.१३) लेख प्रकाशित झाले आहेत.

वरील तक्त्यावरून असे आढळून येते की ग्रंथालयाच्या विकासा संदर्भात विचार करता माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर वाढला आहे. म्हणून सदर नियतकालिकामध्ये ग्रंथालयाच्या सेवा सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने आवश्यक नेटवर्क्स, ग्रंथालय संगणकीकरण, अंकीय साधने, संप्रेषण तंत्रज्ञान, वेब आधारित माहिती सांगणारे लेख सर्वात जास्त आहेत.


### ४.२.७.५ ग्रंथसूचीय परीक्षण, उल्लेख निर्देश याविषयीची माहिती

ग्रंथसूचीय परीक्षण, उल्लेख निर्देश या विषयावर एकूण ७ लेख प्रकाशित झालेले आहेत. त्यांची माहिती खालील सारणी क्र. ७.५ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ८.५ परीक्षण, उल्लेख निर्देश याविषयीची माहिती**

| विषय | लेखांची संख्या | % |
|---|---|---|
| ग्रंथसूचीय परीक्षण | ४ | ५७.१४ |
| उल्लेख निर्देश | ३ | ४२.८६ |
| **एकूण** | **७** | **१००** |

**आलेख क्र. १६ ग्रंथसूचीय परीक्षण, उल्लेख निर्देश याविषयीची माहिती**



ग्रंथसूचीय परीक्षण ४ (५७.१४%) व उल्लेख निर्देश ३(४२.८६%) असे लेखांचे विश्लेषणकेले गेले आहे. वरील माहितीनुसार असे दिसून येते की, ग्रंथालयीन साधनांची उपयोगिता मोजण्याच्या दृष्टीने आवश्यक उल्लेख निर्देश व परीक्षणे या संबंधीत माहिती सांगणारे लेख देखील सदर  त्रैमासिकात प्रकाशित झाले आहेत.


## ४.२.८ देशांप्रमाणे विश्लेषण

लायब्ररी हेराल्ड हे नियतकालिक भारतातून प्रकाशित होत असले तरी इतर देशांतील लेखकांचे लेख या नियतकालीकातून प्रकाशित होत असतात. प्राप्त झालेल्या माहितीनुसार देशांप्रमाणे विभाजन करून मिळालेली माहिती खालील सारणी क्र. ८ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ९ देशांप्रमाणे विश्लेषण**

| देशांची नावे | एकूण लेख | % |
|---|---|---|
| भारत | २८३ | ९१.८८ |
| नायजेरिया | १२ | ३.९० |
| इराण | १० | ३.२५ |
| नेपाळ | १ | ०.३२ |
| बांग्लादेश | २ | ०.६५ |
| **एकूण** | **३०८** | **१००** |

**आलेख क्र. १७ देशांप्रमाणे विश्लेषण**



लेखांचे देशांप्रमाणे विश्लेषणलक्षात घेता असे दिसून येते की सर्वात जास्त लेख हे भारत देशाशी संबंधित आहेत. भारत २८३(९१.८८%), नायजेरिया १२(३.९०%), इराण १० (३.२५), नेपाळ १(०.३२%) तर बांग्लादेश २(०.६५%) असे देशांप्रमाणे लेखांचे विश्लेषणदिसून येते.

वरील माहितीनुसार सदर त्रैमासिक भारत देशात प्रकाशित होत असल्याने जास्तीत जास्त लेख भारत देशातील ग्रंथालयीन स्थितीचा आढावा घेणारे आहेत.

**सारांश**

लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकात सन २००७ ते २०१४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या एकूण ३२ अंकांतील एकूण ३०८ लेखांचे आशय विश्लेषणवरील प्रमाणे केलेले आहे यामध्ये विविध पैलूंचा विस्तृत अभ्यास करून माहितीचे विश्लेषणकेलेले आहे. सदरच्या माहिती वरून मिळालेले निष्कर्ष व या निष्कर्षांवर आधारित शिफारशी यांची माहिती पुढील प्रकरणामध्ये दिलेली आहे.

# संदर्भ


1. Evolution of library and information science, 1965–2005: Content analysis of journal articles. (2014). *Journal of the Association for Information Science & Technology.*, *65*(7), 1446–1462.
2. Patil, Namita P., & Lihitkar, Shalini R. (2013). Content Analysis of Library Herald 2008-2011. *Research Front*, *1*(1), 55–62p.
3. Prabakaran, R., & Lihitkar, Shalini R. (2015). Websites of Astronomy and Astrophysics Libraries in India and USA : A Webometric Study. *PEARL - A Journal of Library and Information Science*, *9*(3), 199–205p.
4. Singh, K. P., & Bedi. (2014). Library Herald : A Bibliometric Study (2013-2012). *Library Herald*, *52*(1), 19–27p.
5. Sinha, S. C., & Dhiman, A. K. (2002). *Research Methodology*. New Delhi: Ess Ess Publications.
6. White, M. D., & Marsh, E. E. (2006). Content Analysis: A Flexible Methodology. *Library Trends*, *55*(1), 23–45p.

# प्रकरण ५ निष्कर्ष व शिफारशी


| क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.१ | प्रास्ताविक | १९२ |
| ५.२ | निष्कर्ष | १९२ |
| ५.३ | शिफारशी | १९४ |
| ५.४ | पुढील संशोधनाची दिशा | १९५ |

## ५.१ प्रास्ताविक

लायब्ररी हेराल्ड या नियतकालिकात सन २००७ ते २०१४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या एकूण ३२ खंडातील एकूण ३०८ लेखांचे आशय विश्लेषण वरील प्रमाणे केलेले आहे यामध्ये विविध पैलूंचा विस्तृत अभ्यास करून माहितीचे विश्लेषण केलेले आहे. सदरच्या माहिती वरून मिळालेले निष्कर्ष व या निष्कर्षांवर आधारित केलेल्या शिफारशी यांची माहिती खालील प्रमाणे दिलेली आहे.

## ५.२ निष्कर्ष

१. 'लायब्ररी हेराल्ड' या नियतकालिकामध्ये ग्रंथालयशास्त्र या विषयाची माहिती आहे. ग्रंथालय शास्त्राशी निगडीत सूक्ष्म विषयांवर अभ्यासपूर्ण ३०८ लेख सदर नियतकालिकात प्रकाशित केले गेले आहेत. (उद्दिष्ट क्र. १)

२. सदर नियतकालिकामध्ये एका लेखकाने लिहिलेल्या लेखांची संख्या (५३.९०%) जास्त आहे. म्हणजेच नियतकालिकातील लेख वैयक्तिकरित्या लिहिण्यावर जास्त भर आहे. एकाच व्यक्तीमार्फत मांडलेले संशोधन निष्कर्ष अभ्यासता येतात.

३. तीन पेक्षा जास्त लेखक असलेल्या लेखांची संख्या सर्वात कमी म्हणजे २ (०.६४) इतकी आहे. यावरून असे दिसून येते की एक, दोन व तीन लेखकांचे लेख लिहिण्यातील योगदान जास्त आहे.

४. बातम्या आणि कार्यक्रम, अहवाल हे दिल्ली लायब्ररी असोशिएशन द्वारे आयोजित केलेले कार्यक्रम व अहवाल याबाबत असल्याने ते कोणी निश्चित लेखकाने लिहिलेले नाहीत. अशा लेखांची संख्या ३९ (१२.६६) इतकी आहे.

५. सदर नियतकालिकात ग्रंथालय शास्त्राशी निगडीत तज्ञांच्या जीवनपटावर प्रकाश टाकणारे विशेष अंक प्रकाशित केले आहेत. या लेखांची संख्या सर्वात जास्त आहे. २००९ डिसेंबर मध्ये प्रो. कौला यांच्या स्मरणार्थ २२ (४५.८३) लेख प्रकाशित केले

गेले, तर प्रो. दासगुप्ता यांच्या स्मरणार्थ  सप्टेंबर २०१२ च्या खंडात २७ (५१.९२) लेख प्रकाशित केले गेले. त्यामुळे २००७ ते २०१४ या कालावधीतील सर्वात जास्त लेखांचे प्रकाशन २००९ व २०१२ या वर्षी झाले. (उद्दिष्ट क्र. २)

६. लेखांव्यतिरिक्त ग्रंथपरीक्षणे, बातम्या आणि विशेष कार्यक्रम आणि दिल्ली लायब्ररी असोसिएशनचा वार्षिक अहवाल, इतर संस्थांनी आयोजित केलेल्या कार्यशाळा, कार्यक्रम यांचे अहवाल याची माहिती सदर नियतकालिकात प्रकाशित केली जाते.

७. फक्त ग्रंथालयशास्त्रातील लेखांवर भर न देता ग्रंथालयशास्त्र व्यावसायिक व विद्यार्थी यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात याविषयी माहिती दिली जाते.

८. ग्रंथालय आणि माहिती शास्त्र व्यावसायिकांचे ग्रंथालयशास्त्राच्या विकासातील योगदान वाढण्यासाठी ग्रंथपरीक्षणे प्रकाशित केली गेली. ग्रंथपरीक्षणाद्वारे ग्रंथाबाबतची निरीक्षणे मांडली आहेत. यावरून असे दिसून येते की ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या सर्वांगीण विकासासाठी हे नियतकालिक कटिबद्ध आहे.

९. लायब्ररी हेराल्ड त्रैमासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांविषयी सहज माहिती मिळावी यासाठी २००३ पासून नियतकालिकाची ऑनलाईन ग्रंथसूचीय माहिती मिळते.

१०. ग्रंथालयाच्या विकासासंदर्भात विचार करता माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर वाढला आहे. म्हणून सदर नियतकालिकामध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाविषयी माहिती सांगणारे लेख सर्वात जास्त म्हणजे ६२ (२०.१२%) आहेत. (उद्दिष्ट ५)

११. भारताशिवाय नेपाळ, नायजेरिया, बांग्लादेश, इराण या वेगवेगळ्या देशातील लेखकांनी आपल्या देशातील ग्रंथालयीन परिस्थिती काय आहे याविषयी माहिती सादर केली आहे.

१२. 'लायब्ररी हेराल्ड' या त्रैमासिकामधील लेखक हे ग्रंथालय कर्मचारी, ग्रंथालय व्यावसायिक, ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे विद्यार्थी असल्याचे दिसून येते.

१३. ग्रंथालयातील सेवा – सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने आवश्यक उपयोजक अभ्यास, उपयोग अभ्यास, माहितीची साक्षरता यांसारख्या विषयाचे विवेचन देखील सदर नियतकालिकामध्ये दिले केले आहे.

१४. ग्रंथालयातील वाचनसाहित्य, ग्रंथालयीन सेवा तसेच ग्रंथपालन व्यवसाय या विषयी विवेचन करणारे लेख अनुक्रमे १२(३.८९%), १२(३.८९%), १५(४.८७%) इतक्या प्रमाणात आहे. म्हणजेच ग्रंथालय व्यवसाय व सेवा याचा विकास साधण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक लेख जास्त प्रमाणात नाहीत.

१५. लेखांच्या लांबीचा विचार करता असे दिसून आले की विषयच्या व्यापकतेनुसार १ ते ३४ पृष्ठ पर्यंत असे लेख लिहिले गेले आहेत. लेख हे साधारण लांबीचे आहेत. सर्व साधारणपणे जास्त लांबी (३४ पृष्ठे) असणाऱ्या लेखांमध्ये सारणी व आलेख आहेत. व्यक्तीविषयक विषयक लेखांची पृष्ठ संख्या साधारण एक किंवा दोन इतकी आहे.

१६. सदर त्रैमासिक भारत देशात प्रकाशित होत असल्याने जास्तीत जास्त लेख भारत देशातील ग्रंथालयीन स्थितीचा आढावा घेणारे आहेत.

## ५.३ शिफारशी

१. 'लायब्ररी हेराल्ड' या त्रैमासिकाविषयी सविस्तर माहिती उपलब्ध झाल्यास सदर नियतकालिकाच्या अभ्यासकाला त्याचा उपयोग होईल.

२. 'लायब्ररी हेराल्ड' त्रैमासिकाचे १९५८ ते २००२ पर्यंतचे लेख वाचकांच्या सोयीसाठी ऑनलाईन उपलब्ध व्हावेत.

३. भारतातील ग्रंथालये व विकसित देशातील ग्रंथालये यांविषयी तुलनात्मक लेख प्रकाशित व्हावेत.

४. ग्रंथालय विकास साधने व ग्रंथालयाची सेवा यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे, सरकारी धोरणे, सरकारी योजना, अनुदान यासंबंधी मार्गदर्शक लेख असावेत.

५. सदर त्रैमासिक इतर प्रादेशिक भाषांमध्ये सुद्धा प्रकाशित व्हावे.

६. ग्रंथालय संगणकीकरणासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना त्रैमासिकामध्ये नमूद केल्यास अनेक ग्रंथालयांना त्याचा उपयोग होईल.

७. ग्रंथालयांना मदत करणाऱ्या सेवाभावी संस्थांची माहिती देणारे लेख असावेत.

८. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाविषयी माहिती नियतकालिकामध्ये प्रकाशित झाल्यास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळेल.

## ५.४ पुढील संशोधनाची दिशा

प्रस्तुत संशोधनात फक्त 'लायब्ररी हेराल्ड' या त्रैमासिकाच्या ठराविक कालावधीतील खंडांचा अभ्यास केला गेला आहे. सदर त्रैमासिकाच्या इतर खंडांचा अभ्यास किंवा जुन्या व नव्या खंडांचा तुलनात्मक अभ्यास या विषयाचे संशोधन करता येईल. भारतातून प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथालय शास्त्रातील घडामोडी तसेच नवीन विषयावर चालणारे संशोधन, माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयातील वापर, ग्रंथालयासाठी उपयुक्त आज्ञावली, अंकीय ग्रंथालय, ई-स्त्रोत इत्यादींविषयी माहिती ग्रंथालयीन कर्मचारी, ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थी यांना त्यांच्या कार्यात मदत करू शकते. तसेच ग्रंथालयशास्त्रात कशा प्रकारच्या संशोधनाची तसेच सेवांची आवश्यकता आहे याविषयी माहिती मिळेल.

माहिती तंत्रज्ञान, अत्याधुनिक साधने यांद्वारे उपयोजकांपर्यंत योग्य माहिती कमी वेळात पोहोचवता येते. परंतु माहितीच्या प्रचंड साठ्यातून योग्य माहिती निवडण्यासाठी ग्रंथ, शोधनिबंध, नियतकालिके, लेख यांचे आशय विश्लेषणकरून सारांश रूपाने ते प्रसिद्ध झाले पाहिजे. याचा वापर करून ग्रंथालयीन कर्मचारी अधिक परिणामकारक सेवा देऊ शकेल. माहितीच्या साठ्यातून योग्य माहिती कमी वेळात पुरवू शकेल.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून संशोधकाने इंग्रजीतून प्रसिद्ध होणाऱ्या 'लायब्ररी हेराल्ड नियतकालिकातील लेखांचे आशय विश्लेषण२००७ -२०१४' असा विषय संशोधनासाठी निवडला. या विषयात आणखी संशोधनाला वाव आहे. पुढील विषयामध्ये संशोधन व्हावे असे अभ्यासकाला वाटते :

१. लायब्ररी हेराल्ड नियतकालिकाच्या जुन्या व नव्या खंडांचे आशय विश्लेषण

२. ग्रंथालय शास्त्रातील इतर नियतकालिकांचे आशय विश्लेषण

३. ग्रंथालय शास्त्रात सादर होणाऱ्या प्रबंधांचे आशय विश्लेषण

४. ग्रंथालयामध्ये वापरल्या जाणाऱ्या ई-साहित्याचे आशय विश्लेषण

समारोप

आशय विश्लेषणहे ग्रंथालय व माहितीशास्त्रातील संशोधनासाठी आवश्यक असणारे एक तंत्र आहे. या तंत्राच्या आधाराने विविध साधनसाहित्यामध्ये प्रकाशित होणाऱ्या माहितीचे विश्लेषणकरून या माहितीचे विविध पैलूंमध्ये मोजमाप करता येते. सदरच्या माहितीवरून नवीन संशोधकांना किंवा नियतकालिकाच्या संपादकांना कोणत्या विषयावरील लेखांना जास्त वाव आहे याची माहिती मिळते. त्याचप्रमाणे माहितीचे विश्लेषण, माहितीचे आदानप्रदान व माहितीची उपयुक्तता या व अशा अनेक उपविषयांवर संशोधन करून समाजातील विविध घटकांना माहितीचे महत्व पटवून देण्यासाठी अशा प्रकारच्या संशोधनाची गरज आहे व त्यातूनच ग्रंथालय व माहिती शास्त्र विषयाची व पर्यायाने ग्रंथालयांची उपयुक्तता समाजाला समजण्यास मदत होईल.

# संदर्भ सूची


- Ahuja, R. (2011). *Research Methods*. Jaipur: Rawat Publications.
- Archibald, M. M. & etc. (n.d.). Current Mixed Methods Practices in Qualitative Research: A Content Analysis of Leading Journals.
- Barrio Minton, C. A. & etc. (2014). Pedagogy in Counselor Education: A 10 Year Content Analysis. *Counselor Education & Supervision*, *58*, 162–177p.
- Brown, C. C. (2013). *A Practical Introduction to Content Analysis*. Statistical and Data Series presentation, Western University. Retrieved from https://youtu.be/HUKPf00Z1Ms
- Christa, C. & etc. (2014). Practitioner Response to Parental Need in Email Consultation : How Do They Match? A Content Analysis. *Child Youth Care Forum*, *43*, 553–567.
- Das, T. K. (2013). A bibliometric analysis of contributions in the journal "Library Trends." *Library Philosophy and Practice (E-Journal)*, 1–11.
- Denzil, C. (2014). *Content quality in web 2.0 services analysis, detection, systems and enhancement* (Thesis). Indraprastha Institute of Information Technology, Delhi.
- Dysart, J. (2014). *Evaluating Library & Research Services: Meaningful Measures & Measuring Impact*. Power Point Presentation, Paris.
- Evans, M. P. (2013). Men in Counseling : A Conent Analysis of the Journal of Counseling & Development and Counselor Education and Supervision 1981-2011. *Journal of Counseling & Development*, 467–474p.
- Evolution of library and information science, 1965–2005: Content analysis of journal articles. (2014). *Journal of the Association for Information Science &*

*Technology.*, *65*(7), 1446–1462.

- Giesler, M. A., & Beadlescomb, T. (2015). Elevated or Erased? A Content Analysis of the Portrayal of Men in Introduction to Social Work Textbooks. *Journal of Men's Studies*, *23*(2), 47–60p.
- Gifty, A. L., & Micheal, O.-A. (n.d.). Undergraduate Students Satisfaction with Library Services in A Faculty Library in University of Education, Winneba. Ghana. *Library Philosophy and Practice (E-Journal)*, 1–27p.
- Ginnie, B. (n.d.). *Content Analysis*.
- Hsu, M. K. & etc. (2014). Business Students' Perception of University Library Service Quality and Satisfaction. *Contemporary Issues in Education Research*, *7*(2), 137–144p.
- Jayaraj, S. (1998, September 30). *Content analysis and evaluation of English textbooks of standard XII in Tamilnadu and Kerala*. Bharathiar University, Coimbatore.
- Kager, J. (2014). *Research Methodology :Content Analysis*. Retrieved from www.youtube.com
- Kardan, A. A., Aziz, M., & Shahpasand, M. (2015). Adaptive systems: a content analyis on technical side for e-learning environments. *Springer*.
- King, T. T. & etc. (2014). What's the message? A content analysis of newspaper articles about assisted reproductive technology from 2005 to 2011. *Human Fertility*, *17*(2), 124–132.
- Kumari, P. (2016). Academic Library Services Through Social Networking Sites with Reference to Facebook. *Imperial Journal of Interdisciplinary Research (IJIR)*, *2*(2), 329–334p.
- Lalitha Bai. (2013). *Literature on Public Finance (1986-2010) : A Bibliometric*

*Analysis based on EBSCO database*. Karunya University, Tamil Nadu. Retrieved from www.shodhganga.com

- Larson, A. L., & Rahn, N. L. (2015). Vocabulary Instruction on Sesame Street: A Content Analysis of the Word on the Street Initiative. *Language Speetch and Hearing Services in Schools*, *46*, 207–221.
- Lee, C.-M. (Angela), & Taylor, M. J. (2013). Moral education trends over 40 years : A content analysis of the Journal of Moral Education (1971-2011). *Journal of Moral Education*, *42*(4), 399–429p.
- Mahesh, G., & Wadhwa, N. K. (2012). Web of Science based ranking of Indian library and information science journals. *COLLNET JOURNAL OF SCIENTOMETRICS AND INFORMATION MANAGEMENT*.
- McGary, C. B. (1989). *Library censorship : a content analysis and a pictorial model for the continued existence of school library censorship*. University of Houston.
- Mohd, D. bin S. & etc. (2011). A Survey on the Use of Library Resources, Services and Facilities: A Case Study at the Faculty of Medicine and Health Sciences, Universiti Putra Malaysia.
- Pandita, R. (2014). DESIDOC Journal of Library and Information Technology (DJLIT): A Bibliometric Study (2003-12). *Library Philosophy and Practice (E-Journal).*
- Patil, Namita P., & Lihitkar, Shalini R. (2013). Content Analysis of Library Herald 2008-2011. *Research Front*, *1*(1), 55–62p.
- Plathottam, G. (2008). *Press and its social responsibility in Northeast India a content analysis* (Thesis). North-Eastern Hill University.
- Polat, S. (2015). Content Analysis of the Studies in Turkey on the Ability of

Critical Thinking. *Educational Sciences Theory & Practics*, *15*(3), 659–670. http://doi.org/10.12738/esto.2015.3.2658

- Prabakaran, R., & Lihitkar, Shalini R. (2015). Websites of Astronomy and Astrophysics Libraries in India and USA : A Webometric Study. *PEARL - A Journal of Library and Information Science*, *9*(3), 199–205p.
- Pradhan, P., & Chandrakar, R. (2011). Indian LIS Literartue in International Journals with Specific Reference to SSCI Database : A Bibliometric Study. *Library Philosophy and Practice (E-Journal)*. Retrieved from http://unllib.unl.edu/LPP/
- Rao, B. (2005). *Research Methodology* (2nd ed.). Hyderabad: Paras Medical Publisher.
- Riahnia, N. (2009). A 2003 - 2007 Citation Analysis of Library Herald. *Library Herald*, *47*(1).
- Samantha, S. H. (2015). Connecting Individuals with Social Services: The Library's Role. *IFLA WLIC*, 1–9.
- Sampson, J. P. & etc. (2014). A Content Analysis of Career Development Theory, Research and Practice 2013. *The Career Developement Quarterly (CDQ)*, *62*, 290–326p.
- Satu, E., & Helvi, K. (2008). The qualitative content analysis process. *Journal of Advanced Nursing*, *62*(1), 107–115.
- Shavnam Kumari. (2014). *Content analysis of gender perspective in cbse textbooks of hindi english and social study of viii standard*. University of Rajasthan, Jaipur.
- Singh, K. P., & Bedi. (2014). Library Herald : A Bibliometric Study (2013-2012). *Library Herald*, *52*(1), 19–27p.

- Sinha, S. C., & Dhiman, A. K. (2002). *Research Methodology*. New Delhi: Ess Ess Publications.
- Thanuskodi, S. (2011). Library Herald Journal : A Bibliometric Study. *International Refereed Research Journal*, *2*(4), 68–76p.
- Thavamani, K. (2013). Directory of Open Access Journals: A Bibliometric Study of Library and Information Science. *Collaborative Librarianship*, *5*(4), 246–255.
- Tigga, U. P., Lihitkar, Shalini R., & Rajyalakshmi, D. (2005). Content Analysis of DESIDOC Bulletin of Information Technology (1997-2002). *DESIDOC Bulletin of Information Technology*, *25*(4), 5–11p.
- Verma, A., Sonkar, S. K., & Gupta, V. (2015). A BIBLIOMETRIC STUDY OF THE LIBRAY PHILOSOPHY AND PRATICE (E-JOURNAL) FOR THE PERIOD 2005-2014" (2015). *Library Philosophy and Practice (E-Journal)*.
- White, M. D., & Marsh, E. E. (2006). Content Analysis: A Flexible Methodology. *Library Trends*, *55*(1), 23–45p.
- Williamson, N. J. & etc. (1995). *The Library of Congress classification : a content analysis of the schedules in preparation for their conversion into machine-readable form*. Library of Congress.
- आगलावे, प्रदीप) .n.d.). संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे.पुणे .
- बापते, विशाल, आणि गेडाम ज्योती“ .(२०१६ - २०१५) .डेसिडॉक जर्नल ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या नियतकालीकाच्या सन २०१० ते ” .२०१५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या संशोधनपर लेखांचे आशय विश्लेषण ज्ञानगंगोत्री, ३(४), १८पा.

- कऱ्हाडे, बी पिंपळापुरे :नागपूर .(दुसरी) शास्त्रीय संशोधन पद्धती .(२००७) .एम . .पब्लिशर्स .आणि कं
- कुंभार, राजेंद्र :पुणे .(प्रथमावृती) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन .(२०१३) . .युनिव्हर्सल प्रकाशन
- चव्हाण, निवृत्ती ज ग्रंथालयशास्त्राच्या ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकातून .(2013) . .(शोधाप्रबंधिका) प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आशयविश्लेषणाचा अभ्यास टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
- भोसले तरुजा.श्री साई प्रकाशन :सिंधुदुर्ग .(प्रथम) संशोधन पद्धती .(२००८) .

**परिशिष्ट्ये –**छायाचित्र

**प्रो. कौला आणि दासगुप्ता यांच्या स्मरणार्थ प्रकाशित विशेष अंक**






## आशय विश्लेषणासाठी आवश्यक आज्ञावली

१. शब्दकोश आधारीत आशय विश्लेषण

| Software | Homepage | Operating System | License | Language |
|---|---|---|---|---|
| CATPAC | http://www.terraresearch.com/catpac.cfm | Windows | Commercial $595<br>Academic $295<br>Student $49 | English (ASCII only ) |
| Computer Programs for Text Analysis | http://www.dsu.edu/˜johnsone/ericpgms.html | MS-DOS | Freeware | English (ASCII only ) |
| Concordance | http://www.rjcw.freeserve.co.uk<br>http://deall.ohio-state.edu/chan.9/conc/concordance. | Windows | $89 + $10 handling fee.<br>$40 per subsequent license | English Chinese |
| Diction | http://www.sagepub.com | Windows | Commercial $189<br>Academic $129 | English (ASCII only ) |
| SPSS Text Smart | http://www.spss.com/textsmart/ | Windows | | English (ASCII only ) |

२. आशय विश्लेषण आज्ञावली

| Software | Homepage | Operating System | License | Language |
|---|---|---|---|---|
| Profiler Plus | http://www.socialscienceautomation.com | Windows | Commercial $770, $400 p.a. thereafter<br>Academic $385, $200 p.a. thereaft<br>Lite (Limited functionality) $60 | English (ASCII only ) |
| DIMAP | http://www.clres.com | Windows | Commercial $330<br>Academic (See below) | English (ASCII only ) |